म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ... निबंध
सं. क्र. 3388

संकलन–
उमा दादेगावकर

आनंद साधले: साहित्यसूची



REFBK-0026174

संदर्भ निबंध

३३८८

२६७४

२३।७।९०

आनंद साधले :
साहित्यसूची

सूचिकर्ती
डॉ. सौ. उमा दादेगावकर

प्रस्तावना
डॉ. सु. रा. चुनेकर

REFBK-0026174

मॅजेस्टिक प्रकाशन

प्रथमावृत्ती : २ मे १९९०
मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या वसंतोत्सवात;
आनंद साधले यांना 'महाकवी' पदवी देण्याच्या प्रसंगी.

© डॉ. सौ. उमा दादेगावकर
३-३-९००/४ कुतुबीगुडा,
हैद्राबाद-५०० ०२७.

प्रस्तावनेचे सर्व हक्क
डॉ. सु. रा. चुनेकर, पुणे विद्यापीठ
यांच्या स्वाधीन आहेत.

मूल्य : ६० रुपये

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेंबर्स,
गिरगांव, मुंबई-४०० ००४.

मुद्रक :
भरत काते
सरस्वती प्रिंटर्स,
क्रिएटिव्ह इंड. इस्टेट,
मुंबई-४०० ०११.

लेझरसेटिंग :
अक्षय फोटोटाइपसेटर्स,
'कुलदीपक' सुभाष पथ,
ठाणे-४०० ६०१.

मुखपृष्ठ : कमल शेडगे
मांडणी : अरुण घाटे

अनुक्रमणिका

०.०.० प्रास्ताविक / ५

१.१.० खंड पहिला

१.१.० प्रस्तावना :
सूची : स्वरूप, शास्त्र आणि इतिहास
डॉ. सु. रा. चुनेकर / १७
१.१.१ प्रस्तावनेची निर्देशसूची / ६२

२.०.० खंड दुसरा

२.१.० आनंद साधले : साहित्यसूची
२.१.१ दोषांचा धनी मी आहे
आनंद साधले / ७१
२.१.२ साधले-साहित्य : वर्णनात्मक बृहदसूची
डॉ. उमा दादेगावकर / ७३
२.१.२.० निर्देशसूची
२.१.२.१ साधले-साहित्य / १३५
२.१.२.२ प्रकाशक / १४५
२.१.२.३ मुद्रक / १४६
२.१.२.४ अर्पण / १४७
२.१.२.५ प्रस्तावनाकार / १४८
२.१.२.६ मुखपृष्ठ, मांडणी, सजावट / १४९
२.१.२.७ समीक्षक, अभिप्रायलेखक / १५०
२.१.२.८ नियतकालिके / १५२
२.१.२.९ इतर / १५७

३.०.० खंड तिसरा

३.१.० परिशिष्टे
३.१.१ आनंद साधले : जीवनपट / १६३
३.१.२ आनंद साधले : एक वेगळा माणूस / १६५
डॉ. व. गो. राजूरकर



प्रास्ताविक

उमा दादेगावकर

पीएच.डी. पदवीसाठी संशोधनार्थ 'आनंद साधले : वाङ्मयीन व्यक्तित्वाची जडणघडण' हा विषय मी घेतला तेव्हा प्रथम साधले यांच्या वाङ्मयाची एक तात्पुरती सूची तयार केली होती. तीच या वर्णनात्मक बृहद्सूचीचे मूळ आहे. प्रबंध विद्यापीठाला सादर केल्यानंतर मौखिक परीक्षा होईपर्यंतच्या काळात जी एक पोकळी जाणवते तिचे काय करावे हा प्रश्नच होता. प्रबंधातील लहानशी सूची पाहून सौ. नलिनी साधले यांनी सर्वप्रथम संपूर्ण सूचीची कल्पना सुचवली आणि या सूचीसाठी सर्व ती मदत केली. एका अर्थी या सूचीचे प्रेरणास्थान त्याच आहेत. सूचीला डॉ. सु. रा. चुनेकर ह्यांची प्रदीर्घ प्रस्तावना असणे उचित होईल हीही त्यांचीच कल्पना. सूचिशास्त्रातील मराठीचे अधिकारी असलेले डॉ. चुनेकर ह्यांच्यासारख्या विद्वानासोबत माझे नाव या सूचीच्या निमित्ताने येणे हा भाग्ययोग सौ. साधले यांनीच आणला. आभार मानलेले त्यांना आवडणार नाहीत आणि मलाही त्यांची ही प्रेरणा व साह्य केवळ उपचारापुरते मान्य करायचे नाही. तेव्हा त्यांच्याशी जडलेला हा ऋणानुबंध हृदयकोशात जपून ठेवणेच मला आवडेल.

डॉ. चुनेकरांनी मी केलेली सूची पाहिलेली नाही. मी मात्र त्यांची प्रस्तावना आधीच वाचून तीमधील सूचिकारांना केलेल्या सूचनांचे शक्यतो पालन करण्याचा प्रयत्न केला आहे. तरीदेखील सूचीत उणिवा आणि वैगुण्ये असणारच. त्याचा दोष माझ्या अल्पसमजशक्तीला द्यावा. ज्यांच्या साहित्याची ही सूची आहे त्या श्री. आनंद साधले ह्यांचे सगळ्यात जास्त आभार मानावयास हवे. सूचीला जोडलेल्या टिप्पणीत जरी त्यांनी 'दोषाचा धनी मी आहे' असे म्हटले असले तरी आपली सर्व प्रकाशित पुस्तके, प्रकाशनाधीन असलेल्या पुस्तकांची माहिती, असंग्रहित लेखांची कात्रणे यांपैकी पुष्कळसे साहित्य त्यांनीच उपलब्ध करून दिले. ग्रंथांवरील समीक्षणे आणि अभिप्राय मिळवण्यासाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा संदर्भ विभाग आणि विशेषत: श्रीमती लतिका जोशी ह्यांचे पुष्कळच मोलाचे साहाय्य झाले हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते. याशिवाय पुणे येथील जयकर ग्रंथालय, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे संदर्भ ग्रंथालय, औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथालय, नांदेड येथील

पीपल्स कॉलेजचे ग्रंथालय व हैदराबादेतील उस्मानिया विद्यापीठ ग्रंथालय आणि मराठी ग्रंथसंग्रहालय येथूनही सूचीतील सामग्री उपलब्ध झाली.

सूचिकाराला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या प्रकारच्या कामाविषयीची लोकांची अनास्था हा त्यातीलच एक भाग. समीक्षेसाठी नावाजलेल्या एका मासिकाच्या एका अंकातील एक संदर्भ कुठेही मिळत नव्हता. तेव्हा त्याची विद्युत्प्रत करून पाठवा म्हणून सगळ्या संदर्भांसह पुरेसे पैसे पाठवूनही आजवर त्यांचे काहीही उत्तर नाही ही गोष्ट पुरेशी बोलकी आहे. सूचिकारांना आस्थेने मदत करणारे हात पुढे येतील तो सुदिन म्हणावयाचा !

सूची प्रकाशित करण्याचे मॅजेस्टिकचे श्री. अशोक कोठावळे यांनी तत्परतेने मान्य केल्यामुळेच सूची करण्यामागील उत्साह दुणावला. माझ्या पूर्वीच्या पुस्तकाप्रमाणे ही सूचीही ते देखण्या स्वरूपात काढतीलच. केशवरावाच्या मागे 'मॅजेस्टिक'ची वैभवशाली परंपरा ज्या समर्थपणे ते सांभाळत आहेत व त्यातून माझ्यासारख्या अनेक अपरिचित लेखकांनाही वाव देत आहेत त्याबद्दल त्यांना द्यावेत तेवढे धन्यवाद थोडेच होतील.

साधले हे लेखक म्हणून सूचीतून प्रकट होत असले तरी त्यांचा एक व्यक्ती म्हणून परिचय होणेही आवश्यक होते. माझ्या विनंतीवरून डॉ. न. गो. राजूरकर ह्यांनी 'आनंद साधले : एक वेगळा माणूस' हा परिचयात्मक लेख लिहून दिला. याबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

माझ्या हातून काही काम व्हावे यासाठी प्रसंगविशेषी पंतोजीची कठोर भूमिकाही घेणारे माझे पती डॉ. पद्माकर दादेगावकर आणि मी लिहायला बसले की मला विचलित करायचे नाही हे समजून घेऊन घरात अलगद वावरणारी माझी दोन्ही मुले, चि. मेघदूत आणि चि. मंदार ह्यांचा निर्देश केल्याशिवाय हे ऋणगान संपवता येणार नाही.

आता थोडेसे सूचीच्या स्वरूपाविषयी :

मुख्य सूचीत साधले यांचे साहित्य कालानुक्रमे दिलेले आहे. त्यात प्रथम विभागात त्यांचे ग्रंथ व ग्रंथनिविष्ट साहित्य आहे. याच विभागात त्या त्या ग्रंथाच्या निर्देशानंतर त्या ग्रंथावर जर काही समीक्षणे व अभिप्राय आले असतील तर त्यांचीही नोंद केली आहे. ती शक्यतो परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे; पण जिथे काही माहिती उपलब्ध झाली नाही तिथे प्रश्नचिन्हे टाकली आहेत. साधले यांचा लेखनप्रवास दिसावा व त्यासोबतच त्यांच्या ग्रंथावरील मत-मतांतरे कळून ग्रंथाचा अधिक परिचय व्हावा हा हेतू तर त्यामागे आहेच, पण नियतकालिकातून होणाऱ्या मराठी ग्रंथसमीक्षेचे स्वरूपही वाचकांपुढे यावे असा या रचनेमागील हेतू आहे. त्यासाठी केवळ साधले यांच्या ग्रंथाचाच नव्हे तर त्यावरील समीक्षेचा व अभिप्रायांचाही गोषवारा देण्याचा जोखमीचा मार्ग स्वीकारला आहे. तो तटस्थपणे दिला आहे हे वाचकांना मान्य होईल अशी आशा आहे.

सूचीत प्रथम ग्रंथाची सर्वसामान्य माहिती, नंतर ग्रंथाचे अंतरंग, ग्रंथ लेखसंग्रह वा कथासंग्रह असेल तर त्या लेखांचे वा कथांचे अंतरंग आणि शेवटी ग्रंथावरील समीक्षणे व अभिप्राय यांची कालानुक्रमे नोंद केली आहे.

विभाग दोन मध्ये साधले यांच्या प्रकाशकांकडे असलेल्या ग्रंथांची नोंद केली आहे.

विभाग तीन मध्ये साधले यांचे प्रकाशित परंतु असंग्रहित लेखन नोंदविले आहे. ते कालानुसारी असून तेथेच कंसात त्याचा कथा, कविता, लेख इत्यादी प्रकारही नोंदवला आहे. तसेच संबंधित नियतकालिकाचे नावही दिले आहे.

विभाग चार मध्ये साधले ह्यांचे अप्रकाशित साहित्य आहे.

विभाग पाच मध्ये साधले ह्यांच्यावर लिहिलेले व त्यांच्याशी संबंधित असलेले साहित्य नोंदवले आहे. त्यात प्रथम लेखकाचे नाव, लेख वा ग्रंथाचे नाव, (असल्यास) नियतकालिकाचे नाव आणि काल दिला आहे.

शेवटी, अभ्यासकांच्या सोयीसाठी विविध प्रकारच्या निर्देशसूची जोडल्या आहेत. मुद्रणाच्या सोयीसाठी म्हणून निर्देशसूचीत मुख्य सूचीत वापरलेल्या विभाग क्रमांक, ग्रंथक्रमांक यांचा उल्लेख केला आहे, पृष्ठक्रमांकाचा नाही.

३.३.९००/४ **उमा दादेगावकर**
कुतुबीगुडा, हैदराबाद २७.

आनंद साधले : साहित्यसूची

१.०.०

खंड पहिला

१.१.१

प्रस्तावना

सूची :

स्वरूप, शास्त्र आणि इतिहास

डॉ. सु. रा. चुनेकर

प्रस्तुत प्रस्तावनेसंबंधी सर्व हक्क
डॉ. सु. रा. चुनेकर यांच्या स्वाधीन

अनुक्रमणिका : पहिल्या प्रस्तावना-खंडाची

प्रस्तावनेची विषयानुक्रमणी (संक्षिप्त)
विषय प्रवेश : परिच्छेद ०/१ ते ०/५ : टीपा १ ते २. (एकूण ७)
भाग पहिला : परिच्छेद १/१ ते १/४५ (१८ द्विरुक्त) : टीपा ३ ते ३१. (एकूण ५७)
भाग दुसरा : परिच्छेद २/१ ते २/३५ (२३ द्विरुक्त) : टीपा १४ ते २८. (एकूण ५१)
भाग तिसरा : परिच्छेद ३/१ ते ३/१० : टीपा २९ ते ३६. (एकूण १८)
प्रस्तावनेची संदर्भग्रंथसूची :
प्रस्तावनेची निर्देशसूची : ग्रंथ, लेख, व्यक्ती, कालिके :

प्रस्तावनेची विषयानुक्रमणी (वर्णनात्मक)

०/१ मराठीत अभ्यासकांना सूचींचे दुर्भिक्ष जाणवते. असलेल्या सूचीही अभ्यासकांना अज्ञात असतात. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अत्यंत स्पृहणीय कार्य.
०/२ महानुभाव साहित्याच्या अभ्यासातही साधन-सामुग्रीचा अभाव.
०/३ इंग्रजीसारख्या भाषेच्या तुलनेत मराठीत अभ्यास-साधनांचे दारिद्र्य.
०/४ मराठीत 'सूची' शब्दाचा सैल वापर. 'सूची' व 'कोश' यांची सरमिसळ.
०/५ कोणत्याही अभ्यासाचा आरंभ सूचीपासून आणि शेवट सूचीत.

१/१ संदर्भसूची आणि निर्देशसूची.
१/२ संदर्भसूची आधी झालेला अभ्यास दाखविते. पुनरावृत्ती व वेळ वाचविते.
१/३ संदर्भसूची नसेल तर आपणच अभ्यासाच्या आरंभी ती करायला हवी.
१/४ त्यासाठी मूल साधन म्हणजे कोशवाङ्मय व इतर सूचिवाङ्मय.
१/५ यात मिळेल तो धागा पकडून इतर धागे शोधायचे. कष्टानंतर वाटा दिसतातच.
१/६ सर्व ज्ञानकोश हे प्राथमिक धागे शोधण्याचे साधन : 'दाते ग्रंथसूची' व 'नियतकालिकसूची' म्हणजे समृद्ध ग्रंथालयेच. यात प्राथमिक धागे मिळतात.
१/७ सूचीत नोंदी कोणत्या असाव्या ?
१/८ सूचिपत्रांचे (CARDS) स्वरूप कसे असावे?
१/९ नोंदी मुळातच परिपूर्ण असाव्या. तोच संदर्भ पुन्हा शोधावा लागू नये.
१/१० नोंदीच्या क्रमाच्या पद्धती. अक्षरविल्हे, विषयविल्हे इत्यादी.

१/११ नोंदसूची व वर्णनात्मक सूची यांतील फरक.

१/१२ कमी महत्त्वाच्या नोंदी कशा कराव्या.

१/१३ सूचीमुळे लेखकाचा व्याप व आवाका स्पष्ट व्हावा. भिडे-सूचीचे उदाहरण.

१/१४ वर्णनसूचीने लेखनाचे स्वरूप स्पष्ट कळावे.

१/१५ सूचिकाराने सावध व साक्षेपी असले पाहिजे.

१/१६ टोपणनावांमुळे येणाऱ्या सूचिकार्यातील अडचणी.

१/१७ प्रत्यक्ष पुरावा नव्हेत असे विश्वसनीय आधार.

१/१८ सूचीचे कार्य निरंतर चालते. पुरेशा पूर्णतेनंतर ती प्रकाशात आणावी.

१/१८ अ. लेखकांनीच अहंकाराच्या आरोपाची भीती न बाळगता स्वत: विषयी नोंदी पूर्ण ठेवाव्या. त्यातून अभ्यासकांचे काम सोपे होते.

१/१९ प्रियोळकर-वाङ्मयसूचीचे स्वरूप.

१/२० माधवराव-पटवर्धन-वाङ्मयसूचीचे (विभाग १) स्वरूप.

१/२१ याच सूचीच्या दुसऱ्या विभागाचे स्वरूप.

१/२२ सूची हे अभ्यासाचे आनुषंगिक फलित.

१/२३ जया दडकर यांचे नमुनेदार सूचिकार्य.

१/२४ लेखसंग्रह, गौरविका, स्मरणिका यांचीही सूचिकार्याला मदत.

१/२५ नियतकालिकांच्या संचिकांच्या सूची व्हायला हव्यात.

१/२६ लेखक-प्रकाशकांच्या निष्काळजीपणाने येणाऱ्या अडचणी. पुनर्मुद्रण व आवृत्ती.

१/२७ प्रकाशनाच्या कालनिर्देशातील अडचणी.

१/२८ अडचणींची उत्तरे आपल्या अनुभवात शोधावी.

१/२९ सूची उपयुक्त असावी. शोभेची नसावी.

१/३० लेख-सार-संकलन-कार्य. त्याचे आजवरचे स्वरूप.

१/३१ अभ्यसनीय नियतकालिकांच्या अल्प प्रसारामुळे येणारी अडचण. परभाषा, परप्रांत इथे होणारा मराठीचा अभ्यास अज्ञात राहतो.

१/३२ 'मराठी संशोधन पत्रिके'ने केलेल्या कार्याचे स्वरूप.

१/३३ सार-संकलन कार्य. संकलकाला विषयाचे ज्ञान हवे. विरामचिन्हांचा काटेकोर उपयोग व मुद्रणशुद्धता यांचे महत्त्व.

१/३४ लेखन-साराच्या संभवनीय पद्धती.

१/३५ पीएच्. डी. प्रबंधांचे सार. आजवर झालेले प्रयत्न.

१/३६ सूचीचीही संकलित सूची आवश्यक.

१/३७ संदर्भसूचीमुळे विखुरलेल्या लेखनाचे एकत्रित सम्यक ज्ञान होते. लेखकावर होऊ शकणारा संभाव्य अन्याय टळतो.

१/३८ सूची हे फक्त साधन आहे. त्यांचा आयता उपयोग हा अभ्यास नव्हे. सूचींच्या आधारे स्वत:च्या अभ्यासाला परिपूर्णता आणायला हवी.

१/३९ अनेकानेक प्रकारच्या सूचींची आवश्यकता.

१/४० सूचीपुढचे पाऊल म्हणजे सूचीत लेखांचे पुन:प्रकाशन व उपलब्धी.

१/४१ समृद्ध ग्रंथालयांनी सूचिकार्य हे कर्तव्य मानावे.

१/४२ विद्यापीठांनी उत्तम सूचिकार्याला, वरच्या पदव्या देऊन, सूचिकार्याची प्रेरणाकेंद्रे बनावे.

१/४३ सूची हा अभ्यासाचा पाया. तो भक्कम असावा.

१/४४ दुय्यम दर्जाच्या साहित्यापेक्षा सूचिकार्य जास्त प्रतिष्ठित व मोलाचे.

१/४५ सूचिकार्य ही चर्चेची गोष्ट नाही, करण्याची गोष्ट आहे. 'परिसंवाद संस्कृतीत खरे, महत्त्वाचे संशोधन-कार्य होतच नाही.

२/१ निर्देशसूची हा सूचीचा दुसरा प्रकार.

२/२ मराठीत महत्त्वाच्या समीक्षाग्रंथांनाही बहुधा निर्देशसूची नसते.

२/३ खर्चाच्या दृष्टीने पाने कमी करण्यासाठी सूची टाळणे घातक.

२/४ निर्देशसूची हवीच अशा स्वरूपाचे ग्रंथ.

२/५ अशा सूचीच्या अभावाविषयी काही तक्रारी.

२/६ अशीच आणखी तक्रार.

२/७ मराठी वाचक सूची वापरण्याइतका प्रगल्भ नाही अशी समजूत.

२/८ 'कोल्हटकर लेखसंग्रहा'ची अपुरी सूची.

२/९ सूचीच्या आवश्यकतेबाबत प्रगल्भ होणारी दृष्टी.

२/१० केतकरांच्या 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण'चे उदाहरण.

२/११ महत्त्वाच्या तळटीपांचीही नोंद सूचीत असावी.

२/१२ उल्लेखांच्या नेमक्या संदर्भांची नोंद हे सूचीचे स्वरूप. अभ्यासकाचा वेळ व श्रम वाचविणे हे सूचीचे साध्य.

२/१३ सूची करणे हे केवळ शारीरकष्टाचे यांत्रिक काम नसून जाणकारीचे काम आहे.

२/१४ ग्रंथाच्या स्वरूपावरून सूचीचे स्वरूप ठरावे.

२/१५ थोडीशीही उणीव सर्व कार्यावरील विश्वास उडविते.

२/१६ सूची कशी नसावी याचे उदाहरण.
२/१७ 'नाट्याचार्य देवल'ची आदर्श सूची.
२/१८ 'वैखरी' या ग्रंथाची नमुनेदार सूची.
२/१९ 'स्वातंत्र्यवीर सावरकर – एक रहस्य'ची गाभ्याकडे नेणारी सूची.
२/२० प्रस्तावना इत्यादी, ग्रंथाला पूरक, गोष्टींचा समावेश सूचीत असावा.
२/२१ निर्देशसूचीने अभ्यासकांच्या विविध अपेक्षा भागवाव्या.
२/२२ सूचीकरण ही स्मरणाला पोषक अशी बौद्धिक वृत्ती आहे.
२/२३ निर्देशसूची करण्यासंबंधी काही स्थूल सूचना. उदाहरणासह.
२/२३ अ. सूचिपत्रे कशी करावी, कशी वापरावी.
२/२४ सूचीरचनेसाठी वर्णानुक्रम-१ दाते, २ अशोक केळकर.
२/२५ मो. रा. वाळंबे यांची समावेशक 'वर्णानुक्रम-पद्धती'.
२/२६ एकदा स्वीकारलेल्या पद्धतीचे अबाधित अवलंबन असावे.
२/२७ निर्देशसूचीचे तीन घटक : व्यक्ती, ग्रंथ, विषय.
२/२८ अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या नोंदी. त्यातील घोटाळे. अपुऱ्या नावांनी होणारे घोटाळे, उदाहरणासह.
२/२९ टोपणनावातील समानतेने झालेले कटू वाद.
२/३० एकाच व्यक्तीची अनेक टोपणनावे. अडचणी. निनावी लेखन.
२/३१ ज्ञानेश्वर, तुकाराम, अशा अतिप्रसिद्ध नावांचे निर्देश.
२/३२ टोपणनावाचे खंड करू नये. ते सलग घ्यावे.
२/३३ सूचिकरणाने अभ्यास पक्का होतो. चुका लक्षात येतात.
२/३४ तारतम्याने निर्णय घ्यावे असे काही प्रश्न.
२/३५ धोरणे तारतम्याने स्वीकारावी. त्यांचा प्रास्ताविकात निर्देश असावा व नंतर काटेकोर पालन घडावे.

३/१ सूचीचा आणखी एक वर्ग. पदसूची.
३/२ पदसूची साधारणपणे काव्याच्या प्रथम चरणांची असते. शीर्षकांच्या अनुक्रमणिकेपेक्षा ती जास्त उपयुक्त.
३/३ प्रथम चरणांच्या सूचीपेक्षाही संपूर्ण चरणांची सूची जास्त उपयुक्त. विशेषत: ज्ञानेश्वरी, गाथा, अशा ग्रंथांच्या संदर्भात.
३/४ या सूचींचा खटाटोप, खर्च, जेवढा मोठा, त्यापेक्षा उपयुक्तता जास्त मोठी.

३/५ चरणसूचीसंबंधी स्पष्टीकरणात्मक उदाहरण. सुभाषिते, सूक्ती यांच्या सूची.

३/६ लेखकाच्या, विशेष अर्थाने वापरलेल्या, शब्दांची सूची. उदाहरणासह.

३/७ अनुभवामृत आणि तुकाराम यांचे पदसंदर्भकोश.

३/८ रामदासांनी वापरलेल्या प्रत्येक शब्दाची निर्देशसूची.

३/९ शब्दकोश हे शब्दसूचीचे विकसित रूप. सूचींची आणखी उदाहरणे.

३/१० समारोप. मराठीत सूचिवाङ्मय अपुरे. पण जे आहे त्याचा तरी नीट अभ्यास झाला पाहिजे. : प्रस्तुत निबंधात फक्त दिग्दर्शनाचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्ष कामे होतील तशा अनेक वेगळ्या अडचणीही दिसतील व त्यातून मार्गही निघतील.

(प्रस्तुत विषयाक्रमणी प्रस्तावनाकारांनी केलेली नाही. अवकाशाच्या अल्पतेमुळे ती त्यांनी मुद्रणापूर्वी पाहिलेलीही नाही. उणिवांची उत्तरदायिता त्यांच्यावर नाही.)



सूची : स्वरूप, शास्त्र आणि इतिहास

सु. रा. चुनेकर

०/१ अलीकडेच (५ ऑगस्ट १९८९) आलेल्या डॉ. उषाबाई देशमुख यांच्या पत्रात त्यांनी लिहिले आहे, 'प्रियोळकर वाचावयास सुरुवात केली आहे. असे काम केले तर सूची नसल्याचे दु:ख होते. प्रियोळकरांची मिळते, पण बनहट्टी, राजवाडे, वि. ल. भावे यांची सूची होणे गरजेचे आहे.'[१] डॉ. उषाबाई देशमुखांची ही खंत, अडचण सर्वच अभ्यासकांची प्रातिनिधिक आहे. एक तरुण अमेरिकन अभ्यासक डॉ. फिलिप चार्ल्स एन्‌ग्ब्लोम पुणे विद्यापीठामधे 'Bilingualism and Literary Modernism in India : Six Bombay Poets' या विषयावर अभ्यास करीत आहेत. (नुकतेच ते येथला अभ्यास संपवून अमेरिकेला गेले. आपल्या या अभ्यासात कुणी कुणी साहाय्य केले या संदर्भात ते आपल्या अभ्यासवृत्तात लिहितात : (८ सप्टें. १९८९) '...and the Mumbai Marathi Granthasangrahalaya, most-importantly, where, with the help of the staff I was able to compile a bibliography of the relevant periodical literature in Marathi criticism as it is possible to do in the absence of Periodical guides to this literature...' अमेरिकेत अशी Bibligraphic Guides असतात, उदाहरणार्थ – 'Bibliography of Asian Studies' असे त्यांनी पुढे नमूद केलेले आहे.

०/२ लंडनच्या स्कूल ऑफ ओरिएंटल (अँड आफ्रिकन) स्टडीज्‌मधील मराठीचे प्राध्यापक डॉ. इयान रेसाईड यांनी महानुभाव मराठी ग्रंथांची वर्णनात्मक सूची केलेली आहे (BSOAS खंड २३, भा. ३, पृ. ४६४-५०७). या सूचीच्या प्रास्ताविकात, ही सूची तयार करताना काय अडचणी आल्या ते सांगताना डॉ. रेसाईड लिहितात, 'The two principle obstacles to the study of the older forms of Marathi language and literature are the shortage of definitive texts of early works and the dirth of critical bibliographies from which one might discover what texts are available and in what form they exist. ...There is, then, throughout

the whole field of Marathi studies a great need for detailed bibliographical works from which one could quickly find which texts are extant, which have been published in any form and the Ms sources on such publications.' (पृ. ४६४)[२]

०/३ अभ्यास करीत असताना पदोपदी वेगवेगळ्या प्रकारच्या सूचींची उणीव भासत असते आणि इंग्रजीतल्या समृद्ध सूचिवाङ्मयाचे नुसते अवलोकन केले तरी, प्रत्येक वेळी मनात येते, 'अशी अशी सूची मराठीत नाही. किती तरी काम व्हावयास पाहिजे.' प्रत्यक्ष नानाविध सूचींबरोबरच, सूचींचे तंत्र, स्वरूप यांची चर्चा करणारे अनेक मोठे मोठे स्वतंत्र ग्रंथ इंग्रजीतले पाहिले, म्हणजे यासंबंधी एकूणच मराठीत किती कमी विचार झाला आहे असे मनात येते.

०/४ मराठीमध्ये 'सूची' हा शब्द सैलपणाने, वेगवेगळ्या अर्थी वापरला जातो.

(अ) ग्रंथांची, नियतकालिकांतील लेखांची, एखाद्या लेखकावरील, विषयावरील लेखनाची संदर्भसूची. जसे, ''मराठी ग्रंथसूची'', ''मराठी नियतकालिकांची सूची'', ''महाराष्ट्रावरील संदर्भसाहित्याची सूची'', (''महाराष्ट्र जीवन'', संपादक, गं. बा. सरदार, खंड २, १९६०, पृ. ५७३-५९८), ''श्री ज्ञानदेव वाङ्मयसूची''.

(ब) एखाद्या ग्रंथाच्या अखेरीस दिली जाणारी त्या ग्रंथातील व्यक्ती, ग्रंथ, लेख, विषय, स्थळे इत्यादींची निर्देशसूची.

(क) शब्दसूची, काव्यसंग्रहाची प्रथम-चरण सूची इत्यादी.

'सूची' म्हणजे सुचविणारी. अभ्यासकाला, वाचकाला हवा असलेला संदर्भ नेमका कुठे आहे ते सुचविणारी ती सूची. 'सूची'चा एक अर्थ सुई, टोक. सुईच्या अग्राने जसा नेमका बिंदू दाखविला जातो, तसा सूचीने नेमका विशिष्ट संदर्भ दाखविला जातो. 'कोश' आणि 'सूची' यांच्यामध्ये काही बाबतींत जवळीक आहे, त्यामुळे कधी 'कोशा'चा उल्लेख 'सूची' म्हणून, तर कधी 'सूची'चा उल्लेख 'कोश' म्हणून केलेला आढळतो. कोशामध्ये ज्ञानाचा, माहितीचा प्रत्यक्ष संचय असतो, तसा सूचीमध्ये नसतो. परंतु वस्तुनिष्ठपणे ज्ञानसंचयाच्या दिशा दाखविण्याचे कार्य सूची करते. कोशाप्रमाणेच सूचीमध्ये नवज्ञाननिर्मिती, नवप्रतिपादन नसते. कोशाप्रमाणेच सूचीचे स्वरूपही संकलनात्मक असते.

०/५ सूची बघण्यापासून आणि सूची करण्यापासून कोणत्याही अभ्यासाचा आरंभ होतो आणि थोड्या मर्यादित, लाक्षणिक अर्थाने असेही म्हणता येईल की, सूचीकरणामध्येच अभ्यासाची समाप्ती होते.

१

१/१ जरी 'सूची' या एकाच शब्दाने उल्लेख होत असला, तरी संदर्भसूची व निर्देशसूची यांचा वेगवेगळा, स्वतंत्रपणानेच विचार करायला हवा.

१/२ संदर्भसाहित्याची सूची (किंवा संदर्भसूची) हा सूचीचा एक प्रकार. अभ्यासाला सुरुवात करताना प्रत्यक्ष आपल्या अभ्यासविषयात आधी काय काय लेखन झाले आहे याचा धांडोळा घ्यावा लागतो आणि मग त्यामधून पुढे जावयाचे असते. मगच नवीन विचार, ज्ञान यांचे प्रतिपादन करता येते. आपल्या अभ्यासविषयावरील झालेल्या पूर्वाभ्यासाचा शोध घेतल्याने जे आधी सांगितले गेले आहे तेच आपण पुन्हा सांगणे आणि सांगण्यापूर्वीच आपले सांगणे जुने होणे हे टळते. संशोधनातील आवर्त टळून अभ्यासाची प्रगती होत राहाते. अभ्यासकांचे श्रम व वेळ यांचा अपव्यय टळतो आणि या पूर्वसंचिताचा मागोवा घेत असताना त्यातूनही नव्या विचारांचे उन्मेष होतात. जुन्याचे संचयन आणि नव्याचे दिशादर्शन हे कार्य सूचीने साधते.

१/३ जर आधी कोणी सूची तयार केली असेल, तर आपले प्रारंभिक काम कमी होते, आणि आपल्याला पुढे जाता येते. एरवी आपल्यालाच अशी सूची बनवून घ्यावी लागते. आपल्याकडे एकंदरीतच अशा तयार सूची फार कमी आहेत. पूर्वसिद्ध सूचीही पूर्ण असेलच असे नाही. ती आधाराला घेऊन आपले संशोधन पुढे चालू ठेवावयाचे असते. एखाद्या लेखकाचा अभ्यास आपल्याला करावयाचा असेल, तर प्रथम त्याच्या समग्र वाङ्मयाची व त्याच्याविषयीच्या वाङ्मयाची सूची करणे आवश्यक असते. संशोधनाला आरंभ अशा सूचीकरणापासून होतो. जसजसा अभ्यास वाढत जातो, तसतशी सूचीत भर पडत जाते आणि अभ्यासाचे एक आनुषंगिक फलित म्हणून एक उत्तम, अधिक पूर्ण अशी वर्णनात्मक, समीक्षात्मक सूची तयार होते.

१/४ अभ्यासाला आरंभ करताना पहिला प्रश्न येतो तो, सुरुवातीला उपयुक्त संदर्भसाधने कुठून, कशी शोधायची ? यासाठी पहिला आधार हा सूचि-साहित्याचा असतो. आपल्या अभ्यासविषयाशी संबंधित लेखन कुठे, काय आले आहे याचा प्रथम शोध घ्यावा लागतो. यासाठी अगदी प्रारंभिक मूलसाधन म्हणजे कोशवाङ्मय व सूचिवाङ्मय. विविध प्रकारच्या सूची असतात. त्यांची माहिती घ्यावयाला हवी.

१/५ मी माझ्या पीएच.डीच्या अभ्यासाला (''डॉ. माधवराव पटवर्धन [माधव जूलियन] : वाङ्मय – दर्शन आणि चिकित्सा'') सुरुवात केली तेव्हा माझे मार्गदर्शक गुरुवर्य

प्रा. रा. श्री. जोग सरांनी मला सांगितले, ''पटवर्धनांनी काय काय वाचले असेल त्याचे टिपण मला करून द्या.'' पटवर्धनांनी काय वाचले असेल याचा तपास घेण्याच्या या निमित्ताने मला त्यांचे सर्व वाङ्मय बारकाईने वाचावे लागले, त्यांच्यावरील वाङ्मय वाचावे लागले. अभ्यासाचा आरंभ असाच करावा लागतो. अभ्यासविषयाशी संबंधित सर्व साहित्य आधी वाचावे लागते. या पहिल्या वाचनातून अनेक संदर्भ हाती येतात आणि त्या संदर्भांचा पाठपुरावा करताना आणखी संदर्भ सापडत जातात. धाग्याला धागा जुळत जातो. पत्त्यांच्या खेळातील 'नॉट ॲट होम' खेळाप्रमाणे आपल्या हातांतील संदर्भ-साहित्यावरून इतरत्रच्या संदर्भ-साहित्याचा अंदाज घ्यावयाचा असतो व ते मिळवावयाचे असते. यामधून पहिली संदर्भसूची तयार होते. प्रारंभिक माहितीसाठी संदर्भसाधने उपलब्ध असतात. पुढचा मार्ग ज्याचा त्याला काढावा लागतो. एकदा पहिली पावले पडली की, पावलांना पुढची वाट आपोआप सापडत जाते, किंवा पावले आपली वाट काढत जातात; किंवा पावले जिथून जातात तीच नवी वाट होते.

१/६ संदर्भ-साहित्य शोधून मिळविण्याचे पहिले प्राथमिक साधन म्हणजे विविध ज्ञानकोश – समग्र ज्ञानकोश, किंवा विशिष्टशाखीय ज्ञानकोश. त्याचबरोबर प्रकाशित झालेल्या विविध सूचींमधूनही प्राथमिक आधारासाठी साधन-साहित्य संकलित करता येते. मराठीमध्ये शं. ग. दाते यांची 'मराठी ग्रंथसूची' (खं. १, १९४४; खं. २, १९६१) व शं. ग. दाते, दि. वि. काळे, शं. ना. बर्वे यांची 'मराठी नियतकालिकांची सूची' (प्रथम खंड; द्वितीय खंडाचे पाच भाग) हे दोन बृहद् सूचिग्रंथ हाताशी असणे म्हणजे इ.स. १८०० ते १९५० या दीडशे वर्षांतील मराठी वाङ्मयाचे समृद्ध ग्रंथालय हाताशी असणे आहे. दाते यांची 'मराठी ग्रंथसूची' १९५० पर्यंतच्याच ग्रंथांची आहे. तिला काही मर्यादा आहेत. तिचा दुसरा खंड (इ.स. १९३८ ते १९५०) प्रकाशित होऊन अठ्ठावीस एकोणतीस वर्षे झाली. १९५० पर्यंतच्या ग्रंथसूचीलाही पुरवणी-सूची जोडली जाण्याची आवश्यकता आहे. १९५० नंतरच्या ग्रंथांची सूचीही पुढे होणे आवश्यक आहे. अशा व्यापक स्तरावर हे काम कुणी अंगीकृत केलेले नाही. पण या कामाला अंशतः पूरक म्हणून काही ग्रंथसूचींचे उपक्रम झालेले आहेत, त्यांचा उल्लेख करता येईल. कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाच्या वतीने तयार होत असलेल्या 'राष्ट्रीय ग्रंथसूची'चा एक भाग म्हणून मराठी ग्रंथसूचीही प्रकाशित होत असते. तिचे १९७० पर्यंतचे खंड निघालेले आहेत. (उपलब्धी : शिक्षण व समाजकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.) म. श्री. दीक्षित यांनी 'मराठी ग्रंथसूची : १९५९-१९६२' (प्रकाशक अ. ह. लिमये, १९६२) तयार केली आहे. १९६८ पासून अनिरुद्ध प्रकाशनचे गजानन क्षीरसागर यांनी 'प्रकाशन डायरी'चा वार्षिक उपक्रम सुरू केला आहे. गेली बावीस वर्षे ती नियमित प्रकाशित होत असून तिच्यात त्या त्या वर्षी प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी असते. या याद्यांत असावा तेवढा काटेकोरपणा असतोच असे नाही. त्या तपासून घ्याव्या लागतात. पण प्राथमिक

साधन म्हणून त्यांचाही उपयोग आहे. दीपक घारे यांनी 'मराठीतील साहित्यलेणी' (ग्रंथाली, १९८६) ही ग्रंथसूची संकलित केलेली आहे. मराठी वाङ्मयाच्या प्रारंभकाळापासून वर्तमान काळापर्यंतच्या काळातील, 'महाराष्ट्राच्या भावनिक आणि बौद्धिक विकासात मानदंड ठरलेल्या निवडक ग्रंथां'ची यादी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या २९ जून १९८६ च्या रविवारच्या अंकात प्रसिद्ध झाली होती. तिच्यावर जाहीर मतप्रदर्शन होऊन आणखी सत्तावीस ग्रंथांची पूरक यादी त्याच वृत्तपत्रातून नंतर प्रसिद्ध झाली. अशा एकूण १७७ 'मराठीतील साहित्यलेण्यां'ची ही सूची आहे. या सूचीत ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशनकाल, आवृत्ती इत्यादी तपशील आहे आणि ग्रंथाचा थोडक्यात परिचय आहे. याशिवाय 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'मराठी संशोधन पत्रिका', 'मराठीचिये नगरी' (१९४८), 'साहित्य सहकार', 'इये मराठीचिये नगरी', 'वाचनालय', 'ललित' अशा काही नियतकालिकांतूनही पुस्तकांच्या सूची प्रसिद्ध होत असत किंवा होतात. 'साहित्य सहकार' मासिकाचे (१९५१-१९७६) पंचवीस वर्षांतील या बाबतीतील कार्य मोठे आहे. आरंभापासूनच्या त्याच्या अंकांचा अभ्यास व्हावयास पाहिजे. अभ्यासाला उपयुक्त असे कितीतरी, वेगवेगळ्या प्रकारचे संदर्भसाहित्य त्यातून प्रकाशित झाले आहे. या अंकांतील सूचींमधून अनेक प्रकारच्या सूची संकलित होऊ शकतील. उदाहरणार्थ, यांतील याद्यांमधून ना. सी. फडके, वि. स. खांडेकर यांचे लेखन व त्यांच्याविषयीचे लेखन यांच्या सूची तयार होऊ शकतील, तयार व्हायला हव्यात. (पण करतो कोण?). 'मराठी संशोधन पत्रिके'तून अ. का. प्रियोळकरांनी संशोधनोपयोगी विविध सूची प्रसिद्ध केल्या. १९६८ ते १९७३ या काळातील अंकांतून अशा अनेक सूची किंवा इतर संकलित संदर्भसाहित्य देण्याचा योजनापूर्वक प्रयत्न करण्यात आलेला आहे. अनेक व्यक्तिसूची तिच्यातून प्रकाशित करण्यात आल्या. अशा सुट्या सुट्या सूची एकत्र करून त्यांची विषयानुसार, कालानुसार संकलित समग्र सूची तयार करता येईल. ग्रंथालय क्षेत्रातील एक ज्येष्ठ कार्यकर्ते गो. रा. परांजपे हे मराठी नियतकालिकांच्या विशेषांकांची सूची तयार करीत आहेत.[३]

प्रकाशक आपल्या वार्षिक किंवा एकूण प्रकाशनांच्या सूची प्रकाशित करीत असतात. व्हीनस प्रकाशन, कॉण्टिनेण्टल प्रकाशन अशा प्रकाशनसंस्थांनी आपल्या रौप्य/सुवर्ण महोत्सवप्रसंगी आपल्या प्रकाशनाच्या समग्र सूची प्रकाशित केल्या आहेत. परदेशात विक्रेतेही आपल्या दुकानातील पुस्तकांच्या सूची प्रकाशित करीत असतात.

'पाश्चिमात्य देशांत फार मोठ्या संख्येने मासिके, पुस्तके प्रकाशित होतात. ती सगळीच्या सगळी नजरेखालून घालायचे म्हटले तर ते प्राय: अशक्यच आहे. त्यामुळे जाहिरातींवर अवलंबून राहावे लागते. तथापि एखाद्या पुस्तकाची जाहिरात वाचकाने वाचली तरी ते मिळवायचे कसे हा यक्षप्रश्न त्याच्यासमोर उरतोच. याच्यावर तोडगा काढण्यासाठी ब्रिटनमध्ये वॉटरस्टोन नावाच्या पुस्तकविक्रेत्याने एक नामी शक्कल लढवली आहे. या वॉटरस्टोनच्या मालकीची अनेक पुस्तक-भांडारे आहेत. अनेक शहरांत व गावांत ती वसलेली आहेत. वॉटरस्टोनने पुस्तकांची

एक सूची तयार केली. सूचीचे नाव 'गाइड टु बुक्स – ऑन ऑर्डरिंग सर्व्हिस फॉर रीडर्स' (पुस्तकांचा मार्गदर्शक –पुस्तके ज्यांना विकत घ्यायची असतील, त्यांनी दुकानदाराकडून ती कशी मागवावीत यासाठी साहाय्य). ही सूची प्रसिद्ध झाली आणि वाचकांनी त्या सूचीला प्रचंड प्रतिसाद दिला. गत वर्षीचा अनुभव हिशेबात घेऊन या वर्षी मागल्या वर्षापेक्षाही जास्त पुस्तकांची दुसरी सूची प्रसिद्ध होणार आहे. या सूचीत साधारण पन्नास हजार नावे झळकतील. ही सर्व पुस्तके टपालामार्फत मागवता येतील.' ('नवी क्षितिजे', अं. ४१, नोव्हेंबर १९८९, पृ. १७१-१७२. एका दुकानदाराने 'ॲनिमल फार्म' ही कादंबरी शेतकी विभागात टाकली होती ही याच टिपणातील माहिती वाचल्यावर 'सुरत संग्राम' कामशास्त्र विभागात टाकल्याच्या आपल्याकडील प्रकाराबाबत हसायला नको.)

१/७ संदर्भ-ग्रंथ-सूचीमध्ये ग्रंथाचे नाव, लेखकाचे नाव, प्रकाशक, प्रकाशनस्थळ, प्रकाशनकाल, आवृत्ती, पुनर्मुद्रणे, पृष्ठसंख्या, किंमत एवढ्या किमान नोंदी असाव्यात. मुद्रक आणि मुद्रणस्थल यांचीही नोंद 'ग्रंथसूची'त असते. संदर्भसूचीचे स्वरूप व उद्दिष्ट यांच्यावर अशी नोंद असावी की नसावी हे ठरते. वाङ्मयप्रकारानुसार जर नोंदींची वर्गवारी केली तर, ग्रंथ कोणत्या वाङ्मयप्रकारातील आहे हे सहजच समजते. तसे नसल्यास वाङ्मयप्रकाराची नोंद करावी. या माहितीपैकी एखादी माहिती उपलब्ध नसेल, तर त्या जागी प्रश्नचिन्ह ठेवावे. ग्रंथाचे हे किमान वर्णन म्हणजे त्याचा पत्ता असतो. या संदर्भसूचीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकाला संदर्भित ग्रंथाचा पत्ता लागावा, तो मिळविता येण्याची सोय व्हावी हे या नोंदींचे साध्य आहे. पृष्ठसंख्या देत असताना ग्रंथात जर प्रस्तावनेचे पृष्ठांक व मुख्य ग्रंथाचे पृष्ठांक हे वेगवेगळे असतील, तर त्याप्रमाणे नोंद करावी. (अलीकडे प्रस्तावनेला पृष्ठांक न देण्याची नवीच प्रथा काही चांगल्या चांगल्या प्रकाशकांच्या ग्रंथात दिसावयाला लागली आहे; हे कशासाठी, कळत नाही. अशा प्रस्तावनेतील संदर्भ द्यावयाचा असला तर तो कसा देणार? आपल्या ग्रंथाला संदर्भमूल्य आहे हेच कदाचित त्या प्रकाशकांना मान्य नसावे.)

१/८ संदर्भलेखांची सूची करताना ९ सें.मी. x १४ सें.मी. आकाराचे सूचिपत्र घ्यावे. सूचिपत्रावर पुढील माहितीची नोंद असावी. लेखाचे शीर्षक, लेखकाचे नाव, नियतकालिकाचे नाव, प्रकाशन-वर्ष व अंक, प्रकाशन-काल (इसवी सन, महिना), पृष्ठांक. पृष्ठांक देताना आरंभ, अखेर असे दोन्ही द्यावेत. लेखाचे मोल जरी पृष्ठसंख्येवर नसले, तरी त्या लेखाचे महत्त्व सामान्यपणे पृष्ठसंख्येवरून ध्यानात येऊ शकते. नियतकालिकांच्या कालनिर्देशाबाबत एक अडचण येण्याची शक्यता असते. नियतकालिकाचा नियत प्रकाशनकाल एक असेल, पण प्रत्यक्ष प्रकाशनकाल वेगळा असेल. (उन्हाळी अंक हिवाळ्यात हाती पडत असतो. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे मोघम कालनिर्देश करण्याची 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाने

नावीन्य म्हणून अंगीकारलेली पद्धतीही घोटाळ्याची आहे. कालनिर्देश स्वच्छ, बोधक असावेत. जबाबदार संशोधकीय नियतकालिके नियत प्रकाशनकाल व प्रत्यक्ष प्रकाशनकाल या दोहोंचा निर्देश करतात. के. नारायण काळे यांच्या संपादकीय काळात 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'वर असे दुहेरी कालनिर्देश असावयाचे; जसे, वर्ष ३९, अंक १५५, ऑक्टोबर-डिसेंबर १९६५, प्रकाशन २३ मार्च १९६६. लेख जर पुस्तकात समाविष्ट असेल तर 'समाविष्ट' म्हणूनही नोंद करावी. नियतकालिकाच्या उपलब्धीपेक्षा पुस्तकाची उपलब्धी सामान्यत: अधिक सुलभ. मात्र नियतकालिकातील लेख पुस्तकात घेताना त्याच्यावर काही संस्करण झाले असण्याचीही शक्यता असते. तेही तपासून तसे असल्यास त्याचा निर्देश असावा. काही सूचींमध्ये ग्रंथ/नियतकालिक यांच्या उपलब्धिस्थानाचीही नोंद असते. विशेषत: दुर्मिळ साहित्याच्या बाबतीत अशी नोंद उपयुक्त ठरते. 'मराठी नियतकालिकांच्या सूची'त अशी उपलब्धि – नोंद आहे. उदाहरणार्थ, एक नोंद देता येईल : 'चानी आणि खानोलकर', जया दडकर, 'सत्यकथा', व. ४९, अं. ३, जानेवारी १९८२; पृ. १९-२५. [समाविष्ट, ''चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात'', जया दडकर; प्रकाशक : जया दडकर, मुंबई ४; १६ जून १९८३.] सूचीमध्ये विरामचिन्हे (कवितेप्रमाणेच) अतिशय अर्थपूर्ण असतात आणि त्यांचा काटेकोर वापर करणे महत्त्वाचे असते. कमीत कमी जागेत जास्तीत जास्त माहिती नमूद करून ठेवणे हे सूचीचे एक महत्त्वाचे साध्य असते.

१/९ या ठिकाणीच हे ध्यानात ठेवावे की, या नोंदी संशोधनाच्या कामाला आरंभ केल्यापासून त्याच्या समाप्तीपर्यंत उपयोगी पडणाऱ्या असतात, आणि या दोन टोकांच्या दरम्यान पुष्कळ अंतर जाण्याचा संभव असतो. तेव्हा प्रथमपासूनच या नोंदी पूर्ण स्वरूपात कराव्यात. प्रारंभी एखादी नोंद कामचलाऊ, अपुरी केली असल्यास पुढे तिच्या प्रत्यक्ष निर्देशाच्या वेळी ती पुन्हा सहज उपलब्ध होईलच असे नाही आणि एकाच कामासाठी दोनदा दोनदा वेळ घालवावा लागावा हेही युक्त नाही. पूर्वी उपलब्ध झालेली नोंद मग तशीच अपुरी ठेवावी लागते, किंवा गाळून तरी टाकावी लागते. संशोधन ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे याचे भान सुरुवातीपासूनच ठेवायला हवे.

१/१० संदर्भसूचीत ग्रंथादिकांची आणि पुस्तकादिकांची नोंद करीत असताना त्यांचा अनुक्रम कसा लावावा याचा निर्णय घ्यावा लागतो. हा क्रम (अ) केवळ अकारविल्हाने, (ब) विषयवारीने, किंवा (क) कालानुक्रमाने लावता येतो. प्रत्येक पद्धतीला काही उपयोग, काही मर्यादा असतात. अभ्यासाचे जे स्वरूप आणि उद्दिष्ट असेल, त्यानुसार हा क्रम ठरवावा. त्यात पूर्ण काटेकोरपणा ठेवणे कठीण असते. तांत्रिक काटेकोरपणापेक्षा सोय, उपयोगक्षमता, सुलभ उपलब्धिक्षमता या गोष्टी अधिक महत्त्वाच्या असतात. अकारविल्हे क्रम नोंद सापडायला

सुलभ ठरण्याचा संभव असतो. सलग कालानुक्रमी सूची लेखकाचा, त्याच्या प्रज्ञेचा, प्रतिभेचा विकास कसा झाला, त्याच्या वाङ्मयीन वाटचालीचा प्रवास कसा झाला हे समजण्यासाठी, त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची एकसंधता व विकसनशीलता ध्यानी येण्यासाठी उपयुक्त ठरते. विषयानुक्रमे वर्गवारी करून त्यामध्ये कालानुक्रमाने मांडणीही करता येते, आणि तीही उपयुक्त ठरते.

१/११ एखादा लेखक, साहित्यकृती, नियतकालिकातील लेख, वाङ्मयप्रकार, विषय यांच्यावरील वाङ्मयाची संदर्भसूची दोन प्रकारची असते. एका प्रकारच्या संदर्भसूचीत या वाङ्मयाची केवळ नोंद असते.[४] संदर्भसूचीचा दुसरा प्रकार, वर्णनात्मक (व कधी समीक्षात्मक) संदर्भसूची – लेखकाच्या स्वत:च्या वाङ्मयाची व त्याच्यावरील वाङ्मयाची वर्णनात्मक सूची. लेखकाचे ग्रंथ, त्याचे स्फुट-लेख या सर्वांचे अतिशय थोडक्यात पण नेमके सार अशा वर्णनसूचीत दिलेले असते. त्यात जे काही आलेले असेल ते अशा संदर्भसूचीत सूत्रबद्ध रीतीने दिलेले असते. यामध्ये आवश्यक तेथे पूरक संदर्भ दिलेले असतात, जरुरीपुरते भाष्य असते. त्या लेखकाच्या स्वत:च्या वा दुसऱ्याच्या लेखनाशी काही अनुबंध, अन्वय असला तर तो स्पष्ट केलेला असतो. अशा वर्णनात्मक सूचीमध्ये त्या लेखकाविषयी जे जे वाङ्मय उपलब्ध असेल, त्या सर्वांचा समावेश अत्यंत सूत्ररूपाने करण्याचा प्रयत्न असतो. अशा सूचीचे मोल संशोधनात्मक व समीक्षात्मक असे दुहेरी असते. अगदी थोडक्यात नेमका सारांश सांगणे, भाष्य करणे, पूरक संदर्भ देणे हे अतिशय अवघड काम असते. अशी सूची कधी पूर्ण वस्तुनिष्ठ, निव्वळ त्या ग्रंथात, त्या लेखात काय आहे एवढेच सांगून थांबणारी असते. कधी त्यामध्ये सूचिकार अभ्यासकाचे भाष्य, समीक्षा असते. भाष्य किंवा समीक्षा करतानाही मूळ लेखाचा यत्किंचित विपर्यास होऊ नये याची दक्षता सूचिकाराने घेतलीच पाहिजे. नुसते यांत्रिक पद्धतीने करण्याचे हे काम नव्हे. त्यासाठी सूचिकाराला त्या विषयाचा चांगला अभ्यास, त्या विषयाचे उत्तम आकलन असावयाला हवे. अशा वर्णनात्मक सूचीमध्ये फार थोड्या अवकाशात लेखकाच्या व त्यावरच्या वाङ्मयाचे समग्र दर्शन घडते. थेंबामध्ये हे आकाशाचे प्रतिबिंब असते. अशा वर्णनात्मक संदर्भसूचीच्या कालानुसारी मांडणीमुळेही समीक्षेचा इतिहास, विकास, बदलती वाङ्मयीन मूल्ये यांचीही धावती कल्पना येते. लेखकाच्या वाङ्मयीन कर्तृत्वाबरोबरच त्याच्या वाङ्मयीन विकासाचा आलेख दिसावा असाही हेतू कालानुक्रमी मांडणीत असतो.[५]

१/१२ कधी काही लेख, ज्यांची दखल घ्यावी, अशा पात्रतेचे नसतात. त्यांची नोंद संदर्भसूचीत करावी का ? संदर्भसूचीत लेखाची नोंद झाल्यावर अभ्यासक त्या लेखाचा शोध स्वाभाविकपणेच घेणार, आणि तो लेख मिळाल्यावर आणि तो सुमार आहे असे लक्षात

आल्यावर, त्याचा वेळ, मेहनत ही वाया गेली असे त्याला वाटणार. पण सूचिकाराने असा विचार करून ती नोंद अजिबातच गाळून टाकणे युक्त होणार नाही. संदर्भसूची वर्णनात्मक – समीक्षात्मक असली म्हणजे अभ्यासकाला त्या नोंदीवरूनच कळू शकेल की, ती नोंद सामान्य आहे, आणि मग तो सहसा त्या नोंदीचा शोध घेण्यामागे जाणार नाही. सूचिकाराने आपली सूची अधिकाधिक व्यापक, समावेशक करण्याचीच दृष्टी ठेविली पाहिजे.

१/१३ लेखकाचे लेखन ज्या प्रकारचे असेल त्यावरून त्याच्या वाङ्मयाच्या सूचीचे स्वरूप ठरेल. मी केलेल्या बाळकृष्ण अनंत भिडे यांच्या वाङ्मयाच्या वर्णनात्मक सूचीमध्ये सूचीचे दोन भाग केले आहेत. पहिल्या विभागात त्यांचे ग्रंथ, संपादने यांची नोंद केली आहे. दुसऱ्या विभागात त्यांचे स्फुटलेख, परीक्षणे यांची नोंद केली आहे. त्यामध्ये शक्य तो कालानुक्रम सांभाळला आहे. (बाळकृष्ण अनंत भिड्यांच्या कवितांची माझी सूची स्वतंत्र आहे.) पुस्तके, लेख यांचे त्रोटक सारांश दिले आहेत. संपूर्ण पुस्तक किंवा दीर्घ लेख यांचे त्रोटक सार सांगताना त्याला अपरिहार्यपणे मर्यादा पडतात. सारांशावरून पुस्तकाचे अथवा लेखाचे स्वरूप समजावे, तसेच, एकाच विषयाची चर्चा (कधी लेखविषयावरून लक्षात न येणारी) आणखी कुठे कुठे आली आहे ते समजावे असा हेतू असतो. केवळ सारांश वाचीत असतानाही लेखकाच्या समग्र लेखनाचा, अभ्यासाचा, विचारांचा व्याप लक्षात यावा.

१/१८ वर्णनात्मक सूचीमुळे लेखाचे स्वरूप नेमके कळते. लेखाच्या नुसत्या शीर्षकावरून त्याच्या विषयाचा नीट बोध होतोच असे नाही. 'मराठी संशोधन पत्रिके'च्या जुलै १९७२ च्या अंकात 'सूचिसाहित्य' हा भ. श्री. पंडितांचा लेख आला आहे. पण तो सूचिसाहित्यावरचा केवळ सर्वसामान्य लेख नसून त्या लेखात प्रामुख्याने श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्याशी संबंधित संदर्भसूची कशी असावी, कोणत्या नोंदी तिच्यात यावयास हव्यात याचा तपशील आहे. हा लेख उपयुक्त आहे तो श्रीपाद कृष्णांच्या अभ्यासाला.

१/१५ प्रा. पंडितांच्या याच लेखात सूचिकाराला कसे सावध, साक्षेपी असले पाहिजे याची सूचना देणारा एक उल्लेख आहे. 'मासिक मनोरंजन'च्या जानेवारी १९०६ च्या अंकात केशवसुतांवर विस्तृत मृत्युलेख आहे. तेथे लेखकाचे नाव नाही. त्याच मासिकाच्या १९१८ जुलै ते ऑक्टोबर अंकांत न. शं. रहाळकरांचा 'केशवसुत आणि त्यांची कविता' हा टीकात्मक प्रबंध क्रमशः प्रकाशित झाला आहे. १९१९ साली तो ग्रंथरूपाने प्रकाशित झाला. त्याला 'किरातां'ची प्रस्तावना आहे, आणि किरातांनी जानेवारी १९०६ च्या 'मासिक मनोरंजना'तील केशवसुतांवरील लेख आपला आहे असे स्पष्ट केले आहे. सूचिकाराला हे माहित असेल तर तो नेमका संबंध देऊ शकेल.

१/१६ लेखक कधी टोपणनाव घेऊन लेखन करतो. कधी एकच लेखक अनेक टोपणनावे घेतो. कधी एक टोपणनाव अनेक लेखक घेतात. अशा वेळी आपल्या अभ्यासाचा विषय असलेल्या लेखकाचे लेखन कोणते याचा निर्णय करणे गुंतागुंतीचे ठरते; ते एक आव्हान ठरते. या ठिकाणी अभ्यासकाची जाणकारी, मर्मदृष्टी यांचा कस लागतो. अवांतर साधनांच्या आधारानेही हा शोध घेता येतो. विसाव्या शतकाच्या पहिल्या चरणातील एक प्रमुख समीक्षक बाळकृष्ण अनंत भिडे यांचे अनेक लेख, विशेषत: आरंभीच्या काळातील, 'B' या टोपणनावाने लिहिलेले आहेत. ते लेख भिड्यांचेच असल्याची प्रमाणेही दाखविता येतात. पण काही लेख 'B' याच टोपणनावाने आणखीही कुणी लिहीत असावे. ('BEE' या टोपणनावाने कविता करणारे नारायण मुरलीधर गुप्ते पुन्हा वेगळेच.) अशा वेळी सूचीत नोंद करताना गोंधळ निर्माण होण्याचा संभव असतो. उलट असेही घडते की, ''टीका, टीकाकार व टीकेचे विषय'' या 'श्री सरस्वती मंदिर' मासिकातील (व. ६ अंक ४, ५, ६, स्वतंत्र पृष्ठे १-५४) लेखकाचे नाव नाही. पण हा लेख भिड्यांचा असल्याचा उल्लेख 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवका'त (खं. ४, पृ. १४७) गं. दे. खानोलकरांनी केला आहे. भिडे यांच्या वाङ्मयसूचीत तो लेख या आधारावर नोंदविला गेला. पण ती सूची प्रकाशित झाल्यावर म. म. दत्तो वामन पोतदारांनी पत्रातून कळविले : (२० मे १९६९) ''सदरील विस्तृत लेख बा. अ. भिड्यांचा नाही; वासुदेव दामोदर मुंडले यांचा आहे. ही माहिती प्रत्यक्ष मुंडले यांनीच सांगितली होती.'' (मराठी संशोधन पत्रिका, व. १७, अं ४, जुलै १९६९) अशा उदाहरणावरून लेखाचा लेखक नक्की ठरविणे आणि सूचीत त्याची नोंद करणे कसे गुंतागुंतीचे आहे हे लक्षात येईल.

१/१७ ग्रंथसूचीतील ग्रंथांच्या नोंदी, लेखसूचीतील लेखांच्या नोंदी स्वत: ग्रंथ, लेख पाहून कराव्यात हे खरेच. पण कधी कधी ग्रंथ, लेख, प्रत्यक्ष पाहावयाला मिळत नाहीत; पण त्यांचा विश्वसनीय उल्लेख मिळतो. समकालीन वृत्तपत्र-नियतकालिकांतील जाहिराती; 'पोच', 'स्वागत' अशा सदरांतील उल्लेख, अभिप्राय, परीक्षणे यामध्ये असे उल्लेख आढळतात. अशा वेळी अशा ग्रंथांची नोंद करून ठेवणे इष्ट होईल. स्वत:ला बघायला न मिळालेल्या, पण विश्वसनीय आधारावर माहिती मिळालेल्या ग्रंथांच्या नोंदीमध्ये काही खूण करून ते निर्दिष्ट करावेत; किंवा स्वतंत्र परिशिष्टात द्यावेत, म्हणजे कालांतराने ते नामशेष न होता पुढील अभ्यासकांच्या संशोधनाची दिशा खुली राहाते. शं. ग. दाते यांना असे अनेक उल्लेख मिळाले असण्याची शक्यता आहे. पण ग्रंथ बघितल्याशिवाय त्याची नोंद न करण्याच्या त्यांच्या (रास्त) धोरणामुळे अशा ग्रंथांच्या नोंदी राहून गेल्या असतील. त्यामुळे पुढील शोधाचा मार्ग बंद झाला.

१/१८ काही वेळा लेखांचेही परोक्ष संदर्भ मिळतात, पण प्रत्यक्ष तो लेख बघावयास मिळत नाही. अशा लेखांची, संदिग्ध, शंकास्पद उल्लेखांची नोंद प्रस्तावनेत करून ठेवावी. हे माहितीचे कण असतात. ते वेळीच साठवून ठेवले नाहीत तर वाऱ्यावर उडून नाहीसे होण्याची शक्यता असते. मिळतील त्याप्रमाणे, तसे स्पष्ट करून, त्यांची नोंद करून ठेविली म्हणजे त्यांचा पुढे शोध घेण्याची शक्यता राहाते. सूचीमध्ये सूचिकर्त्याचा प्रयत्न उपलब्ध, विश्वसनीय जास्तीत जास्त माहिती नोंदवून ठेवण्याचा असावा. मिळालेले अपुरे संदर्भही, तशी स्पष्ट नोंद करून, टिपून ठेवावेत. सूची ही स्वरूपगत्याच अंतिम, परिपूर्ण कधी नसतेच. जास्तीत जास्त निर्दोषित्वाचा, परिपूर्णतेचा उद्देश ठेवावा; आणि तसे प्रामाणिक प्रयत्न करावेत. सूचीत भर पडत जात असते आणि त्या अनुरोधाने ती सुधारून, वाढवून घ्यावी लागत असते. परंतु झाली आहे तेवढी सूची उपयुक्त आहे अशी स्वत:ची खात्री झाल्यावर ती प्रसिद्ध करावी. प्रारंभिक, पायाभूत सूची तरी यामधून तयार होते. एकदा पहिली, आधारभूत सूची तयार झाली की, नंतरच्या अभ्यासकांनी तिच्यात आपल्या अधिक माहितीची भर घालावी, तिच्यातील अपुरेपणा दूर करावा आणि अशा प्रक्रियेतून ती अधिकाधिक पूर्ण होत जावी अशी अपेक्षा असते. सूचीचे कार्य निरंतर चालणारे असते.

१/१८अ मी केलेल्या सूचीतील एक दोन सूचींचा थोडा तपशील नमुन्यादाखल सांगावयास हरकत नाही. माझी अ. का. प्रियोळकर यांच्या वाङ्मयाची सूची आहे.[६] अ. का. प्रियोळकरांसारखे दीर्घ काल आणि विपुल व विविध प्रकारचे, विविध ठिकाणी लेखन करणारे जे लेखक असतात, त्यांच्या लेखनाची सूची करणे कठीण होते. त्यासाठी पुष्कळ शोध घ्यावा लागतो. खरे तर त्या त्या लेखकांनीच आपल्या लेखनाची व्यवस्थित नोंद ठेवली तर पुष्कळसे काम होणार आहे. अनेकदा इतर लेखकांच्या लेखनाची साक्षेपाने नोंद ठेवणाऱ्याकडे स्वत:च्या लेखनाची मात्र व्यवस्थित नोंद असत नाही. स्वत:च्या लेखनाची नोंद स्वत:च ठेवण्यामध्ये अहंकाराचा भाग असतो असे नाही. ही अभ्यासकाची वस्तुनिष्ठ दृष्टी असते. (आणि एवढा अहंकार असावा की!) प्रा. प्रियोळकरांनीच आपल्या 'प्रिय आणि अप्रिय' (१९६५) या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, 'यांपैकी (त्यांच्या वेगवेगळ्या विषयांवरील लेखांपैकी) संशोधनात्मक लेख सोडून इतर बहुतेक वाङ्मय निनावी किंवा टोपणनावाने असल्यामुळे ते शोधून काढणे बरेचसे कठीण व कष्टाचे काम आहे.'

१/१९ प्रा. प्रियोळकर यांच्या वाङ्मयाची सूची करताना तिच्यात पुढीलप्रमाणे धोरण ठेवलेले आहे : प्रथम प्रा. प्रियोळकरांच्या ग्रंथांची नोंद केली आहे. या नोंदी ग्रंथनामाच्या अकारविल्हाने केल्या आहेत. त्यानंतर त्यांच्या मराठी लेखांच्या नोंदी केल्या आहेत. या नोंदी नियतकालिकांनुसार केल्या असून नियतकालिकांच्या क्रमात अकारविल्हे क्रम ठेवला आहे आणि

त्या त्या नियतकालिकातील लेखांचा क्रम त्यांच्या प्रकाशनकालानुसार ठेवला आहे. ज्या लेखांचे संदर्भ अपुरे मिळाले, त्यांच्या नोंदी त्या त्या नियतकालिकातील कालानुक्रमाने नोंदीच्या शेवटी अकारविल्हाने केल्या आहेत. ग्रंथांतर्गत लेखांच्या नोंदी त्या त्या ग्रंथाच्या प्रकाशनकालाच्या अनुक्रमे केल्या आहेत. मराठी लेखांच्यानंतर इंग्रजी लेखांच्या नोंदी केल्या आहेत. त्याही नियतकालिकांतील लेख, ग्रंथांतर्गत लेख, संदर्भित लेख अशा क्रमाने केल्या आहेत. त्यानंतर हिंदी व गुजराथी लेखांच्या नोंदी केल्या आहेत. गद्य-लेखनाच्या नोंदींनंतर प्रियोळकरांनी लिहिलेल्या कवितांच्या नोंदी त्या कवितांच्या प्रकाशनकालानुसार केल्या आहेत.

१/२० माझ्या ''डॉ. माधवराव पटवर्धन : वाङ्मयसूची'' (१९८३) चे धोरण त्या सूचीच्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. येथे थोडक्यात तिचे स्वरूप सूचीची कल्पना येण्यापुरते सांगण्यासारखे आहे. त्या सूचीचे दोन विभाग आहेत : पहिला विभाग डॉ. माधवराव पटवर्धन यांच्या वाङ्मयाचा. यात पुढील पोटविभाग आहेत. अ. ग्रंथ (१) गद्य. (२) पद्य – दीर्घ काव्ये, भाषांतर, स्फुट काव्ये. ब. लेख, पत्रे, भाषणे, वगैरे. (१) स्वत:संबंधी लेख. (२) स्वत:च्या काव्यकृतींविषयी प्रस्तावना, लेख, इत्यादी. (३) भाषांतरे. (४) टीकालेख. [अ] आधुनिक मराठी कविता. [ब] कविपरिचय व टीका. [क] काव्यचिकित्सा. [ड] परीक्षणे-अभिप्राय. [इ] प्रस्तावना. (५) सुनीत-गज़लविषयक लेख. (६) पद्यरचनाशास्त्रविषयक लेख. (७) रसविचार आणि वाङ्मयानंदमीमांसा. (८) भाषाशुद्धि. (९)लेखनशुद्धि. (१०) संकीर्ण. (११) काही महत्त्वाची पत्रे : व्यक्तिगत व प्रकट. (१२) इंग्रजी लेख. (१३) काही महत्त्वाची भाषणे.

१/२१ दुसरा विभाग डॉ. माधवराव पटवर्धनविषयक वाङ्मयाचा आहे. यात पुढील पोटविभाग आहेत. (अ) ग्रंथ. (ब) नियतकालिकांचे विशेषांक. (क) लेख. (१) आठवणी. (२) व्यक्ती आणि वाङ्मय. (३) वाङ्मय-कृतींवरील परीक्षणे व अभिप्राय. (४) पत्रे. (५) पटवर्धनविषयक ग्रंथांतील उल्लेख. (६) पटवर्धनविषयक पुस्तकांवरील परीक्षणलेख. (ड) इतर. (१) पटवर्धन-स्मृतिदिन-भाषणे. (२) पटवर्धन यांच्यावरील काही कविता. परिशिष्टामध्ये माधव जूलियन यांच्या काही ध्वनिमुद्रित कवितांची सूची दिली आहे. प्रारंभी डॉ. पटवर्धन यांचा जीवनपट दिला आहे.

१/२२ अशी सूची प्रबंधात्मक कामासाठी व त्यातून निर्माण होते. लेखकाच्या समग्र अभ्यासातून निर्माण झालेले ते आनुषंगिक फलित असते.

१/२३ लेखकांच्या संदर्भसूचींची नमुनेदार उदाहरणे जया दडकरांनी केलेल्या सूचींची आहेत.

''एक लेखक : एक खेडे'' (पॉप्युलर प्रकाशन, मुंबई; १९७३) या एका अभिनव पुस्तकामध्ये असलेली '१९१९ ते १९३७ या काळात प्रसिद्ध झालेल्या वि. स. खांडेकरांच्या लेखनाची सूची' (पृ. २९-४७), ''वि. स. खांडेकर वाङ्मयसूची'' (देशमुख आणि कंपनी, पुणे; १९८७; पृ. ७४), या सूची म्हणजे सूचीकरणाचे उत्तम नमुने आहेत. ''चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात'' (प्रकाशक जया दडकर, मुंबई; १९८३; पृ. २२३; ५५ रु.) या दडकरांच्या पुस्तकातील खानोलकरांच्या वाङ्मयाची सूचीही अशीच नमुनेदार आहे. सूचीमागे किती अभ्यास असावा लागतो, कशी जाण व सूक्ष्म दृष्टी असावी लागते, कसे परिश्रम व काटेकोरपणा असावा लागतो या सर्वांचा प्रत्यय या सूचीमधून येतो. सूचिविषय लेखकाविषयी आत्मभाव आणि संशोधकाची तटस्थता असल्याशिवाय अशा सूची होत नाहीत. अशा सूची म्हणजेही नादिष्टपणाच असतो; ध्यासातून त्या तयार झालेल्या असतात.

१/२४ लेखांच्या सूची करीत असताना नियतकालिकांतील लेखांचा शोध घेतला जातो. पण लेखसंग्रहांतील लेखांचीही सूची व्हावयास पाहिजे. विद्यापीठांच्या किंवा संशोधन-संस्थांच्या संशोधन-पत्रिका निघतात. त्या अनेकदा जिज्ञासू अभ्यासकांपर्यंत पोहोचतही नाहीत. कधी कधी काही महाविद्यालयांच्या वार्षिक अंकांतही संदर्भमोलाचे लेख येतात; पण ते बाजूलाच पडतात. अशा सर्व लेखांचा शोध लेखसूची करताना घेतला पाहिजे. गौरवग्रंथ, स्मरणिका यांतील लेखांचाही शोध घेऊन त्यांची नोंद व्हायला पाहिजे. गौरवग्रंथ, स्मरणिका बऱ्याच प्रमाणात दुर्लक्षित, उपेक्षितच राहातात. पण काहींचे स्वरूप गौरवग्रंथ-स्मरणिकांचे असले, तरी ते अनेकदा उत्तम संदर्भग्रंथच असतात. गौरविका, स्मरणिका यांचा अभ्यास हा एक स्वतंत्र पण दुर्लक्षित अभ्यासाचा विषय आहे. काही चांगले लेख गौरविका-स्मरणिकांतच अडकून राहिले आहेत.[७]

१/२५ जाता जाता इथे आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करण्यासारखा आहे. नियतकालिकांच्या संचिकांतही कितीतरी चांगले लेख पडून आहेत. त्यांचा शोध घेऊन नियतकालिकांतील वेगवेगळ्या स्वरूपाच्या लेखांचे संग्रह निघायला हवेत. चांगल्या चांगल्या लेखकांचे लेखही असे अनेक ठिकाणी विखुरलेले असून संग्रहाअभावी वाया गेल्यासारखेच आहेत. त्यांचाही शोध घेऊन संग्रह व्हावयाला पाहिजेत. (व्हावयाला पाहिजे पुष्कळ; पण करतो कोण ? आणि कशाला ?)

१/२६ ग्रंथाची किंवा लेखाची नोंद करताना कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख करावयास हवा याचा या लेखात पूर्वी उल्लेख केलेला आहे. हे उल्लेखही वाटतात तेवढे सरळ सोपे नसतात. ते करीत असताना जवळजवळ प्रत्येक गोष्टीबाबत शंका, अडचणी निर्माण होऊ शकतात. अशा

काही अडचणींचा उल्लेख पूर्वी आला आहे. आणखीही काही अडचणींचा निर्देश करता येईल. कधी एकच ग्रंथ दोन वेगवेगळ्या नावांनी उल्लेखिलेला त्याच ग्रंथात आढळतो. डॉ. भीमराव कुलकर्णी यांच्या 'ऐतिहासिक मराठी नाटके' (१९७१) असे मुखपृष्ठावर असलेल्या पुस्तकाच्या आतील पृष्ठशीर्षकावर (folio) सर्वत्र 'मराठी ऐतिहासिक नाटके' असे ग्रंथनाम मुद्रित केलेले आहे. अगदी नुकतेच प्रकाशित झालेले एक पुस्तक पाहिले. या पुस्तकातच या एकाच पुस्तकाचा निर्देश निदान चार नावांनी झालेला आहे. मुखपृष्ठावर शीर्षक 'आधुनिक मराठी गद्याचे जनक' असे आहे. आतमध्ये 'आधुनिक मराठी गद्याचे जनक बाळशास्त्री जांभेकर' म्हटलेले आहे. पुरस्कारकर्त्यांनी पुरस्कारात 'आधुनिक भारताचे शिल्पकार : बाळशास्त्री जांभेकर' म्हटले आहे; तर पृष्ठशीर्षकावर 'दर्पणकार जांभेकरशास्त्री' असा निर्देश आहे. (डॉ. सौ. नलिनी मुळजकर (मोकाटे); सायंटिफिक इलेक्ट्रिकल्स, शालीबंडा, हैदराबाद; ३० ऑक्टोबर १९८९). अशा पुस्तकाच्या शीर्षकाची नोंद सूचीत कशी करावयाची ? मुखपृष्ठावर जे नाव असेल त्याची नोंद करावी हे इष्ट. ★ उपशीर्षक असल्यास तेही नोंदवावे. ग्रंथ भाषांतरित असल्यास सूचीच्या उद्दिष्टानुसार, भाषांतरकर्त्याचे नाव प्रथम नोंदवून नंतर मूळ कर्त्याची नोंद करावी. जर मूळ कर्ता प्रथम उद्दिष्ट असेल, तर आधी त्याचे नाव देऊन नंतर भाषांतरकर्त्याचे नाव द्यावे. दोघांचेही संदर्भ-प्रतिसंदर्भ देणे अधिक युक्त. ग्रंथाचे दोहोंपेक्षा अधिक लेखक वा संपादक असल्यास, ज्याचे नाव प्रथम असेल, त्याचा निर्देश करून 'आणि इतर' म्हणावे. वेगवेगळ्या आवृत्त्या असतील तर त्या आवृत्त्यांची नोंद व्हावी. पहिल्या आवृत्तीपासून अखेरच्या आवृत्तीपर्यंत नोंद करावी. (आपण आधारासाठी ज्या आवृत्तीचा उपयोग केला असेल, तिचा स्वतंत्र उल्लेख करावा.) पुनर्मुद्रणे व आवृत्त्या यांतील भेद स्पष्ट व्हावा. जेव्हा मूळ ग्रंथात कसलाही फेरफार न करता, जसेच्या तसे पुन्हा मुद्रण केलेले असते, तेव्हा ते पुनर्मुद्रण; आणि जेव्हा पूर्व आवृत्तीत काही बदल केला असेल, संस्करण केले असेल, तेव्हा ती नवी आवृत्ती. कधी काही आवृत्त्यांचे प्रकाशक आधीच्या प्रकाशकापेक्षा वेगळे असतात. त्यांचीही नोंद व्हावी. या नोंदीतून ग्रंथाच्या प्रकाशनाचा इतिहास कळतो. आवृत्ती/पुनर्मुद्रणे यांचीही नोंद सरळ सोपी असतेच असे नाही. या नोंदी ग्रंथात करण्याच्या बाबतीत आपले प्रकाशक दक्ष असतातच असे नाही. विठ्ठलराव घाटे यांच्या ''काही म्हातारे व एक म्हातारी''च्या 'मराठी ग्रंथसूची'तील नोंदीत १९४४च्या पुनर्मुद्रणाची नोंद नाही,

---

★ एक भिन्न मत : कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयातील ''राष्ट्रीय ग्रंथसूची'' ह्या मराठी विभागाचे भूतपूर्व संपादक श्री. श्री. बा. जोशी, हे विद्वान सन्मित्र, या संदर्भात म्हणतात, ''मुखपृष्ठ अनेकदा झिजून नष्ट होते. कधी ते केवळ वेष्टनरूप असल्यास काढून ठेवले जाते. कधी पुनर्बांधणी शीर्षकाशिवाय होते. त्यासाठी जे नाव शीर्षकपृष्ठावर (folio) असेल तेच सूचीत घ्यावे असा निर्णय सूचिशास्त्रात घेतला गेला आहे.'' (आनंद साधले)

मलाही ते पुनर्मुद्रण पहावयास मिळालेले नाही. मात्र व्हीनस प्रकाशनाच्या पुनर्मुद्रणात १९४४च्या पुनर्मुद्रणाची नोंद आहे. केशवकुमारांच्या (आचार्य प्र. के. अत्रे) 'झेंडूच्या फुलां'बाबतही स. गं. मालशे सांगतात, ' 'झेंडूच्या फुलां'ची सातवी आवृत्ती न मिघताच ही आठवी आवृत्ती मिघत आहे. कारण 'झेंडूच्या फुलां'च्या दोन आवृत्त्या 'सुधारून वाढवलेली तिसरी आवृत्ती' अशा वर्णनाखाली प्रसिद्ध झाल्या आहेत.'[९]

१/२७ पुस्तकाचा प्रकाशन-कालनिर्देश करणेही कधीकधी अडचणीचे होऊन बसते. जयवंत दळवींच्या ''साहित्यिक गप्पा, दहा साहित्यिकांशी'' (सन पब्लिकेशन, पुणे) या पुस्तकाच्या प्रकाशकीय पृष्ठावर प्रकाशनकाल '२६ जानेवारी १९८५' असा आहे, तर दळवींच्या प्रास्ताविकाखालील तारीख '१० डिसेंबर १९८५' म्हणजे प्रकाशनकालानंतर दहा-अकरा महिन्यांनंतरची आहे. डॉ. दत्तात्रय पुंडे संपादित ''वाङ्मयेतिहासाची संकल्पना'' (प्रतिमा प्रकाशन, पुणे) या, 'इतिहास' या कालसंकल्पनेच्याच पर्यायी संकल्पनेशी बद्ध पुस्तकात तर कालनिर्देशच करावयाचा राहिला आहे; प्रकाशकीय पृष्ठावरही तो नाही की इतरत्र नाही. खुद्द ग्रंथसूचिकार दाते यांच्या 'मराठी ग्रंथसूची'च्या पहिल्या खंडात दोन कालनिर्देश आहेत. मुखपृष्ठावर '१९४३' हे वर्ष आहे, तर दाते यांच्या प्रस्तावनेखाली '२५।४।१९४४' अशी तारीख आहे. 'मराठी ग्रंथसूची'च्या दुसऱ्या खंडात पहिल्या खंडाची नोंद करताना (पृ.२) त्याचे प्रकाशनवर्ष '१९४४' नोंदलेले आहे आणि पुढे वर्णनात 'मुखपृष्ठावरील नोंद १९४३ आहे.' अशी नोंद केली आहे.

१/२८ सूची करीत असताना अशा अडचणी येतात; प्रश्न निर्माण होतात; तेव्हा अनुभवातून त्या अडचणींचे निराकरण करण्याचा मार्ग मिघतो. आपल्या अनुभवातून शिकत, आपापल्या अडचणींची उत्तरे शोधत पुढे जावयाचे असते.

१/२९ हे सगळे करण्यामागे मूळ उद्देश असला पाहिजे तो हा की, अभ्यासकाला संदर्भित ग्रंथ, लेख यांचा नेमका बोध व्हावा, त्याला तो उपलब्ध होण्याचा मार्ग स्पष्ट व्हावा. केवळ असावयाला हवी म्हणून काही तरी देखाव्याची, किंवा विद्वत्तेचा आभास निर्माण करणारी संदर्भसूची नसावी.

१/३० लेख-सार-संकलन : वर्णनात्मक संदर्भसूचीत ग्रंथाचे किंवा लेखसंग्रहांतील, नियतकालिकांतील लेखांचे सार दिलेले असते. अशी लेख-सार-संकलनात्मक सूची अभ्यासकांना विशेष उपयुक्त ठरणारी असते. विविध ठिकाणी, विविध स्वरूपाची नियतकालिके, अभ्यासपत्रिका प्रसिद्ध होत असतात. ती सर्वच नियतकालिके, अभ्यासपत्रिका

अभ्यासकांपर्यंत पोहोचतात असे नाही; त्यांच्या वाचनात येतात असे नाही. एखाद्या केंद्रीय संशोधन-संस्थेत अशी नियतकालिके, अभ्यासपत्रिका एकत्र याव्यात, आणि त्या संस्थेने अशा नियतकालिकांतील, अभ्यासपत्रिकांतील लेखांचे सार संकलित करून त्यांची सूची प्रकाशित करावी. 'मराठी संशोधन पत्रिके'तून १९७० सालच्या काही अंकांतून असा उपक्रम करण्यात आला होता.

१/३१ मराठीमध्ये संशोधनविषयक नियतकालिके मोजकीच. त्यांचेही प्रकाशन वेगवेगळ्या स्थानी होते, आणि त्यांतील लेखांची माहिती, त्या नियतकालिकांच्या मर्यादित प्रसारामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे सर्वसाधारण वाचकांपर्यंत तर नाहीच, पण जिज्ञासू वाचकांपर्यंतही पोहोचू शकत नाही. यासाठी अशा संशोधकीय लेखांचे सार 'मराठी संशोधन पत्रिके'तून प्रसिद्ध करण्यात येत असे. अनेक लेख, जे लक्षात येत नाहीत, पण यावयास पाहिजेत, अशा लेखांकडे लक्ष वेधावे, जिज्ञासूंना त्यांची माहिती द्यावी, आणि वेगवेगळ्या ठिकाणी येणाऱ्या अशा लेखांचे सार-संकलन एका ठिकाणी यावे अशा हेतूने हा उपक्रम करण्यात आला होता. सहसा जी नियतकालिके सहजपणे अवलोकनात येणार नाहीत अशा नियतकालिकांतील लेखांचे सार देण्याला अग्रक्रम देण्यात आला होता. लेखांचे देण्यात येणारे सार सामान्यत: वस्तुनिष्ठ, भाष्यरहित असे. अभिप्राय, परीक्षण, मतप्रदर्शन सहसा नसे. तथापि सार म्हणजे संपूर्ण लेख नव्हे हे उघडच आहे. असे सार काढण्याला स्वाभाविकच मर्यादा पडतात. मुळाकडे लक्ष वेधावे हा अशा सारसंकलनाचा हेतू असे. त्या त्या लेखाचा समग्र परिचय करून देण्याची दृष्टी नसून त्या त्या लेखातील प्रतिपादनाचा, वैचारिक विशेषांचा परिचय करून देण्याची भूमिका असे. केवळ मराठीपुरतेच नव्हे, तर मराठी भाषा, साहित्य, यांविषयी परप्रांतात, परभाषांत काय संशोधनकार्य चालते ते मराठी अभ्यासकांना समजणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा वाङ्मयाचा परिचय करून देण्यालाही प्राधान्य दिलेले होते. असे सार वैचारिक, विमर्शात्मक लेखनाचेच देणे सामान्यत: शक्य आहे. ललित वाङ्मयाचे सार अशा प्रकाराने देणे अशक्य आहे. त्याचा विचार वेगळ्या प्रकाराने करावा लागेल.

१/३२ 'मराठी संशोधन पत्रिके'तून ज्या नियतकालिकांतील, अभ्यास-पत्रिकांतील लेखांचा परिचय करून दिला होता, ती नियतकालिके, अभ्यासपत्रिका पुढीलप्रमाणे होत्या : जानेवारी १९७० : स्वाध्याय संशोधन पत्रिका' (उस्मानिया विद्यापीठाच्या मराठी विभागाचे वार्षिक). एप्रिल १९७० : Journal of of The University of Bombay, Journal of the Asiatic Society of Bombay, मराठवाडा विद्यापीठ पत्रिका, Journal of The S.N.D.T. Womens University, Bulletin of The Ramakrishna Mission Institute of Culture. जून १९७० : विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक.

१/३३ मर्यादित अवकाशात असे नेमके सार सांगावयाचे असल्याने सार-संकलकाला त्या लेखाचे यथार्थ आकलन असावयास हवे. सार लिहिताना शब्दांचा नेमका वापर हवा. एक शब्द अधिक नको, एक उणा नको. अशा संकलनात विरामचिन्हे, विलग-रेषा(—), संधि-रेषा(-), द्विबिंदू (:) इत्यादी खुणा यांचीही दक्षता घ्यावयास हवी. प्रत्येक चिन्हाला, खुणेला येथे अर्थ असतो, महत्त्व असते. अक्षरांचे विविध टंक, शब्दांमधील अंतर, गोल कंस (()), चौकोनी कंस ([]), साखळी कंस({}) या सर्वांचा वापर साक्षेपाने व काटेकोरपणे केला पाहिजे. (अर्थात या आणि एकूणच सूचींच्या बाबतीत, मुद्रणाच्याही शुद्धतेबाबत, अगदी मशिन-प्रुफापर्यंत दक्ष राहिले पाहिजे. नाहीतर मुद्रणप्रतीत सांभाळले ते मुद्रितात गमावले अशी वेळ यावयाची !)

१/३४ हे लेख-सार एकेका नियतकालिकात आलेल्या लेखांच्या क्रमाने देता येईल; किंवा एक विषय निश्चित करून त्या विषयावर वेगवेगळ्या नियतकालिकांत, अभ्यासपत्रिकांत आलेल्या लेखांच्या अनुरोधाने देता येईल.

१/३५ ग्रंथ किंवा लेख यांच्या सार-संकलनाप्रमाणे पीएच्.डी.च्या प्रबंधांचाही सार-संकलन-संग्रह व्हायला पाहिजे. विविध विद्यापीठांमध्ये पीएच्.डी.चे अनेक प्रबंध तयार होत असतात. अभ्यासकाला ते सर्व उपलब्ध होण्याची शक्यता सहजासहजी तर नसतेच. परंतु अशा प्रबंधांचे सारांश तयार करून ते एकत्र संकलित व प्रकाशित केले, तर अभ्यासकाला आपल्या विषयात कुठे काय संशोधन झाले आहे याची माहिती मिळेल. त्यांपैकी त्याला आवश्यक असे प्रबंध कोणते ते समजून ते मिळविण्याचा प्रयत्न करता येईल. अभ्यासाची पुनरावृत्ती टळेल. असे प्रबंध-सार-संकलन-संग्रह होणे अतिशय आवश्यक आहे. असे प्रयत्न पूर्वी करण्यात आलेही होते. मुंबईच्या 'मराठी संशोधन मंडळा'ने डॉ. मु. श्री. कानडे, डॉ. म. प. पेठे यांच्यावर ही जबाबदारी सोपवून हे काम करण्याचा प्रयत्न केला होता. कऱ्हाडचे प्रा. विद्याधर गोखलेही असा प्रयत्न करू पाहात होते. पण ते फळाला आले नाहीत. डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी 'युगवाणी'च्या अंकांतून १९७२-७३ साली असे काही प्रबंधसारांश दिले होते. चार प्रबंधांचे सारांश त्यांनी दिले. पण तेही काम तेवढेच राहिले ! असे संकलन होण्याची आवश्यकता आहे; पण ते व्हावयाला अनुकूल शैक्षणिक, वाङ्मयीन वातावरण नाही हेच खरे.[१०]

१/३६ 'सूचींची सूची' : एकेक लेखक, किंवा विषय यांची एकेक संदर्भसूची तयार झाल्यानंतर, अशा अनेक सूचींचीही एक संकलित सूची बनविता येते, आणि ती पुष्कळच उपयुक्त होते. अशा सूचींच्या सूचीमधून थोडचा अवकाशात अनेकानेक संदर्भ हाती लागू

शकतात. 'मराठी संशोधन पत्रिका' व 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यांच्यामधून मी संकलित केलेले अशा तऱ्हेचे 'सूचींच्या सूचीं'चे तीन हप्ते प्रसिद्ध झाले आहेत, आणि त्यांत एकूण २७३ सूचींची नोंद झालेली आहे.[११] 'सूचींच्या सूची'चा मराठीतील हा बहुधा एकमेव उपक्रम असावा.[१२] या तीनही हप्त्यांचे एकत्रीकरण करून, आणि त्यांत नंतर आणखी उपलब्ध झालेल्या सूचींची भर घालून एक उपयुक्त संदर्भपुस्तिका होऊ शकेल.

१/३७ संदर्भसूचीचा हाही एक महत्त्वाचा उपयोग आहे की, एका लेखकाच्या समग्र लेखनाची माहिती तिच्यामुळे उपलब्ध होऊ शकते; वेगवेगळे संदर्भ परस्परांशी ताडून बघून लेखकाची भूमिका निश्चित करता येते. एका विषयावरील एखाद्या लेखकाची भूमिका, त्याचे पूर्ण विचार त्याचे त्या विषयावरील सर्व लेखन पाहिल्याशिवाय समजणार नाही. त्याचे हे लेखन वेगवेगळ्या काळी केलेले, विखुरलेले असण्याचाही संभव असतो. त्याच्या समग्र लेखनाची सूची उपलब्ध असली म्हणजे त्याचे विशिष्ट विषयावरील सम्यक् प्रतिपादन शोधून काढण्यास मदत होते. उदाहरणार्थ, ना. सी. फडक्यांनी नाटक, रंगभूमी, नाटककार यांच्यावर वेगवेगळ्या काळात विपुल लेखन केले आहे. या सर्व लेखनाची माहिती संदर्भसूचीमुळे झाली, म्हणजे एखादाच लेख बाजूला काढून फडक्यांवर टीका करण्याचा प्रसंग येत नाही; त्यांच्या समग्र लेखनाच्या संदर्भात विशिष्ट लेखातील प्रतिपादन पारखून घेता येते. ''खाडिलकरांच्या नाट्यकृती'' या पुस्तकात फडक्यांनी नाट्याचार्य खाडिलकरांवर लिहिले आहे. परंतु याच विषयावर, 'कोण म्हणतो खाडिलकर कवी नव्हते ?' हा त्यांचा लेख 'लहरी' या त्यांच्या लेखसंग्रहात आला आहे. तो लेख वाचल्याशिवाय खाडिलकरांविषयीचे फडक्यांचे प्रतिपादन नीट समजणार नाही. या संदर्भात पंधरावीस वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र सारस्वत'मधील वि. ल. भाव्यांच्या रामदास-तुकाराम तुलनेसंबंधात (आ.५, १९६३, पृ.३१०-३११) झालेला वाद आठवतो. या तुलनेत 'महाराष्ट्र सारस्वत'कार भाव्यांचे तुकारामाबद्दलचे विवेचन विपर्यस्त आहे अशी हाकाटी काही जातीयवादी गटांनी केली होती, आणि अखेर विद्यापीठाला माघार घेऊन 'हा भाग अभ्यासक्रमातून वगळावा' असे परिपत्रक काढावे लागले होते. (१८ डिसेंबर १९७२.) परंतु भावे यांनी ''तुकारामबुवांची अस्सल गाथा'' उत्तम प्रकाराने संपादित केली आहे. (भाग १, १९१९; भाग २, १९२०) आणि तेव्हाच, 'माझे लिखाणाचा भलताच अभिप्राय घेऊन, तुकारामात काही अवगुण होते किंवा त्याचे साधुत्व कमी दर्जाचे होते असे मला वाटते असा कुणीही आपला समज करून घेऊ नये.' असे स्पष्ट करून आपल्याला तुकारामाच्या ''अलौकिक गुणांबद्दल अत्यंत आदर'' असल्याचे त्यांनी निःसंदिग्धपणे म्हटले आहे, हे चळवळकर्त्यांनी लक्षात घेतले असते तर पुढचे वादंग उठले नसते. (पण जेथे वादंग उठविणे हेच प्रस्तुत असते तेथे अशा अभ्यासू, सत्यशोधक दृष्टीची अपेक्षाच कशी करावी ?) भावे यांच्या समग्र सूचीमधून ही गोष्ट सहज लक्षात आली असती.[१३]

१/३८ संशोधनकार्यात संदर्भसूची हे निस्संशय महत्त्वाचे साधन तर आहेच; पण कधीकधी असे वाटते की, असल्या तयार, सहज हाताशी असणाऱ्या सूची अभ्यासकाला परावलंबी, आळशी तर करीत नाहीत ? झटपट आणि कमी कष्टात, फक्त काही व्यावहारिक, व्यावसायिक प्रयोजनाने एम्.फिल., पीएच्.डी. सारखे संशोधन करू बघणाऱ्या तथाकथित संशोधकांचा भर अशा आयत्या सूचींवर असतो. उपलब्ध सूची हे आरंभस्थान आहे हे समजून न घेता, तेच अंतिम साधनही आहे अशा सुखसमजात, तिच्यावर आणि तिच्यापुरतीच सारी भिस्त ठेवून, अभ्यासक निर्भर राहाण्याचा संभव असतो. असे होऊ नये. सूचीलाही मर्यादा असतात. तिच्या उद्दिष्टानुसार तिचे स्वरूप ठरत असते. 'मराठी ग्रंथसूची', किंवा 'मराठी नियतकालिकांची सूची' अशा बृहत्सूचींचा व्याप व आवाका मोठा असतो. अशा सूचीमध्ये येणाऱ्या विशिष्ट व्यक्तींवरील किंवा विषयांवरील नोंदींना, स्वाभाविकच मर्यादा असणार. माधवराव पटवर्धन यांच्या किंवा त्यांच्याविषयीच्या नोंदींना अशा बृहत्सूचीत महत्त्वदृष्ट्या, स्थलदृष्ट्या मर्यादा असते. पण जिथे माधवराव पटवर्धन हाच अभ्यासाचा केंद्रविषय असतो, तिथे अशा नोंदींना मर्यादा असणार नाहीत. अशा सूचीत संदर्भविषयाशी संबंधित बारक्यासारख्या नोंदींनाही स्थान असते. सूची कोण, कशी, कशासाठी करतो आणि तिचा अभिप्रेत उपयोगकर्ता कोण आहे यावर संदर्भसूचीचे स्वरूप ठरते. संदर्भसूची हे अभ्यासाचे अखेरचे साधन नाही; ती सुरुवात आहे. या प्रारंभिक साधनाच्या आधाराने, त्याची पूर्णापूर्णता पारखीत, स्वतंत्रपणे स्वत: शोध घेत, भर घालीत सूचिकाराने पुढे जावयाचे असते. सूचीकरण ही कधी न थांबणारी, न संपणारी, सतत गतिमान असणारी क्रिया आहे.

१/३९ अनेकानेक प्रकारच्या सूची व्हावयाला पाहिजेत. एकेका लेखकाच्या समग्र वाङ्मयाच्या सूची, त्याच्यावरील लेखनाच्या सूची, एकेका विषयावरील सूची, एकेका साहित्यकृतीवरील सूची अशा कितीतरी प्रकारच्या सूची हव्यात. बालकवींच्या 'औदुंबर' या एकाच कवितेवर किती वेगवेगळ्या दृष्टींनी, वेगवेगळ्या संदर्भात लेखन झाले आहे. त्या सर्व लेखनाची सूची झाली, लेखांचे संकलन झाले तर मराठी समीक्षेचे त्यामधून विविधांगी दर्शन घडेल; एका कवितेच्या अभ्यासाच्या, आकलनाच्या अनेक दिशा लक्षात येतील. अशा सूची हा संशोधनाचाच भाग आहे. अशा सूचींना संशोधकीय मान्यता मिळायला पाहिजे. अशा सूची तयार झाल्यावर त्याच्या पुढचा भाग म्हणजे सूचित वाङ्मयाच्या संकलित प्रकाशनाचा.

१/४० 'विविधज्ञानविस्तार', 'लोकशिक्षण', 'महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका' अशा काही फार थोड्या नियतकालिकांच्या सूची प्रकाशित झाल्या आहेत. एम्.फिल्., पीएच्.डी. सारख्या परीक्षांसाठी झालेल्या नियतकालिकांच्या अभ्यासामधूनही काही सूची तयार झाल्या आहेत. त्यापुढचा भाग म्हणजे त्यांतील लेखांचे वर्गीकृत संग्रहही निघायला हवेत. 'सत्यकथा',

'आलोचना', 'युगवाणी', 'प्रतिष्ठान' अशांसारख्या नियतकालिकांच्या सूची होऊन त्यांतील निवडक लेखांचे वर्गीकृत संग्रह झाले, तर त्यांमधील कोंडून पडलेले लेख मोकळे होतील आणि मराठी साहित्याच्या अभ्यासकांना फार उपयुक्त साधन उपलब्ध होईल. व्हावयाला पाहिजे खूप; पण होत तर काहीच नाही; ही खरी आमची वाङ्मयीन संस्कृती !

१/४१ समृद्ध ग्रंथालयांनी असा सूचिविभागच निर्माण करून वैपुल्याने सूचिनिर्मिती करायला पाहिजे. पण विद्यापीठांच्या समृद्ध समजल्या जाणाऱ्या ग्रंथालयांनाही असे काम करावयाला सवड मिळत नाही. कोणी एखादा ग्रंथपाल, ग्रंथालय-सेवक स्वत:च्या प्रेरणेने, हौसेने अशा कामाला आरंभ करतो. पण ती व्यक्ती बाजूला गेली की, तिचे कामही बाजूला पडते. विद्यापीठाच्या ग्रंथालयापुरत्या अशा सूची तयार केल्या जातात; पण त्यांचा प्रसार कमी असतो. अशा सूची संकलित होऊन त्या प्रकाशित व्हायला हव्यात. विद्यापीठाच्या विविध-विषय-विभागांनी किंवा ग्रंथालयांनी स्वत:चे संशोधनकालिक काढून त्यांतून अशा संशोधनसाहित्याला प्रसिद्धी द्यावायास पाहिजे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयांनाही त्यांच्या मर्यादित अशी कामे करता येणे शक्य आहे. संशोधनसाहित्य अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हे ग्रंथालयांच्या अनेक कामांपैकी एक काम आहे. संशोधक व ग्रंथपाल एकमेकांना परस्परपूरक, साहाय्यक असतात; असायला पाहिजेत. 'साहित्य सहकार', 'इये मराठीचिये नगरी', 'वाचनालय' अशा नियतकालिकांचा तर जन्मच अभ्यासकांना संदर्भसाहित्य पुरविण्यासाठी झाला होता. पण त्यांना पुरेसे स्थैर्य व यश मिळू शकले नाही. 'साहित्य सहकार', 'इये मराठीचिये नगरी' तर बंदच पडली. 'वाचनालय' हे 'महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघा'चे, आहे आहे, नाही नाही, अशा स्थितींतच आहे. व्यक्तिगत हेवेदावे, खोटे अहंकार यातच ते बरबटून गेले असून 'उपयुक्त संदर्भसहायक मासिक' या हेतूपासून ते कधीच दूर गेले आहे.

१/४२ उत्तम, स्वतंत्र सूचिकार्याला एम्.फिल्.सारखी, आणि गुणवत्तेनुसार पीएच्.डी.सारखी पदवी द्यावयाला प्रत्यवाय नसावा. विद्यापीठीय पदवीनेच कार्याचा सन्मान होतो असे नाही. तथापि ते एक प्रेरक प्रयोजन होऊ शकते. अशा मान्यतेमुळे प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते. अलीकडे अनेक विद्यापीठांत विद्यार्थी एम्.फिल्. करीत असतात. त्याच त्याच विषयांवरील चाकोरीच्या प्रबंधिका लिहिण्यापेक्षा जर अशा उपयुक्त, स्वतंत्र संदर्भसूची विद्यार्थ्यांनी तयार केल्या, तर त्या साहित्याच्या संवर्धनाच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरतील. 'मराठी ग्रंथसूची', 'मराठी नियतकालिकांची सूची' अशा कामांना डी.लिट.सारखी पदवी दिली, तर त्यात विद्यापीठाचाच सन्मान होणार आहे; ही कामे स्वयंसिद्ध मोठी आहेत, पदवीने त्यांच्या मोठेपणात भर पडणार नाही !

१/४३ सूचींच्या संदर्भात एक गोष्ट ध्यानात ठेविली पाहिजे. अपुऱ्या, कामचलाऊ, दिखाऊ सूची करण्यापेक्षा त्या न झालेल्या परवडल्या. अशा दिखाऊ सूची अभ्यासकाची दिशाभूल करून, त्याला भलत्याच वाटेला नेऊन तोंडघशी पाडतात. ज्या पायावर संशोधन उभे राहावयाचे, तो पाया भक्कम, शुद्ध असावयाला हवा.

१/४४ स्वतंत्र संशोधनकार्यापेक्षा सूचिकार्य हे गौण, दुय्यम मानण्याकडे एक प्रवृत्ती असते. काही प्रमाणात ते खरेही आहे. कित्येक वर्षांपूर्वी गुरुवर्य प्रा. रा. श्री. जोगांनी मला सांगितले होते, ''आता सूचिचक्रातून बाहेर पडा.'' पण असा भेद करणे फारसे बरोबर नाही. अभ्यासकाला अभ्यासाला आरंभ करताना संदर्भसूची असल्यास ती मिळविल्याखेरीज, किंवा स्वत: संदर्भसूची बनविल्याखेरीज पुढेच जाता येत नाही. चांगल्या संदर्भसूची ह्या अभ्यासकाच्या स्वत:च्या अभ्यासातूनच, अनुषंगाने निर्माण होतात. सूचिकार्यात प्रतिभा नसते; ते एक शारीरिक कष्टाचे व चिकाटीचे काम असते अशी समजूत दिसते. पण ती तितकीशी रास्त नाही. स्वतंत्र विवेचक अभ्यासक आणि सूचिकर्ता या दोघांतून कुणाचे काम, श्रेय अधिक महत्त्वाचे असा प्रश्न निर्माण होणे शक्य आहे. सूचिकार हा संशोधकास साहाय्यक आहे. तो संशोधकाला पाया उपलब्ध करून देतो. आपल्याकडे सूचिकार्य फार अपुरे असल्याने विश्लेषक प्रज्ञा असणाऱ्या अभ्यासकालाही आपला वेळ व श्रम सूची बनविण्यामध्ये खर्ची घालावे लागतात. विवेचक संशोधक आणि सूचिकार हे एक झाले तर ते जास्त श्रेयस्कर. दुय्यम दर्जाचे काहीतरी, तथाकथित 'स्वतंत्र' ललित, समीक्षणात्मक, वैचारिक लेखन करण्यापेक्षा अव्वल दर्जाच्या संदर्भसूची केल्या तर ते कार्य साहित्याच्या अभिवृद्धीच्या दृष्टीने अधिक मोलाचे ठरेल. संदर्भसूची करण्यासाठी सूचिकाराला पुष्कळ शोधावे लागते, वाचावे लागते, दक्ष असावे लागते. त्यामानाने त्याला तात्कालिक प्रसिद्धी, मान्यता, अन्य लाभ कमी मिळतात. पण अंतिमत: ते काम फार आवश्यक व उपयुक्त आहे. एका सूचिकाराने घालविलेला वेळ, घेतलेले परिश्रम इतर अभ्यासकांचा कितीतरी वेळ, केवढे तरी परिश्रम वाचवीत असतात. सूचिकाराचे हे श्रेय, समाधान तर आहेच; पण जेव्हा एखादी नोंद, दीर्घकालीन शोधानंतर त्याला अचानक गवसते, तेव्हा मिळणारा आनंद ललित लेखनात, अकस्मात एखादी कल्पना सुचते, तेव्हा मिळणाऱ्या आनंदासारखाच असतो. दुसरा एखादा मान्यवर अभ्यासक सूचिकर्त्याला जाणकारीने म्हणतो, ''तुमची सूची हे अभ्यासकांवर उपकार आहेत.'' तेव्हा सूचिकर्त्याचे श्रम भरून पावतात आणि त्याच्यासाठी आनंदाचा ठेवा निर्माण करून ठेवतात.

१/४५ शेवटी, संदर्भसूची हीसुद्धा करण्याची गोष्ट आहे, नुसती चर्चेची नाही. अशा फक्त चर्चा करीत राहण्यापेक्षा प्रत्यक्ष एखादी संदर्भसूची प्रसिद्ध करणे खऱ्या अर्थाने फलदायी आहे. चर्चाच फार, कृती कमी, अशीच प्रवृत्ती अलीकडच्या 'परिसंवाद-संस्कृती'त वाढलेली दिसते.

२

२/१ 'सूची' शब्द 'संदर्भसूची' या अर्थाखेरीज ज्या दुसऱ्या अर्थाने वापरला जातो, तो अर्थ म्हणजे ग्रंथाच्या अखेरीस असणारी निर्देशसूची किंवा उल्लेखसूची. 'निर्देशिका', 'पृष्ठदर्शिका' असेही काही शब्द त्यासाठी वापरता येतील.

२/२ ग्रंथांना निर्देशसूची असण्याचे महत्त्व अद्यापही फारसे वाटत असल्याचे दिसत नाही. अजूनही बहुतांश समीक्षणात्मक, विवेचनात्मक, वैचारिक ग्रंथांना निर्देशसूची असत नाही. उदाहरणे तरी किती द्यावयाची ? श्री. के. क्षीरसागर, रा. श्री. जोग, वा. ल. कुळकर्णी अशा मान्यवरांचे लेखसंग्रह पाहिले, तरी त्यांना निर्देशसूची असल्याचे दिसणार नाही. रा. श्री. जोगांच्या 'चर्वणा', 'विचक्षणा', 'दक्षिणा' या लेखसंग्रहांना निर्देशसूची नाही. मात्र प्रा. जोग आपल्या पुस्तकांना विस्तृत विषयानुक्रमणिका देतात, त्याने निर्देशसूचीचे बरेच कार्य साधते. विस्तृत विषयानुक्रमणिका आणि निर्देशसूची एकमेकांना पूरक असतात. या दोहोंच्या समन्वयाने ग्रंथाच्या स्वरूपाचे प्राथमिक आकलन होते. (प्रा. जोगांच्या ग्रंथांना मात्र साक्षेपी निर्देशसूची असतात.) अलीकडचे काही मान्यवर लेखकांचे सहज हाताशी आलेले लेखसंग्रह बघितले तेव्हा त्यांच्यांतील बहुतेकांना निर्देशसूची नसल्याचे दिसून आले. ''साहित्य आणि समीक्षा'', (वा. ल. कुळकर्णी, १९६३), 'खडक आणि पाणी' (१९६०), ''साहित्याचे मानदंड'' (१९६२), ''पाण्यावरील अक्षरे'' (१९८९, सर्व गंगाधर गाडगीळांचे लेखसंग्रह); ''परंपरा आणि नवता'' (गो. वि. करंदीकर, आ. १, १९६७, आ. २, १९८०), ''वाटा आणि वळणे'' (गो. म. कुळकर्णी, १९७५), ''अर्वाचीन मराठी साहित्यकार'' (१९७५), ''साहित्य : रूप आणि गंध'' (१९७६), ''ज्ञानेश्वर : काव्य आणि काव्यविचार'' (१९७७, सर्व व. दि. कुलकर्णी), ''माती आणि मूर्ती'' (सरोजिनी वैद्य, १९७५), ''समीक्षेची नवी रूपे'' (गंगाधर पाटील, १९८१), अशा महत्त्वाच्या लेखसंग्रहांना निर्देशसूची नाही. (खुद्द माझ्या स्वत:च्या ''सहा साहित्यकार'', (१९८२) या लेखसंग्रहालाही निर्देशसूची नाही.) मर्ढेकरांच्या ''सौंदर्य आणि साहित्य''च्या पहिल्या (१९५५) किंवा दुसऱ्या (१९६०) आवृत्तीलाही निर्देशसूची नाही. १९७५ मधील तृतीयावृत्तीला मात्र नव्याने प्रथमच विषयसूची जोडलेली आहे.

२/३ अभ्यासपूर्ण गंभीर ग्रंथांचा निर्देशसूची हा महत्त्वाचा, अविभाज्य भाग आहे. परंतु अजूनही अनेक ग्रंथ निर्देशसूचीशिवाय बाहेर पडतात; किंवा त्यांना जोडल्या जाणाऱ्या सूची जुजबी, अलंकरणासाठी जोडलेल्या असतात. अशा निर्देशसूचींचे महत्त्व त्या मानाने अलीकडच्या काही वर्षांतच वाटू लागले आहे.[१४] एखाद्या ग्रंथाला निर्देशसूची करूनही, वाढत्या

पृष्ठसंख्येमुळे ती अजिबात गाळावी लागल्याचे, किंवा संक्षिप्त करावी लागल्याचे निर्देशही काही ग्रंथांत वाचावयास मिळतात.

२/४ निर्देशसूची कशा स्वरूपाच्या ग्रंथाला असावी, आणि कशा स्वरूपाच्या पुस्तकांना नसावी, नसली तरी चालेल असाही प्रश्न करता येईल. सामान्यत: वैचारिक, संशोधनात्मक, समीक्षणात्मक ग्रंथांना निर्देशसूची असावयाला हवी. जेथे एकच व्यक्ती, ग्रंथ, विषय यांसंबंधीचे विवेचन ग्रंथात वेगवेगळ्या ठिकाणी विखरून आलेले असेल, तेथे त्या विवेचनाची संकलित माहिती मिळण्यासाठी निर्देशसूची आवश्यक आहे. या दृष्टीने सलग ग्रंथाला तर निर्देशसूची असावयाला हवीच. स्फुट लेखसंग्रहाबाबतही असे म्हणता येईल. ज्या संग्रहातील प्रत्येक लेख अगदी सुटा, स्वतंत्र असेल, त्यामध्ये व्यक्ती, ग्रंथ व विषयाची पुनरावृत्ती नसेल आणि लेखशीर्षकावरूनच विषयाची कल्पना येण्याजोगी असेल, तेथे व्यावहारिक कारणामुळे, निर्देशसूची नसली तरी चालू शकेल. ललित पुस्तकाला निर्देशसूची नसते; असण्याची आवश्यकता नाही असे सामान्यत: म्हणता येईल. पण तसे तरी निरपवादपणे का म्हणावे ? हरिभाऊ आपट्यांच्या ''वज्राघात'' कादंबरीतील कुंजवनासारख्या स्थळांची, प्रमुख व्यक्तिनामांची, घटनांची सूची जर करून जोडली तर अभ्यासक वाचकाला तिचा उपयोग होईलच की !

२/५ ग्रंथाला सूची नसल्याची तक्रार अधूनमधून होताना दिसते. वामन मल्हार जोश्यांच्या ''नीतिशास्त्रप्रवेशा''वर परीक्षण लिहिताना वा. गो. आपटे म्हणतात, ''It is pity that such an important and bulky volume on a subject, which associates itself with hundreds of names of writers, and a fairly large number of divisions, should go without an exhaustive index. When will all Marathi writers realise its value and usefulness and make it a necessary adjunct of their work ?'' (1919)[15]

२/६ स. आ. जोगळेकरांच्या ''जोसेफ मॅझिनी'' या चरित्रग्रंथाच्या परीक्षणातही वा. गो. आपटे अशीच तक्रार करतात : ''The lack of a good index appended at the end or of a full and exhaustive list of contents given in the beginning of such books is a standing complaint against Marathi authors. When will they realise the force and truth of it ?'' (1924)[16]

२/७ चिंतामण वैजनाथ राजवाडे यांनी 'दीघनिकाय' (भाग २) च्या केलेल्या मराठी भाषांतराला[17] लिहिलेल्या प्रस्तावनेत चिंतामण विनायक जोशी यांनी लिहिले आहे, ''या ग्रंथास

सूची करण्याची लेखकाची इच्छा होती व ती मी पुरविलीही असती. परंतु अगोदरच फुगलेल्या पृष्ठसंख्येत पन्नास पानांची भर घालावी हे प्रकाशकांच्या दृष्टीने योग्य होणार नाही व मराठी वाचकांचीही सूचिपत्र वापरण्याइतकी तयारी अद्याप झालेली नाही, तेव्हा निष्कारण शीण देण्या-घेण्यात अर्थ नाही.'' (१९३२)

२/८ १९३२ साली प्रकाशित झालेल्या ''कोल्हटकरांच्या लेखसंग्रहा''ला (संपादक : वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, गं. दे. खानोलकर) विषय, ग्रंथ, ग्रंथकार, प्रसिद्ध पुरुष इत्यादींची निर्देशसूची आहे; पण ती त्रोटक आहे. या संबंधात सुनील सुभेदार सांगतात, ''त्यांनी या संदर्भात माडखोलकर यांना विचारले असता ते म्हणाले, 'सूची आहेच अपुरी. खानोलकरांनी विस्तृत सूची तयार केली होती[१८], पण 'एवढ्या सूचीला दोन अडीच फर्मे लागतील, तेव्हा थोडक्यात बनवून द्या.' असे मंगेशराव कुळकर्ण्यांनी सांगितल्यामुळे महत्त्वाचे निर्देश असलेली, एका फर्म्यात बसणारी सूची करून दिली.'[१९]

२/९ निर्देशसूचीच्या कल्पनेत, साक्षेपात कसा फरक पडला आहे याची कल्पना पन्नास-साठ वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या ग्रंथाची निर्देशसूची, आणि त्याच ग्रंथाच्या अलीकडील आवृत्तीची सूची यांची तुलना केली तरी लक्षात येईल.

२/१० १९२८ साली प्रकाशित झालेल्या डॉ. केतकरांच्या ''महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण'' या ग्रंथाला 'संतकवि व ग्रंथकार' यांची निर्देशसूची जोडलेली आहे. परंतु डॉ. केतकरांच्याही या ग्रंथाची सूची स्थूल, पुष्कळशी अपुरी आहे. तिच्यात उणिवा, विसंगती राहिल्या आहेत. पहिल्या आवृत्तीची सूची मुख्यत: व्यक्तिनामांची आहे; थोडी ग्रंथनामे आहेत; आणि तुरळक विषयनोंदी आहेत. त्यात काही आवश्यक नोंदी आलेल्या नाहीत; तर काही अनावश्यक नोंदी आलेल्या आहेत. एकाच व्यक्तीचे निर्देश अनेक नावांखाली आलेले आहेत. (उदा. केतकर –गोविंद रघुनाथ, कल्याण – कल्याण (शिष्य), चिपळूणकर विष्णुशास्त्री – विष्णुशास्त्री चिपळूणकर.) एकाच व्यक्तिनामाचे लेखनही अनेक तऱ्हांनी झालेले आढळते. त्यामुळे एकाच व्यक्तीचे अनेक ठिकाणी निर्देश आलेले आहेत. (उदाहरणार्थ, एकोजी राजा – व्यंकोजी राजा, कानूपात्रा –कान्होपात्रा.) सूचीतील नोंद आणि प्रत्यक्ष ग्रंथातील उल्लेख यांतही काही ठिकाणी विसंगती निर्माण झाली आहे. (उदा. आनंदराय मंखित, दिनकर नरसिंह अशा सूचिनिर्दिष्ट नावांऐवजी ग्रंथात आनंदराय मखिन्, दिवाकर नरसिंह असे उल्लेख आहेत.) १९६४ मधील 'सूची'त या उणिवा, विसंगती दूर करून ती काटेकोर केलेली दिसेल.[२०]

२/११ ''कोल्हटकरांच्या लेखसंग्रहा''च्या १९३२ मधील प्रकाशित आवृत्तीची सूची (पृ. ८४१ ते ८५७) आणि १९७५ मधील त्याच्या परिवर्धित आवृत्तीची सूची (''समग्र

कोल्हटकर'', खं. २, 'सूची', स. गं. मालशे, पृ. १०७५-१११३) यांची तुलना केली, तरी सूचीसंबंधीच्या बदललेल्या जाणिवेची कल्पना येईल. पहिल्या आवृत्तीची सूची सतरा पृष्ठांची होती. परिवर्धित आवृत्तीची सूची एकुणचाळीस पृष्ठांची आहे. फरक नुसत्या पृष्ठसंख्येचा नाही. साक्षेपाचा, कोणत्या नोंदी निवडाव्यात, कोणत्या वगळाव्यात याच्या दृष्टीचाही आहे. (या खंडाला गं. दे. खानोलकरांच्या विस्तृत माहितीपर संदर्भटीपा आहेत. टीपांतील उल्लेखांची ग्रंथाच्या सूचीत नोंद करावी का ? की सूची फक्त मुख्य ग्रंथाचीच करावी ? असा एक प्रश्न निर्माण होतो. प्रस्तृत सूची फक्त मुख्य ग्रंथाची आहे. पण या स्वरूपाच्या टीपांचीही नोंद सूचीत करणे अधिक उपयुक्त ठरेल.)

२/१२ विशिष्ट ग्रंथात सामान्यत: विशिष्ट व्यक्ती, विशिष्ट ग्रंथ किंवा विशिष्ट विषय कोणकोणत्या पृष्ठांवर विवेचिले गेले आहेत, त्यांचे संदर्भ ग्रंथात कुठेकुठे आलेले आहेत यांची संकलित नोंद म्हणजे निर्देशसूची असे स्थूलपणाने म्हणता येईल. निर्देशसूचीत व्यक्ती, ग्रंथ, विषय यांच्याच नोंदी असतात असे नव्हे. निर्देशसूचीत कोणत्या नोंदी याव्यात हे त्या ग्रंथाच्या स्वरूपावरून ठरते. गडकऱ्यांवरील समीक्षाग्रंथ असेल, तर गडकऱ्यांच्या नाटकांतील सिंधू, सुधाकर यांच्यासारख्या पात्रांच्याही नोंदी निर्देशसूचीत येऊ शकतील. नियतकालिके, लेख, स्थळे यांच्याही नोंदी निर्देशसूचीत येऊ शकतील. ग्रंथाचे स्वरूप काय आहे, त्याचे लक्ष्य काय आहे यावर सूचीत कोणते निर्देश यावेत हे ठरेल. सूची हे ग्रंथवाचनाला साहाय्य करणारे साधन आहे. अभ्यासकाला त्याच्या अभ्यासविषयाच्या अनुषंगाने एखाद्या ग्रंथातील विशिष्ट संदर्भच हवा असतो. त्यासाठी सर्व ग्रंथ शोधणे हा वेळेचा अपव्यय आहे. त्याची विशिष्ट गरज निर्देशसूची भागविते. जेव्हा अभ्यासाचा व्याप, विस्तार वाढतो; त्यामधे विशिष्टता येते; तेव्हा ग्रंथाचे वाचन, शोध निर्देशसूचीच्या आधारानेच करावा लागतो. अभ्यासकाला जर रा. श्री. जोग यांच्या रसविचाराचा अभ्यास करावयाचा असेल, तर रा. श्री. जोगांचे स्वत:चे 'अभिनव काव्यप्रकाश', 'सौंदर्यशोध आणि आनंदबोध' यांसारखे ग्रंथ, तसेच ''प्रा. रा. श्री. जोग गौरवग्रंथ'', ''रसविमर्श'' (के. ना. वाटवे), ''भारतीय साहित्यशास्त्र'' (ग. त्र्यं. देशपांडे), यांसारख्या ग्रंथांच्या निर्देशसूचींतील नोंदीवरून त्याला हा विचार, त्याचा परामर्श कमी अवकाशात नेमकेपणाने संकलित करता येईल. हे जसे विषयाबाबत, तसे व्यक्ती, ग्रंथ यांच्याबाबतही करता येते. अशा निर्देशसूचीमुळे अभ्यासकाची मोठीच सोय होते. अभ्यासाचा वेळ व त्याचे श्रम वाचविणे हे संशोधनातील संदर्भसेवेतील एक महत्त्वाचे साध्य, ते निर्देशसूचीमुळे साधते.

२/१३ अशी नेमकी, उपयुक्त सूची करणे हेही जाणकारीचे काम असते. ग्रंथाची निर्देशसूची करणे हे केवळ एक यांत्रिक काम आहे; शारीरिक-बौद्धिक कष्टाचे काम आहे असा भ्रामक ग्रह

अजूनही आढळतो. मग स्वत: सूची करण्याऐवजी आणखी कुणाकडे तरी ते काम सोपविले जाते आणि सूचीत घोटाळे राहातात.[२१] उत्तम निर्देशसूची वाचकाला ग्रंथाविषयी नेमकी दृष्टी देत असते; ग्रंथकाराचा दृष्टिकोण वाचकांपर्यंत पोहोचवत असते. अगदी थोडक्या अवकाशात ग्रंथाचे संपूर्ण दर्शन घडविणारी ती असते. अशी सूची करण्यासाठी सूचिकारालाही ग्रंथाचे नेमके आकलन असावे लागते. ग्रंथाचा विषय, त्यातील प्रतिपादन, त्याचा रोख ध्यानात घेऊनच त्यात कोणते निर्देश महत्त्वाचे आहेत, कोणत्या निर्देशांची वेगवेगळ्या पृष्ठांवर विखरून चर्चा झाली आहे याचा विचार करूनच निर्देशसूची बनवावी लागते. निर्देशसूचीचा अनावश्यक विस्तार होणे किंवा ती अतिसंक्षिप्त होणे या दोन्ही गोष्टी टाळावयाला पाहिजेत. यासाठी सूचीमधे लवचिकता, तारतम्य ठेवावे लागते. काय महत्त्वाचे, काय बिनमहत्त्वाचे, कशाकडे वाचकाचे लक्ष वेधावे, हे समजावे लागते. ग्रंथकाराचा दृष्टिकोण त्याच्याइतका कुणाला माहीत असणार ? म्हणून सामान्यत: ग्रंथकारानेच आपल्या ग्रंथाची सूची करणे इष्ट होय.

ग्रंथाचे स्वरूप लक्षात घेऊन, कोणत्या उल्लेखांची नोंद करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन निर्देशसूची करावयाला पाहिजे. भाषाशास्त्रावरील ग्रंथाच्या सूचीत जी नोंद महत्त्वाची ठरेल, त्या नोंदीला समीक्षेवरील ग्रंथात महत्त्व असेलच असे नाही.

५ / १५ निर्देशसूची कधीकधी फसवी, एक देखावा म्हणूनही जोडलेली असू शकते. एखाद्या साहित्यशास्त्रविषयक ग्रंथात 'ध्वनी' ही संज्ञा अनेक वेळा स्वाभाविकपणेच आलेली असते, आणि त्यांपैकी जर थोड्या ठिकाणांचाच उल्लेख निर्देशसूचीत केलेला असेल, तर ती सूची अपुरी, दिशाभूल करणारी होईल. वस्तुत: अशी फसवी सूची वाचकाचीच दिशाभूल करीत नसते, तर ती ग्रंथालाच मारक ठरत असते. संशोधनांतल्या सर्वच क्षेत्रांतल्याप्रमाणे संशोधनातला प्रामाणिकपणा ही सूचीकरणातील प्राथमिक अपेक्षा असते. वाचक सामान्यत: संशोधकावर विश्वास ठेवून त्याचे प्रतिपादन गंभीरपणे घेत असतो. परंतु एखाद्या ठिकाणी जरी जाणीवपूर्वक खोटेपणा दिसला तरी मग सर्वच संशोधनाविषयी अविश्वास उत्पन्न होतो. अविश्वासाच्या मिठाचा एक बारकासा खडा सर्व संशोधनाचे प्रामाण्य नासवून टाकतो. अशी अपुरी सूची त्या ग्रंथाच्याच अंगाशी कशी येते याचे उदाहरण ''श्रीपाद कृष्ण : वाङ्मयदर्शन'' या वा. ल. कुळकर्णी यांच्या पुस्तकावरील सुनील सुभेदार यांच्या टीकेमध्ये दिसून येते.[२२] श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांवरील बऱ्याच टीका, त्यांचा लेखसंग्रह पूर्ण व नीट न वाचता, त्याच्या अपुऱ्या निर्देशसूचीवर आधारून केलेल्या आहेत, आणि म्हणून त्यात फसगत झाली आहे असे सुभेदारांनी दाखविले आहे. पण गंमत म्हणजे स्वत: सुभेदारांचीही वा. ल. कुळकर्णी यांच्या या ग्रंथावरील टीका त्याच्या सूचीवर विसंबूनच केली आहे, की जी सूची अपुरी आहे; आणि त्यामुळे सुभेदारांचीही टीका एकांगी झाली आहे.

२/१६ निर्देशसूची कशी नसावी याचा नमुना म्हणजे शं. के. कानेटकर यांच्या ''स्वप्नभूमी'' (व्हीनस प्रकाशन, पुणे; १९६५), या ग्रंथाची सूची. अतिशय चमत्कारिक, सूचिशास्त्राचा गंध नसलेली सूची आहे ही. ग्रंथाला (शोभेसाठी) निर्देशसूची हवी या सांकेतिक कल्पनेमुळे जोडलेली ही सूची असावी. ग्रंथातील मनात येईल तो कोणताही शब्द उचलावा, आणि त्याचा पृष्ठांकनिर्देश करावा अशातून ही सूची तयार झाली असावी. अध्यक्ष, अनुक्तमंत्र, एकांगी, कटयुत्तर, अंगीं, कुंभार, कोरफड असे अनेकानेक शब्द सूचीत येण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. पूर्णत: अनावश्यक अशा या नोंदी आहेत, आणि ज्यांचे निर्देश यावयास हवे होते अशा अनेकानेक नोंदी यात नाहीत. अशा प्रकारे केलेली सूची ग्रंथाच्या वाचकाला मार्गदर्शक तर होत नाहीच, उलट मारक ठरते.

२/१७ या उलट काही नमुनेदार निर्देशसूचींचा उल्लेख करता येईल. त्यावरूनही चांगल्या निर्देशसूचीचे काही गुणविशेष लक्षात येतील. अशीच एक विशेष उल्लेखनीय निर्देशसूची श्री. ना. बनहट्टी यांच्या ''नाट्याचार्य देवल'' (१९६७) या ग्रंथाची आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या छपाईमधे प्रत्येक पृष्ठावर ओळींची संख्या निर्दिष्ट करण्याचा अभिनव उपक्रम केला आहे. पृष्ठ व ओळ या दोहोंचे संदर्भ दिल्याने ठामपणा येऊन निर्दिष्ट स्थळ अधिक लौकर सापडेल. 'या संदर्भपद्धतीचा उपयोग साधनसामग्रीचे परिशिष्ट, सूची आणि शुद्धिपत्र यांमधे करून घेतला आहे.' (प्रस्तावना). निर्देशसूचीमध्ये प्रथम पृष्ठाचा आकडा दिला आहे, आणि त्यापुढे टिंब देऊन पुढे ओळीचा आकडा दिला आहे. तोच विषय त्याच पृष्ठात अधिक वेळा आलेला असल्यास, पृष्ठ व ओळ यांच्या आकड्यापुढे अधिक चिन्ह (+) दिले आहे. ही पद्धती अधिक सोयिस्कर आहे. एका पृष्ठावर एक नोंद अनेक वेळेला उल्लेखिलेली असली, तरी वाचकाला एक नोंद आढळल्यावर त्याचे बाकीच्या नोंदींकडे दुर्लक्ष होण्याचा संभव असतो. तो धोका अशा उल्लेखांनी टळतो. तोच विषय एकामागून एक अनेक पृष्ठांवर उल्लेखित असल्यास पहिला व शेवटचा संदर्भ यांमध्ये आडवी रेघ (-) दिली आहे. नाटकांतील पात्रांच्याही नोंदी समाविष्ट केलेल्या आहेत. जेथे वर्णानुक्रमीत वर्ण बदलतो, तेथे पहिल्या नोंदीचे पहिले अक्षर जाड ठशात दिलेले आहे. नाटके व ग्रंथ यांची नावे एकेरी अवतरणात दिलेली आहेत. अतिशय नमुनेदार म्हणून ही सूची बघावयाला हवी. सूची करताना किती साक्षेप असावा लागतो, किती काटेकोरपणा सांभाळता येतो, कशी संशोधकीय दृष्टी असावी लागते याची कल्पना या सूचीवरून येते.

२/१८ अलीकडील एक नमुनेदार निर्देशसूची अशोक केळकरांच्या ''वैखरी'' या लेखसंग्रहाला (मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; १९८३) जोडलेली आहे. या सूचीत तळटीपांतील निर्देशांच्याही नोंदी आहेत. जिथे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, लेखी किंवा तोंडी अवतरण असेल

तिथे पृष्ठांकनोंदीनंतर 'उ' (- उक्ती) जोडले आहे. जिथे विषयाचे स्पष्टीकरण असेल तिथे पृष्ठांकनोंदीनंतर 'स्प' (- स्पष्टीकरण) जोडले आहे. पुस्तके सामान्यत: लेखकांच्या नावाखाली पोट-नोंदी म्हणून दिली आहेत. निर्देशसूचीचा जो मुख्य उद्देश, ग्रंथात काय आले आहे, आणि जे आपल्याला हवे आहे ते नेमके कुठे आले आहे ते सुलभतेने समजणे, तसेच ग्रंथाच्या स्वरूपाची नेमकी कल्पना देणे, ग्रंथात आपल्याला काय मिळेल ते समजणे, तो या सूचीत उत्तम प्रकारे साधला आहे.

२/१९ ''स्वातंत्र्यवीर सावरकर : एक रहस्य'' (मौज प्रकाशन गृह, मुंबई; १९८९) या द. न. गोखले यांच्या ग्रंथाची 'विवेचनाच्या आवृत्तीची सूची' ही सूचीही वेगळ्या स्वरूपाची, उल्लेखनीय आहे. ती करण्यातही वेगळी दृष्टी, साक्षेप, दक्षता दिसते. ग्रंथाच्या गाभ्याकडे नेणारी ही सूची आहे. ग्रंथात एखाद्या विषयाचे जे विवेचन आले आहे, ते वेगवेगळ्या स्वरूपात, वेगवेगळ्या ठिकाणी आलेले आहे, त्याचे एकत्रित संसूचन या सूचीतून होते. सूचीतील हे विषय मूळ ग्रंथात * अशा तारकाचिन्हाने दाखविले आहेत.

२/२० सूची करताना पडणारा एक प्रश्न म्हणजे, मुख्य ग्रंथाखेरीज जी प्रस्तावना (स्वत: लेखकाची अथवा अन्य कुणाची) असेल, परिशिष्टे असतील, टीपा-तळटीपा असतील, त्यातील नोंदीचा उल्लेख सूचीत करावा की नाही ? प्रा. बनहट्टींसारखे साक्षेपी संशोधकही परिशिष्टांतील उल्लेखांचा समावेश निर्देशसूचीत करीत नाहीत. ''समग्र कोल्हटकर'' (खं. १ १९७२, खं. २ १९७५) ला दुसऱ्या खंडात गं. दे. खानोलकरांनी विस्तृत टीपा दिल्या आहेत. या खंडांची सूची स. गं. मालशांसारख्या व्यासंगी अभ्यासकांनी केली आहे. पण मालशे यांनीही टीपांतील उल्लेखांचा सूचीत अंतर्भाव केलेला नाही याचा उल्लेख पूर्वी आला आहे. परंतु प्रस्तावना, टीपा, परिशिष्टे मूळ ग्रंथाला पूरक असल्याने त्यांतील उल्लेखांचीही नोंद सूचीत असणे उपयुक्त आहे. 'प्र', 'त.टी', 'टी', 'प', अशासारख्या संक्षेपांनी फार तर त्यांचे वेगळेपण सूचित करावे.

२/२१ कोणत्या ग्रंथाचा कोणत्या कारणासाठी अभ्यास व्हावा या अपेक्षेवरही निर्देशसूचीचे स्वरूप अवलंबून असते. एकाच ग्रंथाचे वाचन वेगवेगळे वाचक वेगवेगळ्या अपेक्षेने करीत असतात, आणि, त्यानुसार त्यांची निर्देशसूचीकडून अपेक्षा असते.

२/२२ निर्देशसूची ही केवळ यांत्रिक कृती नसून, ती एक वृत्ती, बौद्धिक शिस्त आहे. अनुभवलेल्या, स्मरणात ठेवावयाच्या व्यक्ती, घटना, विषय इत्यादींचे वर्गीकरण करून मनातल्या मनात त्यांचा क्रम लावावयाची सवय लागली, तर स्मरणात राहायला मदत होते.

आपण एखाद्या गावाला जातो; अनेक व्यक्ती तेथे आपणाला भेटतात. त्यांतल्या महत्त्वाच्या व्यक्तींची नोंद मनामध्ये, आणि तीही एका विशिष्ट पद्धतीने (उदाहरणार्थ, वर्णानुक्रमाने) केली, तर अतिशय थोडक्या अवकाशात त्या गावाचा सर्व मुक्काम आपल्य स्मरणात राहातो. सूचीकरण ही एक व्यवस्था आहे, आणि कोणत्याही प्रकारच्या अभ्यासाचा पाया ही व्यवस्था हा आहे.

२/२३ निर्देशसूची कशी करावयाची याबद्दल काही स्थूल, सर्वसाधारण सूचना करता येतील. आपल्याकडे प्राय: सर्वच गोष्टींत अपुरेपणा आहे. संशोधनाला अनुकूल, उत्तेजक वातावरण, परिस्थिती फारशी नसते. हौस, इच्छा असली तरी अनेक प्रकारच्या मर्यादा पडतात. त्यातली एक मुख्य मर्यादा आर्थिक. अशा मर्यादा लक्षात घेऊनच अशी निर्देशसूची कशी करावयाची याचा विचार करावयाला हवा. सूचिपत्रासाठी ९ सें.मी. x ७ सें.मी. (पोस्टकार्डाच्या अर्ध्या) आकाराचे कार्डाचे तुकडे घ्यावेत. कार्ड घेण्याचे कारण त्यांच्या जाडसरपणामुळे, ती हाताळायला, मागे-पुढे करायला, जुळवायला आणि टिकवायलाही अधिक सोयिस्कर असतात. एकेका सूचिपत्रिकेवर एकेका शब्दाची नोंद करीत जावे. उदाहरणार्थ, ''माधवराव पटवर्धन : वाङ्मयदर्शन'' (सु. रा. चुनेकर; मौज प्रकाशन गृह, मुंबई; १९७३) या ग्रंथाची निर्देशसूची करावयाची आहे, तर ती कशी करावयाची ? प्रथमत: या ग्रंथाचे स्वरूप लक्षात घ्यावे लागेल. माधवराव पटवर्धन या, मराठीतील प्रमुख साहित्यिकाच्या समग्र साहित्याचा तो सामीक्षिकी अभ्यास आहे. पटवर्धनांचे जीवनचरित्र, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्याशी वेगवेगळ्या नात्याने संबंधित महत्त्वाच्या व्यक्ती, संस्था, त्यांचे समग्र साहित्य, त्यांच्या लेखनाचे विषय, त्यांचे समीक्षक, समकालीन (मुख्यत:) वाङ्मयीन वातावरण यांच्याकडे या सूचीने निर्देश केला पाहिजे. पटवर्धन हे प्राधान्याने कवी, छंद:शास्त्रज्ञ, भाषाशुद्धीचे अभ्यासू पुरस्कर्ते, समीक्षक व साहित्यविमर्शक. या त्यांच्या अंगाकडे, यांच्याशी संबंधित व्यक्ति-ग्रंथ-विषय यांच्याकडे निर्देशसूचीने लक्ष वेधले पाहिजे.

२/२३ अ ग्रंथाच्या वाचनाला आरंभ करताना या दृष्टीने प्रथम जो शब्द महत्त्वाचा वाटेल त्याच्याखाली पेन्सिलीने रेघ मारावी, व सूचिपत्रिकेवर तो लिहावा आणि पुढे पृष्ठांक टाकावा. (उदाहरणार्थ, सहस्रबुद्धे, महादेव विश्वनाथ, ४) यानंतर पुढची जी शब्दनोंद महत्त्वाची वाटेल तिच्याखाली अशीच खूण करून दुसऱ्या सूचिपत्रावर टिपावी. सूचिपत्रे जुळविताना प्रारंभापासूनच वर्णानुक्रमाने जुळवीत जावे, म्हणजे कोणतेही सूचिपत्र नवा पृष्ठांक टाकताना सहज मिळू शकते. पूर्वीच्या नोंदीचा शब्द पुन्हा पुढे आढळला की, तेथेही शब्दाखाली रेघ मारावी, आणि सूचिपत्रावर तो पृष्ठांक टाकावा. ट्रेमध्ये वा लांबोळक्या लहान खोक्यामध्ये ही सूचिपत्रे वर्णानुक्रमाने जुळवून ठेवीत जावे. ती ठेवताना मुख्य काळजी घ्यावयास हवी ती ही की, ती विस्कटू नयेत; त्यांचा क्रमभंग होऊ नये. सूचिपत्रे नीट क्रमवार जुळविणे, ती विस्कटू

न देणे, त्यांचा क्रमभंग होऊ न देणे महत्त्वाचे. एकीकडे ग्रंथाचे मुद्रण चालू असतानाच, दुसरीकडे, जसजसे फर्मे येत जातील तसतशा तेव्हाच सूचिपत्रिका जुळवून ठेवीत जाव्यात, म्हणजे ग्रंथाची छपाई पुरी होण्याच्या सुमारासच निर्देशसूचिपत्रिकांची नोंदणी पुरी झालेली असेल. फक्त त्या नोंदी सलगपणे उतरून काढणे तेवढे शिल्लक राहील. सूची तयार नाही, म्हणून ग्रंथाच्या छपाईने काम अडून बसण्याचे कारण उरणार नाही.

२/२४ निर्देशसूचीतील शब्दनोंदीचा क्रम कसा असावा ? हा क्रम सामान्यत: आद्याक्षरानुसार असणे सोयिस्कर असल्याने तसा तो बहुश: असतो. मराठी वर्णमालेसंबंधी काही शंकास्थाने, वाद आहेत. या संदर्भाने बरीच चर्चा झाली आहे; होत असते. तो स्वतंत्र विषय आहे. प्रस्तुत प्रास्ताविक निबंधात त्या चर्चेच्या तपशिलात न जाता, प्रचलित दोन वर्णानुक्रमींचा उल्लेख करता येईल. शं. ग. दाते यांनी 'मराठी ग्रंथसूची' साठी पुढीलप्रमाणे वर्णानुक्रम स्वीकारला आहे.

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ
क् ख् ग् घ् ङ्
च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण्
त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ् क्ष् ज्ञ्

अशोक केळकरांनी आपल्या 'मराठी देवनागरी वर्णक्रमी' या लेखात सुचविलेला वर्णानुक्रम असा आहे :

अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ
ए ॲ ऐ ओ ऑ औ
. :
क् ख् ग् घ् ङ्
च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण्
त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व् श् ष् स् ह् ळ्
क्ष् ज्ञ्

'दोन शब्दांमधली कोरी जागा (शब्द खंड) आणि संयोगचिन्ह (-) ही वर्णमालेच्या सुरुवातीची, म्हणजे 'अ'च्या आधीची दोन चिन्हे आहेत असे मानावे. औ आणि क् यांच्यामधली चिन्हे शिरोबिंदू (डोक्यावरचे टिंब) आणि विसर्ग अशी आहेत, अं आणि अः नाहीत हे ध्यानात ठेवावे.' [''वैखरी'', पृ. २६२]

२/२५ वर्णानुक्रमावरील अलीकडील लेख म्हणजे मो. रा. वाळंबे यांनी लिहिलेला समावेशक लेख 'वर्णानुक्रम-पद्धती'.[२६] या लेखात वाळंबे यांनी मराठी वर्णानुक्रमाचा पुष्कळसा ऊहापोह केलेला आहे, वादस्थळांची माहिती दिली आहे. वाळंब्यांनी अशोक केळकरांचा वर्णानुक्रम स्वीकारला आहे.

२/२६ वर्णानुक्रमात एकसूत्रता असणे केव्हाही इष्ट. पण असे एकमत होणे तेवढेच कठीण. विकल्पांनाही काही तर्कशुद्ध स्थान आहे. तेव्हा या संदर्भात एवढेच सांगता येईल की, आपणाला सयुक्तिकपणे जर निराळा, विशिष्ट वर्णक्रम स्वीकारावासा वाटला, तर तो स्वीकारावा; पण त्यामागे स्वत:चे निश्चित धोरण, भूमिका असावी, आणि प्रारंभी त्याचे स्पष्टीकरण असावे. आपण जो वर्णक्रम एकदा स्वीकारला त्याचे सर्वत्र अबाधित अवलंबन असावे. संशोधनाशी संबंधित सर्वच गोष्टींमागे आपले विचारपूर्वक स्वीकारलेले धोरण असावे, त्याचे स्पष्टीकरण असावे, आणि सर्वत्र त्या धोरणाची एकसूत्रीपणाने कार्यवाही असावी.

२/२७ सर्वसाधारण निर्देशसूचीचे मुख्यत: तीन घटक असतात. १) व्यक्तिसूची, २) ग्रंथ/लेखादी नामसूची, ३) विषयसूची. या तीनही सूची पृथक् पृथक् देता येतात किंवा वर्णानुक्रमाने सलग एकमेकींत मिसळून देता येतात. या संबंधात निश्चित नियम सांगता येणार नाही. सूचीचा विस्तार, गुंतागुंत यावर हे धोरण ठरवावे लागेल. तीनही वर्ग सरमिसळीने दिले, तर त्यांचा वेगवेगळेपणा वेगवेगळ्या टंकांमधून दाखविता येतो. उदाहरणार्थ, व्यक्तिनामे नेहमीच्या ठशात, ग्रंथ/लेखनामे जाड ठशात, विषय तिरप्या ठशात; ग्रंथ-लेख यांच्यासाठी दुहेरी-एकेरी अवतरणाचा उपयोग करूनही हा भेद दाखविता येतो.

२/२८ एकाच व्यक्तीचे निर्देश वेगवेगळ्या ठिकाणी लिहिण्याच्या ओघात, वेगवेगळ्या पद्धतीने एकाच ग्रंथात येणे शक्य आहे. कधी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कधी श्रीपाद कृष्ण, कधी कोल्हटकर, कधी तात्यासाहेब, असे एकाच कोल्हटकरांचे उल्लेख लिहिण्याच्या ओघानुसार येणे शक्य आहे. या वेगवेगळ्या उल्लेखांची सूचीत नोंद कशी करावयाची ? मुळात हे सर्व एकाच व्यक्तीचे उल्लेख आहेत याची जाणकारी सूचिकाराला असावयाला पाहिजे. हे वेगवेगळे उल्लेख म्हणजे टोपणनावेही नसतात. एकाच व्यक्तीचे विविध नावांनी उल्लेख करण्याची ही प्रचलित

धाटणी असते. एकाच व्यक्तीचे हे उल्लेख असल्याचे निश्चित माहिती असेल, तर मुख्य नावापुढे सर्व नोंदींचे पृष्ठांक देऊन, उपनावापुढे 'पहा' म्हणून मुख्य नावाचा उल्लेख करता येईल. असे संदर्भ-प्रतिसंदर्भ (पोकळ नोंदी) देऊन हा प्रश्न सोडविता येतो. मात्र, विविध उल्लेख एकाच व्यक्तीचे आहेत की वेगवेगळ्या हे ठरविणेही कधीकधी गुंतागुंतीचे होते. 'नामूलं लिख्यते किंचित्' अशा सार्थ प्रतिज्ञेने व अभिमानाने लिहिणाऱ्या रा. शं. वाळिंबे यांच्या ''साहित्यातील संप्रदाय'' ग्रंथाच्या १९५० व १९६६ च्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्त्यांत 'महाराष्ट्रातील रोमँटिसिझम' या प्रकरणात रविकिरणमंडळावर लिहिताना, माडखोलकरांनी विठ्ठलराव घाट्यांना पाठविलेले म्हणून एक पत्र उद्धृत केले आहे. माडखोलकरांच्या 'दोन तपे' या पुस्तकातून ते पत्र उद्धृत केले आहे. तेथे माडखोलकरांनी फक्त आपण विठ्ठलरावांना पत्र पाठविल्याचे म्हटलेले आहे. रविकिरणमंडळ आणि विठ्ठलराव एवढे लक्षात घेऊन, वाळिंब्यांनी ते पत्र, विठ्ठलराव म्हणजे विठ्ठलराव घाटे अशा उतावळ्या समजुतीने ते, विठ्ठलराव घाट्यांच्या नावावर दिले आहे. पण ''दोन तपे''तील एकूण संदर्भ, माडखोलकर-विठ्ठलराव घाटे संबंध, माडखोलकर-विठ्ठलराव कुळकर्णी संबंध, पत्रलेखनाचा काल हे सर्व लक्षात घेतल्यावर, हे 'विठ्ठलराव' घाटे नसून कुलकर्णी आहेत हे समजणारे आहे.[२७] वाळिंब्यांसारख्या संशोधनाच्या बारकाव्याचा, सत्यनिष्ठेचा आग्रह धरणाऱ्या संशोधकाकडूनही कसा घोटाळा होतो हे लक्षात घेतल्यावर, नामनिर्णयाचा हा प्रश्नही कसा गुंतागुंतीचा होऊ शकतो हे समजते.

अशाच आणखी एका शंकास्थानाचा उल्लेख करता येईल. द. वा. पोतदार व श्री. शं. नवरे लिखित ''महाराष्ट्र-साहित्य-परिषद-इतिहास'' (महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; १९७१) मध्ये पृ. १५३, १५४ वर 'रा. केशवराव आपटे' यांचा उल्लेख आहे. पण पृ. १७१ वर या संबंधाने स्पष्टीकरण असून 'येथे वासुदेवराव आपटे असेच नाव आहे व तेच बरोबर असले पाहिजे.' असे नि:संदिग्ध विधान आहे. अशा वेळी पृ. १५३, १५४ वरील 'आपट्यां'ची नोंद कशी करावयाची ? या ग्रंथाच्या सूचीत 'आपटे, केशवराव' अशीच नोंद (पृ. ४६३) ठेविली आहे. ही नोंद दिशाभूल करणारी ठरेल. वस्तुत: 'आपटे, केशवराव' या नोंदीपुढील पृ. १५३-४ या पृष्ठनोंदीपुढेच पृ. १७१चीही नोंद केली असती, तरी आवश्यक तो बोध झाला असता. हाच प्रश्न असाही उपस्थित होईल : मूळ उल्लेख चूक असून शुद्धिपत्रात ती चूक दुरुस्त केली असली, तर या चुकीच्या दुरुस्तीची नोंद सूचिकाराने कशी घ्यावयाची ? ती चूक निदर्शनाला येईल अशा प्रकाराने सूचिकाराने नोंद करावयाला हवी.

२/२९ टोपणनावांच्या प्रश्नामुळे संदर्भसूची करतानाही कशा अडचणी येतात याचा मागे उल्लेख केला आहे. (परिच्छेद १/१६). निर्देशसूचीच्या बाबतीतही अशाच अडचणी येतात. एकच टोपणनाव वेगवेगळ्या व्यक्तींनी घेणे शक्य असते, किंवा एकच व्यक्ती अनेक टोपणनावे घेण्याची शक्यता असते, याचा पूर्वीच उल्लेख केला आहे. 'केशवसुत' (कृष्णाजी केशव

दामले) हेच टोपणनाव पुढे नारायण केशव बेहेऱ्यांनी वाच्यार्थ्याच्या वास्तवामुळे काही काळ घेतले. (आणि यावरून १९३१ मधे 'प्रगति' साप्ताहिकातून माधवराव पटवर्धन व ना. के. बेहेरे यांच्यात कटू वादही झाला.) सूचीकरणातील संशोधनाचा, जाणकारीचा भाग इथे येतो. सूची करणे हे केवळ यांत्रिक काम नाही हे अशा वेळी विशेष लक्षात येते.

२/३० एकच व्यक्ती वेगवेगळ्या टोपणनावांनी लेखन करते, तेव्हा या सगळ्या टोपणनावांचा छडा लावणेही केव्हा केव्हा अशक्य होते. टोपणनावाने किंवा अनाम केलेल्या लेखनाची नोंद कशी करावयाची हा एक प्रश्नच असतो. जेथे मूळ नाव निश्चित समजेल, तेथे मूळ नावावर नोंद करून इतरत्र 'पहा' अशी नोंद करणे योग्य. पण कधी मूळ नावापेक्षा टोपणनावच अधिक प्रसिद्ध असते, अशा वेळी तारतम्याने नोंद करणे योग्य. जर टोपणनावाचा तलास नाही लागला, तर ग्रंथात, लेखात जसा उल्लेख असेल तसा करावा. सर्व अनाम उल्लेख सूचीच्या आरंभी घ्यावेत.[२८]

२/३१ काहीसा गंमतीचा, विनोदी वाटावा असाही एक प्रश्न करता येईल. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम इत्यादींचे उल्लेख कसे करावेत ? यांची आडनावे तर सर्वसामान्यांना माहीतही नसतात. कुलकर्णी, ज्ञानेश्वर विठ्ठलपंत; ठोसर, नारायण सूर्याजीपंत; आंबिले (मोरे), तुकाराम बोल्होबा असे या महान संतकवींचे उल्लेख करणे, म्हणजे चेष्टाच आहे असे वाटावे. प्रसिद्ध, मान्य नावांपुढे त्यांच्या निर्देशाच्या नोंदी कराव्यात हे स्पष्टच आहे.

२/३२ 'माधव-जूलियन' या टोपणनावाची नोंद कुठे कुठे 'जूलियन माधव' अशी आढळते. हे अर्थातच अगदीच चूक आहे. टोपणनाव हे एक संपूर्ण घटक आहे; त्याची फोड करावयाची नसते.

२/३३ सूचीकरणाचा एक महत्त्वाचा फायदा हा की, सूची करण्याच्या निमित्ताने पुन्हा, एकापेक्षा अधिक वेळा ग्रंथाचे सूक्ष्म वाचन होते, आणि ग्रंथात जर काही विसंगती राहिल्या असतील, तर त्या ध्यानात येतात. लेखनातील सैलपणा, पुनरावृत्ती, एकच संज्ञा, शब्दसंहती वेगवेगळ्या अर्थाने वापरली गेली असेल, किंवा एकाच अर्थासाठी वेगवेगळ्या संज्ञा वापरल्या गेल्या असतील, तर हे सगळे दोष सूची करताना ध्यानात येतात. ग्रंथकाराने स्वत:च सूची केली तर हे त्याच्या लक्षात येऊ शकते. जर दुसऱ्या सावध सूचिकाराने सूची केली, तर त्याच्या लक्षात येऊन तो ग्रंथकाराच्या निदर्शनाला या विसंगती आणून देऊ शकतो. ''मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा'' (मौज प्रकाशन गृह, मुंबई; १९७०) या प्रभाकर पाध्ये यांच्या ग्रंथात एकाच अर्थाने वेगवेगळे शब्दप्रयोग वेगवेगळ्या जागी सैलपणे केलेले आढळतील. 'सौंदर्याची प्रक्रिया'

(पृ. २५) आणि 'सौंदर्यनिर्मितीची प्रक्रिया' (पृ. १, २५, ३४, ४०) असे भिन्न अर्थदर्शक शब्दप्रयोग ते एकाच अर्थाने करताना दिसतात. सूची करताना असे दोष लक्षात आले, तर ते टाळता येतात, किंवा सूचीत निर्दिष्ट करून सावरून घेता येतात.

२/३४ सूची करीत असताना कधी असे होते की, एखादा निर्देश प्रारंभीच्या भागात गौण, अनिर्देश्य वाटतो, पण पुढे तो निर्देश महत्त्वाचा वाटू लागतो. अशा वेळी पुन्हा मागे येऊन पूर्वी न केलेले पृष्ठनिर्देश नोंदवावे लागतात. कधी असे होते की, एखाद्या ठिकाणच्या चारपाच उल्लेखांपैकी एखादाच उल्लेख महत्त्वाचा वाटतो, इतर वाटत नाहीत. पण एक उल्लेख केल्यावर सोबतचे इतरही उल्लेख समाविष्ट करावे लागतात. चव्हाण, पाटील, पेंडसे, भावे, महाजनी अशी अनेक नावे एकत्र आली, आणि, पैकी एखाददुसरेच नाव तेथील संदर्भात प्रस्तुत असले तर अन्य उल्लेख गाळावेत का, असाही प्रश्न पडतो. अशा वेळी तारतम्याने निर्णय घ्यावा लागतो. सूची अतिविस्तृत किंवा अतिसंक्षिप्त होऊ नये, आणि सूची ग्रंथरूपबोधक असावी, ही सूत्रे ध्यानात ठेवून, तारतम्यानेच सूचिकाराला हे निर्णय घ्यावे लागतात.

२/३५ या सगळ्या विवेचनातून एक ध्यानात यावे. संशोधनाप्रमाणे सूचीकरण हीही काही यांत्रिक क्रिया नाही. साचा निर्जीवपणे आचरिला म्हणजे चांगली सूची होत नाही. शिस्त, काटेकोरपणा, नियमांकितता हवीच; पण लवचिकपणा, तारतम्य हेही लवचिकपणेच असावे लागते. प्रामाणिक तारतम्य कुठे संपते, आणि देखावा, चालढकल, आळस कुठे सुरू होतो याचा शोध ज्याचा त्यानेच घ्यावयाचा. सूचीकरणातील वेगवेगळे प्रश्न ध्यानात घेऊनच सापेक्षत: अधिक उपयुक्त धोरण ठेविले पाहिजे, आणि मुख्य म्हणजे जे धोरण विचारपूर्वक स्वीकारले असेल, त्याचा सर्वत्र सारखेपणाने अवलंब केला पाहिजे. आपल्याला सयुक्तिक वाटणाऱ्या आपल्या धोरणाचे निर्देशसूचीच्या प्रास्ताविकात स्पष्टीकरण केले पाहिजे. हे सर्व लक्षात आले म्हणजे सूचीकरणातही सूचिकाराच्या प्रज्ञेला, निर्णयाला अवसर असतो हे उमजते, आणि हे काम निर्जीव नसून जिवंत वाटू लागते.

३

३/१ संदर्भसूची, निर्देशसूची यांच्याप्रमाणेच सूचींचा आणखी एक वर्ग करता येईल, तो म्हणजे पदसूची, शब्दसूची इत्यादींचा.

३/२ पदसूची म्हणजे सामान्यत: कवितांच्या प्रथमचरणांची सूची. कवितासंग्रहाला अनुक्रमणिका असते, पण ती कवितांच्या शीर्षकांची असते. अनेकदा वाचकाला, त्या विशिष्ट कवितेच्या आवडीमुळे तिचा सुरुवातीचा चरण आठवत असतो, पण कवितेचे शीर्षक ध्यानात

नसते; अशा वेळी ही प्रथमचरणांची सूची त्याला मदत करते. 'संगमोत्सुक डोह' हे कवितेचे शीर्षक त्याला आठवत नसते; पण 'एकत्र गुंफून जीवित धागे' ही या कवितेची सुरुवात त्याला आठवत असते. प्रथमचरणांच्या सूचीवरून त्याला मूळ कविता मिळू शकते. अलीकडे कवितेला शीर्षके न देण्याचा प्रघातही दिसतो. तेथे कविता प्रथमचरणानेच निर्देशिली जाते. पण अनुक्रमणिकेतला क्रम वर्णानुक्रमी नसतो. पदसूचीत तो वर्णानुक्रमी असतो.

३/३ ज्ञानदेव-तुकारामादींच्या अभंगांच्या गाथ्यांमधे अशा प्रथमचरणांच्या सूची असतात. ज्ञानेश्वरीतील प्रथमचरणांची अशी सूची, सौ. कालिंदी जोशी यांनी जवळजवळ पूर्ण करीत आणल्याची काही वर्षांपूर्वी बातमी आली होती. पुष्कळदा आपल्याला ज्ञानेश्वरीतला एखादाच चरण आठवत असतो. पण तो चरण कोणत्या ओवीत कितवा आहे इत्यादी संदर्भ चटकन आठवत नाही आणि मग हा संदर्भ शोधावयाचा म्हणजे संपूर्ण ज्ञानेश्वरी शोधायला हवी. हा इतका त्रास वाचवावयाचा तर त्यासाठी एखादी चरणसूची हवी. ही अडचण लक्षात घेऊन सौ. कालिंदी जोशी यांनी अशी चरणसूची तयार केली.[२९] मात्र अजूनही ही सूची प्रकाशित झालेली नाही.

३/४ प्राचीन पद्यग्रंथांच्या बाबतीत चरणसूची देण्याचा उपक्रम त्या ग्रंथांच्या अनेक संपादकांनी केला आहे. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकरांनी त्यांच्या ''सार्थ ज्ञानेश्वरी''च्या अखेरीस, ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवीच्या पहिल्या चरणाची अकारविल्हाने सूची दिली आहे. ''दासबोधा''चीही अशी चरणसूची प्रकाशित आहे. अशा चरणसूचीमधे ओवीच्या अथवा अभंगाच्या पहिल्या चरणाची सूची असल्यामुळे, वस्तुतः या 'ओवीसूची' किंवा 'अभंगसूची' म्हणावयास हव्यात. या संबंधात मु. श्री. कानडे लिहितात, 'अभ्यासकांच्या किंवा जिज्ञासू वाचकांच्या दृष्टीने पाहिले तर ओवीसूचीपेक्षा प्रत्येक ओवीची चरणसूची अधिक उपयोगी होईल, हे उघड आहे. .... ओवीसूची किंवा अभंगसूची यापेक्षा चरणसूची अनेकपटींनी जागा अडवणारी असली, तरी तिची उपयुक्तताही तितक्याच प्रमाणात वाढलेली असते.'[३०]

३/५ अनेकदा असे होते की, एखादा अभंग, ओवी, कविता यांमधील मधलाच चरण सुभाषितवजा ठरून तो आपणास माहीत असतो. पण त्याचा प्रारंभ माहीत नसतो. तुकारामांच्या अभंगांत तर असे अनेक चरणांबद्दल होते. 'सोने आणि माती ।। आम्हा समान हे चित्ती ।।' असा चरण माहीत असतो, पण 'मुंगी आणि राव। आम्हा सारखाची जीव ।।' हा अभंगाचा प्रारंभ माहीत नसल्याने, तो पुरा अभंग सहजासहजी सापडत नाही. अशासाठी जर पदसूची केल्या तर त्या फार उपयोगी ठरतील. सुभाषिते, सूक्ती, यांच्या संग्रहांच्या सूची अशा वेळी उपयुक्त ठरतील.

३/६ पदसूचीप्रमाणे शब्दसूचीचाही उपयोग, कवितेच्या आणि इतरही साहित्याच्या अभ्यासाला आवश्यक, उपयुक्त होतो. अशा शब्दसूची कवी-लेखकाला अभिप्रेत असणारा शब्दाचा नेमका अर्थ स्पष्ट करायला मदत करतात. 'हरपले श्रेय' ही केशवसुतांची महत्त्वाची कविता. त्यांच्या अंतरंगाच्या जवळ नेणारी. तिची भरपूर चर्चा मराठी समीक्षेत झाली आहे. या कवितेमधील केशवसुतांचा अभिप्राय जाणण्यासाठी या कवितेच्या शीर्षकातील 'श्रेय' शब्दामागील अभिप्राय निश्चित समजून घ्यावयास हवा. कवितेतील शब्दांचा अर्थ शब्दकोशाच्या कक्षेत सामावणारा नसतो. त्यासाठी कवीनेच त्या वा तत्सम शब्दांचा वापर आणखी कुठे कुठे केला आहे याचा शोध घेऊन या शब्दवापरामागील कवीचे भाव-अर्थ-वलय जाणून घ्यावे लागते. यासाठी केशवसुतांनी 'श्रेय' वा त्याच्या जवळपास येणाऱ्या अर्थाचे शब्द आणखी कुठे, कोणत्या संदर्भात वापरले आहेत याचा शोध घेतला म्हणजे 'हरपले श्रेय' मधील 'श्रेया'ची विवक्षा बरीचशी स्पष्ट होऊ लागते.[३१] हे काम केवळ यांत्रिक किंवा संगणकाच्या आधाराने करता येईल असे नाही. केशवसुतांच्या कवितांची अशी शब्दसूची शकुंतला क्षीरसागर यांनी तयार केली आहे, पण ती प्रकाशित होऊ शकली नाही.[३२]

३/७ 'अनुभवामृताचा पदसंदर्भकोश' (येथे 'पदकोश' हा शब्द 'शब्दसूची' अशा अर्थानेच वापरला असावा; [कंसात 'concordance' असेच म्हटले आहे] 'चरण' अशा अर्थाने वापरला नसावा.) शरद केशव साठे यांनी तयार केला असून तो मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग व मराठी संशोधन मंडळ, मुंबई, या उभयतांच्या वतीने प्रकाशित होत असल्याची अलीकडेच माहिती प्रसिद्ध झाली आहे. श्रीमती कुळकर्णी व श्री. साठे यांनी मराठी संशोधन मंडळासाठी 'तुकारामपदकोश'ही तयार केला आहे; तो अप्रकाशित आहे. साठे यांनी केलेला 'मर्ढेकर पदसंदर्भकोश'ही प्रकाशित आहे.[३३]

३/८ श्री समर्थांच्या वाङ्मयातील प्रत्येक शब्द कोठे कोठे आला आहे याची नोंद करून तयार केलेली, शं. श्री. देवांची प्रचंड शब्दसूची धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवता मंदिरात उपलब्ध आहे. ''दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास'' या मु. श्री. कानडे यांच्या अप्रकाशित पीएच.डी. प्रबंधात (पुणे विद्यापीठ, १९५८) दासबोधाची बृहत् शब्दसूची आहे. रामदासांच्या वाङ्मयातील फारशी शब्दांची कानडे यांची सूचीही ''मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिका''त (१९७४, पृ. १५५-१७९) प्रकाशित झाली आहे.[३४]

३/९ शब्दसूचीचे विवृद्ध, विकसित स्वरूप म्हणजे शब्दकोश. अशा तऱ्हेच्या अनेक शब्दसूची किंवा शब्दटिपणे प्राचीन ग्रंथांवर प्राचीन काळीही झालेली आहेत, आणि अर्वाचीन काळातही त्या साहित्याचे शब्दकोश प्रकाशित होत आहेत. 'मध्ययुगीन काळातील ग्रंथांचा भाषिक अभ्यास' या मु. श्री. कानडे यांच्या लेखात[३५] मध्ययुगीन ग्रंथांच्या अनेक शब्दसूचींची, टिपणांची, माहिती आली आहे. ''मराठी शब्दसमीक्षा'' या कानडे यांच्या

लेखसंग्रहात मराठीतील शब्दांच्या पाहाणीच्या व समीक्षेच्या अनुषंगाने 'शिवाजी महाराजांच्या पत्रातील फारशी शब्दांची यादी', 'विद्यमान मराठीतून लुप्त झालेल्या एकोणिसाव्या शतकातील मराठी शब्दांची यादी', 'गडकऱ्यांच्या नाटकांतील शब्दविशेषांची यादी' अशा आणखी काही शब्दसूची आलेल्या आहेत.

३/१० संदर्भसूची असो, निर्देशसूची असो, किंवा पदसूची, शब्दसूची असो, हे एक महत्त्वाचे संदर्भसाधन आहे. अभ्यासकाचा वेळ, श्रम वाचविणे आणि त्याला पाहिजे असलेली माहिती, संदर्भ कमीत कमी वेळात उपलब्ध करून देणे हे सूचीचे साध्य आहे. अशा सूची जितक्या आणि जितक्या प्रकारच्या होतील तितक्या हव्याच आहेत. आपल्याकडे एकूणच संदर्भसाधनांची फार कमतरता आहे, आणि त्यामुळे अभ्यासकाला सूची तयार करण्यापासून विश्लेषणात्मक विवेचन करण्यापर्यंत सर्व कामे अनेकदा स्वत:लाच करावी लागतात. साधे साधे संदर्भ मिळत नाहीत, आणि मग वाटते, 'या प्रकारची सूची हवी आहे.' इंग्रजीमधे 'Bibliography' वर अनेक मोठमोठे स्वतंत्र ग्रंथ झालेले आहेत. आपल्याकडे काही थोडी छोटेखानी पुस्तके, आणि तुरळक लेख यांखेरीज यासंबंधाने फारसा विचार झालेला नाही. त्यामुळे सूची करणाऱ्याला अनेक प्राथमिक अडचणी जाणवतात, प्रश्न पडतात, शंका येतात. पण काम करावयाला लागले म्हणजे मार्ग निघत जातो, प्रश्नांचे निरसन होत जाते. मराठीतील वेगवेगळ्या स्वरूपाच्या ग्रंथांच्या, वेगवेगळ्या पद्धतींनी केलेल्या अनेक संदर्भसूचींची, निर्देशसूचींची पाहणी करून, अशा प्रत्यक्ष अभ्यासावर आधारित असे यासंबंधी अधिक सविस्तर विवेचन व्हावयाला हवे. अभ्यासक परिश्रमाने संदर्भसूची तयार करतात, त्यांची परीक्षणे व्हायला हवीत. प्रस्तुत प्रास्ताविक निबंधातही केवळ सर्वसामान्य दिग्दर्शनाचे, आणि संशोधनातील या महत्त्वाच्या साधनाकडे लक्ष वेधण्याचे कार्य साधण्यापुरतेच उद्दिष्ट मर्यादित होते. प्रत्यक्ष सूची करावयाला लागल्यावर आणखीही अनेक गोष्टी लक्षात येत जातील आणि स्वत: सूचिकारच गरजेप्रमाणे, सरावाने मार्ग काढू शकेल.

[''संशोधन : स्वरूप.आणि पद्धती'', संपादक : सु. रा. चुनेकर, रंगनाथ पठारे, दिलीप धर्म; शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३, या पुस्तकात माझा 'सूची : शास्त्र व उपयोग' हा लेख आहे. त्या लेखाचा विस्तार करून, त्यावर संस्कार करून, प्रस्तुत प्रास्ताविक निबंध नव्यानेच लिहिला आहे.]

'शतदीप', एस् ४
३५९ ब/२, मॉडेल कॉलनी
पुणे-४११ ०१६

सु. रा. चुनेकर
३१ डिसेंबर १९८९

संदर्भटीपा

१ डॉ. उषाबाई देशमुखांची तक्रार रास्त आहे. पण त्यांनी ज्या विशिष्ट व्यक्तींच्या सूची नसण्याबद्दल लिहिले आहे त्यांच्या सूची पुऱ्या अपुऱ्या स्वरूपात पुढीलप्रमाणे झाल्या आहेत –

(१) प्रा. [श्री. ना.] बनहट्टी यांचे प्रकाशित वाङ्मय, परिशिष्ट, ''एकावळ'' (प्रा. श्री. ना. बनहट्टी यांचे संकलित लेख), संपादक : मा. गो. देशमुख; १९४१; पृ. १९६-२०१.

(२) श्रीनिवास नारायण बनहट्टी यांची ग्रंथसंपदा, 'युगवाणी', एप्रील-मे १९७५; पृ. ६.

(३) कै. वि. ल. भावे [१८७१-१९२६] वाङ्मयसूची व संदर्भलेखसूची, डॉ. म. प. पेठे, 'साहित्य सहकार', ऑक्टोबर १९७१; पृ. ३१-३२.

(४) १) सारस्वतकार वि. ल. भावे - वाङ्मयसूची, पृ. १६२-१६७; २) सारस्वतकार वि. ल. भावे विषयक संदर्भसाहित्य, पृ. १६८, ''वारसा'' (वि. ल. भावे लेखसंग्रह), संपादक : रा. चिं. ढेरे; १९७१.

(५) राजवाडे - वाङ्मयसूची : मराठी साहित्यदर्शन, पुष्प पंधरावे, ''इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे.'', संपादक : दि. वि. काळे, जून १९६४, पृ. १४३-१५६.

(६) राजवाडे साहित्य : अ) राजवाडे-लिखित ग्रंथ, ब) राजवाडे-संपादित ग्रंथ, क) राजवाडे-संपादित साधनग्रंथ, ''राजवाडे-विचारदर्शन.'' प्र. न. जोशी; फेब्रुवारी १९६५; पृ. २६८-२७१.

(७) राजवाड्यांच्या ग्रंथांची व लेखांची यादी, ''राजवाडे-दर्शन'', मॉडर्न बुक डेपो, पुणे, मे १९६५; पृ. १९६-२१०. ('विद्यासेवक' मासिकाच्या राजवाडे अंकावरून पुनर्मुद्रित.)

२ उद्धृत : 'पाश्चात्यांचे मराठीविषयक संशोधन आणि अभ्यास', शं. गो. तुळपुळे, ''भाषा आणि साहित्य-संशोधन'', खं. २, संपादक वसंत स. जोशी, गं. ना. जोगळेकर, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; जून १९८५, पृ. ११३-११४.

३ गो. रा. परांजपे यांच्याकडून समक्ष समजलेली माहिती. 'साहित्य सहकार' मासिकाच्या जून, जुलै, ऑगस्ट १९६५ अंकात गो. रा. परांजपे यांनी नवभारत, सह्याद्रि, लोकशिक्षण, साहित्य, सत्यकथा, ज्योत्स्ना, प्रतिभा, समीक्षक इत्यादी नियतकालिकांच्या विशेषांकांची सूची प्रकाशित केली आहे.

४ उदाहरणार्थ : ''महाराष्ट्र साहित्य पत्रिका सूची'', मराठी विभाग, पुणे विद्यापीठ; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मार्च १९७२.

५ अशा काही सूची :

१) ज्ञानदेव वाङ्मयसूची – म. प. पेठे; मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९६८.

२) डॉ. माधवराव पटवर्धन : वाङ्मयसूची - (वर्णनात्मक व समीक्षात्मक) - सु. रा. चुनेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ, मुंबई; १९८३.

३) राम गणेश गडकरी : वाङ्मयसूची – सुधा भट; महाराष्ट्र शासन, शिक्षण विभाग, मुंबई; १९८६

६ 'प्रा. अ. का. प्रियोळकर यांच्या वाङ्मयाची सूची' – सु. रा. चुनेकर; मराठी संशोधन मंडळ, मुंबई; १९७३. पृ. ४८; २ रु. [प्रथम प्रकाशन, 'मराठी संशोधन पत्रिका', वर्ष २०, अं. ३, एप्रील १९७३]

७ पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने असा गौरविका-स्मरणिकांचा संग्रह करण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल अरविंद टिकेकर गौरवग्रंथांचा अभ्यास पीएच्.डी. पदवीसाठी करीत होते असे समजले.

८ काही म्हातारे व एक म्हातारी – विठ्ठलराव घाटे. (संपादक : सु. रा. चुनेकर), मौज प्रकाशन गृह, मुंबई, आ. ३, १९८८, 'संपादकीय प्रास्ताविक', पृ. दहा.

९ झेंडूची फुले – केशवकुमार (प्रल्हाद केशव अत्रे) (संपादक : डॉ. स. गं. मालशे), ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; आ. ९, १९७४, प्रस्तावना, पृ. बावीस-तेवीस.

१० 'मराठी संशोधन पत्रिके'तून पीएच्.डी.च्या याद्या देण्याचा उपक्रम पूर्वी झाला होता. त्यानंतर ''भाषा व साहित्य : संशोधन'' या ग्रंथाच्या तीन खंडांमधे [महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; १९८१, १९८५, १९८९] डॉ. म. प. पेठे यांनी विद्यापीठ स्तरावरील पीएच्.डी.च्या मराठी संशोधनाच्या याद्या दिल्या आहेत. त्याही पुष्कळच उपयुक्त, मार्गदर्शक आहेत. नागपूर विद्यापीठातील निवृत्त ग्रंथपाल व. वि. कुळकर्णी यांनी तयार केलेली 'मराठी प्रबंधांची सूची : १९३९-१९८९' प्रकाशनाच्या वाटेवर आहे. यामध्ये भारतातील विद्यापीठांमधील गेल्या पन्नास वर्षांतील मराठीविषयक प्रबंधांची सूची संकलित केली आहे.

११ १) 'मराठी संशोधन पत्रिका', ऑक्टोबर १९६९ (७२ सूची).

२) 'मराठी संशोधक पत्रिका', जुलै १९७१ (६१ सूची)

३) 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', डिसेंबर १९७८ (१४० सूची).

१२ 'यानंतरचा (दाते यांच्या ''मराठी ग्रंथ-सूची'' नंतरचा) टप्पा डॉ. चुनेकर यांच्या प्रयत्नामुळे दृष्टीपुढे येतो. डॉ. चुनेकर यांनी 'मराठी संशोधन पत्रिके'त (व. १७, अं. १, ऑक्टोबर १९६९, पृ. ६२-६९) ''सूचींची सूची'' या नावाची एक आठ पानी संकलित यादी दिली आहे.' शं. ना. बर्वे, 'मराठी सूचिकार्याची वाटचाल', ''ग्रंथालय-विचार'', १९७१, पृ. १४०-१४१.

'ग्रंथांतर्गत व नियतकालिकांतील सूचींची सूची करण्याचा मराठीतील पहिला व किंबहुना एकमेव प्रयत्न श्री. प्रा. सु. रा. चुनेकर यांनी केला आहे.' पृ. ६४९.

'सूचींची सूची करण्याची प्रथा पाश्चात्यात रूढ झाली आहे. आपल्याकडे श्री. सु. रा. चुनेकर यांनी असा प्रयत्न केला आहे.' प ७१६-७१७

–वसंत विष्णु कुलकर्णी, ''मराठीतील कोशवाङ्मय'' (अप्रकाशित पीएच्. डी. प्रबंध), नागपूर विद्यापीठ, १९७६.

१३ 'वारसा' या रा. चिं. ढेरे संपादित, वि. ल. भावे यांच्या लेखसंग्रहात १९७१ सालीच भावे यांच्या वाङ्मयाची सूची प्रकाशित झाली होती. संदर्भटीप १ / ४ पहावी.

१४ 'अलीकडे मराठीमध्ये विवेचनात्मक ग्रंथास सूची देण्याची पद्धती पडू लागली आहे, ही एक इष्ट गोष्ट आहे. अशा ग्रंथांची उपयुक्तता सूचीमुळे वाढते यात शंका नाही. ही उपयुक्तता या सूची विश्वसनीय असण्यावर बरीच अवलंबून आहे.' रा. श्री. जोग, 'मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, सप्टेंबर १९५७. [समाविष्ट : ''वाङ्मय-विमर्श'', प्रा. रा. श्री. जोग यांच्या लेखांचा संग्रह, व्हीनस प्रकाशन, १९८९; पृ. १६५.]

१५ The Modern Review, August 1919, P.149. उद्धृत, ''वा. गो. आपटे : व्यक्ती आणि वाङ्मय''. श. रा. राणे, अप्रकाशित पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, १९८४, पृ. ३४१.

१६ The Modern Review, August 1924, P.443. उद्धृत उपरोक्त प्रबंध, पृ. ३४१.

१७ दीघनिकाय, भाग २, भाषांतरकार (कै.) चिंतामण वैजनाथ राजवाडे; श्री सयाजी साहित्यमाला, अंक १९६; ग्रंथसमीक्षक व ग्रंथप्रकाशक मंडळी; बडोदे, १९३२.

१८ 'आलोचने'त संपादकीय तळटीप : 'आमच्या माहितीप्रमाणे 'लेखसंग्रहा'ची सूची खानोलकरांनी तयार केलेली नव्हती.'
अलीकडेच (८ डिसेंबर १९८९) खानोलकरांनी समक्ष भेटीत मला सांगितले, ''ही सूची खांडेकरांनी केली होती. 'आपण या लेखसंग्रहाचे काहीच काम केलेले नाही. आता सूची आपण करतो.' अशा आशयाचे खांडेकरांचे पत्र माझ्याकडे आहे.'' [सु. रा. चु.]

१९ 'श्रीपाद कृष्णांची साहित्यदृष्टी', सुनील सुभेदार, 'आलोचना' नोव्हेंबर-डिसेंबर, १९७१, पृ. १४०-१४१.

२० ''महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण'' – श्रीधर व्यंकटेश केतकर, व्हीनस प्रकाशन, पुणे; आ. २, डिसेंबर १९६४.

२१ सुधाकर शंकर देशपांडे यांच्या '' 'माला'कार चिपळूणकर'' (मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९८५) या ग्रंथाच्या सूचीत, 'पेठकर चिंतामणी' अशी नोंद आहे. वस्तुत: 'चिंतामणीपेठकर' असे ते संपूर्ण आडनाव आहे. मूळ ग्रंथातही सर्वत्र 'चिंतामणी पेठकर' असाच उल्लेख आहे. त्यामुळे सूचीतही त्या रीतीने उल्लेख झाला. येथे ग्रंथकर्त्याच्या अज्ञानाचा हा परिणाम आहे. सूचीकर्त्यने ग्रंथकाराच्या चुकांचा अनुवाद करावा का हाही एक प्रश्न आहे. तत्त्वत: सूचिकर्त्यने ग्रंथकाराच्या लेखनात हस्तक्षेप करण्याचे स्वातंत्र्य घेऊ नये. तथापी त्याने जर दोष लक्षात आला, तर तो ग्रंथकर्त्याच्या निदर्शनाला आणून द्यावा. अखेरचा शब्द व उत्तरदायित्व ग्रंथकर्त्याचे.

२२ तळटीप १९ पहावी.

२३ या प्रास्ताविक निबंधाअखेरच्या संदर्भसाहित्य, यादीत काही संदर्भ मिळतील.

२४ 'मराठी देवनागरी वर्णक्रमी', अशोक केळकर, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', अं. २०२, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९७७, समाविष्ट, ''वैखरी''.

२५ ''वैखरी'' पृ. २६२

२६ वर्णानुक्रम पद्धती – मो. रा. वाळंबे, ''भाषा व साहित्य : संशोधन'', संपादक वसंत स. जोशी; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; नोव्हेंबर १९८१, पृ. ४७३-४८८.

२७ ''साहित्यातील संप्रदाय''च्या तिसऱ्या आवृत्तीत (१९७४, पृ. २३५) वाळिंब्यांनी ही चूक सुधारून घेतली आहे.

२८ टोपणनावांचा हा प्रश्न तसा महत्त्वाचा, गुंतागुंतीचा आहे. स्वतंत्र अभ्यासाचा तो विषय आहे. ''मराठी नियतकालिकांच्या सूची''त, (खं. २. भा. ३, पृ. ४६-४८ व खं. २, भा. ५, पृ.३६६३-३६७१, दाते-काळे-बर्वे) टोपणनावाचे मूळ शोधून सांगण्याचा उपक्रम केला आहे. कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयातील, ''राष्ट्रीय ग्रंथसूची''च्या मराठी विभागाचे संपादक म्हणून निवृत्त झालले श्री. बा. जोशी यांनीही टोपणनावांचा शोध घेतलेला आहे. 'लिहून छापून नामानिराळे' हा त्यांचा टोपणनावावरील अभ्यासपूर्ण, माहितीपूर्ण, विस्तृत रोचक लेख 'साहित्य-सहकार' मासिकाच्या जून, जुलै, ऑगस्ट १९६० च्या अंकात आला आहे. [समाविष्ट, ''संकलन'', श्री. बा. जोशी, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे; १९८५.] पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे निवृत्त ग्रंथपाल कृ. शं. हिंगवे हेही टोपणनावांची सूची करीत असल्याचे समक्ष भेटीत मला म्हणाले होते. टेल्को कंपनीत कामाला असलेले स. बा. यशवंत हेही टोपणनावांचे संकलन करीत आहेत. टोपणनावांचा समग्र कोश व्हावयाला पाहिजे. ''A Dictionary of Names, Nicknames, and Surnames of persons, places and things.'' (Edward Lathum, London, 1904, Republished 1966) असे टोपणनावांचे अनेक कोश इंग्रजीत आहेत.

२९ दै. सकाळ (पुणे), गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर १९७४.

३० 'मध्ययुगीन काळातील ग्रंथांचा भाषिक अभ्यास', मु. श्री. कानडे; ''भाषा व साहित्य : संशोधन'', खं. ३, संपादक : वसंत स. जोशी; म. ना. अदवंत; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; १९८९.

३१ असा प्रयत्न 'न परि हरपले ते गवसे' या माझ्या लेखात केला आहे. समाविष्ट : ''सहा साहित्यकार'', मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४; १९८२.

३२ ''तसबीर आणि तकदीर'', श्री. के. क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई; १९७६, पृ. ४५८-४५९.

३३ 'जावे ग्रंथांच्या गावा' (सदर), प्रदीप कर्णिक, 'महाराष्ट्र टाइम्स', शनिवार दि. ५ ऑगस्ट १९८९.

३४ समाविष्ट, ''मराठी शब्दसमीक्षा'', मु. श्री. कानडे; सन् पब्लिकेशन्स, पुणे; १९८९.

३५ ''भाषा व साहित्य : संशोधन'' खं. ३, संपादक : वसंत स. जोशी, म. ना. अदवंत; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; १९८९.



संदर्भसाहित्य

ग्रंथ

१. ग्रंथसूचिशास्त्र – ना. बा. मराठे; महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, मुंबई; १९७३, पृ. १६ + १३४; ३ रु.

२. ग्रंथवर्णन आणि ग्रंथसूचि – रा. के. लेले; जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे; १९७३, पृ. ८ + २०५; ६ रु.

३. ग्रंथालय सूचीकरण तात्त्विक – कृ. मु. उजळंबकर, रंगनाथन् स्मारक समिती, पुणे; १९७५; २० रु.

प्रबंध

मराठीतील कोशवाङ्मय – वसंत विष्णु कुलकर्णी, नागपूर विद्यापीठ; १९७६ (अप्रकाशित)

लेख

१. ग्रंथ-सूचि-शास्त्र – शं. ग. दाते; ''मराठी-ग्रंथ-सूचि'', भाग १; शं. ग. दाते, पुणे; १९४४; पृ. ३३-६२

२. मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी – रा. श्री. जोग; 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', व. ३१, अं. १२२, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९५७ [समाविष्ट : ''वाङ्मय-विमर्श'' (प्रा. रा. श्री. जोग यांच्या असंगृहीत निवडक लेखांचा संग्रह), संपादक : डॉ. द. न. गोखले, डॉ. दत्तात्रेय पुंडे, डॉ. जयंत वष्ट; व्हीनस प्रकाशन, पुणे; १९८९; पृ. १६६-१७७]

३. ''भारतीय राष्ट्रीय ग्रंथसूची'' (टीकात्मक अभिप्राय), शंकर गणेश दाते, 'केसरी', २८ डिसेंबर १९५८ व ४ जानेवारी १९५९.

४. ग्रंथवर्णन व ग्रंथसूचि – यादवराव मुळे (आणि सहकारी चिं. वा. दातार, ना. बा. मराठे, श्री. बा. जोशी; नॅशनल लायब्ररी, कलकत्ता). 'साहित्य सहकार', फेब्रुवारी १९६३; पृ. ५-२०

५. ग्रंथान्तर्गत उल्लेखांची सूचि – वा. पु. कोल्हटकर; 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', व. ३९, अं. १५४, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९६५; पृ. १८-२३.

६. मराठी सूचिकार्याची वाटचाल – शं. ना. बर्वे; ''ग्रंथालय-विचार'' (वा. वि. भट गौरवग्रंथ), महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ, मुंबई; जानेवारी १९७१

७. सूचि-साहित्य – भ. श्री. पंडित; 'मराठी संशोधन पत्रिका', व. १९ अं. ४, जुलै १९७२; पृ. १६१-१६९.

८. मराठी देवनागरी वर्णक्रमी – अशोक केळकर; 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका',

अं. २०२ (१९७७), पृ. ६०-६४. [समाविष्ट : ''वैखरी'', अशोक केळकर, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; १९८३; पृ. २६२-२६६]

९. ग्रंथ, ग्रंथसूची, राष्ट्रीय ग्रंथसूची व ग्रंथहक्क – ना. बा. मराठे; 'नवभारत', सप्टेंबर १९८०; पृ. १७-२१.

१०. वर्णानुक्रमपद्धती – मो. रा. वाळंबे, ''भाषा व साहित्य : संशोधन'', संपादक : वसंत स. जोशी; महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे; नोव्हेंबर १९८१; पृ. ४७३-४८८.

११. आणखी एक तरी सूचिमंडळ हवे ! – शरद साठे; 'महाराष्ट्र टाइम्स', रविवार दि. ३१ ऑक्टोबर १९८१.

१२. आणखी एक तरी सूचिमंडळ हवे ! – शरद साठे; 'रुची', फेब्रुवारी १९८३.

१३. सूची : शास्त्र व उपयोग – सु. रा. चुनेकर, ''संशोधन : स्वरूप आणि पद्धती'', संपादक : सु. रा. चुनेकर, रंगनाथ पठारे, दिलीप धर्म; शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर; १९८३; पृ. ९०-११२.

१४. मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी, कृष्ण श्री. अर्जुनवाडकर; 'मराठी संशोधन पत्रिका', व. ३१ अं. २, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९८४; पृ. ८६-९२.

१५. मराठी भाषा व वाङ्मयसंशोधन आणि ग्रंथसूची – वसंत विष्णू कुलकर्णी, 'साहित्यसूची', जुलै १९८९, पृ. ५१-५४. ['मराठी भाषा व वाङ्मयसंशोधनातील काही समस्या', नागपूर विद्यापीठ, मराठी विभाग, २५, २६, २७ मार्च १९८९, परिसंवादात वाचलेला शोधनिबंध.]

चर्चासत्र

१. मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी, लो. टिळक स्मारक ट्रस्ट व सूचिप्रबोधिनी (पुणे) च्या वतीने, पुणे येथे, १२ व १३ डिसेंबर १९८१.

२. शब्दकोश – चर्चासत्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मराठी शब्दकोश योजना, अखिल भारतीय कोशविज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, पुणे येथे; १९, २०, २१ मार्च १९८२.

''मराठी नियतकालिकांची सूची'' (संपादक : शं. ग. दाते, दि. वि. काळे, शं. ना. बर्वे), प्रथम खंड (१९६९), 'ग्रंथप्रवेश' हे प्रास्ताविक; द्वितीय खंड, भाग १ (१९७४) चा 'प्रास्ताविक सूचना' हा विभाग (पृ. ४४-५६); द्वितीय खंड, भाग ४ (१९७७) चा 'प्रास्ताविक सूचना' (पृ. १७-२६) हे लेखनही सूचिशास्त्राच्या संदर्भात उपयुक्त आहे.

१.१.१
प्रस्तावनेची निर्देशसूची
ग्रंथ, लेख, व्यक्ती, कालिके

प्रस्तुत प्रस्तावना-निबंध सूचिकार्याचा व्यापक अनुभव असणारे व्यासंगी विद्वान डॉ. सु. रा. चुनेकर यांनी लिहिला. परंतु ही त्या निबंधाची निर्देशसूची त्यांनी बनविलेली नाही. किंबहुना अवकाशाच्या अल्पतेमुळे ती त्यांच्या नजरेखालूनही गेलेली नाही. डॉ. चुनेकरांचा निबंध सूचीच्या आदर्शतेकडे निर्देश करणारा आहे. प्रस्तुत सूचीत या आदर्शांचे पालन घडल्याचा दावा नाही. जी स्खलने असतील त्यांची उत्तरदायिता प्रबंधलेखकावर नाही, एवढेच इथे सांगावयाचे. प्रबंधाची रचना क्रमांक दिलेल्या परिच्छेदांत व टीपांत आहे. सूचीतील आकडे परिच्छेदांचे आणि टीपांचे आहेत. सूचिकर्ती अनाम राहू इच्छिते. मी तिची आभारी आहे.

उमा दादेगावकर

अत्रे, प्रल्हाद केशव. १/२६; टीप ९.
अदवंत, म. ना. टीप ३०; टीप ३५.
''अनुभवामृताचा पदसंदर्भकोश.'' ३/७.
''अभिनव काव्यप्रकाश.'' २/१२.
''अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक (४).'' १/१६.
''अर्वाचीन मराठी साहित्यकार.'' २/२.
''आधुनिक भारताचे शिल्पकार – बाळशास्त्री जांभेकर.'' पहा. जांभेकर.
''आधुनिक मराठी गद्याचे जनक.'' पहा. जांभेकर.
आपटे, वा. गो. २/५. २/६; टीप १५.
आपटे, हरिभाऊ २/४
'आलोचना.' १/४०; टीप १९.
आंबिले (मोरे), तुकाराम वोल्होबा. २/३२.
'इये मराठीचिये नगरी.' १/६; १/४१.
'एकत्र गुंफून जीवितधागे', ३/२.
''एक लेखक, एक खेडे.'' १/२३.
''एकावळी'' टीप १/१.
एन्ब्लोम, डॉ. फिलिप चार्लस. ०/१.
''ऐतिहासिक मराठी नाटके.'' १/२६.
'औदुंबर'. १/३९.
करंदीकर, गो. वि. २/२.
'कल्याण' (शिष्य). २/१०.

कानडे, मु. श्री. १/३५; ३/४; ३/८; ३/९.
कानूपात्रा (कान्होपात्रा). २/१०.
कानेटकर, शं. के. २/१६.
काळे, के नारायण. १/८.
काळे, दि. वि. टीप १/५; टीप १/६; टीप २८.
''काही म्हातारे व एक म्हातारी.'' १/२६; टीप ८.
'किरात' १/१५.
कुलकर्णी, गो. म. २/२.
कुलकर्णी, द. भि. १/३५.
कुलकर्णी, भीमराव. १/२६.
कुलकर्णी, मंगेशराव. २/८.
कुलकर्णी, व. दि. २/२.
कुलकर्णी, व. वि. टीप १०; टीप १२.
कुलकर्णी, वा. ल. २/२; २/१५.
कुलकर्णी, विठ्ठलराव. (वि. ह.). २/२८.
कुलकर्णी, श्रीमती (?). ३/७.
कुलकर्णी, ज्ञानेश्वर विठ्ठलपंत. २/३१.
'कुंजवन' २/४.
केतकर, गो. र. २/१०.
केतकर, श्री. व्यं. २/१०; टीप २०.
'केशवकुमार.' पहा, अत्रे.
'केशवसुत.' १/१५; २/२९; ३/६.
– आणि त्यांची कविता. १/१५.
केळकर, अशोक. २/१८; २/२४; टीप २४; २/२५.
'कोण म्हणतो खाडिलकर कवि नव्हते ?' १/३७.
कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण. १/१४; २/२८.
– यांचा लेखसंग्रह. २/८; टीप १९; २/११.
– समग्र. २/११; २/२०
– वाङ्मयदर्शन. २/१५.

''खडक आणि पाणी''. २/२.
खाडिलकर, कृ. प्र. (नाट्याचार्य) १/३७.
''खाडिलकरांच्या नाट्यकृती'' १/३७.
खानोलकर, चिं. त्र्यं. पहा, चिं. त्र्यं.
खानोलकर, गं. दे. १/१६; २/८; टीप १८; २/११; २/२०.
खांडेकर, वि. स. १/१६; २/८; टीप १८.
– लेखनसूची. (१९१९ ते ३७ ची) / १/२३.
– वाङ्मयसूची. १/२३.

गडकरी, राम गणेश : वाङ्मयसूची. टीप ५/३; २/१२.
'– यांच्या नाटकांतील शब्दविशेषांची यादी'. ३/९.
''ग्रंथालय विचार'' टीप १२.
गाडगीळ, गंगाधर. २/२.
गुप्ते, नारायण मुरलीधर. (BEE) १/१६.
गोखले, द. न. २/१९.
गोखले, डॉ. विद्याधर. १/३५.

घाटे, विठ्ठलराव. १/२६; २/२८.
घारे, दीपक. १/६.

''चर्वणा.'' २/२
चव्हाण, २/३४.
''चानी आणि खानोलकर'' १/८.
चिपळूणकर, विष्णुशास्त्री. २/१०.
– 'माला'कार. टीप २१.
चिंतामणीपेठकर. टीप २१.
''चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात.'' १/८; १/२३.
चुनेकर, सु. रा. टीप ८; टीप ११; टीप १२; २/२३; टीप ३६.
मी (सु. रा. चु.) १/१५; १/१३; टीप ५/२; १/१८; १/३६; २/२.

'जर्नल ऑफ धि एशियाटिक सोसायटी, बॉंबे'. १/३२.
'जर्नल ऑफ धि बॉंबे युनिव्हर्सिटी'. १/३२.
'जर्नल ऑफ एस.एन.डी.टी. वुइमेन्स युनिव्हर्सिटी'. १/३२.
जांभेकर, बाळशास्त्री. १/२६.
– ''आधुनिक मराठी गद्याचे जनक''. १/२६.
– ''आधुनिक भारताचे शिल्पकार''. १/२६
– ''दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर''. १/२६
जोग, रा. श्री. १/५; १/४४; २/२; टीप १४; २/१२.
''– गौरवग्रंथ'' २/१२.
जोगळेकर, गं. ना. टीप २.
जोगळेकर, स. आ. २/६.
जोशी, सौ. कालिंदी. ३/३.
जोशी, चिंतामण विनायक. २/७.
जोशी, प्र. न. १/६.
जोशी, वसंत स. टीप २१; टीप २६; टीप ३०; टीप ३५.
जोशी, वामन मल्हार. २/५.
जोशी, श्री. बा. टीप ८ च्या पूर्वी; टीप २८.
''जोसेफ मॅझिनी.''२/६.
'ज्योत्स्ना.' टीप ३.
''झेंडूची फुले'' १/२६; टीप ९.

'टीका, टीकाकार व टीकेचे विषय'. १/१६.
टिकेकर, अरविंद. १/२६.
ठोसर, नारायण सूर्याजीपंत. २/३१
''डिक्शनरी ऑफ नेमस्....'' टीप २८.
ढेरे, रा. चिं. टीप १/४; टीप १३.

तुकाराम. १/३७; ३/३.
''– बुवांची अस्सल गाथा''. १/३७.
''तुकाराम पदकोश'' ३/७.
'तात्यासाहेब' पहा. कोल्हटकर.
दडकर, जया. १/८; १/२३
'दर्पण'कार जांभेकरशास्त्री. पहा जांभेकर.
दळवी, जयंवत. १/२७.
''दक्षिणा'' २/२.
दाते, शं. ग. १/६; १/१७; १/२७; टीप ११; २/२४; टीप २८.
दांडेकर शं. वा. (सोनोपंत). ३/४.
दामले, कृष्णाजी केशव. पहा केशवसुत.
''दासबोध'' ३/४.
''दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास.''

३/८.
दिवाकर, (दिनकर) नरसिंह. २/१०
''दीघनिकाय''. २/७; टीप १७.
दीक्षित, म. श्री. १/६.
देशपांडे, ग. त्र्यं. २/१२.
देशपांडे, सुधाकर शंकर. टीप २१.
देशमुख, उषाबाई. ०/१.
देशमुख, मा. गो. ०/१; टीप १.

धर्म. दिलीप. टीप ३६.

'नवभारत'. टीप ३.
''नाट्याचार्य देवल''. २/१७.
''नीतिशास्त्रप्रवेश''. २/५.
पटवर्धन, माधवराव. १/५; १/२०; १/२१; १/३८; २/२९; २/३२.
– ''वाङ्मय : दर्शन आणि चिकित्सा'' १/५; २/२३.
– ''वाङ्मयसूची'' टीप ५/२; १/१०.
पठारे, रंगनाथ. टीप ३६.
''परंपरा आणि नवता''. २/२.
परांजपे, गो. रा. १/६; टीप ३.
पाटील, गंगाधर. २/२
पाटील, २/३४.
''पाण्यावरील अक्षरे'' २/२.
पाध्ये, प्रभाकर. २/३३
'पाश्चात्यांचे मराठीविषयक संशोधन आणि अभ्यास.' टीप २.
पुंडे, दत्तात्रय. १/२७
पेठकर, चिंतामणी. पहा चिंतामणीपेठकर.
पेठे, म. प. ०/१; टीप १/३१; १/३५; टीप १०.
पेंडसे, २/३४.
पोतदार, दत्तो वामन. १/१६.
पंडित, भ. श्री. १/१४; १/१५.
'प्रकाशन डायरी' १/६.
'प्रतिभा' टीप ३.
'प्रतिष्ठान' १/४०.
''प्रिय आणि अप्रिय'' १/१८.
प्रियोळकर, अ. का. ०/१; १/६; १/१८; १/१८ अ; १/१९.
– यांची वाङ्मयसूची १/१८ अ.

फडके, ना. सी. १/६; १/३७.

बनहट्टी, श्री. ना. ०/१; २/१६; २/२०.
– यांचे प्रकाशित वाङ्मय; परिशिष्ट, ०/१.
– यांची ग्रंथसंपदा. ०/१; टीप १/२.
बर्वे, शं. ना. १/६; टीप १२; टीप २८.
'बालकवी'. १/३९
'B'. १/१६
'BEE'. १/१६
''बिब्लिऑग्राफी ऑफ एशियन स्टडीज''. ०/१.
'बुलेटिन ऑफ रामकृष्ण मिशन इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर' १/३२.
बेहेरे, ना. के. २/२९.

भट, सुधा. टीप ५/३.
''भाषा व साहित्य : संशोधन''. टीप २; टीप २६; टीप ३०; टीप ३५.

''भारतीय साहित्यशास्त्र'' २/१२
भावे, २/३४.
भावे, वि. ल. ०/१.
– सारस्वतकार १/३७.
– यांचे वाङ्मयसूची. ०/१; टीप १/३.
– वाङ्मयसूची. टीप १/४.
– विषयक संदर्भसाहित्य. टीप १/४.
भिडे, बा. अ. १/१३; १/१६.
भोसले, एकोजी (व्यंकोजी) २/१०.

''मध्ययुगीन काळातील ग्रंथांचा भाषिक अभ्यास'' टीप ३०; ३/९.
माखिन, आनंदराय (मंखित) २/१०.
मर्ढेकर, बा. सी. २/२.
''मर्ढेकर-पदसंदर्भकोश'' ३/७.
''मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा.'' २/३३.
'मराठवाडा विद्यापीठ पत्रिका'. १/१२.
''मराठी ऐतिहासिक नाटके.'' १/२६.
''मराठी ग्रंथसूची'' ०/४, १/६; १/२६; १/२७; टीप ११; १/३८; १/४२; २/२४.
– दीक्षितांची १/६.
'मराठीचिये नगरी.' १/६.
'मराठीतील कोशवाङ्मय (अप्र.)' टीप १२.
'मराठीतील साहित्यलेणी' १/६.
'मराठी देवनागरी वर्णक्रमी' २/२४; टीप २४.
''मराठी नियतकालिकांची सूची.'' ०/४; १/६, १/८; १/३८; १/४२; टीप २८.
'मराठी प्रबंधांची सूची'. (१९३९-८९) टीप १०.
'मराठी वर्णमालेतील आनुपूर्वी' टीप १४.
''मराठी शब्दसमीक्षा'' ३/९.
''मराठी साहित्यदर्शन (१५)'' टीप १/५.
'मराठी सूचिकार्याची वाटचाल' टीप १२.
'मराठी संशोधन पत्रिका' १/८; १/१४; १/१६; १/३०; १/३१; १/३२; टीप १०; १/३६; टीप ११; टीप १२.
महाजनी, २/३४.
'महानुभाव ग्रंथांची वर्णनात्मक सूची.' ०/२.
''महाराष्ट्र जीवन'' ०/४.
'महाराष्ट्र टाइम्स' (२९-६-८६) १/६.
''महाराष्ट्र सारस्वत'' १/३७.
'महाराष्ट्र साहित्य पत्रिका'. १/६; १/८; टीप ४; १/३६; टीप ११; १/४०; टीप १४; टीप २४.
'महाराष्ट्रावरील संदर्भसाहित्याची सूची.' ०/४.
''महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण.'' २/१० टीप २०.
माडखोलकर, ग. त्र्यं. २/८; २/२८.
'मॉडर्न रिव्ह्यू.' टीप १५.
''माती आणि मूर्ती''. २/२.
'माधव जूलियन.' पहा पटवर्धन, माधवराव.
मालशे, स. गं. १/२६; टीप ९; २/११; २/२०.
'माला'कार चिपळूणकर, पहा चिपळूणकर

विष्णुशास्त्री.
'मासिक मनोरंजन' जा. १९०६. १/१५.
मुंडले, वासुदेव दामोदर. १/१६.
मुळजकर (मोकाटे), डॉ. सौ. नलिनी. १/२६.

यशवंत, स. बा. टीप २८.
'युगवाणी', एप्रील-मे ७५, ०/१; टीप १/२; १/३५; १/४०.

''रसविमर्श.'' २/१२.
रहाळकर, न. शं. १/१५.
राजवाडे, चिंतामण वैजनाथ. २/७, टीप १७.
राजवाडे, वि. का.; इतिहासाचार्य. ०/१; टीप १/५.
– लिखित ग्रंथ. टीप १/६.
– संपादित ग्रंथ टीप १/६, ०/१.
– संपादित साधनग्रंथ. टीप १/६; ०/१.
– वाङ्मयसूची. टीप ५.
– यांच्या ग्रंथांची यादी. १/७.
''राजवाडे दर्शन'' टीप १/७.
''राजवाडे विचारदर्शन'' टीप १/६.
'राजवाडे अंक' 'विद्यासेवक'. टीप १/७.
राणे, श. रा. टीप १५.
'रामदास' १/३७; ३/८.
''राष्ट्रीय ग्रंथसूची (मराठी)'' १/६; टीप २८.
रेसाइड, इयॉन. ०/२.
'ललित'. १/६.
'लहरी', १/३७.
लाथम, एडवर्ड टीप २८.
लिमये, अ. ह. १/६.
'लिहून छापून नामानिराळे' टीप २८.
'लोकशिक्षण', टीप ३; १/१०.

''वज्राघात.'' २/४.
'वर्णानुक्रमपद्धती' २/२५; टीप २६.
''वाङ्मयेतिहासाची संकल्पना'' १/२७.
''वाङ्मय-विमर्श.'' टीप १४.
'वाचनालय' १/६; १/४१.
वाटवे, के. ना. २/१२.
''वाटा आणि वळणे'' २/२.
''वारसा'' टीप १/४; टीप १३.
वाळंबे, मो. रा. २/२५; टीप २६.
वाळिंबे, रा. शं. २/२८.
''विचक्षणा'' २/२.
'विद्यमान मराठीतून लुप्त.... शब्दांची यादी.' ३/९.
'विद्यासेवक-राजवाडे अंक' पहा. राजवाडे, वि. का.
'विदर्भ-संशोधक-मंडळ-वार्षिक' १/३२.
'विविधज्ञानविस्तार'. १/४०.
'विवेचनाच्या (सावरकर) आकृतीची सूची.' २/२०.
''वैखरी''; २/१८, टीप २५.
वैद्य, सरोजिनी. २/२.

'शिवाजी महाराजांच्या पत्रांतील फारशी शब्दांची यादी'. ३/९.

'श्रीपाद कृष्ण.' पहा कोल्हटकर.
'श्रीसमर्थ.' पहा रामदास.
'श्रीसरस्वतीमंदिर.' १/१६.
'सकाळ, दैनिक'. पुणे. ३/३.
'सत्यकथा' टीप ३; १/८; १/४०.
'समीक्षक' टीप ३.
''समीक्षेची नवी रूपे.'' २/२.
सरदार, गं. बा. ०/४.
सहस्रबुद्धे, महादेव विश्वनाथ २/२३ अ.
''सहा साहित्यकार.'' २/२.
'सह्याद्री.' टीप ३.
साठे, शंकर केशव. ३/७.
''सार्थ ज्ञानेश्वरी.'' ३/४.
'साहित्य.' टीप ३.
''साहित्य आणि समीक्षा.'' २/२.
''साहित्य : रूप आणि गंध.'' २/२.
'साहित्य सहकार.' ०/१; टीप १/३; १/६; टीप ३; टीप २८.
''साहित्याचे मानदंड'' २/२.
''साहित्यातील संप्रदाय.'' २/२८; टीप २७.
''साहित्यिक गप्पा - दहा साहित्यिकांशी'' १/२७.
'सिंधू-सुधाकर' (पात्रे.) २/१२.
सुभेदार, सुनील. २/८; टीप १९; २/१५.
सूची : शास्त्र व उपयोग. टीप ३६.
'सूचींची सूची.' टीप १२.
'सूचींच्या सूची'. १/४.
'सूचिसाहित्य' १/४.
''सौंदर्य आणि साहित्य.'' २/२.
''सौंदर्यशोध आणि आनंदबोध.'' २/१२.
''संकलन.'' २/२८.
'संगमोत्सुक डोह.' ३/२.
''संतकवी व ग्रंथकार.'' २/१०.
'संशोधन : स्वरूप व पद्धती.' टीप ३६.
''स्वप्नभूमी.'' २/१६.
''स्वातंत्र्यवीर सावरकर : एक रहस्य.'' २/१९.
'स्वाध्याय संशोधन पत्रिका'. १/३२.
'हरपले श्रेय.' ३/६.
हिंगवे, कृ. शं. टीप २८.
क्षीरसागर, गजानन. १/६.
क्षीरसागर, शकुंतला. ३/६.
क्षीरसागर, श्री. के. २/२.
'ज्ञानदेव, (श्री) वाङ्मयसूची' ०/४; टीप ५/१; ३/३.
''ज्ञानेश्वर : काव्य व काव्यविचार.'' २/२.

आनंद साधले : साहित्यसूची

२.०.०

खंड दुसरा

२.१.०

आनंद साधले :

साहित्यसूची

सूचिकर्ती

डॉ. उमा दादेगावकर

२.१.१
दोषांचा धनी मी आहे

आनंद साधले

पूर्वगामी प्रस्तावना मी वाचली आहे. आगामी सूचीची संहिता मी पाहिलेली नाही; मुद्रणापूर्वी पाहणार नाही.

प्रस्तावनेवरून एक गोष्ट कळली, निर्दोष सूची ही अशक्य गोष्ट आहे. पुढील सूचीत दोष नसोत ही माझी भावना आहे. भावनेमागे कृती व सहकार असेल तर ती भावना शक्तिरूप घेते. माझी भावना दुबळी आहे. अजाणता मी ज्या निष्काळजीपणाने वागत आलो, त्यातूनच हे दुबळेपण आले आहे. १९३५ ते १९८५ ही स्थूलपणे माझी लेखक-कारकीर्द. ३५ ते ५८-५९ पर्यंत, लेखन ही एक लष्करच्या भाकऱ्या भाजणारी, कर्मदरिद्री उचापत होती. त्या कालातील काहीच उपलब्ध नाही असे नव्हे. एका धूळभऱ्या फाइलमधे अनेक कागद मिळाले. पण सर्वच कागद त्या फाइलमधे ठेवले गेले असे नाही. सत्तेचाळीसच्या सुमारास कुणा क्षुद्र संपादकाने केलेल्या अवमानाच्या उद्वेगाने, मी अनेक लेख व कात्रणे जाळून टाकली. ५८-५९ मधे दीनानाथ दलाल यांनी मला लेखक म्हणून गौरवाने वागविल्यानंतर मी जाणीवपूर्वक कशाचा नाश केला नाही; पण खास काळजीही घेतली नाही. अनेक घरे बदलण्याच्या गोंधळात, आपाततः काही कागद हरवले असतील. मुद्रितांची कात्रणे येताच त्यांची संकलने बनवून, जादा कात्रणांचा कचरा (?) मी नष्ट केला. त्यामुळे जी पंधरावीस पुस्तके प्रकाशकांकडे वाट पाहात आहेत, त्यांत नेमके काय आहे हे मी सूचिकर्तीला सांगू शकलो नाही. ही पंडिता पायाला भिंगरी बांधून, उरीपोटी कष्टत, गेले चार महिने मराठवाडा, विदर्भ, पुणे, मुंबई, अशी सारखी फिरत आहे. प्रस्तावनाकार म्हणतात तसा हाही एक छंद, एक वेड! या वेडाचे चीज 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'ने केले. ज्याचा मलाही पत्ता नव्हता असे अक्षरशः अनेकानेक संदर्भ तिथे मिळाले. हे संदर्भलेख छापणारे नियतकालिकांचे संपादक मूळ प्रकाशकाला वा लेखकालाही कळवीत नाहीत. हीच त्यांची आचारसंहिता. गेल्याच वर्षी पुण्यातील (?) कोणा भाग्यवान चोराने माझे संपूर्ण गीतगोविंद, मला न विचारता, माझ्याच नावे छापून हजार-पंधराशे प्रती संपविल्या व मला आणि प्रकाशकांनाही टोपी घातली. हैदराबादेत घरफोडीची नित्य बातमी येते त्यात पोलिसांचे एक ठराविक वाक्य असते. 'आम्ही चोरांना पकडण्यासाठी जाळे फेकले आहे.' यापलीकडे काहीच घडत नाही. तीच गोष्ट याही चोरांची. आधी आमच्याकडे जाळे

नाही, तेव्हा ते आम्ही फेकू शकत नाही. फेकले तर जाळे जाते, चोर येत नाही. प्रस्तावनेप्रमाणे, आदर्श सूचीत, सर्व पुनर्मुद्रणांचे नीट उल्लेख हवेत. आता या निर्लज्ज चोरांचे उल्लेख कसे करावयाचे ? अशा अनेक अडचणींमुळे आगामी सूचीत काही उणिवा असतील त्याचा दोष वाचकांनी व प्रस्तावनाकारांनी सूचिकर्तीला देऊ नये. बराचसा मला द्यावा व काही थोडा आमच्या साहित्यविश्वाच्या आचारसंहितेला द्यावा. प्रस्तावनाकारांनी आधीच तो माझ्यासारख्या अहंकारभीरू लेखकांना दिलेला आहे. (परिच्छेद १ / १८ अ.) मी तो स्वीकारतो.

२.१.२
साधले साहित्य : वर्णनात्मक बृहद्सूची
विभाग १

१.१/१ **लढाई संपल्यावर**. कादंबरी; महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई; लोयल प्रिंटिंग प्रेस, मुंबई; ऑगस्ट १९४५; २३६; क्राऊन; पाच रुपये; आईस अर्पण; लेखनकाल : २० ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर १९३९

१.१.२ एका कॉलेज तरुणीच्या जीवनात आलेल्या दोन तरुणांची कथा. रहस्य, खून, देशभक्ती या साऱ्यांचा उपयोग करून लिहिलेली तंत्रबद्ध कादंबरी. सुखान्त.

१.२/१ **अमृतमेघ**. लेखसंग्रह; दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई; संगम प्रेस प्रा. लि., पुणे; २६ जानेवारी १९६४; ८६; क्राऊन; ? रुपये, मुखपृष्ठ : दलाल आर्ट स्टुडिओ; प्रथम प्रकाशन : दीपावली (मासिक); ''भारतीय कवि-कुल-भूषण'' नामक लेखमाला.

१.२.२ बारा संस्कृत कवींची लेखकाला भावलेली वैशिष्ट्ये सांगणारे रसग्रहणात्मक लेख.

१.२.२.१ कालिदास : कविता कामिनीचा विलास; पृ. ४-११

मूळ शृंगारिक पिंड असलेला कालिदास आपल्या अत्यंत रसाळ, अर्थवाही आणि समुचित शब्दयोजनेने मूलतः सुंदर असलेल्या संस्कृत भाषेला आगळाच विलासी डौल आणतो.

१.२.२.२ भास : कविता कामिनीचा मुग्ध हास; पृ. १२-१७

अत्यंत दुर्दैवी नाटककार. फार थोडी रचना उपलब्ध. परंतु सागराने गिळंकृत केलेल्या धनभांडारातील थोडासा अंशही लाटेने बाहेर आल्यावर कृपणास आनंदाचे भरते यावे तसे या उपलब्ध साहित्याच्या लाभाने रसिक परमानंदात तल्लीन होऊन जातात.

१.२.२.३ शूद्रक : कविता कामिनीचा परिहास; पृ. १८-२३

संस्कृत साहित्याला जाचक नियमांनी बांधून टाकले होते. हे नियम तोडून विसाव्या शतकातील लेखकाचीही झेप जाऊ शकणार नाही तेथे जात शूद्रकाने आपल्या मृच्छकटिकम् या नाटकात गणिकेची कुलवधू बनविली आहे, हा त्याच्या दृष्टीतील व्यापक द्रष्टेपणाच आहे.

१.२.२.४ भारवी : कविता कामिनीचे तेज; पृ. २४-२९

किरातार्जुनीयम्चा कर्ता हा कवी महाराष्ट्रीय असून त्याच्या प्रत्येक शब्दात अर्थगांभीर्य

साकार झाले आहे. मोक्षवृत्तीच्या आड आपला भेकडपणा लपविणाऱ्या नादानांना अक्षरशः लाथ मारण्यासाठी भारवीने हे काव्य लिहिले असावे, असा लेखकाचा अभिप्राय.

१.२.२.५ भवभूती : कविता कामिनीची करुणा; पृ. ३०-३५

आशयघनतेच्या बाबतीत भवभूती अग्रगण्य आहे. तत्कालीन टीकाकारांना आत्मविश्वासपूर्ण उत्तर देणारा भवभूती आपल्या उत्तररामचरितात मूर्तिमंत करुणरस उभा करतो, तेव्हा भवभूती हाच शारदेची मूर्त करुणा आहे, असे लेखकाला वाटते.

१.२.२.६ बाण : कविता कामिनीचे स्वप्न; पृ. ३६-४१

गद्य हे कवीच्या कवितेची कसोटी असते या आव्हानाचा यशस्वी रीत्या स्वीकार करणारा बाण हा पुरुषसिंह होता. त्याने लिहिलेल्या कादंबरीचे गद्य म्हणजे श्रवणमनोहर आणि अर्थमनोहर अशा संस्कृत रचनेच्या सौंदर्याची पराकोटी होय.

१.२.२.७ विशाखदत्त : कविता कामिनीचे राजकाज; पृ. ४२-४७

शृंगाररसाशिवायही उत्कृष्ट ललित साहित्य असू शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे विशाखदत्ताचे मुद्राराक्षस हे नाटक. त्यातील चाणक्याचे चरित्रचित्रण आदरानंद देणारे आहे. त्यामुळे शृंगाराच्या गोडीभोवती घोटाळणाऱ्या दुसऱ्या नाटककारांशी त्याची तुलना करणे योग्य नाही, असे लेखकाचे म्हणणे.

१.२.२.८ भट्टनारायण : कविता कामिनीचे रणकाज; पृ. ४८-५३

महाभारतातील पौरुषाचे दर्शन घडविणाऱ्या या वेणीसंहार नाटकाचा ओज हा स्थायिभाव असून रसवैचित्र्य हे वैशिष्ट्य होय. त्यामुळेच संस्कृत साहित्यशास्त्रकाराचे वेणीसंहारातील उदाहरणाशिवाय पान हलत नाही.

१.२.२.९ जयदेव : कविता कामिनीची माधुरी; पृ. ५४-६१

गीतगोविंद ही जगातील शृंगाररसपर भावकवितेतील सर्वात मधुर कविता. जयदेवाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव आहे. प्रसाद आणि माधुर्य या दोन्ही गुणांचा परमोत्कर्ष वश असलेला एकमेव भाग्यवान कवी.

१.२.२.१० जगन्नाथ : कविता कामिनीचा आत्मविश्वास; पृ. ६२-६९

जगन्नाथ हा उत्तम पंडित तसाच रसिक कवीही. गंगालहरीसारखी भक्तीने ओथंबलेली काव्येही लिहू शकणारा जगन्नाथ हा शेवटचा संस्कृत कवी. विदग्ध संस्कृत कविता कामिनीचा हा शेवटचा विलास होता.

१.२.२.११ माघ : कविता कामिनीचे पांडित्य; पृ. ७०-७५

''शिशुपालवधम्'' हे महाकाव्य लिहिणाऱ्या माघाचे सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य म्हणजे त्याने आपल्या काव्यामध्ये अपरंपार शब्दसंपत्तीचा आणि शक्य त्या सर्व व्याकरण-प्रयोगांचा उपयोग केला आहे. माघाचे नुसते नऊ सर्ग जरी वाचले तरी मराठी भाषेत नवा शब्द

शिल्पक राहात नाही, असे सुभाषित आहे.

१.२.२.१२ श्रीहर्ष : कविता कामिनीचे वैभव; पृ. ७६-८६

''नैषधीयचरितम्'' हे हर्षाचे महाकाव्य वैभवाने तसेच विस्ताराने प्रचंड आहे आणि तरीही ते अपूर्ण आहे. त्याचा दुसरा गुण म्हणजे त्यातील पांडित्याला विनोदाचे मुळीच वावडे नाही. हर्षाची कल्पनाशक्तीही अचाट आहे. खरोखरच हर्ष शारदेचे वैभवच आहे.

१.२.३.१ P. S. Nerurkar, Century (Magazine); १५ ऑगस्ट १९६४

Anand Sadhale comments in light but enchanting style of the lives of twelve Sanskrit poets. The entire book is fascinating.

१.२.३.२. श्रीकृष्ण ठाकूर; नंदा (मासिक); सदर : कल्पवृक्षाची फुले; जानेवारी १९६५

दलाल आर्ट स्टुडिओने हे पुस्तक प्रकाशित करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. आनंद साधले यांनी अत्यंत काव्यमय भाषेत हे लेख लिहिले आहेत.

१.२.३.३ शेष; ?; सदर : शब्दब्रह्म; फेब्रुवारी १९६५

साहित्य आणि चित्रकला यांचा सुंदर मिलाफ.

१.२.३.४ ?; केसरी (दैनिक); सदर : ग्रंथसमालोचन; ६ जून १९६५

दलालांनी घडविलेले संस्कृत कवींचे मार्मिक दर्शन आणि साधले यांचे अभ्यासहीन व सर्वसामान्य दर्जाचे लेख यांचा विषम संयोग निश्चितच खटकावा इतका स्पष्ट आहे.

१.२.३.५ पां. ज. चिन्मुळगुंद; नवशक्ती (दैनिक); ४ जुलै १९६५

संस्कृत काव्यांचा रसपूर्ण परिचय. श्री. साधले यांचा अपूर्व व संग्राह्य ग्रंथ.

१.२.३.६ संहिता; मराठवाडा (दैनिक); सदर : पुस्तकांच्या जगात; ३० ऑगस्ट १९६५

दीनानाथ दलालांच्या कुंचल्याचे उन्मेष हेच या पुस्तकाचे प्रमुख वैशिष्ट्य.

१.२.३.७ ?; आलमगीर (दैनिक); सदर : साहित्य मंथन; ?

दलालांची कलापूर्ण चित्रे आणि साधले यांची मार्मिक रसग्रहणे यामुळे ''अमृतमेघ'' रसिकांना आनंद देईल यात शंका नाही.

१.२.३.८ दत्ता चितळे; ?; ?; ?

आनंद साधले यांनी तन्मयतेने काव्यमय भाषेत विवेचन केलेले लेख.

१.३/१ **हा जय नावाचा इतिहास आहे.** शोधलेखसंग्रह; मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; कल्पना मुद्रणालय, पुणे; त्रिपुरी पौर्णिमा : नोव्हेंबर १९६४; १६१; क्राऊन; पाच रुपये; श्री. वसंत मोरेश्वर चौबळ यास; लेखनकाल १०-१०-१९६१ ते ३०-१०-१९६१; प्रथम प्रकाशन (आत्माराम नीलकंठ या नावाने) दीपावली (मासिक) : मार्च १९६२ ते मे १९६३; महाराष्ट्र शासनाचा ६४-६५ चा पुरस्कार.

१.३/२ ओम् मुद्रणालय, पुणे; ५ जुलै १९७४; १५२; क्राऊन; मूल्य दहा रुपये

१.३/३ ; १५४; मूल्य वीस रुपये

१.३.२ कृष्ण आणि युधिष्ठिर यांचे परस्पर विरोधी आदर्श महाभारतात दिसतात. कोणताही इतिहास हा व्यवहारवेद असतो. व्यवहारात तत्त्वज्ञानाची कास धरणे अपरिहार्य असले तरी ते तत्त्वज्ञान मुरड घालून योजिलेले असते. या महाभारत नामक व्यवहारवेदाचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. कृष्ण हा महाभारतातील आदर्श आहे, युधिष्ठिर नव्हे; हे लक्षात घेऊन युधिष्ठिराचा आपल्या समाजातील वारसा आपण नाकारला पाहिजे आणि त्यासाठी रामायण व महाभारताची तात्पर्ये, सारांश, भाषांतरे हे सारे पुन्हा केले पाहिजे, ही आजची राष्ट्रीय गरज आहे – या आपल्या मताच्या समर्थनार्थ लिहिलेल्या महाभारतविषयक चाळीस शोधलेखांचा समावेश असलेला वादळी ग्रंथ.

१.३.३.१ प्र. श्री. नेरूरकर; (पुणे) तरुणभारत (दैनिक); सदर : ग्रंथपरीक्षण; २३ मे १९६५

युद्धधर्म सांगणारे साधले यांचे आगळे महाभारत. हा महाभारतावरील अपूर्व संवाद आहे.

१.३.३.२ सौ. माधुरी भागवत; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); सदर : नवी पुस्तके; २३ मे १९६५

या पुस्तकातील इतिहास हा मनोरंजक व चटकदार शैलीतून उतरल्यामुळे वाचनीय झाला आहे.

१.३.३.३ ?; आलोचना (मासिक); जून १९६५

महाभारतातील निरनिराळ्या प्रसंगांमधील प्रेरणा व धारणा यांचे श्री. साधले यांनी घडविलेले दर्शन पारंपरिकांना चकित करणारे आहे.

१.३.३.४ प्र. न. जोशी; विवेक (साप्ताहिक); सदर : साहित्यविवेक; ५ सप्टेंबर १९६५

हे पुस्तक वाचल्यानंतर पडणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आनंद साधले यांच्यासारखे व्यक्तिमापन करणारे जो युधिष्ठिर मानतात तो व्यासांचा की सौतीचा ?

१.३.३.५ आमोणकर; आलमगीर (दैनिक); सदर : पुस्तकपरीक्षण; २८-११-१९६५

साधलेंनी ज्या युधिष्ठिरीय अपयशी तत्त्वज्ञानाचा फोलपणा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे त्याचा अधिक फोलपणा वास्तवात उतरत असल्याची चिन्हे भारतात दिसत आहेत, हे त्यांच्या दृष्टीने सुचिन्ह होय.

१.३.३.६ ?; नंदा (मासिक); सदर : पुस्तक परीक्षण, फेब्रुवारी १९६६

आपल्या धर्मग्रंथांचे नव्याने चिंतन व मनन करण्याच्या उपक्रमास श्री. आनंद साधले यांनी 'हा जय नावाचा इतिहास आहे' हे पुस्तक लिहून फार मोठा हातभार लावला आहे.

१.३.३.७ सुनील सुभेदार; तरुण भारत (दैनिक) नागपूर; सदर : विविध-विषय-विभाग; २४-७-१९६६

हे पुस्तक म्हणजे पौराणिक महाकाव्याचे आकलन न होताच संशोधनाच्या नावाखाली केलेली आत्मविटंबनाच आहे.

१.३.३.८ अनिलकुमार खुर्शीकर; दीपावली (मासिक); सदर : वाचकांची प्रतिक्रिया; सप्टेंबर १९६६

युधिष्ठिराचा आदर्श या व्यवहारी जगात लाभदायक होत नसेल; पण म्हणून तो साधले यांच्या मताप्रमाणे निंद्य ठरत नाही.

१.३.३.९ ?; साधना (साप्ताहिक); १८ फेब्रुवारी १९६७

साधले यांचे लिखाण घृणास्पद वाटते. ते वाचताना अंगावर शहारे येतात.

१.३.३.१० ?; साधना (साप्ताहिक); सदर : ग्रंथकार, ग्रंथपाल, ग्रंथप्रकाशक, ग्रंथविक्रेते; २२ जुलै १९६७

प्रेमा कंटक यांनी मुक्तचिंतन म्हणून लिहिलेल्या 'महाभारत' (महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर;) या ग्रंथाच्या प्रसन्न शैलीचे कौतुक करताना साधले यांच्या 'हा जय नावाचा इतिहास आहे' मध्ये ती नसून उलट साधले यांचा संताप महाभारताच्या वाट्याला आला आहे असा अभिप्राय.

१.३.३.११ श्री. के. क्षीरसागर; वसंत (मासिक); लेख; नोव्हेंबर १९६७

'धर्मराज संप्रदाय अर्थात आमचा एक राष्ट्रीय दुर्गुण' या लेखात आमच्या सौजन्याच्या अतिरेकाची चर्चा करताना साधले यांनी युधिष्ठिराच्या 'भला माणूस' ठरण्याच्या वेडाचे 'हा जय०' नावाच्या आपल्या ओजस्वी ग्रंथात फार सुंदर चित्रण केले आहे, असा अभिप्राय.

१.३.३.१२ शेष; वीणा (मासिक); लेख; नोव्हेंबर १९६७

'महाभारतावर पाच प्रकाशझोत' या १९६७ पूर्वीच्या एका तपातील महाभारतविषयक मराठी ग्रंथांचा मागोवा घेणाऱ्या समालोचनात्मक लेखात साधले यांचा ग्रंथ हा युधिष्ठिरावर चढविलेला भीषण हल्ला आहे असा अभिप्राय. दुर्गाबाई भागवत यांची प्रतिभायुक्त वाणी सोडली तर साधले यांची धावती शैली व तर्कप्रधान युक्तिवाद श्रेष्ठ आहेत असे मत.

१.३.३.१३ वि. ह. कुळकर्णी; वीणा (मासिक); सदर : संपादक 'वीणा' यांस; जानेवारी १९८८

'महाभारतावर पाच प्रकाशझोत' या लेखाबद्दलच्या पत्रात साधले यांची 'हा जय०' मधील भूमिका शेष यांनी नीट मांडली आहे. पण या भूमिकेबाबत स्वत:चे मत मात्र दिलेले नाही, असा अभिप्राय.

१.३.३.१४ अप्रबुद्ध; (पुणे) तरुणभारत (दैनिक); सदर : विविध-विषय-विभाग; लेखांक १ – ७ ऑगस्ट १९६८

आनंद साधले म्हणजे आपल्या लिखाणाद्वारे पौराणिक भावमूर्तींवर आघात करण्यास

सरसावलेले आधुनिक मूर्तिभंजकच आहेत, असा हल्ला.

लेखांक २ – १४ ऑगस्ट १९६८

'हा जय०' मधील सर्व विवेचन अर्थशून्य सिद्धांतांवर आधारित आहे, असे प्रतिपादन.

लेखांक ३ – २१ ऑगस्ट १९६८

साधले यांनी युधिष्ठिराला निर्लज्ज बनवून आपल्या मनाने नवेच महाभारत रचले आहे, असा आरोप.

लेखांक ४ – २८ ऑगष्ट १९६८

'हा जय०' हे महाभारताचे कुत्सित व अमर्यादपणे केलेले विकृतिकरण आहे; त्यामुळे भारत हे अभारतीय बनण्याचा धोका आहे, असा इशारा.

१.३.३.१५ अनंत आठवले; केसरी (दिवाळी अंक); लेख; १९६८

'महाभारताचे मारेकरी' या लेखात 'हा जय०' हे पुस्तक म्हणजे युधिष्ठिराची यथेच्छ निंदा करणारे कर्णपुराण असून या पुराणात आधुनिक पंडितांनी पौराणिकांवर लादलेले सर्व काल्पनिक दोष प्रत्यक्ष रूपाने अवतीर्ण झाले आहेत, असा अभिप्राय.

१.३.३.१६ अनंत आठवले; लोकसत्ता (दैनिक); लेखमाला; 'दु:शासनी विद्वानांचे महाभारत – वस्त्रहरण!'

लेखांक १ – १६ मार्च १९६९; 'पांडवांची वृथा निंदा : कौरवांचा वृथा गौरव!'

कर्णाच्या उपेक्षेचा 'हा जय०' मध्ये पिटलेला डांगोरा खरा नाही; कर्णभक्त खोडसाळ अतिशयोक्ती करतात, असा अभिप्राय.

लेखांक २ – २३ मार्च १९६९; 'धर्मराज युधिष्ठिरावर विकृत चिखलफेक'

युधिष्ठिरद्वेषाची झापडे लावल्यामुळे महाभारताच्या रंगणात फिरताना साधले यांना काही दिसत नाही. पण हा दोष युधिष्ठिराचा नसून साधले यांच्या पूर्वग्रहाचा आहे. त्यामुळे साधले यांनी कुत्सित तर्कटांच्या वावडया उडविल्या आहेत, असे मतप्रतिपादन.

लेखांक ३ – ३० मार्च १९६९; 'साधले यांचा धर्मराजावरील अधर्म्य हल्ला!'

युधिष्ठिराच्या शीलावर शिंतोडे उडविण्यापूर्वी सबळ कारणे पुराव्यादाखल देणे आवश्यक होते, ते साधले यांनी केलेले नाही असा आरोप. साधले यांनी युधिष्ठिराला भ्याड आणि दुर्बळ ठरविणे विकृत आहे असे मत.

१.३.३.१७ दिवाकर खांडेकर; दीपावली (मासिक); सदर : ऐसी अक्षरे रसिके मेळवीन; ऑगस्ट १९६९

महाभारतकालीन समाज आणि आजचा समाज यातील बौद्धिक क्रांती लक्षात घेऊन प्रस्तुत ग्रंथ लिहिला गेला आहे. कृष्णाखालोखाल लेखकाला द्रौपदीबद्दल आदर. लेखकाने रंगविलेल्या द्रौपदीच्या व्यक्तिरेखेने महाभारतातील इतर अनेक व्यक्तींवर झगझगीत प्रकाश. सत्य काय, कल्पित काय याचा वाचकांना उलगडा होतो. महाभारताविषयी

व विशेषत: त्यातील व्यक्तींविषयी मांडलेला विचार तर्कशुद्ध वाटतो.

१.३.३.१८ अनंत आठवले; सह्याद्री (दिवाळी अंक); लेख; १९६९

'महाभारतातील कर्ण आणि ललित साहित्यातील कर्ण' या लेखात 'हा जय०' मध्ये साधले यांनी कर्णावर पुष्कळच प्रेम करून त्याचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न खोट्या पुराव्यानिशी केला आहे, असे मत.

१.३.३.१९ अनंत आठवले; महाभारताचे वास्तवदर्शन (आक्षेपांच्या संदर्भात); कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणे; ऑगस्ट १९७०

या ग्रंथात 'हा जय०'मधील विधाने खोडून काढण्याचा ठिकठिकाणी प्रयत्न असून 'श्री. आनंद साधले यांच्या विधानांचे परीक्षण' (पृ. ११२-१४८) असे एक पूर्ण प्रकरणही आहे. त्यात 'उमलत्या तारुण्यातील मोकळ्या मनाच्या युवकांचा बुद्धिभेद होण्याच्या दृष्टीने साधले यांचे 'जय नावाचा इतिहास' हे पुस्तक सर्वात अधिक घातक आहे. भ्रमोत्पादक पुराव्यावर भरवसून निरपराध आरोपीला फाशीची शिक्षा देणारा न्यायाधीशही आपली लेखणी मोडून टाकतो. साधले यांनी आता तसे करावे. विकृतीला चटावलेली विषारी लेखणी मोडून टाकावी आणि दुसरी एखादी निर्मल लेखणी वापरावी, मग ती बुद्धिवादाच्या, कठोर संशोधकाच्या, प्रामाणिक चिकित्सकाच्या आणि पूर्ण इहवादी नास्तिकाच्या कारखान्यात तयार झाली असली तरी मला चालेल.' असे मत.

१.३.३.२० **D. K. Bedekar, Indian Writing Today; 1969-1970 issue.**

Sadhale's study in his 'Jaya Navacha Itihas' is a passionate and rather obvious attempt to fit his interpretation to echo contemporary Indian political events.

१.३.३.२१ बाळ गाडगीळ; सोबत (साप्ताहिक); सदर : कडू आणि गोड; २६ मार्च १९७२

आठवले यांच्या 'महाभारताचे वास्तवदर्शन'वर खेळकर टीकाटिप्पणी करताना ''कौरव हे मित्र व पांडव हे शत्रू अशी आपली दृष्टी नाही'' असे साधल्यांनी म्हटले असले तरी तो त्यांच्या नम्रतेचा भाग. कारण त्यांनी युधिष्ठिराचे चित्र रंगविताना काळ्या रंगाचा वापर भरपूर केला आहे. सारांश, या पुस्तकात आनंदरावांनी कौरवांचे पांडव आणि पांडवांचे कौरव करण्यात असाधारण यश मिळविले आहे. अशी टिप्पणी.

१.३.३.२२ प्र. के. अत्रे; मराठा (दैनिक); अग्रलेख; ?

महाभारताच्या स्वतंत्र वृत्तीने केलेल्या अभ्यासाची, स्वतंत्र निर्भीड विचारांची आणि बंडखोर वृत्तीची जी साक्ष साधलेंनी आपल्या पुस्तकात दिलेली आहे ती मराठी बाण्याची आहे यात शंका नाही अशी प्रशस्ती.

१.३.३.२३ शरद्चंद्र मा. महाजन, ?; ?; ?

'जय नावाचा इतिहास' ही सत्यान्वेषी दृष्टिकोनातून निर्मिती न झालेली एक अनाठायी टीका आहे.

१.३.३.२४ अनंत आठवले; (पुणे); तरुणभारत (दैनिक); वृत्तांत; ?
गायकवाडवाडा गणेशोत्सवात झालेल्या भाषणात 'जय०' हा निबंध म्हणजे स्वैर कल्पनाविलासाचा प्रत्यक्ष नमुनाच आहे, असे मत मांडल्याचा वृत्तांत.

१.४/१ **दहा उपनिषदे** (भाग १); संक्षिप्त अनुवाद; मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; ओम् मुद्रणालय, पुणे; त्रिपुरी पौर्णिमा : १९६५; ७९; क्राऊन; पाच रुपये; अर्पण –श्रीकृष्णास; लेखनकाल – १० ऑक्टोबर १९६४ ते १२ ऑक्टोबर १९६४ व १३ जानेवारी १९६५ ते २३ जानेवारी १९६५

१.४/२ फेब्रुवारी १९८२; नऊ रुपये

१.४.२ ईशावास्योपनिषद्; केनोपनिषद्, प्रश्नोपनिषद्, मांडुक्योपनिषद् आणि बृहदारण्यकोपनिषद् या पाच उपनिषदांचा सुगम सारांश.

१.५/१ **दहा उपनिषदे** (भाग २); संक्षिप्त अनुवाद; मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; ओम् मुद्रणालय, पुणे; त्रिपुरी पौर्णिमा : १९६५; ८४; क्राऊन; पाच रुपये; अर्पण –श्रीकृष्णास;

१.५/२ फेब्रुवारी १९८२; नऊ रुपये

१.५.२ कठोपनिषद्, मुंडकोपनिषद्, छांदोग्योपनिषद्, तैत्तिरीयोपनिषद्, ऐतरेयोपनिषद् या पाच उपनिषदांचा सुगम सारांश व उपनिषदांची नावे, स्थाने; त्यातील प्रार्थना व महावाक्ये यांची सूची.

१.५.३.१ ?; नवाकाळ (दैनिक); सदर : ग्रंथ आणि ग्रंथकार; १९ जून १९६६
मनन-चिंतनाने ज्ञानविज्ञान साधणारी शिकवण हाच विषय असलेला उद्‌बोधक ग्रंथ.

१.५.३.२ सुनील सुभेदार; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); ११ डिसेंबर १९६६
साधले यांचा अनभ्यास आणि अज्ञान यांचेच जास्त दर्शन. जोडीला विपर्यास आणि प्रक्षेप हेही दोष. मात्र ग्रंथाचे नसले तरी लेखकाचे भारताच्या पुरातन संचित धनाचे संशोधन एकलव्याच्या एकटेपणाने करीत असल्याबद्दल स्वागत. या ग्रंथातून साधले यथार्थ ज्ञानासाठी आतुर आहेत, त्यांचे मन प्रांजळ आहे व वृत्ती अनाग्रही आहे हे जाणवते.

१.५.३.३ प्रभाकर कुळकर्णी; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); सदर : वाचकांचे मनोगत; १८ डिसेंबर १९६६
सुभेदारांची टीका विपर्यस्त असून साधले यांचा हेतू काटेकोर परिभाषा देण्याचा नव्हता तर उपनिषदांतील ज्ञान स्थूल रूपात देण्याचा होता, म्हणून सुभेदारांची टीका अनाठायी असल्याचे मत.

१.५.३.४ सुनील सुभेदार; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); सदर : वाचकांचे मनोगत; २४ डिसेंबर १९६६

कुळकर्णी यांच्या पत्रातील टीकेस उत्तर व उपनिषदे तर सोडाच, पण साधले यांचा मूळ ग्रंथही न वाचताच त्यांची तरफदारी केल्याबद्दल संभावना.

१.५.३.५ अविनाश केळकर; नवशक्ती (दैनिक); ३१ डिसेंबर १९६७

उपनिषदातील आशयाचे स्वरूप कळून यायला आणि त्यांची ओझरती माहिती व्हायला हे पुस्तक उपयोगी आहे.

१.५.३.६ ग. वि. केतकर; (पुणे) तरुणभारत (दैनिक); सदर : नवे साहित्य; ४ फेब्रुवारी १९६८

आजचा सामान्य वाचक डोळ्यापुढे ठेवून त्याच्यापुढे उपनिषदातील ब्रह्मविद्येची गोडी व निष्कर्ष सुलभरीत्या मांडण्याचा प्रयत्न पुस्तकात आहे. श्री. साधले यांनी दिले आहे तेवढे जरी सामान्य वाचक पाहील तरी त्याला आपल्या धर्माच्या मुळाचे दर्शन सहजपणे होईल.

१.५.३.७ ?; मराठा (दैनिक); सदर : पुस्तकांच्या जगात; ?

अत्यंत समर्पक दाखले, समजावण्याची उत्तम हातोटी आणि प्रवाही शैली यामुळे उपनिषदांचे वाचन ही केवढी सुखावह गोष्ट असू शकते हे ह्या पुस्तकावरून सिद्ध होते.

१.५.३.८ प्र. श्री. नेरूरकर; ललित (मासिक); ?

केवळ १६० पृष्ठांच्या मर्यादेने मर्यादित न होणारे असे उपनिषदातील विचारधन व साहित्यधन लेखकाने पसा भरभरून वाचकांना दिले आहे.

१.५.३.९ तृत्सु; ?; सदर : साहित्यसमीक्षण; ?

प्रमुख आणि सुप्रसिद्ध अशा दहा उपनिषदांमधील विचार सोपेपणाने आणि थोडक्यात देण्याचा या पुस्तकात प्रयत्न आहे.

१.६/१ **गीतगोविंद**. अनुवाद; मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई; कल्पना मुद्रणालय, पुणे; श्रीकृष्णजन्माष्टमी : १५ ऑगस्ट १९६८; १३६; क्राऊन; पाच रुपये; अर्पण –शब्दातीत स्नेहाने बांधलेले सुहृद – चित्रकार दीनानाथ दलाल यांस; मुखपृष्ठ – बाळ ठाकूर; लेखनकाल – १३ ऑक्टोबर १९६६ ते २७ ऑक्टोबर १९६६

१.६/२ १९८३; बावीस रुपये

१.६.२ जयदेवाच्या गीतगोविंद या भावकाव्याचा मूळ संहिता, पदपरिच्छेद या मांडणीने केलेला मराठी अनुवाद.

१.६.३.१ पु. रा. बेहेरे; नवशक्ती (दैनिक); संपादकीय; १७ ऑक्टोबर १९६८

लेखकाचे वैशिष्ट्य घेऊन मराठीत आलेले संस्कृतातील काव्यलतेवर फुललेले सुंदर व सुवासिक फूल.

१.६.३.२ शिरीष पै; मराठा (दैनिक); सदर : ग्रंथविचार; २४ नोव्हेंबर १९६८
वाचकांच्या अंत:करणाला व बुद्धीला मोह घालणारे मधुर गीतगोविंद.

१.६.३.३ अवधूत शास्त्री; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); २ मार्च १९६९
सरस मराठी अनुवाद. शब्दांच्या छटांतील बारकावे वगळल्यास साधले यांचा हा अनुवाद खरोखरच सरस आहे.

१.६.३.४ ?; आलोचना (मासिक); एप्रिल १९६९
अनुवाद करण्यापूर्वी लेखकाने केलेले परिश्रम त्याच्या मूलगामी अभ्यासवृत्तीची साक्ष वाटते. पण हा अनुवाद पुष्कळदा आनंदाची जी उत्कट प्रतिती आणून देतो त्याचे मूळ मात्र परिश्रमशीलतेपेक्षा श्री. साधले यांच्या मूलत: रसिकवृत्तीत व मराठी भाषेवरील त्यांच्या प्रभुत्वात आहे... या गुणांच्या जोरावर श्री. सा. यांचा हा भावानुवाद बराच सरस उतरला आहे हे खरे. परंतु काही ठिकाणी मात्र भावानुवाद करण्याच्या भरीस पडून मूळ लेखकाच्या भावनेशी श्री. सा. यांना एकतानता साधता आलेली नाही.

१.६.३.५ केशव मेश्राम; ललित (मासिक); लेख; मे १९६९ – '१९६८ मधील मराठी कविता' या लेखात.
मूळ संस्कृत अष्टपदी, लगोलग अन्वय व शब्दानुसारी भावपूर्वक भाषांतर ह्यांच्या संयुक्तिकरणामुळे श्री. साधले यांचे गीतगोविंद वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे. काही दोषांसह हे खास मराठमोळे भाषांतर आहे.

१.६.३.६ सदाशिव मंगरूळकर; (पुणे) तरुणभारत (दैनिक); ३ ऑगस्ट १९६९
आनंदनिधान कलाकृतीचा सरस भावानुवाद.

१.६.३.७ ?; (मुंबई-पुणे) रविवार सकाळ; सदर : ग्रंथपरीक्षण आणि परिचय; २४ ऑगस्ट १९६९–
जयदेवाच्या गीतगोविंदाचा गद्यमय अनुवाद. मूळ काव्याशी जवळीक साधण्याचा यशस्वी प्रयत्न. जयदेवाचे त्रोटक का होईना, चरित्र देणे आवश्यक होते.

१.६.३.८ ज. शा. देशपांडे; लोकसत्ता (दैनिक); २७ ऑगस्ट १९६९
गीतगोविंद मराठी वाचकास समजावून देण्यास हे पुस्तक उपयोगी आहे.

१.६.३.९ निशिकांत मिरजकर; माणूस (पाक्षिक); २३ मे १९७०
शब्दश: भाषांतर न करता स्वैर भावानुवाद केला हे एका अर्थी फार चांगले झाले. साधल्यांचे भाषांतर म्हणजे त्यामुळे मूळ काव्याचे एकरंगी रम्य प्रतिबिंब ठरले आहे. ते मूळ काव्याचे सोंग अथवा नक्कल बनलेली नाही... स्वैर अनुवादामुळे सर्वत्र नवी रेखीव सौंदर्ये खुलली आहेत. काही श्लोकांचे अनुवाद तर मुळापेक्षा सरस झाले आहेत. पण काही ठिकाणी नकळत स्पष्टीकरणात्मक संथपणा निर्माण झाला आहे.

१.६.३.१० म. बा. कुलकर्णी; अमृत (मासिक); ऑगस्ट १९७०

गद्य अनुवाद या दृष्टीने साधले यांची कृती प्रशंसनीय आहे. इतकेच नाही तर इतरही अनेक संस्कृत कलाकृतींचा मराठी वाचकांना कसा परिचय करून द्यावा याची एक दिशा दाखविणारी आहे.

१.७/१ **महापुरुष**. कादंबरी; सुनंदा प्रकाशन, मुंबई; एलोरा प्रिंटर्स, मुंबई; फेब्रुवारी १९६९; २२२; क्राऊन; आठ रुपये;

अर्पण – आधुनिक भारताचे महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे माझे लक्ष वेधणारे महाराष्ट्राचे महापुरुष आचार्य अत्रे यांना महाभारताचा महापुरुष कर्ण याची ही कहाणी समर्पण; प्रस्तावना – व. दि. कुलकर्णी; मुखपृष्ठ – पद्मा सहस्रबुद्धे; लेखनकाल – १ नोव्हेंबर १९६५ ते ६ नोव्हेंबर १९६५; प्रथम प्रकाशन – नंदा (मासिक); जानेवारी १९६६ ते नोव्हेंबर १९६६ यातून क्रमश:

१.७/२ प्रिया प्रकाशन, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, कुलाबा; नोव्हेंबर १९७४; १८०; डेमी; सोळा रुपये; सजावट-कु. प्रतिमा दलाल; (२.९/१ पहा)

१.७.२ महाभारतातील उपेक्षित कर्णाविषयीच्या प्रेमाने व जिव्हाळ्याने भारून ही पौराणिक कादंबरी लिहिली गेलेली दिसते. कर्णाच्या निमित्ताने जे स्वत: तेजाचे पुतळे आहेत, पण ज्यांची तेजस्विता जाती-पातीच्या काळोख्या अंधारात कुजत पडली आहे अशा दलित वर्गाविषयीचे आपल्या अंत:प्रवृत्तीतून आणि उत्कट मनोवृत्तीतून निर्माण झालेले परखड विचार साधले यांनी या कादंबरीतून मांडलेले दिसतात.

१.७.३.१ संहिता; मराठा (दैनिक); सदर : ग्रंथविचार; ६ एप्रिल १९६९

कादंबरी नसून कर्णाचे जीवनचरित्र वाटते, कारण तिची लेखनपद्धती, कर्ण-वसुंधरा यांचे एकांतातील प्रसंग आणि कर्णाचे भावजीवन वगळता बाकी सर्व पात्रांचे जीवन आणि घटना महाभारताच्या घटनांच्या आधारे अगदी सरळ व त्रोटकपणे सांगितल्या आहेत. त्यामुळे तेवढा भाग अहवालवजा, यामुळे कादंबरीत शैलीची एकात्मता जाणवत नाही. कर्ण महापुरुष होता असे कादंबरीतून जाणवत नाही. काहीतरी कमी पडते, त्याचा साधलेंनी गंभीरपणे विचार करावयास हवा होता.

१.७.३.२ पंढरीनाथ रेगे; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); २७ जुलै १९६९

कर्णाला योग्य तो न्याय देण्याच्या भूमिकेपायी भावविवशतेच्या आहारी न जाता लेखकाने त्याचे तेजस्वी व्यक्तिचित्र नीटस घटनाप्रसंग व मनोविश्लेषण यांच्या साहाय्याने ठसठशीतपणे साकार केले आहे.

१.७.३.३ वि. ह. कुलकर्णी; अनुराधा (मासिक); जून १९६९

प्रस्तुत कादंबरी ही कादंबरी नसून कर्णचरित्राच्या निमित्ताने साधले यांनी केलेले एक सामाजिक भाष्य आहे आणि ते त्यांच्या 'जय०' इतकेच चित्तवेधक आणि उद्बोधक झाले आहे. प्रस्तुत कादंबरीत साधले यांनी निर्माण केलेले प्रसंग आणि त्यातील संभाषणे

हे नाट्यप्रकाराला अनुकूल आहेत. ते पौराणिक कथानकावर आधारलेल्या नाटकांचे लेखक म्हणून अधिक यशस्वी होतील. (१.३५/१ पहा)

१.७.३.४ ?; आलोचना (मासिक); जुलै १९६९

विचारप्रतिपादक कादंबरी. महापुरुष कर्ण मनोज्ञपणे उभा करण्याचा प्रयत्न. महाभारताकडे पाहण्याच्या लेखकाच्या दृष्टीचे सातत्य इथेही दिसते. कर्णाला केंद्र कल्पून महाभारतातील पांडवपक्षाची निर्भर्त्सना करण्यासाठी साधले यांनी ही कादंबरी रावविली आहे. भाषा संस्कृतनिष्ठ, पण काही शब्द खटकतात.

१.७.३.५ नरहर कुरुंदकर; दीपावली (मासिक); जानेवारी १९७०

पत्ररूप लेख. कर्णाचे मोठेपण त्याच्या दुर्दैवात. 'महापुरुष'मधील कर्ण हा साधले यांच्या अतिरेकी प्रेमाला बळी पडला आहे असे मत मांडून कादंबरीच्या दोषांसोबतच गुणांचीही चर्चा.

१.७.३.६ अरविंद लेले; (पुणे) तरुणभारत (दैनिक); सदर : नवे साहित्य; १९ एप्रिल १९७०

सामान्य प्रतिभेने निकृष्ट शैलीत रंगविलेली उदात्त कर्णाची विकृत प्रतिमा या पौराणिक कादंबरीत दिसते. अवगुणांनाही गौरविण्याचा लेखकाचा हा प्रयत्न एकांगी व अतिरेकी वाटतो.

१.७.३.७ माधव मनोहर; नवशक्ती (दैनिक); सदर : शब्दांची दुनिया; २० एप्रिल १९७०

लेखकाच्या मानसीचे कर्णाचे वेगळे रूप धारण करून येणारी कादंबरी. कर्णचरित्रच, पण ते स्वतंत्र पौराणिक कादंबरीच्या मार्गाने सांगितले आहे.

१.८/१ **मातीची चूल**. आत्मचरित्र; सुनंदा प्रकाशन, मुंबई; एलोरा प्रिंटर्स, मुंबई; १० ऑगस्ट १९७०; पृष्ठे क ते स + ६००; क्राऊन; २० रुपये, अर्पण : लता मंगेशकर यांना; प्रस्तावना : पु. ल. देशपांडे; मुखपृष्ठ : वसंत सरवटे; आतील चित्रे : पद्मा सहस्रबुद्धे; नंदा मासिकातून लेखरूपाने पूर्वप्रकाशित; १९७०-७१ सालचा महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार; (२.१४/१ पहा)

१.८.२ पोस्टात काम करणाऱ्या परंतु वृत्तीने अत्यंत रसिक व संस्कृतप्रेमी असलेल्या आनंद साधले यांची आत्मकथा. यातून साधले यांच्या जीवनातील लहानमोठ्या प्रसंगांमधून प्रकट होणारी त्यांची विशिष्ट जीवनदृष्टी, वेगळे तत्त्वज्ञान यांचे दर्शन होते. व्यक्ती साधले आणि लेखक साधले यांच्यातील अदृश्य परंतु चिवट नाते शोधण्याच्या कामी या आत्मचरित्राचा उपयोग होऊ शकेल.

१.८.३.१ सौ. अचला जोशी; सोबत (साप्ताहिक); १५ नोव्हेंबर १९७०

मातीची चूल हे लेखकाच्या जीवनाचे निर्भीड व नि:संकोचपणे केलेले निवेदन आहे.

१.८.३.२ माधव मनोहर; नवशक्ती (दैनिक); सदर : शब्दांची दुनिया; पूर्वार्ध : २९ नोव्हेंबर १९७०, उत्तरार्ध : ६ डिसेंबर १९७०

आनंद साधले यांचे हे आत्मचरित्र अपूर्व असून त्यातील साधले पतिपत्नींची जुगलबंदी ही अपूर्वता आहे. स्वजनसंबंध आणि स्त्रीपुरुषसंबंध यांच्या संबंधातील नि:संकोच निवेदनाची कक्षा विस्तृत करणारे आत्मचरित्र.

१.८.३.३ उमा माडखोलकर; वीणा (मासिक); सदर : शब्दब्रह्म; फेब्रुवारी १९७१

मातीची चूल हे आत्मचरित्र-लेखनाच्या क्षेत्रात पदार्पण करू इच्छिणाऱ्या घाबऱ्या आणि बुजऱ्या लेखकांची हिंमत वाढविणारे आत्मचरित्र आहे.

१.८.३.४ सदा कऱ्हाडे; मराठा (दैनिक); १६ मे १९७१

प्रांजळ आत्मनिवेदन आणि अनुभवकथन ही प्रस्तुत आ.च.ची श्रेयाची बाजू. 'ऋणनिर्देश' हे ग्रंथाचे महत्त्वाचे प्रयोजन. पाल्हाळ, पुनरुक्ती, औचित्यभंग इ. दोष जमेस धरूनही ह्या लेखनात वैशिष्ट्यपूर्णता आहे. कारण आ.चरित्रात्मक लेखनाचे रूढ संकेत झुगारून देऊन लेखकाने मुक्तपणे लिहिले आहे. आजवरच्या मराठी आत्मचरित्रसाहित्यात अगदी वेगळे ठेरेल असे वेगळ्या धर्तीचे आ.च. लौकिक चरित्रापेक्षा यात खाजगी चरित्र जास्त. वाङ्मयीन दृष्ट्या मात्र एक प्रश्न उरतो. खाजगी चरित्राचे इतक्या पराकोटीचे प्रकटीकरण साहित्यातून होणे उचित आहे काय? ह्या दृष्टिकोनातून टीकाकारांनी आ.सां.चे हे वैशिष्ट्यपूर्ण चरित्र तपासून त्याचे मराठी आ.च. साहित्यातील स्वतंत्र स्थान निश्चित करावयास हवे.

१.८.३.५ मालती मराठे; अभिरुची (द्वैमासिक); मे-जून १९७१

जीवनातील कडू-गोड पचवून जिद्दीने झुंजणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या आत्मचरित्रातून घडते.

१.८.३.६ प्र. श्री. नेरूरकर; अस्मितादर्श (द्वैमासिक); वर्ष ४ – अंक २ : ३० जून १९७१

कथाविषयाच्या वेगळेपणाने आणि निर्लेप कथनशैलीमुळे कमालीचे मनोवेधक ठरलेले आत्मकथन, पण अतिखाजगी आत्मकथन अतिजाहीरपणे. या आत्मचरित्राला त्यांची जीवनकादंबरीच म्हणता येईल इतकी ती चटकदार आणि व्यक्ती, प्रसंग व घटना यांनी समृद्ध आहे. लेखनशैली ओघवती, धावती (racy), बाळबोध, अल्पसंमिश्र अशी आहे. साधल्यांच्या व्यक्तित्वात एक धटिंगण, आडदांड पुरुष आहे (त्यांच्या वडिलांसारखाच), तर दुसरा हळुवार, फुलामूलांवर आषक होणारा व त्यांच्यावर विशुद्ध प्रेम करणारा कविवृत्तीचा नाजुक पुरुष आहे साधले हे प्रामुख्याने 'कुटुंबवासी' आहेत, समाजवादी नाहीत. त्यांचे जग फक्त तेघांचे आहे, ही त्रिमूर्ती म्हणजे 'मधे मी व बाजूंना उषा आणि माझा मित्र वसंत'. म्हणूनच साधल्यांच्या अर्धशतकी जीवनाची चूल पेटते

ती धडाडून. त्या चुलीवर जे काही शिजते, वाढले जाते ते साधल्यांच्या खास घरातीलच असते, आणि तरीही साधले या आत्मकथनाने इतरेजनांसाठीही आपल्या घराची दारे खिडक्या सताड उघडचा ठेवतात. डोकावणाऱ्याने हवे तर आत डोकावून पाहावे व आणखी एक 'मातीची चूल' कशी पेटते, विझते, काय शिजवते हे स्वत:च्या घरातील चुलीला साक्ष ठेवून खुशाल पडताळावे. साधल्यांनी सादर केलेली स्वजीवनगाथा सहृदय वाचकांच्या अंत:करणात माणुसकीचे कढ आणल्याशिवाय राहणार नाही.

१.८.३.७ प्र. ना. परांजपे; समाज-प्रबोधन-पत्रिका (द्वैमासिक); सप्टेंबर-ऑक्टोबर १९७१

आनंद साधले यांचे हे आत्मचरित्र म्हणजे त्यांनी केलेले अत्यंत प्रांजळ असे आत्मपरीक्षण आहे.

१.८.३.८ वि.प्र. मोहगावकर; अस्मितादर्श (द्वैमासिक); लेख; वर्ष ४-अंक ४ : नोव्हेंबर-डिसेंबर १९७१

'गेल्या दशकातील काही आत्मचरित्रे' या समालोचनात्मक लेखात 'मातीची चूल' चे समालोचन करताना –

एका सामान्य स्थितीतल्या माणसाने माणुसकीच्या शोधासाठी जे श्रम घेतले, जे कष्ट सोसले व जी तपश्चर्या केली त्याचे हे आत्मचरित्र. जे घडले ते आडपडदा न ठेवता सांगितले आहे. मराठीतील अनोखे आत्मचरित्र. मराठीतील आत्मचरित्रांची दिशा अधिक वास्तववादी होऊ लागली आहे असे दाखविणारे.

१.८.३.९ ग. त्र्यं. माडखोलकर; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); ५ डिसेंबर १९७१

मातीची चूल ? छे ! धक्के देणारी विजेची चूल ! श्री. साधले यांचे बोधप्रद आत्मवृत्त.

१.८.३.१० कु. सुधा वगळ; महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका (त्रैमासिक); ऑक्टोबर-डिसेंबर १९७१

मातीची चूल हे आत्मचरित्र म्हणजे अत्यंत प्रांजळपणे, तटस्थ वृत्तीने आणि चिकित्सक बुद्धीने केलेले स्वजीवनाचे मूल्यमापन होय.

१.८.३.११ ग. त्र्यं. माडखोलकर; ललित (मासिक); डिसेंबर १९७१

साधले हे स्वत:ला सामान्य म्हणवत असले तरी ते सामान्यांतील असामान्य कसे आहेत याची जाणीव हे आत्मचरित्र वाचून वाचकांना होईल.

१.८.३.१२ जयवंत दळवी; सत्यकथा (मासिक); डिसेंबर १९७२

हे पुस्तक झपाट्याने वाचवते, परंतु झपाटत नाही; मोहित करते, पण भारून टाकत नाही. तथापि मन गुंतवून ठेवण्याची या आत्मचरित्राची शक्ती मात्र सामान्य नाही. याची मुख्य दोन कारणे म्हणजे वेगळे अनुभव आणि गोष्टीवेल्हाळ भाषा.

१.८.३.१३ आनंद साधले; आत्मचरित्राविषयी काही विचार; (१.२२.२.९ पहा)

१.८.३.१४ गो. ग. कुळकर्णी; सत्यकथा (मासिक); लेख; ऑगस्ट १९७३
डिसेंबर १९७२ अंकातील दळवी व साधले यांच्या लेखांच्या संदर्भात मनात आलेले विचार मांडताना –
'मातीची चूल' वाचनीय असूनही असमाधान वाटते, त्याला कारण आत्मचरित्र-लेखनाची साधल्यांची धारणा सदोष आहे, हे होय. जीवनाकडे पाहण्याची व ते जीवन लेखनात मांडण्याची साधले यांची दृष्टीच तऱ्हेवाईक, abnormal आहे. त्यांची व्यक्तिमत्त्वासंबंधीची धारणाही कठोर वास्तवाच्या डोळस अवलोकन-चिंतनातून सिद्ध झालेली नाही; ती बरीचशी स्वप्नाळू आहे. साधल्यांची कलादृष्टी उथळ आणि जीवनदृष्टी खुजी वाटावी अशी आहे. आत्मचरित्र-लेखनासाठी निकोप कलादृष्टीची आवश्यकता असते. पण आत्मचरित्रकाराची जीवनदृष्टी ही त्याच्या कलादृष्टीचा एक अपरिहार्य भाग असत नाही काय ? त्याच्या जीवनदृष्टीतूनच त्याची स्वभाववैशिष्ट्ये साकार होत नाहीत काय ? साधल्यांची जीवनदृष्टी वाढाळू असल्यामुळे त्यांची कलादृष्टी उथळ झाली आहे की त्यांच्या कलादृष्टीतल्या अधुरेपणामुळे जीवनदृष्टी थिटी वाटते ?

१.८.३.१५ आनंद साधले; साहित्यसूची (मासिक), दिवाळी १९८७
'चूल मातीची मोल मोत्याचे' (लेख). आत्मचरित्राच्या लेखनामागील प्रेरणांचा इतिहास प्रथमच कथन करणारे व पहिला संसार का मोडला त्याची सूचक माहिती देणारे आत्मकथन.

१.९/१ **केतकी**. कादंबरी; सुनंदा प्रकाशन, मुंबई; रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मुंबई; २६ जानेवारी १९७१; १३८; क्राऊन; सात रुपये; विजय तेंडुलकर यांस अर्पण; मुखपृष्ठ व सजावट:सौ. नीला पोंक्षे; लेखनकाल ८ ऑगस्ट १९७० ते १४ ऑगस्ट १९७०; प्रथम प्रकाशन:नंदा (दिवाळी अंक) १९७०

१.९/२ सन पब्लिकेशन्स, पुणे; तपस्या मुद्रणालय, अलिबाग; १९८२; १३०; क्राऊन; अठरा रुपये

१.९.२ आपल्याला आवडलेल्या अप्पा नामक तरुणाऐवजी घरच्या गरिबीच्या परिस्थितीमुळे प्रौढ माणसाशी विवाह करावा लागून नाना संकटांशी तोंड द्यावे लागणाऱ्या केतकीची कहाणी. संकटकाळी प्रीतीला स्मरून ती अप्पाला हाक देते पण दुर्बळ अप्पा प्रतिसाद देत नाही. स्वत:च संकटांवर मात करून केतकी स्वतंत्र राहू लागते. पण आयुष्याच्या सरत्या काळात अप्पाच्या प्रेमाची प्रचिती येऊन ती सुखावते. अप्पाला मात्र अपराधी वाटत राहते, असे सूत्र.

१.९.३.१. माधव मनोहर; नवशक्ती (दैनिक); सदर : शब्दांची दुनिया; ९मे १९७१
आनंद साधले यांनी केतकी लिहून छोटीशी कथा केवढी उंची गाठू शकते याचा सहज

प्रत्यय आणून दिला आहे. वर्णनासाठी वर्णन म्हणून एक शब्दही न उच्चारता रेखाटलेले एक प्रादेशिक, चित्रदर्शी वातावरण आणि पारिजातकाच्या फुलापेक्षाही नाजूक आणि पांगाऱ्याच्या फुलापेक्षाही भडक अशा शब्दांनी गुंफलेले संवाद ही या कादंबरीची वैशिष्ट्ये.

१.९.३.२ भालचंद्र फडके; ललित (मासिक); लेख; एप्रिल १९७२ – '१९७१ सालातील कादंबरी' या समालोचनात्मक लेखात

साधल्यांच्या केतकीचे रूप अगदी निराळे आहे. तिने अप्पावर प्रेम केले आहे. पण आपले भ्रष्ट शरीर ती त्याला देत नाही. केवळ मने एकत्र आहेत या जाणिवेनेच ती तृप्त आहे.

१.९.३.३. प्रभा गणोरकर; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); सदर –पुस्तक-परिचय; २० मार्च १९८३

या कादंबरीतला जीवनानुभव फारसा गुंतागुंतीचा नाही. पण संयत, ओघवते स्त्रीपात्रमुखी निवेदन, मोजके संवाद आणि कथानकाचे गांभीर्य व वजन सांभाळण्याची लेखकाची कुवत यामुळे ही कादंबरी परिणामकारक होते.

१.१०/१ **असेन मी मातीची**. कादंबरी; ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; श्री ज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर; १५ नोव्हेंबर १९७१; १४५; क्राऊन; सात रुपये पन्नास पैसे; सौ. शिरीष पै यांस अर्पण; मुखपृष्ठ –प्रभाकर जोगदंड; लेखनकाल : ९ ऑक्टोबर १९६९ ते १२ ऑक्टोबर १९६९

१.१०.२ पतीपासून घटस्फोट घेतलेल्या नायिकेला जीवनात पुन्हा उभी करण्यासाठी पतीचाच मित्र अप्पा नांदोसकर याने घेतलेल्या अपरिमित श्रमांची आणि या दोघांमधील वेगळ्याच नात्याची कहाणी सांगणारी कादंबरी. 'मातीची चूल' या आत्मचरित्रात या कथानकाचे धागेदोरे सापडतात.

१.१०.३.१ सदा कऱ्हाडे; मराठा (दैनिक); लेख; ११ जानेवारी १९७०

'सत्तरच्या दिवाळीतील कादंबऱ्या' या परामर्शात्मक लेखात 'वेगळे कथानक असलेली कादंबरी; अप्पा नांदोसकर, विजया प्रधान या व्यक्ती सामान्यांपासून वेगळ्या असून भोगापेक्षा त्यागाचे, वंचनेपेक्षा श्रद्धेचे सामर्थ्य अधिक असते हे या कादंबरीतून प्रत्ययाला येते' असा अभिप्राय.

१.१०.३.१ माधव मनोहर; नवशक्ती (दैनिक); सदर : शब्दांची दुनिया; १२ डिसेंबर १९७१

सत्य व सत्याभास यातील परस्परसंबंधांची अभिव्यक्ती आणि वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेचे प्रत्ययकारक प्रात्यक्षिक म्हणजे ही कादंबरी.

१.१०.३.३ भालचंद्र फडके; ललित (मासिक); लेख; एप्रिल १९७२ – '१९७१

सालातील कादंबरी' या समालोचनात्मक लेखात
माणसावर प्रेम करणाऱ्या व आपण प्रेम केले या जाणिवेवर तृप्त असलेल्या स्त्रीचे वेगळे रूप दाखविणारी कादंबरी.

१.१०.३.४. सदाशिव करंदीकर; मराठा (दैनिक); २८ जानेवारी १९७३
अप्पा नांदोसकरांचे सुंदर व्यक्तिरेखाटन. हाच विषय आणि आशय एखाद्या सामान्य मगदुराच्या लेखकाच्या हातात गेला असता तर पन्नास वेळा त्यातील नायिकांचे चेहरे लज्जने आरक्त झाले असते आणि शंभर वेळा एकमेकांच्या बाहुपाशात पडून कथानकाचे वाटोळे झाले असते. पण साधल्यांसारख्या साक्षेपी आणि सृजनशील लेखकाच्या हातात गेल्याने त्याचे चीज झाले. मधेमधे उपदेश आणि प्रवचने कंटाळवाणी होत असली तरी एक चांगली कादंबरी वाचल्याचा निखळ आनंद मिळतो.

१.११/१ **अभिसार**. कादंबरी; मनीषा प्रकाशन, मुंबई; कनकेश्वर प्रसाद प्रिंटिंग प्रेस, कुलाबा; जानेवारी १९७२; १०४; क्राऊन; चार रुपये पन्नास पैसे; जी द्रौपदी तिच्या योजनगंधास अर्पण; मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे; लेखनकाल; १४ सप्टेंबर १९७१ ते २० सप्टेंबर १९७१

१.११.२ अनाथ शंकरवर उमाचे प्रेम, तिच्या घरच्यांचा विरोध, शंकरला अज्ञाताची हाक ऐकू येते, तिच्या मागे जात त्याला आपल्या मातापित्यांचा शोध लागतो व शेवटी शंकर-उमाचा विवाह होतो, असे कथासूत्र.

१.११.३.१ माधव मनोहर; नवशक्ती (दैनिक); सदर : शब्दांची दुनिया; १९ मार्च १९७२
कथानकाच्या ओघात कला, मन, प्रीती वगैरे विषयांवर अनेक लहानमोठी व्याख्याने असणारी साधले यांची ही कादंबरी म्हणजे घाईत (बि)घडलेली, न साधलेली अशी इटुकली मिटुकली परिकथाच आहे.

१.११.३.२ भालचंद्र फडके; ललित (मासिक); लेख; एप्रिल १९७२ – '१९७१ सालातील कादंबरी' या समालोचनात्मक लेखात
''अभिसार' मधील उमा हे साधल्यांच्या केतकीचेच आणखी एक रूप. ती शरीरासाठी जगत नाही, जगली नाही. ती मनाने जगणारी मुलगी आहे.' असा अभिप्राय.

१.१२/१ **सय**. कादंबरी; ग. पां. परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; संजय प्रेस, मुंबई; १३ ऑगस्ट १९७२; १४३; क्राऊन; सात रुपये पन्नास पैसे; तिला –आयुष्यभर साथ देण्यासाठी जिची फक्त सय उरलेली आहे –; मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे; लेखनकाल : ४ एप्रिल १९७२ ते १५ एप्रिल १९७२; प्रथम प्रकाशन : अनुराधा (मासिक) मे, जून, जुलै १९७२

१.१२.२ फाळणीच्या वेळी निर्वासित झालेल्या उच्चकुलीन अशा सुरेंद्रच्या, आणि वेश्येचे

जीवन जगणाऱ्या बबीच्या प्रेमाची कथा सांगणारी कादंबरी.

१.१२.३.१ ?; धर्मभास्कर (मासिक); दिवाळी अंक १९७२

दीर्घकथा की कादंबरी? कल्पनाविलास नाही – तो पोषक ठरला नसता –कल्पनाविलासाच्या अभावाने कादंबरीच्या सौंदर्यात भरच पडली आहे. आकाराने लहान – आशयाने खूप मोठी. बबीचे जीवन या संपूर्ण कादंबरीला आणि (नायक) सुरेंद्रच्या जीवनालाही झपाटून टाकणारे. वेदनेपेक्षा परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्यातच मानवी जीवनाची यशस्विता आहे आणि बबीचे आयुष्य हे सतत परिस्थितीचे आव्हान स्वीकारीत गेलेले दिसते. आणि इथेच एक स्त्री पुरुषावर मात करताना दिसते. यशस्वी कादंबरी.

१.१२.३.२ ?; नवशक्ती (दैनिक); अग्रलेख; १२ नोव्हेंबर १९७२

दीर्घकथा म्हणावी इतक्याच लांबीची छोटी कादंबरी, बबीची कहाणी. ती गणिकांची प्रतिनिधी नसून गृहिणींचीच प्रतिनिधी वाटावी असे तिचे सुरेंद्रला सर्वस्व अर्पण केले त्या काळातले वर्तन. साधल्यांनीही या कलात्मक चित्राची तेवढीच चौकट चितारली आहे. या कथेला अंगभूत अशी एक लय आहे, त्यामुळे वाचनीय.

१.१२.३.३ वि. शं. चौधुले; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); ३ डिसेंबर १९७२

नेहमीच्या वळणाची कादंबरी. विसंगत व्यक्तिरेखा. गुंडाळलेला शेवट.

१.१३/१ **इसापनीती** (भाग १). स्वैर अनुवाद; मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई; सुलभ मुद्रणालय, पुणे; नोव्हेंबर १९७३; १४३; डेमी; पाच रुपये; मुखपृष्ठ व चित्रसजावट : वसंत सरवटे;

१.१३/२ १९८०; १५८; डेमी; आठ रुपये.

१.१३.२ इसापाच्या नीतीकथांचा स्वैर अनुवाद. केवळ मुलांनाच नव्हे तर प्रसंगी प्रौढांनाही उपयोगी ठरणाऱ्या कथा. (१.२५.३.१ पहा)

१.१४/१ **परि हरि हा ब्रह्मचारि**. लेखसंग्रह; अमेय प्रकाशन, नागपूर; कल्पना मुद्रणालय, पुणे; मार्च १९७४; १८०; डेमी; पंधरा रुपये; सज्जन मित्र प्रा. गंगाधर पाटील यांस अर्पण; मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे; मांडणी : सुभाष अवचट; महाराष्ट्र शासनाचा १९७४-७५ सालचा साहित्यपुरस्कार प्राप्त.

१.१४.२ पूर्वार्ध (पुराणे) : यात महाभारत, रामायण व भागवतावरील लेख व उत्तरार्ध (संकीर्ण) : यात पंचतंत्रावरील आणि इतर लेख अशा पंधरा पूर्वप्रकाशित लेखांचे संकलन.

१.१४.२.१ वाळूत पाउले त्यांची; पृ. ३ ते १४; प्रथम प्रकाशन : आलमगीर, दिवाळी १९६६

स्त्रीचे स्वातंत्र्य व तिचे मातृत्व यांबद्दलच्या आपल्या पूर्वजांच्या परमसहिष्णू दृष्टीचे

कुंतीच्या मातृत्वाच्या संदर्भात दर्शन घडविणारा लेख.

१.१४.२.२ एकटी; १५ ते २७; वीणा, दिवाळी १९६६

सर्व आयुष्य आपल्या पुत्रांसाठी वेचूनही शेवटी एकाकी उरलेल्या कुंतीची वेदना उजागर करणारा लेख.

१.१४.२.३ रामायणातील उपनायिका; ३१ ते ४७; बागेश्री, दिवाळी १९६६

हतभागिनी कौसल्या, धीरोदात्ता सुमित्रा, सामान्या कैकेयी, बुभुक्षिता अहिल्या, विकृता मंथरा, यशस्विनी तारा, पतिव्रता मंदोदरी आणि भाग्यवती उर्मिला या रामायणातील स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटणारा लेख.

१.१४.२.४ रामायणातील राजकारण; ४८ ते ५५; आलमगीर, दिवाळी १९६८

सुग्रीव आणि राम यांच्यातील राजकीय तह आणि बिभीषणाला रावणापासून फोडण्याचे रामाचे राजकारण विशद करणारा लेख.

१.१४.२.५ तीन रामभक्त; ५६ ते ६२; आलमगीर, दिवाळी १९६७

बिभीषण, सुग्रीव व हनुमान परंपरेने रामभक्त गणले जातात. पण बिभीषण हा घरभेदी; सुग्रीव हा राजकीय स्नेही; तर हनुमान हा नि:स्पृह स्नेही; म्हणून यांपैकी भक्त कोणीच नाही असे मत मांडणारा लेख.

१.१४.२.६ रामाने सीतात्याग केलाच नाही; ६३ ते ७१; दीपावली, दिवाळी १९६२

उत्तररामायण प्रक्षिप्त असल्यामुळे त्यातील सीतात्यागही पौराणिकांनी रामचरित्राला जोडलेले बांडगूळ आहे असे मत मांडणारा लेख.

१.१४.२.७ परि हरि हा ब्रह्मचारि; ७५ ते १०६; दीपावली (मासिक); सप्टेंबर १९६१ ते डिसेंबर १९६१

पंडित कवींच्या रासक्रीडाविषयक आख्यानांमधून कृष्णाने रासक्रीडेत गोपींशी संभोग केला होता असा जो गैरसमज झालेला आहे त्याचे खंडन करणारा दीर्घ लेख.

१.१४.२.८ पंचतंत्र आणि हितोपदेश; १०९ ते ११७; आलमगीर, दिवाळी १९७२

पंचतंत्र आणि हितोपदेश ही सामान्यत्वे मानली जातात तशी मुलांची पुस्तके नसून प्रौढांनाही व्यवहारनीती आणि राजकारण शिकवून माणसाला व्यवहारचतुर व धूर्त बनविणारी पुस्तके आहेत असा लेखकाचा अभिप्राय. यातूनच लेखकाची 'पंचतंत्र' व 'हितोपदेश' नव्या दृष्टीने मांडणारी पुस्तके निर्माण झाली.

१.१४.२.९ पंचतंत्रातील समाजजीवन; ११८ ते १२७; धर्मभास्कर, दिवाळी १९७२

'पंचतंत्र' या ग्रंथातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक रीतिरिवाजांचे दर्शन घडविणारा माहितीपर लेख.

१.१४.२.१० पंचतंत्रातील स्त्री-जीवन; १२८ ते १३६; अनुराधा, दिवाळी १९७२

इतर संस्कृत साहित्यात आहे त्यापेक्षा पंचतंत्रातून दिसणारे स्त्रीजीवन खूपच वेगळे व

अधिक नैसर्गिक आहे असे सप्रमाण सांगणारा लेख.

१.१४.२.११ किं मधुना किं विधुना; १३९ ते १४४; आलमगीर, दिवळी १९७०
संस्कृत भाषेच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता पटवून देणारा लेख.

१.१४.२.१२ पुराणातील विमानविद्या; १४५ ते १५१; दीपावली (मासिक); मे १९६९
पुराणात प्रत्यक्ष विमान वा विमानाची शास्त्रीय विद्या नसेल पण विमानांची कल्पना अवश्य होती, हे प्रतिपादणारा लेख.

१.१४.२.१३ भारतीय संगीत-नृत्याची पुरातन परंपरा; १५२ ते १६२; आलमगीर, दिवाळी १९७१
वैदिक काळापासून आपल्या जीवनात आणि परंपरेत संगीत व नृत्याला प्रतिष्ठेचे स्थान होते. पण मधल्या काळात स्त्रियांच्या लैंगिक नीतीबद्दलच्या बदलत्या कल्पनांमुळे या प्रतिष्ठेचा संकोच होत गेला असे प्रतिपादन करणारा लेख.

१.१४.२.१४ वसुंधरेचे स्तन्य उसळले; १६३ ते १७३; दीपावली, दिवाळी १९६३
तेजस्विनी सिंधू, विलासिनी यमुना, तपस्विनी गंगा, शुभांगिनी सरस्वती, प्रमद्वरा नर्मदा आणि तीर्थरूपा गोदावरी या नद्यांच्या थोरवीचे दर्शन घडविणारा लेख.

१.१४.२.१५ ही तो माणके मकरे गिळिली; १७४ ते १८०; उत्तम, दिवाळी १९६९
काही नामशेष झालेसे वाटणाऱ्या ग्रंथांचे पुनरागमन रसिक वाचकाच्या जीवनात जो आनंद आणते त्याचे सोदाहरण दर्शन घडविणारा लेख.

१.१४.३.१ वा. रा. कांत; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); १९ जानेवारी १९७५
साधल्यांची लेखणी व मती रामायण-महाभारतात विशेष रमते. भारतीय जीवनमूल्यांचा शोध त्यांनी आत्मनिष्ठतेने घेतलेला असल्याने तो उत्कट आणि भेदक ठरला आहे. सौंदर्यवादी दृष्टी आणि प्रांजळ व प्रवाही भाषा ही साधल्यांची वैशिष्ट्ये या लेखांतूनही दिसतात.

१.१४.३.२ ?; आलोचना (मासिक); जून १९७५
साधल्यांच्या लिखाणात एक विशेष असा दिसतो की जो कुणी उपेक्षित आहे असे त्यांना वाटते त्याची बाजू ते घेतात आणि त्याचे समर्थन अगदी टोकाला जाऊन करतात. असे करण्यात आपण दुसऱ्या संबंधित व्यक्तीवर अन्याय करीत असू अशी शंकाही त्यांना येत नाही. पण हे सर्व वाचत असताना साधल्यांची भारावलेली अवस्थाही आपल्या प्रत्ययाला येते.

१.१५/१ **रसमुग्धा**. लेखसंग्रह; अमेय प्रकाशन, नागपूर; नाग मुद्रणालय, नागपूर; सप्टेंबर १९७४; १५८; डेमी; वीस रुपये; गुरुमित्र व. दि. कुळकर्णी यांस; मुखपृष्ठ व सजावट : पद्मा सहस्रबुद्धे;

१.१५.२ संस्कृत विदग्ध साहित्यात नायिकांचे जे सुरम्य दर्शन होते त्याचा परिचय करून

देणारे तेरा लेख व कथापरिचय.

१.१५.२.१ दोन हजार वर्षांपूर्वीच्या मराठी कुलवधूचे कामजीवन; पृष्टे १ ते १५; प्रथम प्रकाशन : उत्तम, दिवाळी १९७० व श्री, दिवाळी १९७० यांत विभागून.
गाथा सप्तशतीत आढळणाऱ्या मराठमोळ्या, कुलवंत नववधूच्या प्रणयजीवनाचे चित्रण करणारा लेख.

१.१५.२.२ सखी; १६ ते २७; दीपावली, दिवाळी १९६८
सुसंस्कृत पण संकोची नायक-नायिकांना मदत करणाऱ्या गाथा सप्तशतीतील सखीचे दर्शन घडविणारा लेख.

१.१५.२.३ पूर्वमेघातील शृंगार-शिल्पाचे सौंदर्य; २९ ते ३८; दीपावली, दिवाळी १९७१
कालिदासकृत मेघदूतातील पूर्वमेघामधील शृंगारचित्रांचे रसग्रहण करणारा लेख.

१.१५.२.४ उत्तरमेघातील प्रीतीची कोवळीक; ३९ ते ४७; राष्ट्रमत, दिवाळी १९७१
उत्तरमेघातील विप्रलंभ शृंगाराला कारुण्याचा जो स्पर्श आहे त्याचे सौंदर्य उलगडून दाखविणारा लेख.

१.१५.२.५ कथा काममंजिरीची; ४९ ते ६०; दीपावली (मासिक); जुलै १९७०
दंडीकृत दशकुमारचरितातील काममंजिरीच्या कथेचा प्रास्ताविकासह स्वैर अनुवादयुक्त परिचय.

१.१५.२.६ कहाणी नितंबवतीची; ६१ ते ६६; दीपावली (मासिक); ऑक्टोबर १९६७
वरीलप्रमाणेच आणखी एक कथा-परिचय.

१.१५.२.७ शृंगारातील ऋतुचक्र; ६७ ते ७५; दीपावली, दिवाळी १९७०
भर्तृहरीच्या 'शृंगारशतक' या काव्याची कल्पना वाचकांना यावी या हेतूने केलेली स्वतंत्र अशी एकसंध टीका.

१.१५.२.८ नववधू प्रिया मी; ७६ ते ८८; दीपावली (मासिक); डिसेंबर १९६६
अमरुशतकातील शृंगार-कणिकांचे रसग्रहण करणारा लेख.

१.१५.२.९ भाग्यवती मी भाग्यवती; ८९ ते १००; नंदा (मासिक); जानेवारी १९६७
अमरुशतकातील सुभग आणि स्वाधीनपतिका नायिकेच्या प्रणयजीवनाचे दर्शन घडविणारा आस्वादक लेख.

१.१५.२.१० व्यथा – कुणा मालतीची; १०१ ते १२०; दीपावली, दिवाळी १९६६
दामोदरगुप्ताच्या 'कुट्टणीमत' या गणिकांवरील ग्रंथातील एका वशीकरण- प्रसंगाचा परिचय करून देणारा कथारूप लेख.

१.१५.२.११ गणिकांची शाळा; १२१ ते १३४; दीपावली, दिवाळी १९६९
क्षेमेन्द्राच्या 'समय-मातृका' या ग्रंथातील वैशिष्ट्यांचा परिचय करून देणारा आस्वादक लेख.

१.१५.२.१२ कुंजवनाची वाट; १३५ ते १४५; नंदा (मासिक); जानेवारी १९६९
जयदेवाच्या गीतगोविन्दातील नांदीच्या आधारे संस्कृतातील शृंगाराचे स्वरूप स्पष्ट करणारा लेख.

१.१५.२.१३ पंडित कवींची रासक्रीडा; १४६ ते १५८; दीपावली (मासिक); सप्टेंबर १९६०
वामन पंडित, श्रीधर पंडित, कृष्णदयार्णव आणि मोरोपंत या पंडित कवींनी आपल्या भागवतावरील टीकेत रंगविलेल्या रासक्रीडेचे दर्शन घडविणारा लेख.

१.१५.३.१ म. गो. वैद्य; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); २ फेब्रुवारी १९७५
अत्यंत रसाळ भाषेत लिहिलेले हे निबंध व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचे असून यातील मेघदूतावरील दोन व गीतगोविन्दावरील एक अशा तीन लेखांची लय विलक्षण चेतोहर आहे. मात्र लेखकाच्या प्रस्तावनेतील इतरांना लावलेली दुर्विदग्ध वगैरे विशेषणे अप्रयोजक वाटतात.

१.१५.३.२ विश्वास जहागीरदार; अस्मितादर्श (त्रैमासिक); एप्रिल-जून १९७६
कमालीची रंजकता हा सर्व लेखांचा महत्त्वाचा विशेष. इथे आकलन आणि आस्वाद केवळ परिचयात्मक किंवा टीकात्मक नाहीत. त्यात एक विशेष दृष्टी आहे. म्हणून हे व्यक्तिनिष्ठ निबंध (personal essays) आहेत असे लेखकाचे म्हणणे. पण आस्वादक टीका आणि ललित निबंध या दोन्हींच्या मध्ये कुठेतरी हे निबंध येऊ पाहतात. परंतु इथे अन्वयात्मक, आस्वादात्मक अशा निबंधांबरोबर काही चक्क कथाही निबंध म्हणून येतात. मात्र 'रसमुग्धा' अत्युत्कृष्ट ललितनिबंधग्रंथ. त्यातील शब्दकळा विलक्षण कोवळीक घेऊन येणारी. पुस्तकात पद्मा सहस्रबुद्धेंची समर्थ चित्रे.

१.१५.३.३ विश्वास जहागीरदार; मराठवाडा (दैनिक); २५ जुलै १९७६
'अस्मितादर्श' – एप्रिल-जून १९७६ मधून पुनर्मुद्रित.

१.१५.३.४ शांता शेळके; ललित (मासिक); सप्टेंबर १९७५
'१९७४ सालातील ललितलेखन' या लेखात –
काही संस्कृत काही मराठी ग्रंथांचा रसास्वादाच्या भूमिकेतून परिचय. भावाशयी भाषांतरात साधले अनेकदा जे स्वातंत्र्य घेतात त्याबद्दल मतभेद शक्य. 'कुट्टिनीमत' आणि 'समयमातृका' या परखड वास्तवता असणाऱ्या ग्रंथांचा परिचय हाच 'रसमुग्धा'तील सर्वात वाचनीय आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग. (यातील भाषांतराच्या भूमिकेसंबंधीच्या आक्षेपांना साधले यांनी 'मी संस्कृत साहित्याला काय दिले - ?' या लेखात उत्तर दिले आहे.)

१.१६/१ **प्रणयिनी**. कादंबरी; परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; संजीव मुद्रणालय, पुणे; १४ नोव्हेंबर १९७४; १२५; क्राऊन; आठ रुपये; नेकीचे स्नेही श्री. जयवंत दळवी यांस; मुखपृष्ठ : ढवळे

१.१६.२ आपल्या सौंदर्याच्या जोरावर नाट्यक्षेत्रात आणि जीवनात वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळविणाऱ्या तरुणीची कहाणी.

१.१७.१ **अशीच एक रात्र होती.** कथासंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, अलिबाग-कुलाबा; १५ जानेवारी १९७५; १६२; क्राऊन; बारा रुपये; स्नेहमूर्ती श्री. बा. जोशी यांस; मुखपृष्ठ : बांदोडकर

१.१७.२ दहा कथांचा संग्रह.

१.१७.२.१ अशीच एक रात्र होती; पृष्ठे ९ ते २३; प्रथम प्रकाशन – सत्यकथा (मासिक); मे १९४८

माहेरी जाणाऱ्या पत्नीच्या संभाव्य विरहाने व्याकुळणारा पती व पत्नीने जाणे रहित करून त्याला दिलेला गोड धक्का वर्णन करणारी कथा.

१.१७.२.२ आहुती; २४ ते ३५; अनुराग, दिवाळी १९७२

एका प्रौढ कुमारिकेला आपल्या विवाहित प्रियकराबद्दल वाटणारी प्रीती, पण त्याच्या प्रतिष्ठेसाठी स्वत:च्या मनाला समिधेप्रमाणे जळत ठेवणाऱ्या प्रेयसीची कथा.

१.१७.२.३ कथा सनातन; ३६ ते ५४; नंदा, दिवाळी १९६८

येशूला सुळी चढविण्याचा निर्णय कसा घेतला गेला ते सांगणारी कथा. Orsler च्या Greatest Story वर आधारित.

१.१७.२.४ चंदना; ५५ ते ६५; रत्नप्रभा, दिवाळी १९७२

स्त्री प्रसंगी दुबळी ठरली तरी त्यामुळे तिची प्रीती दुबळी ठरत नाही यावर ठाम विश्वास असणाऱ्या अण्णा या प्रौढ गृहस्थांची प्रीतिकथा. 'मातीची चूल' या आत्मचरित्रात धागेदोरे.

१.१७.२.५ जिद्द; ६६ ते ८१; गौरव, दिवाळी १९७१

एका स्त्री डॉक्टरने आपल्या व्यवसायात ठामपणे उभे राहण्यासाठी उपसलेल्या कष्टांची व जिद्दीची कथा.

१.१७.२.६ झुंज; ८२ ते १०३; अनुराग, दिवाळी १९७१

गीताबाई नामक डॉक्टरच्या आयुष्यात येणाऱ्या अनेकविध जबाबदाऱ्यांच्या क्षणांपैकी एका कृतार्थ क्षणाची कथा.

१.१७.२.७ दोन चाके; १०४ ते ११९; आशिष, दिवाळी १९७०

'पति-पत्नी ही संसाररथाची दोन चाके' या म्हणीची खिल्ली उडविणारी, एका संसारचित्राचे औपरोधिक वर्णन करणारी कथा.

१.१७.२.८ प्रीतिगंध; १२० ते १३४; अलका, दिवाळी १९७२

प्रौढ वयातही कोवळी प्रीती जपणाऱ्या स्त्रीची, 'प्रीतिगंध अमर असतो' असे सांगणारी कथा.

१.१७.२.९ लोपामुद्रा; १३५ ते १५१; गौरव, दिवाळी १९७०
स्त्री ही पुरुषाच्या पराक्रमावर भाळते हे अगस्ती-लोपामुद्रा या पौराणिक पात्रांच्या संदर्भात सांगणारी कथा.

१.१७.२.१० रात गेली घाई घाई; १५२ ते १६२; सुगंध, दिवाळी १९७०
पतिमीलनासाठी आतुरलेल्या पत्नीच्या मार्गात येणारे विविध अडथळे वर्णन करणारी हलकीफुलकी कथा.

१.१८/१ **वैदेही**. कादंबरी; भगवानदास हिरजी, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, कुलाबा; १५ ऑगस्ट १९७५; २२९; क्राऊन; वीस रुपये; सौ. आशालता सावे यांस; दीनानाथ दलाल; लेखनकाल : ९ जानेवारी १९६५ ते २० जानेवारी १९६५, पुन:संस्कार –जुलै १९७४; नंदा (मासिक) फेब्रुवारी १९६५ ते नोव्हेंबर १९६५

१.१८/२ सन पब्लिकेशन्स, पुणे; स्मिता प्रिंटर्स, पुणे; १५, ऑगस्ट १९८८; २०५; डेमी; पन्नास रुपये; मुखपृष्ठ : जोशी;

१.१८.२ सीता ही आदिमाता. स्वतंत्र बाण्याची. तिच्या या बाण्यामुळेच रामायण घडले व तिच्यामुळेच उत्तर-दक्षिण संस्कृतीचा मिलाप घडून आला असे सांगणारी पौराणिक कादंबरी. लेखकाच्या 'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्यातील सीतेच्या व्यक्तिरेखेवर आधारित.

१.१८.३.१ रेणू देशपांडे; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); २७ जुलै १९७५
पारंपरिक पुण्यकथांमध्ये साधले यांचे धाडसी बदल.

१.१८.३.२ वा. रा. कांत; नवशक्ती (दैनिक) : २८ सप्टेंबर १९७५
लेखकाच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर व आदर्शांवर आधारित कादंबरी. मानव हा अज्ञानाच्या तीरावरील युयुत्सु असून त्याच्या युयुत्सुपणात भारतीय पुरुषार्थाचा अर्थ सामावला आहे व प्राप्त कर्तव्याच्या परिभाषेत तो लावला पाहिजे असे लेखकाचे मत असून त्याने रामाच्या बाबतीत पुत्रधर्म आणि पतिधर्म यांच्या चौकटीत तो अर्थ लावला आहे. पतिव्रता स्त्रीचं शीलरक्षण आणि अत्याचारी रावणाचा नाश यांच्या पार्श्वभूमीवर दोन भिन्न संस्कृतींच्या मीलनाचे व राष्ट्रधर्माचे चित्र या पूर्वनियोजित चौकटीत लेखकाने कौशल्याने बसविले आहे. पौराणिक कादंबरीला वर्तमान अर्थ देण्याच्या खांडेकरांच्या दिशेने साधल्यांनी टाकलेले हे वेगळे पाऊल आहे.

१.१९/१ **धन्य अंजनीचा सुत**. कादंबरी; नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई; जयभारत मुद्रणालय, पुणे; ११ मार्च १९७५; २५२; क्राऊन; सोळा रुपये; प्रा. विठ्ठलराव कुळकर्णी आणि इंदिराआई यांच्या ममतेस; वसंत सरवटे; लेखनकाल : ३१ ऑक्टोबर १९७४ ते २५ फेब्रुवारी १९७५; (२.६/१ पहा)

१.१९.२ हनुमंत हा रामाचा मोठा भाऊच असून त्याच्या बुद्धिमत्तेमुळेच उत्तर-दक्षिण एक

होऊन रावणाविरुद्ध लढले, असे प्रतिपादन करणारी पौराणिक कादंबरी. लेखकाच्या 'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्यातील हनुमंताच्या व्यक्तिरेखेवर आधारित.

१.१९.३.१ रेणू देशपांडे; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); २७ जुलै १९७५

पारंपरिक पुण्यकथांमध्ये साधले यांचे धाडसी बदल. 'वैदेही'पेक्षा 'धन्य अंजनीचा सुत' ही अधिक सरस ठरली आहे.

१.१९.३.२ वा. रा. कांत; नवशक्ती (दैनिक); २८ सप्टेंबर १९७५

'महापुरुष'पेक्षा या कादंबरीत आकृतिबंधामध्ये आणि विशेषत: निवेदनशैलीत बदल झालेला आहे. लेखकाचा हेतू भारतीय जीवनादर्शाचे व सांस्कृतिक मानदंडाचे महत्त्व वर्णन करण्याचा असून असे करताना कुठल्याही कलाविषयक हेतूच्या कुबड्या त्याने आधाराला घेतलेल्या नाहीत हे विशेष. अद्भुताला शक्य तेथे मानवी स्पर्श देण्याचा लेखकाचा प्रयत्न असून मारुतीला कौटिल्य व श्रीकृष्ण या धुरंधर मुत्सद्यांचा पूर्वज ठरवून या भारतीय एकात्मतेच्या कल्पनेवरच या कादंबरीची बांधणी केलेली आहे.

१.२०/१ **कुमारसंभव**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, कुलाबा; १९७५; १८४; क्राऊन; पंधरा रुपये; वत्सला कोळोसकर हीस; माला : सोन्याचे पान – १; लेखनकाल : ६ जून १९७५ ते २२ जून १९७५;

१.२०.२ कालिदासाच्या 'कुमारसंभवम्' या संस्कृत महाकाव्याचा 'कादंबरी'च्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.२१/१ **वासवदत्ता**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; अदिती प्रिंटर्स, मुंबई; दिवाळी १९७५; १४४; क्राऊन; बारा रुपये; प्रिय नलिनीस; माला : सोन्याचे पान; लेखनकाल : २५ सप्टेंबर १९७५ ते ५ ऑक्टोबर १९७५;

१.२१.२ भासाच्या 'स्वप्नवासवसत्तम्' या संस्कृत नाटकाचा 'कादंबरी'च्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद. मात्र प्रस्तुत कादंबरीच्या पूर्वरंग, मध्यरंग व उत्तररंग या तीन भागांपैकी फक्त उत्तररंगाचे कथानक तेवढे भासाचे. इतर दोन भागांतील कथानकाला दंतकथा, इतिहासकथा व पुराणांचा आधार.

१.२१.३.१ सु. म. ठाणेकर; नंदा (मासिक); फेब्रुवारी १९७६

विदग्ध साहित्यातील एक उत्कट प्रीतिकथा. वाचकांना कथा समजावी म्हणून मूळ नाटकांचे कादंबऱ्यांत रूपांतर केले ही उल्लेखनीय गोष्ट. नाटक प्रेक्षकांसाठी तर कादंबरी वाचकांसाठी याचे भान. प्रयोग यशस्वी. स्वतंत्र कादंबरीप्रमाणे अनेकदा रंगते. सूचना : प्रत्येक पुस्तकाचे संस्कृत वाङ्मयातील स्थान व वैशिष्ट्य थोडक्यात सांगावे, कारण वाचकांना त्याबद्दल कुतूहल असते.

१.२१.३.२ सदानंद नाईक; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); ८ ऑगस्ट १९७६

या भावानुवादातून लेखकाची सौंदर्यदृष्टी व रसिकपणा प्रकट होतो. मात्र शृंगाराचे साधले

टचेस् हीच लेखकाची मर्यादा. तपशीलाच्या काही चुका आहेत.

१.२२/१ **अजून यौवनात मी**. लेखसंग्रह; परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई; सुलभ मुद्रणालय, पुणे; २० डिसेंबर १९७५; १७३; डेमी; पंधरा रुपये; – स; प्रस्तावना : बाळ सामंत; मुखपृष्ठ व मांडणी : वसंत सरवटे

१.२२.२ जीवनसाहित्य व साहित्यजीवन अशा दोन भागांत असलेले चौदा आत्मपर लेख.

१.२२.२.१ वर्षाव पडो मरणांचा; पृष्ठे ३ ते २८; प्रथम प्रकाशन : मनोरा, दिवाळी १९७४

लेखकाच्या आयुष्यात आलेल्या 'अमृता देव' नामक स्त्रीच्या प्रीतीची, तिच्या दुर्बल वृत्तीमुळे झालेल्या असफल प्रेमाची व असफल तरीही महनीय वाटणाऱ्या प्रेमाच्या क्षणाची दास्तान.

१.२२.२.२ पानाआडचे फूल; २९ ते ४२; आलमगीर, दिवाळी १९७६

'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्याच्या क्रमशः प्रकाशनाच्या कालात परिचित झालेल्या सौ. आशालता सावे यांनी लेखकाला लिहिलेल्या पत्रांचे 'पानाआडचे फूल' नामक ग्रंथरूपाने प्रकाशन करण्यासाठी लेखकाने केलेल्या धडपडीची कहाणी सांगणारा लेख.

१.२२.२.३ कीलोत्पाटीऽव वानरः ॥; ४३ ते ५८; नंदा, दिवाळी १९७४

स्वतःला विदुषी समजणाऱ्या एका प्रौढ कुमारिकेला तिच्या आजारकाळात सोबत केली असता तिच्या अहंमन्य स्वभावाचे जे दर्शन लेखकाला घडले त्याचे अत्यंत खेळकर शैलीत नाट्यछटेच्या अंगाने जात व्यंगचित्रासारखे चित्रण करणारा लेख.

१.२२.२.४ काऽऽव काऽऽव!; ५९ ते ८३; पैंजण, दिवाळी १९७४

लेखकाच्या विवाहबाह्य प्रीतीवर इतरेजनांनी जे दोषारोप केले त्यांचा उपरोधिक शैलीत परामर्श घेणारा लेख.

१.२२.२.५ एकच शांतिस्थान; ८४ ते ८९; सोबत, दिवाळी १९७०

चर्चेसमध्ये लेखकाला जी मनःशांती मिळते ती हिंदू देवळात मिळत नाही, या गोष्टीची कारणमीमांसा करणारा लेख.

१.२२.२.६ मी गातो नाचतो आनंदे; ९० ते १००; निषाद, दिवाळी १९७१

लेखकाने त्याच्या शालेय आयुष्यात सर्वप्रथम जे भाषण दिले व जे गाणे म्हटले, त्या वेळी त्याच्या झालेल्या फजितीची विनोदी शैलीने हकीकत सांगणारा लेख.

१.२२.२.७ नाही मी बोलत; १०१ ते १०६; रुद्रवाणी, दिवाळी १९७३

भाषणाची आमंत्रणे लेखक कशी शिताफीने नाकारतो त्याची खेळकर शैलीत हकीकत सांगणारा लेख.

१.२२.२.८ महाराष्ट्र रामायण – एक कहाणी; १०९ ते ११७; नवशक्ती (दैनिक); २३ ऑगस्ट १९७०

'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्याच्या लेखनामागील प्रेरणा व त्याच्या 'नवशक्ती'

दैनिकातील क्रमश: प्रकाशनामागील हकीकत सांगणारा लेख.

१.२२.२.९ आत्मचरित्राविषयी काही विचार; ११८ ते १२९; सत्यकथा (मासिक); डिसेंबर १९७२

आत्मचरित्र कसे असावे व नसावे याबद्दल लेखकाने स्वत:च्या आत्मचरित्राच्या संदर्भात मांडलेले विचार. त्यात सापवाद सत्य व निरपवाद सत्य केव्हा सांगावे याचा विवेक बाळगण्याला प्राधान्य द्यावे असे मत.

१.२२.२.१० हा जय नावाचा इतिहास आहे; १३० ते १४०; ललित (मासिक); मार्च १९६७

लेखकाच्या 'हा जय नावाचा इतिहास आहे' या वादळी पुस्तकामागे कोणत्या प्रेरणा होत्या व या पुस्तकाची साहित्यविश्वात कशी वेगवेगळी दखल घेतली गेली त्याची माहिती देणारा लेख.

१.२२.२.११ 'संध्या' कचेरी-भटवाडी-सावंतवाडी; १४१ ते १४७; ललित, दिवाळी १९७०

लेखकाने शालेय आयुष्यात चालविलेल्या 'संध्या' नामक हस्तलिखिताची चित्तरकथा सांगणारा लेख.

१.२२.२.१२ माझे पत्रलेखक – मित्र आणि मैत्रिणीही; १४८ ते १५७; ललित, दिवाळी १९७२

लेखकाची पुस्तके – विशेषत: 'हा जय नावाचा इतिहास आहे' व 'मातीची चूल' –वाचल्यानंतर वाचकांनी पत्ररूपाने ज्या प्रतिक्रिया कळविल्या, त्यातून जुळलेल्या स्नेहबंधांची कथा.

१.२२.२.१३ सप्रेम भेट; १५८ ते १६६; रुद्रवाणी, दिवाळी १९७१

लेखकांकडून पुस्तके सप्रेम भेट मिळविण्यासाठी धडपडणारे वाचक व पुस्तके अशी देणे (आणि घेणेही) मान्य नसणारे काही लेखक यांच्याबद्दलचा लेख.

१.२२.२.१४ स्वाक्षऱ्यांशी संवाद; १६७ ते १७३; ललित, दिवाळी १९७१

लेखकाने गोळा केलेल्या विविध साहित्यिकांच्या स्वाक्षऱ्यांमागील आठवणी सांगणारा लेख.

१.२२.३.१ अचला जोशी; सोबत (साप्ताहिक); १२ सप्टेंबर १९७६

१.२२.३.२ शैला कर्णिक; नवनीत (मासिक); ऑक्टोबर १९७६

वैयक्तिक अनुभव. साधल्यांवर संस्कृत वाङ्मयाचे संस्कार विपुल... ह्या सर्व लेखांचा संग्रह वाचताना आपणाला कोणत्याही ललित कृतीचा आस्वाद घेत नसून आपण आनंद साधले वाचतोय याचे भान प्रकर्षाने होत राहते हेच या संग्रहाचे मोठे अपयश.

१.२२.३.३ शांता शेळके; ललित (मासिक); मे १९७६

'१९७५ सालातील ललित गद्य' या लेखात –
या वर्षीचे उल्लेखनीय ललित गद्याचे पुस्तक. पण अलिप्तता नसल्यामुळे लेखनात वरचा सूर. व्यक्तिनिरपेक्षता नसल्यामुळे वाङ्मयीन मूल्याची उणीव. मात्र 'महाराष्ट्र रामायण : एक कहाणी' व 'हा जय नावाचा इतिहास आहे' हे लेख उल्लेखनीय.

१.२३/१ **वसंतसेना**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, कुलाबा; १९७६; २३९; क्राऊन; एकवीस रुपये; साऱ्या गणिकांस; माला : सोन्याचे पान–३; मुखपृष्ठ : बांदोडकर;

१.२३.२ शूद्रकाच्या 'मृच्छकटिकम्' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद

१.२३.३.१ रेखा जोशी; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); ४ जुलै १९७६
या कादंबरीतून साधले यांना वाटणारा स्त्रीविषयक आदर प्रकटतो. त्यांनी शूद्रकाच्या नाटकाला स्वत:चा साज चढविला आहे.

१.२४/१ **जानकीहरण**. लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; स्वानंद मुद्रणालय, कुलाबा; १५ जानेवारी १९७६; १४४; क्राऊन; तेरा रुपये; श्री. हरिभाऊ मोटे, सौ. कृष्णाबाई मोटे या मित्रदंपतीस; मुखपृष्ठ : बांदोडकर;

१.२४.२ विविध संस्कृत ग्रंथांमधील सौंदर्यस्थळे उकलून दाखविणारे व लेखक आणि संस्कृत साहित्य यातील भावबंधाचे विश्लेषण करणारे दहा लेख.

१.२४.२.१ शाकुंतलातील उपमासौंदर्य; पृष्ठे ९ ते १९
कालिदासाच्या 'शाकुंतल' नाटकातील वैशिष्ट्यपूर्ण उपमांचे सौंदर्य उलगडून दाखविणारे विवेचन.

१.२४.२.२ कुमारसंभवातील शृंगारशिल्प; २० ते ३३
कालिदासाच्या 'कुमारसंभवम्' या महाकाव्यातील शृंगार शारीर पातळीवरचा असला तरीही अश्लील नसून कसा कमलपुष्पासारखा टवटवीत आहे ते सांगणारा लेख.

१.२४.२.३ कुमारसंभवातील कल्पनासौंदर्य; ३४ ते ४५
कुमार० मधील तरल कल्पनासौंदर्याचे दर्शन घडविणारा लेख.

१.२४.२.४ रघुवंशातील मनोज्ञ शृंगार; ४६ ते ५९
दिलीप-सुदेष्णेचा वात्सल्याची झालर असलेला आणि अज-इंदुमतीचा कारुण्याचे अस्तर असलेला शृंगार उलगडून दाखविणारा लेख.

१.२४.२.५ रघुवंशातील आदर्श; ६० ते ७२
आदर्शांची जपणूक करण्यासाठी सर्वस्वाचे अर्पण करणाऱ्या राघवांची थोरवी सांगणारा लेख.

१.२४.२.६ स्वप्नवासवदत्त-सुगंधी वेदनेचे स्वप्निल नाटक; ७३ ते ८४

वासवदत्तेने स्वत: होऊन स्वीकारलेले पतिविरहाचे दु:ख वेदना देणारे असले तरी ती वेदना काटेरी नसून सुगंधी आहे असे प्रतिपादन करणारा लेख.

१.२४.२.७ मृच्छकटिक– गुणी गणिकेची कहाणी; ८५ ते ९८

वसंतसेना गणिका असली तरी तिचे चारुदत्तावरील प्रेम किती एकनिष्ठ होते ते पटवून सांगणारा लेख.

१.२४.२.८ महाकाव्यातील स्वप्न – जानकीहरण; ९९ ते ११६

श्रीलंकेतील महाकवी कुमारदासाच्या 'जानकीहरण' या महाकाव्याच्या उपलब्धीचा अद्‌भुत इतिहास सांगून या महाकाव्यातील सौंदर्यस्थळांचा धावता परिचय करून देणारा लेख.

१.२४.२.९ संस्कृत साहित्याने मला काय दिले ?; ११७ ते १२९

संस्कृत साहित्याने अगदी बालवयापासून आपल्यावर जे संस्कार केले त्यातून आपल्याला आपली जीवनदृष्टी प्राप्त झाली असे सांगणारा आत्मपर लेख.

१.२४.२.१० मी संस्कृत साहित्याला काय दिले ?; १३० ते १४४

संस्कृत भाषेच्या व साहित्याच्या आपल्यावरील ऋणाची फेड आपण त्या भाषेतील साहित्याचे सौंदर्य दाखविणारे लेख लिहून अधिकाधिक लोकांपर्यंत ते सौंदर्य पोचविण्याचा करसा प्रयत्न केला ते सांगणारा आत्मपर लेख.

१.२४.३.१ रेखा जोशी; महाराष्ट्र टाइम्स (दैनिक); ४ जुलै १९७६

या लेखांमधून साधले यांचे संस्कृत साहित्यावरील नितांत प्रेम व त्यातील सौंदर्याची इतरांना ओळख पटवून देण्यामागील तळमळ जशी प्रकट होते, तशीच त्यांची जीवनदृष्टी व जीवनातील व्यवहारी-अव्यवहारीपणा प्रकट होतो. मात्र पोटार्थी भाषांतरकर्त्यांना मारलेले टोमणे साधले यांच्या जीवनदृष्टीशी विसंगत वाटतात.

१.२५/१ **इसापनीती** (भाग २) : स्वैर अनुवाद; मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई; ओम् मुद्रणालय, पुणे; १९७७; १४०; डेमी; सहा रुपये; मुखपृष्ठ व चित्रसजावट : वसंत सरवटे; मांडणी : जयंत ताडफळे;

१.२५/२ १९८३; पंधरा रुपये

१.२५.२ १.१३.२ प्रमाणे.

१.२५.३.१ सौ. प्रभा जोग; लोकप्रभा (पाक्षिक); सदर : अक्षरओळख; १८ मे १९८६

या कथा खरं तर प्रौढांसाठी, पण आपण मात्र त्या बालवाङ्मयात घालतो. साधल्यांनी त्या चांगल्या पद्धतीने सांगितल्या आहेत हे नक्की, पण या कथा लेखकाला पुन्हा का सांगाव्याशा वाटतात ते कळले नाही.

१.२६/१ **उर्वशी**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; विजयादशमी १९७७; १७०; क्राऊन; सोळा रुपये; प्रा. दिनकर देशपांडे व

सौ. सुषमा देशपांडे यांस; माला : सोन्याचे पान – ४; मुखपृष्ठ : बांदोडकर;

१.२६.२ कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीयम्' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.२७/१ **मालविका**. कादंबरी; प्रिया प्रकाशन , मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; विजयादशमी १९७७; १९६; क्राऊन; अठरा रुपये; डॉ. नीलकंठ ठोसर आणि सौ. मीरा ठोसर यांस; माला : सोन्याचे पान - ५ मुखपृष्ठ : बांदोडकर;

१.२७.२ कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रम' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.२८/१ **शकुंतला**.कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय,कुलाबा; १९७८; २५४; क्राऊन; पंचवीस रुपये; माझे वडील नीलकंठ अनंत साधले...यांस; माला : सोन्याचे पान – ६; बांदोडकर;

१.२८.२ कालिदासाच्या 'शाकुंतल' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.२९/१ **महाभारतातील मानदंड**.लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; १७८;१३८; क्राऊन; चवदा रुपये; गुरुमित्र नरहर कुरुंदकर यांस; बांदोडकर; (२.९/१ पहा)

१.२९.२ रामायण, महाभारत आणि संस्कृत काव्ये व कवी यांसंबंधी लेखकाचे विचार प्रकट करणाऱ्या दहा लेखांचे संकलन.

१.२९.२.१ महाभारतातील मानदंड; पृष्ठे ११ते २३

महाभारतकार व्यासांसंबंधीचा लेख. कलावंताचे सामर्थ्य जास्तीत जास्त किती उंच जाऊ शकेल याचा व्यास हे जागतिक आणि सार्वकालीन मानदंड आहेत असा विचार प्रकट करणारे मुक्तचिंतन.

१.२९.२.२ सीता : आदिमाता; २३ते ३९; बिल्वदल, दिवाळी १९७७

सारे दाक्षिणात्य आणि औत्तरीय रामायणात रावणाशी लढण्यासाठी सर्वप्रथम जे एकत्र आले त्याची प्रेरणा सीता होती व म्हणून भारतीय संस्कृतीच्या कल्याणमंत्राला प्रेरणा ठरणारी ती पहिली स्त्री म्हणून आदिमाता असे प्रतिपादन करणारा लेख.

१.२९.२.३ सीता आणि द्रौपदी; ३९ ते ५०;

रामाच्या कर्तृत्वामागील प्रेरक शक्ती सीता व महाभारताची नायिका द्रौपदी यांच्या सुखदु:खाचा आलेख काढणारा तौलनिक लेख.

१.२९.२.४ राधा, रुक्मिणी आणि द्रौपदी; ५० ते ६३;

राधा ही काल्पनिक किंवा मूर्त भावना असून प्रेयसी, पत्नी आणि कर्तृत्वामागील प्रेरणा या रूपात अनुक्रमे राधा, रुक्मिणी आणि द्रौपदी या तिघींनी श्रीकृष्णाचे आयुष्य परिपूर्ण

बनवले आहे असे प्रतिपादन करणारे मुक्तचिंतन.

१.२९.२.५ चौदावा सर्ग; ६७ ते ७९;

अर्थगर्भ लिखाणाची भारतीय परंपरा विशद करून कालिदासाच्या रघुवंशातील चवदाव्या सर्गामधील अर्थगर्भ स्थळांचा परिचय करून देणारा लेख. (लेखकाने 'हा लेख 'जानकीहरण' मध्ये समाविष्ट आहे' अशी तळटीप दिलेली असली तरी 'जानकीहरण' मध्ये हा लेख सापडत नाही.)

१.२९.२.६ मालविकाग्निमित्राचा विदूषक; ७९ ते ९१;

संस्कृत नाटकांत सामान्यत: आढळणाऱ्या बिनडोक व खादाड विदूषकांपेक्षा 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकातील विदूषक कसा वेगळा आहे, ते पटवून देणारा लेख.

१.२९.२.७ कालिदास आणि भवभूती; ९१ ते १०१;

या दोन कवींच्या बलस्थानांची समान प्रसंगांच्या साहाय्याने तुलना करणारा लेख.

१.२९.२.८ भवभूतीचा पराक्रम; १०१ ते ११२;

सीतेचा त्याग करण्याचे अमानुष कृत्य करणाऱ्या रामाबद्दलही वाचकांना सहानुभूती वाटावी या पद्धतीने रामाचे दु:ख रंगविण्यात भवभूतीचा पराक्रम, असे मत मांडणारा लेख.

१.२९.२.९. प्रेमवीर विद्यापती बिल्हण; ११२ ते १२८;

'विक्रमांकदेवचरित' कर्ता गुजराथी कवी बिल्हण यांच्या जीवनातील प्रीतिसाक्षात्काराची कथा सांगणारा काव्यात्मक लेख.

१.२९.२.१० मृच्छकटिकातील वर्णाश्रमधर्म; १२८ ते १३८;

शूद्रकाने 'मृच्छकटिकम्' या नाटकात वर्णन केलेली सामाजिक व राजकीय परिस्थिती सांगून तिचे विश्लेषण करणारा लेख.

१.३०/१ **मालती**.कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; १९७८; ३०३; क्राऊन; सव्वीस रुपये; सौ. सुलभा (ताई) आठलेकर आणि श्री. रा. श्री. आठलेकर यांस; माला : सोन्याचे पान – ७; बांदोडकर;

१.३०.२ भवभूतीच्या 'मालतीमाधव' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.३०.३.१ माधुरी भास्करवार; (नागपूर) तरुणभारत (दैनिक); २७ एप्रिल १९८०

या कादंबरीने संस्कृत नाटकांमधील एक सुंदर दालन वाचकांसाठी उघडले आहे.

१.३१/१ **सुगंधाचा पैस**.लेखसंग्रह; सुनंदा प्रकाशन, मुंबई; दिनकर व्यं. सावंत, मुंबई; २१ ऑगस्ट १९७८; १३४; डेमी; पंधरा रुपये; ग. पां. परचुरे आणि सौ. सुधाताई परचुरे यांस; मुखपृष्ठ : प्रभाकर जोगदंड;

१.३१.२ नऊ व्यक्तिचित्रे आणि एक व्यक्तिचित्रसदृश लेख अशा दहा लेखांचे संकलन.

१.३१.२.१ सुगंधाचा पैस; पृष्ठे ९ ते २४; प्रथम प्रकाशन : मौज (वार्षिक); १९७१
लेखक ज्यांना शारदेचा आधुनिक अवतार मानतो त्या दुर्गाबाई भागवतांचे व्यक्तिचित्र रेखाटणारा लेख.

१.३१.२.२ ज्ञानेश्वरी गोडबोले; २५ ते ३६; राजस (मासिक); जून १९७२
ज्ञानेश्वरीचा पारंपरिकांपेक्षा वेगळा अर्थ करणाऱ्या म. शं. गोडबोले यांच्या वक्तशीर आणि शिस्तशीर जीवनाचे दर्शन घडविणारा लेख.

१.३१.२.३ वि. ह. कुळकर्णी; ३७ ते ४६; ललित (मासिक); १९७७
शिष्टाचार हीच जीवनरीती असणाऱ्या वि. ह. कुळकर्णी यांचे व्यक्तिचित्र.

१.३१.२.४ खासे खासेराव; ४७ ते ५६; पैंजण; दिवाळी १९७२
पुस्तकांचे वेड असणाऱ्या आणि विद्वानांसाठी स्वत:च्या संग्रहातील पुस्तके उपलब्ध करून देणाऱ्या खासेराव सावंत यांचे व्यक्तिचित्र.

१.३१.२.५ डॉ. राम गिंडे; ५७ ते ६९; राजस (मासिक); जून १९७५
शल्यशास्त्री डॉ. गिंडे यांच्या रसिक आणि शिस्तशीर व्यक्तित्वाचे चित्रण.

१.३१.२.६ माझी आणखी एक मैत्रीण; ७० ते ८१; सोबत; दिवाळी १९७१
'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्यामुळे पत्रस्नेह जडलेल्या सौ. आशालता सावे यांच्या पत्रातून प्रकटणारे त्यांचे व्यक्तित्व.

१.३१.२.७ ग. पां. परचुरे; ८२ ते ९३; सोबत (साप्ताहिक); १० नोव्हेंबर १९७४
'प्रकाशकांतील पेशवे' अशा ग. पां. परचुरे यांचे व्यक्तिचित्र.

१.३१.२.८ वसंत सरवटे; ९४ ते ९९; ललित (मासिक); मे १९७७
बहुरंगी रसिकता आणि बहुरंगी व्यक्तित्व असणाऱ्या चित्रकार वसंत सरवटे यांचे व्यक्तिचित्र.

१.३१.२.९ दीनानाथ दलाल; १०० ते १२१; दीपावली (मासिक); १९७१
थोर चित्रकार, संपादक व लेखकाचे स्नेही दीनानाथ दलाल यांच्यावरील मृत्युलेख. (हा लेख 'नंदा' व 'पराग' या मासिकांतही पुनर्मुद्रित झाला आहे.)

१.३१.२.१० यत्र द्रुमा अपि मृगा अपि बन्धवो मे ।।; १२२ ते १३४; मनोरा (मासिक); दिवाळी १९७७.
मुंबई नुकतीच सोडून हैदराबादेत स्थायिक झाले असताना मुंबईच्या आठवणीने मनाने तिथे जाऊन पोचले असता लेखकाला तेथील जयवंत दळवी, डॉ. वसंत अवसरे, उमाकांत ठोमरे, व. दि. कुलकर्णी, बाळ सामंत, रवींद्र पिंगे, ग. पां. परचुरे आणि हरिभाऊ मोटे ही मित्रमंडळी कशी भेटतील, काय बोलतील यासंबंधी कल्पिलेली स्मृतिचित्रे.

१.३२/१ **मी राधा, मीच उमा.** कादंबरी; कुळकर्णी ग्रंथागार, पुणे; सुलभ मुद्रणालय,

पुणे; १९७८; ११६; क्राऊन; बारा रुपये; To my friends Shri N. Govind Menon and Sau. Saroj Menon; श्याम जोशी, प्रथम प्रकाशन : मनोरा, दिवाळी १९७८.

१.३२.२ साठी उलटल्यानंतर विशीच्या तरुणीच्या प्रेमात पडून त्यासाठी सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा झुगारण्याची धमक बाळगणाऱ्या एका डॉक्टरची व त्याला तितक्याच समरसतेने साथ देणाऱ्या तरुण प्रेयसीची कथा.

१.३३/१ **चाणक्य**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; १५ जानेवारी १९७९; क्राऊन; सव्वीस रुपये; श्री. शि. द. जोशी आणि सौ. सुलोचना जोशी यांस; माला : सोन्याचे पान – ८; बांदोडकर; (लेखनसहकार्य : सौ. नलिनी साधले)

१.३३.२ विशाखदत्तच्या 'मुद्राराक्षस' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.३४/१ **प्रतिमा**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; प्रमोद प्रिंटर्स, पुणे; रामनवमी १९७९; २१६; क्राऊन; बावीस रुपये; सौ. उषा पंडित – श्री. बाबासाहेब पंडित यांस; माला : सोन्याचे पान – ९; बांदोडकर;

१.३४.२ भासाच्या 'प्रतिमा' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.३५/१ **महापुरुष**. नाटक; कुलकर्णी ग्रंथागार, पुणे; सुलभ मुद्रणालय, पुणे; दिवाळी १९७९; ७०; क्राऊन; तीन रुपये; श्री. रवींद्र पिंगे, सौ. कमल पिंगे आणि मंडळीस; श्याम जोशी;

१.३५.२ लेखकाच्या 'महापुरुष' या कादंबरीवर आधारित नाटक.

१.३६/१ **एकटा**. लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, कुलाबा; १९८०; २०१; क्राऊन; पंचवीस रुपये; चित्रकार वसंत सरवटे यांस; बांदोडकर;

१.३६.२ प्रामुख्याने संस्कृत साहित्यावरील चिंतनात्मक व ललित अशा अकरा लेखांचा संग्रह.

१.३६.२.१ एकटा; पृष्ठे ५ ते २५; राष्ट्रमत, दिवाळी १९७९
आदर्शाचे परिपालन करताना मर्यादापुरुषोत्तम राम अखेरपर्यंत कसा एकाकीच राहिला ते दर्शविणारा लेख.

१.३६.२.२ कैकेयी : लोकमाता; २६ ते ४१; सोबत, दिवाळी १९७९
दिल्या वचनाला हरताळ फासून कुलकीर्ती कलंकित करणारा दशरथ व श्रावणपित्याच्या शापाने जवळ आलेला रामाचा संभाव्य मृत्यू या गोष्टी टाळण्यासाठी स्वत:वर येणाऱ्या कलंकाची क्षिती न बाळगता कैकयी वागली व तिने रामाला वनवासात धाडले. अस

वागणारी ती पहिलीच माता असे सांगणारा लेख.

१.३६.२.३ चाणक्य; ४२ ते ६१; राजस, दिवाळी १९७८

परलोकावर दृष्टी ठेवून न करता राजकारण ऐहिकावर म्हणजे प्रजा कल्याणावर दृष्टी ठेवून करावे असे मानणाऱ्या चाणक्याची राजनीती वर्तमान संदर्भ देत देत स्पष्ट करणारा लेख.

१.३६.२.४ हळूच इवले घेउन चुंबन; ६२ ते ८४; सोबत, दिवाळी १९७८

'शाकुंतल' नाटकातील भ्रमरासंबंधीच्या श्लोकातील व्यंजना भ्रमराच्या व पर्यायाने दुष्यंताच्या चंचलवृत्तीसंबंधाने नसून त्यांच्या प्रीतीतील कोवळिकेविषयी आहे असा युक्तिवाद करणारा लेख.

१.३६.२.५ मालती-माधवातील प्रीतीची संकल्पना; ८५ ते १०४; सागर, दिवाळी १९७९

भवभूतीच्या 'मालती-माधव' नाटकातील प्रीतीची कल्पना ही संयमाला महत्त्व देणाऱ्या भारतीय विचारातील आदर्श प्रीतीची व म्हणूनच इतर नाटककारांपेक्षा वेगळी आहे असे प्रतिपादन करणारा लेख.

१.३६.२.६ भवभूतीचे ओले स्वप्न; १०५ ते १२१; पैंजण, दिवाळी १९७९

स्त्रीच्या कामजीवनातील एक विलक्षण नाजुक अशी शास्त्रीय गोष्ट भवभूतीने 'मालतीमाधव' या नाटकातील मदयंतिकेच्या अनुभवातून कलावंताच्या पातळीवर जाऊन मांडलेली असे दाखविणारा लेख.

१.३६.२.७ वात्सायनाचे कामसूत्र; १२२ ते १३८; पैंजण, दिवाळी १९७८ (भुइकोट, दिवाळी अंकात पुनर्मुद्रित)

मूळ कामसूत्रातील शृंगारासने सांगणारा भाग महत्त्वाचा नसून त्यातील काम म्हणजे काय ते सांगणारा व इतर सामाजिक जीवनाची चर्चा करणारा तात्त्विक भाग अधिक महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन करणारा लेख.

१.३६.२.८ मृच्छकटिकातील विदूषक; १३९ ते १५४;

विदूषकासंबंधीच्या सर्वसामान्य कल्पनेपेक्षा वेगळाच असा 'मृच्छकटिकम्' मधील विदूषक म्हणजे प्रखर संघर्षाच्या प्रसंगी मैत्रीच्या झऱ्याने झुळझुळणारे विश्रांतीस्थानच होय, असे सांगणारा लेख.

१.३६.२.९ मुद्राराक्षस : राजकारण की मित्रकारण ?; १५५ ते १७४; वीरवाणी, दिवाळी १९७९

'मुद्राराक्षस' या नाटकात राक्षसाच्या मित्रकारणाचा उपयोग राजकारणाने करून घेत चाणक्याने स्वत:च्या मनातील हेतू साध्य करून घेतला असे सांगणारा लेख.

१.३६.२.१० हितोपदेश : युद्धतंत्र आणि युद्धकहाणी; १७५ ते १९४; दीपावली, दिवाळी ?

हितोपदेशातून दिसून येणाऱ्या युद्धतंत्राची माहिती देणारा लेख.

१.३६.२.११ कहाणी लंकापुराची; १९५ ते २०१; पूर्वी अप्रकाशित लंकेचा इतिहास, भूगोल व संस्कृती यांसंबंधीचे टिपण.

१.३७/१ **रुक्मिणीस्वयंवर**. अनुवाद; व्हीनस प्रकाशन, पुणे; साधना प्रेस, पुणे; ऑगस्ट १९८०; १०५; डेमी; रुपये दहा; प्रा. रा. श्री. जोग यांच्या स्मृतीस; बांदोडकर;

१.३७.२ महानुभाव कवी नरेन्द्र पंडित यांच्या 'रुक्मिणीस्वयंवर' या काव्याचा भावानुवाद.

१.३८/१ **व्यासांच्या उपनायिका**. लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; प्रमोद प्रिंटर्स, पुणे; १९८१; १३०; क्राऊन; अठरा रुपये; सौ. आशा कोलवाडकर हिच्या स्मृतीस; बांदोडकर;

१.३८.२ महाभारतातील आख्यानांमधील काही नायिकांची व्यक्तिचित्रे. एकूण सात लेख.

१.३८.२.१ दमयंती; १० ते २३;
नलोपाख्यानातून घडणाऱ्या दमयंतीच्या बुद्धिचातुर्याचे दर्शन करविणारा लेख.

१.३८.२.२ देवयानी, २४ ते ३९;
स्वत:च्या व्यक्तित्वाच्या प्रतिष्ठेस जागरूकपणे जपणाऱ्या व परिस्थितीवर मात करून व्यवहारी मार्गाने पुढे जाणाऱ्या देवयानीचे चित्रण करणारा लेख.

१.३८.२.३ शकुंतला; ४० ते ५५
स्वत:च्या आणि पुत्राच्या अधिकारांना प्राणपणे जपणारी व कालिदासाच्या शकुंतलेपेक्षा अगदीच वेगळी असणारी महाभारतातील शकुंतला रंगविणारा लेख.

१.३८.२.४ शर्मिष्ठा; ५६ ते ६८
कुलासाठी आत्मयज्ञ करण्याची तयारी ठेवणाऱ्या व त्याच निष्ठेने जगणाऱ्या शर्मिष्ठेचे चित्रण करणारा लेख.

१.३८.२.५ मत्स्यगंधा-सत्यवती; ६९ ते ८५
नियतीने कौमार्यभंग व वृद्ध पती पदरात बांधल्यावर त्या नियतीविरुद्ध झुंज देताना शंतनुकडून व्यवहारी वर मागणाऱ्या व पर्यायाने भीष्माला आजन्म ब्रह्मचर्य पाळावयास कारणीभूत झालेल्या सत्यवतीची कहाणी चितारणारा लेख.

१.३८.२.६ सीता-सावित्री; ८६ ते १०७
महाभारतात युधिष्ठिराला सांगितलेल्या सीता व सावित्रीच्या उपाख्यानातून दिसणारे त्या दोघींचे चित्र रंगविणारा लेख.

१.३८.२.७ अंबा; १०८ ते १३०
अंबा ही स्त्री-स्वातंत्र्याची उद्गाती होती असे सांगणारा लेख.

१.३९/१ **बिल्वदल**. लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, रायगड; १९८१; २१७; क्राऊन; तीस रुपये; जगद्गुरू श्री आद्य शंकराचार्य यांच्या तेजस्

स्मृतीस;

१.३९.२ संस्कृती, व्यक्ती आणि साहित्यवृत्ती अशा त्रिविध विषयांवरील अकरा लेखांचा संग्रह.

१.३९.२.१ विद्वत्वं रसिकत्वं च; पृष्ठे ११ ते ३२; राजस, दिवाळी १९८०

शृंगेरी पीठाच्या शंकराचार्यांच्या विद्वत्तेबद्दल व रसिकतेबद्दल माहिती सांगणारा व्यक्तिचित्रात्मक लेख.

१.३९.२.२ उचापती, तत्त्ववृत्ती, फलश्रुती; ३३ ते ५४; कवडसे, दिवाळी १९८०

लेखकाने आयुष्यात ज्या विविध उचापती केल्या, त्यामागील त्याची नैतिक भूमिका स्पष्ट करणारा लेख.

१.३९.२.३ संजयाय शंकराय च ।।; ५५ ते ७७; सोबत, दिवाळी १९८०

कामकोटीपीठाचे शंकराचार्य आणि संजय गांधी यांच्या अनुक्रमे धार्मिक आणि राजकीय शक्तीची प्रशंसा करणारा लेख.

१.३९.२.४ माझ्या रक्ताचा माणूस; ८१ ते ११४; राजस (मासिक); फेब्रुवारी १९८०

ग. त्र्यं. माडखोलकरांशी लेखकाच्या असलेल्या उण्यापुऱ्या चाळीस वर्षांच्या भावबंधाचा आलेख काढणारा लेख.

१.३९.२.५ आमच्या बाबांचे घर : नांदेड; ११५ ते १२६; राजस (मासिक); जून १९८०

नरहर कुरुंदकर यांची धाकटी कन्या राणी हिचे लोभस बालचित्र रंगविणारा लेख.

१.३९.२.६ चौदा दिवस? नाही. चौदा वर्षे. वनवास चौदा वर्षे; १२९ ते १४६; वीरवाणी, दिवाळी १९८०

भासाच्या श्लोकाचा भासाला अभिप्रेत अर्थ काय ते सांगणारा लेख.

१.३९.२.७ रात्र संपली. पण...; मेनका, दिवाळी १९८०

भवभूतीच्या 'उत्तरामचरितम्' मधील रामसीतेच्या मानसिक संगाचे चित्रण करणारा लेख.

१.३९.२.८ अशी रंगली प्रीत; १६४ ते १८०; नंदा (मासिक); एप्रिल १९६९

'गीतगोविन्दम्' मधील शृंगाराला राधा-कृष्णाचे अधिष्ठान असल्यामुळे तो अधिक जिवंत आणि मनोज्ञ झाला आहे, हे पटवून देणारा लेख.

१.३९.२.९ दिवाळी आणि होळी : साहित्यातील परंपरेचा मागोवा; १८१ ते १९५; केसरी, होळी १९७८, दिवाळी १९७९

दिवाळी आणि होळी या सणांचे उल्लेख संस्कृत काव्यांमधे कुठेकुठे आढळतात त्याची नोंद घेणारा लेख.

१.३९.२.१० संस्कृत विनोद; १९६ ते २०३; दीपावली (मासिक); जून १९६७

संस्कृत साहित्यात अभावानेच आढळणाऱ्या हास्यरसाचे सोदाहरण दर्शन घडविणारा लेख.

१.३९.२.११ शृंगार आणि SEX; २०४ ते २१७; हेमांगी, दिवाळी १९८०

परदेशी साहित्यातील सेक्स आणि भारतीय साहित्यातील शृंगार या संकल्पनांमागील अधिष्ठानभूत भूमिकांमागील फरक स्पष्ट करून मराठी साहित्यात सेक्स नाही असे मत मांडणारा लेख.

१.४०/१ **हितोपदेश** (भाग १). अनुवाद; मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई; परशुराम प्रोसेस, पुणे; जून १९८१; ११६; डेमी; दहा रुपये; मुखपृष्ठ व सजावट : वसंत सरवटे;

१.४०.२ 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचे मुलांसाठी पुन:कथन.

१.४१/१ **हितोपदेश** (भाग २); अनुवाद; मॅजेस्टिक प्रकाशन; मुंबई; परशुराम प्रोसेस, पुणे; जून १९८१; ९६ (११७ ते २१३); डेमी; दहा रुपये; मुखपृष्ठ-सजावट : वसंत सरवटे

१.४१.२ वरील १.४०.२ प्रमाणे.

१.४२/१ **सोबत**. कथासंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, रायगड; १९८२; २१८; क्राऊन; तीस रुपये; प्रा. रामाचार घनपाठी यांच्या निर्व्याज स्नेहास;

१.४२.२ स्वतंत्र, अनुवादित व आधारित अशा नऊ कथा आणि एक प्रत्यक्ष अनुभव यांचे संकलन.

१.४२.२.१ एक फूल फुलले; पृष्ठे ५ ते २४

एक कळी फूल बनते त्याची स्त्रीजीवनावर केलेली भाष्यरूप कथा. श्री. गुडिपाटी व्यंकटाचलम् या ख्यातनाम तेलुगू कथाकाराच्या 'ओक पुव्वु पूसिन्दि' या कथेचा मुक्त अनुवाद.

१.४२.२.२ सोबत; २५ ते ५८

प्रवासात बसमध्ये शेजारी आलेल्या गर्भवती तरुणीविषयी नायकाच्या मनात क्षणकाल निर्माण झालेल्या अभिलाषेची व तदुत्तर वाटणाऱ्या लाजिरवाणेपणाची कथा.

१.४२.२.३ विश्वस्त; ५९ ते ८३

आपल्या घटस्फोटाचे खरे कारण व पुत्राच्या जन्माचे रहस्य २१ वर्षांनी विश्वस्तपणे पुत्राला सांगण्यासाठी निघालेल्या पित्याच्या पुत्र उद्भट आणि बेजबाबदार निघाल्यामुळे झालेल्या अपेक्षाभंगाची कथा.

१.४२.२.४ नकोशी; ८४ ते १०६

उपेक्षा आणि दारिद्र्य यांना कंटाळून परपुरुषाशी संबंध जोडणाऱ्या आणि नंतर त्याबद्दलच्या अपराध-भावनेने आत्महत्या करणाऱ्या एका विवाहित स्त्रीची कथा.

१.४२.२.५ समांतर; १०७ ते १३५

विधुर पुरुष आणि त्याची द्वितीय पत्नी बनलेली एक प्रौढ कुमारिका यांच्या विवाहाच्या पहिल्या रात्री उभयतांच्या होणाऱ्या मन:स्थितीची व मीलनाची कथा.

१.४२.२.६ पूजा; १३६ ते १५२

प्रेयसीने दुबळेपणामुळे इतराशी विवाह केला असता तिच्या आठवणींची पूजा करण्यातच मग्न राहणाऱ्या प्रियकराची गोष्ट.

१.४२.२.७ चकवा; १५३ ते १६९

शृंगार हवासा वाटणाऱ्या पण त्यासाठी पुढाकार घेऊ न शकणाऱ्या प्रियकराची त्याच्या प्रेयसीच्या निवेदनातून सांगितलेली कथा. माधव ज्यूलियन व शांताबाई कशाळकर यांची आठवण करून देणारी.

१.४२.२.८ वस्त्रहरण; १७० ते १९१

एका टंच भासणाऱ्या नटीच्या टंचपणामागील रहस्य सांगणारी कथा. परदेशी कल्पनेवर आधारित.

१.४२.२.९ सूड; १९२ ते २०६

एक चित्रकार आणि त्याच्या दोन मैत्रिणी यांनी एकमेकांवर उगवलेल्या सूडाची कथा.

१.४२.२.१० मी पुंडले; २०६ ते २१८

लक्षाधीश-कोट्याधीश होण्याच्या कल्पनेने पछाडलेल्या व त्यासाठी पराकोटीची काटकसर करणाऱ्या एका व्यक्तीची कहाणी. 'मातीची चूल' या आत्मचरित्रातही ही व्यक्ती भेटते.

१.४३/१ **चतुर्भाणी बावन्नखणी**; अनुवाद; रविराज प्रकाशन, पुणे; रविराज प्रिंटरी, पुणे; मार्च १९८२; ३२ + ४५ + ५७ + ६२ + ९२ (एकूण २८८); क्राऊन; तीस रुपये; मित्रोत्तम श्री. माधव मनोहर यांस; प्रस्तावना – नरहर कुरुंदकर; मुखपृष्ठ : सालकर (पद्ये : नलिनी साधले)

१.४३/२ ऑगस्ट १९८९; २२६ डेमी; पन्नास रुपये

१.४३.२ 'शृंगारहाट' नामक एकपात्री अशा वेश्याजीवनाचे चित्रण करणाऱ्या चार संस्कृत भाणांचा आशयानुवाद.

१.४३.२.१ मदना तूच तुझा ऋतुराज; १३ ते ४५ (दु.आ. ४२ ते ६६); प्रथम प्रकाशन : पैंजण (मासिक); डिसेंबर १९८१

महाकवी वररुचि मुनी यांच्या 'उभयाभिसारिका' या भाणाचा आशयानुवाद.

१.४३.२.२ दे मला तव प्रीतिची काही खुणा; २ ते ५७; (६८ ते १०९); पैंजण; दिवाळी १९८१

महाकवी शूद्रक याच्या 'पद्मप्राभृतिकम्' या भाणाचा आशयानुवाद.

१.४३.२.३ चांदणी-चौकातली ती चांगली; २ ते ६२ (१११ ते १५६); बुवा, दिवाळी

१९८१

ईश्वरदत्त कृत भाणाचा आशयानुवाद.

१.४३.२.४ माऽऽर प्रिये शिरि लाथ-माझ्या !; २ ते ९२ (१५८ ते २२६); कादंबरी, दिवाळी १९८१

आर्य शामीलककृत 'पादताडितकम्' या भाणाचा आशयानुवाद.

१.४३.३.१ अनिल थत्ते; गगनभेदी (साप्ताहिक); ?

कामनगरीची रसिक कहाणी सांगणारे हे पुस्तक म्हणजे शृंगाररसाचा अमृतकुंभ असून रसिकतेचे पारणे फेडणारे आहे.

१.४४/१ **द्रौपदी**. कादंबरी; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, अलिबाग (रायगड); १९८३; २०७; क्राऊन; पस्तीस रुपये; डॉ. रमेश पोतदार, डॉ. सौ. हेमा पोतदार या मित्रदंपतीस; माला : सोन्याचे पान –१०; बांदोडकर;

१.४४.२ भट्टनारायण रचित 'वेणीसंहारम्' या संस्कृत नाटकाचा कादंबरीच्या घाटात केलेला स्वैर भावानुवाद.

१.४५/१ **हाक**. लेखसंग्रह; प्रिया प्रकाशन, मुंबई; तपस्या मुद्रणालय, अलिबाग (रायगड); १९८४; १९४; क्राऊन; एकोणचाळीस रुपये; डॉ. प्रमोद लाळ्ये व सौ. सिंधुताई लाळ्ये यांस स्नेहपूर्वक.

१.४५.२ रामायण, महाभारत, कथासरित्सागर आदी ग्रंथांमधील व्यक्ती, प्रसंग, विचार यांबद्दलचे लेखकाचे मत प्रकट करणारे बारा लेख.

१.४५.२.१ हाक; पृष्ठे ५ ते ११; प्रथम प्रकाशन : उत्तम, दिवाळी १९७२ व युगवाणी, दिवाळी १९७४

श्रीकृष्ण आणि त्याचे कर्तृत्व फुलविणारी द्रौपदी या दोघांमधील अलौकिक प्रीतीचे दर्शन घडविणारा तरल पातळीवरील काव्यात्म लेख.

१.४५.२.२ नारद; १२ ते ३१; कथाश्री, दिवाळी १९८१

'नारद' या शब्दाचा नेमका अर्थ काय व नारद एक होते की अनेक याचा ऊहापोह करून शेवटी 'नारद' ही कुणी प्रत्यक्ष व्यक्ती नाही तर तो आत्मभवाचा आत्मसुत आहे व त्याचेच दुसरे नाव विवेक आहे असे प्रतिपादन करणारा लेख.

१.४५.२.३ हे स्वतंत्रते, हे सीते !; ३२ ते ४३; (नागपूर) तरुणभारत, दिवाळी १९८२

सीता ही स्त्रीस्वातंत्र्याची प्रथम उद्गाती आहे; आजही स्त्रियांना आपली अस्मिता, आपले स्वत्व टिकवावयाचे असेल तर त्यांनी सीतेचा आदर्श समोर ठेवला पाहिजे; सीतेने यासाठी जी किंमत चुकविली ती चुकविण्यास तयार राहिले पाहिजे; पण याचबरोबर 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते...' अशी परिस्थितीही इथे निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादिणारा लेख.

१.४५.२.४ कथासरित्सागरातील न्यायविचार; ४४ ते ५७; वीरवाणी, दिवाळी १९८२
'कथासरित्सागर' या प्राचीन ग्रंथातील न्यायनिवाडाविषयक अनेक कथा तत्कालीन न्यायविचारावर व सोबतच मानवी स्वभावाच्या विशेष अभ्यासावर कशा प्रकाश टाकणाऱ्या आहेत याचे सोदाहरण विवेचन करणारा लेख.

१.४५.२.५ द्रौपदी : एक आदिमाता; ५८ ते ७४; (नागपूर) तरुणभारत, दिवाळी १९८१
रामायण आणि महाभारत हे दोन्ही अजूनही आपल्याला पूज्य वाटणारे ग्रंथ आहेत. आपल्या सामाजिक, राजकीय प्रश्नांची उकल करण्याचा मार्ग हे ग्रंथ दाखवू शकतात. त्यांपैकी महाभारतातील द्रौपदी ही भारतीय स्त्रीचा आजही आदर्श आहे असे सांगणारा लेख.

१.४५.२.६ श्लोक : शोकलम् आगत:; ७५ ते ९१; वीरवाणी, दिवाळी १९८१
वाल्मीकींच्या हातून क्रौंचवधाच्या दु:खातून शापवचनपर श्लोकाची निर्मिती झाली व याच श्लोकातून पुन्हा त्यांना शोक झाला व हा शोकच रामायणनिर्मितीला कारणीभूत ठरला असे प्रतिपादन करणारा चिकित्सक लेख.

१.४५.२.७ कथासरित्सागर आणि संस्कृत साहित्यशास्त्र; ९२ ते १०५; सोबत, दिवाळी १९८२.
कथासरित्सागरातील कथांच्या संदर्भात संस्कृत साहित्यशास्त्राच्या अपर्याप्ततेचा विचार करणारा लेख.

१.४५.२.८ माझा कर्ण, माझा युधिष्ठिर, माझे महाभारत; १०६ ते १२१; लोकसत्ता (दैनिक); जून १९६९
महाभारताकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन विशद करणारा लेख.

१.४५.२.९ श्रीरामप्रभूंचा रासरंग; भृशुंडि रामायण आणि तुळशीदास; १२२ ते १४३; मेनका, दिवाळी १९७३
स्वत:ला 'भृशुंडिमानसराजहंस' म्हणवून घेणाऱ्या तुळशीदासाने ज्या भृशुंडिचे अनुकरण केले त्या भृशुंडिच्या रामायणाची झलक दाखवून त्यात रामकथा आणि मधुराभक्ती यांचा कसा अनौचित्यपूर्ण संकर दिसून येतो त्याचे विवेचन करणारा लेख.

१.४५.२.१० कथासरित्सागरातील वेताळविचार; १४४ ते १५४; ?
कथासरित्सागरातील वेताळकल्पना आणि पाश्चिमात्यांची Vampire कल्पना यांतील भेद दाखविणारा लेख.

१.४५.२.११ महाभारतातील दृष्टान्तकथा; १५५ ते १७६; नवयुग, दिवाळी १९६६
महाभारतात पंचतंत्र वा इसापनीतीच्या तोडीच्या ज्या काही नीतीकथा आढळतात, त्यांतील तीन कथांचा परिचय घडविणारा लेख

१.४५.२.१२ महाभारतातील काही शलाका; १७७ ते १९४; गौरव, दिवाळी ?
ओम् मुद्रणालय, पुणे १.४/१; १.५/१; १.२५/१; १.५०/१; १.३/२; १.३/३
कनकेश्वर प्रिंटिंग प्रेस, कुलाबा १.११/१
कल्पना मुद्रणालय, पुणे १.३/१; १.६/१; १.१४/१
जयभारत मुद्रणालय, पुणे १.१९/१
तपस्या मुद्रणालय, अलिबाग १.२६/१; १.२७/१; १.२८/१; १.२९/१; १.३०/१; १.३३/१; १.३६/१; १.३९/१; १.४२/१; १.४४/१; १.४५/१; १.४८/१; १.४९/१; १.९/२
नाग मुद्रणालय, नागपूर १.१५/१
परशुराम प्रोसेस, पुणे १.४०/१; १.४१/१; १.४६/१; १.४७/१
प्रमोद प्रिंटर्स, पुणे १.३४/१; १.३८/१
रविराज प्रिंटरी, पुणे १.४३/१; १.५१/१; १.५३/१
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मुंबई १.९/१
लोयल प्रिंटिंग प्रेस, मुंबई १.१/१
श्री ज्ञानेश्वर प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर १.१०/१
संगम प्रेस प्रा. लि., पुणे १.२/१
संजय प्रेस, मुंबई १.१२/१
संजीव मुद्रणालय, पुणे १.१६/१
साधना प्रेस, पुणे १.३७/१
सावंत दिनकर १.३१/१
सुलभ मुद्रणालय, पुणे १.१३/१; १.२२/१; १.३२/१; १.३५/१
स्टेप इन सर्व्हिसेस, पुणे १.५२/१
स्मिता प्रिंटर्स, पुणे १.१८/२
स्वानंद मुद्रणालय, अलिबाग १.१७/१; १.१८/१; १.२०/१ १.२३/१; १.२४/१

२.१.२.४
निर्देशसूची : ४
अर्पण

अत्रे आचार्य १.७/१
आगलावे कांता १.४९/१
आठलेकर सुलभा व आठलेकर रा. श्री. १.३०/१
कुरुंदकर नरहर १.२९/१
कुळकर्णी व. दि. १.१५/१
कुळकर्णी वि. ह. व कुळकर्णी इंदिराबाई १.१९/१
कोलवाडकर आशा १.३८/१
कोळोसकर वत्सला १.२०/१
घनपाठी रामाचार १.४१/१
चौबळ वसंत मोरेश्वर १.३/१
जोशी शि. द. व जोशी सुलोचना १.३३/१
जोशी श्री. बा. १.१७/१
ठोसर नीळकंठ व ठोसर मीरा १.२७/१
तेंडुलकर विजय १.९/१
दलाल दीनानाथ १.६/१
दवे गुरुप्रसाद व दवे कमलाबेन १.५२/१
दळवी जयवंत १.१६/१
नलिनी १.२१/१
परचुरे ग. पां. व परचुरे सुधाताई १.३१/१
पंडित उषा व पंडित बाबासाहेब १.३४/१
पाटील गंगाधर १.१४/१
पांडे श्रीनिवास १.४८/१
पिंगे रवीन्द्र व पिंगे कमल आणि मंडळी १.३५/१
पै शिरीष १.१०/१
पोतदार रमेश व पोतदार हेमा १.४४/१
बेहेरे ग. वा. १.५३/१
मनोहर माधव १.४३/१
मंगेशकर लता १.८/१
मोटे हरिभाऊ व मोटे कृष्णाबाई १.२४/१
रेगे पंढरीनाथ १.५०/१
लाळ्ये प्रमोद व लाळ्ये सिंधुताई १.४५/१
शंकराचार्य १.३९/१
सरवटे वसंत १.३६/१
साधले नीळकंठ अनंत १.२८/१
सावे आशालता १.१८/१

२.१.२.५

निर्देशसूची : ५

प्रस्तावनाकार

कुलंदकर नरहर १.४३/१
कुळकर्णी व. दि. १.७/१
देशपांडे पु. ल. १.८/१
सामंत बाळ १.२२/१

२.१.२.६
निर्देशसूची : ६
मुखपृष्ठ, मांडणी, सजावट

अवचट सुभाष १.४१/१, १.५२/१
कुलकर्णी चंद्रमोहन १.५३/१
जोगदंड प्रभाकर १.१०/१; १.३१/१
जोशी १.१८/२
जोशी श्याम १.३२/१; १.३५/१
ठाकूर बाळ १.६/१
ढवळे १.१६/१
ताडफळे जयंत १.२५/१
पोंक्षे नीला १.९/१
बांदोडकर १.१७/१; १.२३/१; १.२४/१; १.२६/१; १.२७/१; १.२८/१; १.२९/१; १.३०/१; १.३३/१; १.३४/१; १.३६/१; १.३८/१; १.४४/१; १.४९/१
सरवटे वसंत १.१३/१; १.१९/१; १.२२/१; १.२५/१; १.४०/१; १.४१/१; १.४६/१; १.४७/१; १.५०/१
सहस्रबुद्धे पद्मा १.११/१; १.१२/१; १.१४/१; १.१५/१
सालकर १.४३/१; १.५१/१

२.१.२.७
निर्देशसूची : ७
समीक्षक, अभिप्रायलेखक

अत्रे प्र. के. १.३.३.२२
अप्रबुद्ध १.३.३.१४
आठवले अनंत १.३.३.१५;
१.३.३.१६; १.३.३.१८;
१.३.३.१९; १.३.३.२४
आमोणकर १.३.३.५
करंदीकर सदाशिव १.१०.३.४
कर्णिक शैला १.२२.३.२
कऱ्हाडे सदा १.८.३.४; १.१०.३.१
कंटक प्रेमा १.३.३.१०
कांत वा. रा. १.१४.३.१;
१.१८.३.२; १.१९.३.२
कुरुंदकर नरहर १.३.३.५
कुळकर्णी गो. ग. १.८.३.१४
कुळकर्णी प्रभाकर १.५.३.३
कुळकर्णी म. बा. १.६.३.१०
कुळकर्णी वसंत १.५२.३.५
कुळकर्णी वि. ह. १.३.३.१३;
१.७.३.३
केतकर ग. वि. १.५.३.६
केळकर अविनाश १.५.३.५
खांडेकर दिवाकर १.३.३.१७;
१.१८.३.२
खुर्शीकर अनिलकुमार १.३.३.८
गणोरकर प्रभा १.९.३.३
गाडगीळ बाळ १.३.३.२१
ग्रामोपाध्ये गं. ब. १.५२.३.१०
चापेकर के. सी. १.५२.३.७
चितळे दत्ता १.२.३.४
चिन्मुळगुंद पां. ज. १.२.३.५
चौघुले वि. शं. १.१२.३.३
जहागिरदार विश्वास १.१५.३.२.;
१.१५.३.३
जोग प्रभा १.२५.३.१; १.४७.३.१
जोशी अचला १.८.३.१; १.२२.३.१
जोशी प्र. न. १.३.३.४
जोशी रेखा १.२३.३.१; १.२४.३.१
ठाकूर श्रीकृष्ण १.२.३.२
ठाणेकर सु. म. १.२१.३.१
तुळपुळे प्रभा १.५२.३.९
तृत्सु १.५.३.९
थत्ते अनिल १.४३.३.१
दळवी जयवंत १.८.३.१२
दातार अ. ग. १.५२.३.६
देशपांडे ज. शा. १.६.३.८
देशपांडे रेणू १.१८.३.१; १.१९.३.१
देशपांडे वामन १.५०.३.१
देशपांडे सुनंदा १.५१.३.१

नाईक सदानंद १.२१.३.२
नेरूरकर प्र. श्री. १.२.३.१;
१.३.३.१; १.५.३.८; १.८.३.६
परचुरे म. प. १.५२.३.२
परांजपे प्र. ना. १.८.३.७; १.५०.३.२
पै शिरीष १.६.३.२
फडके भालचंद्र १.९.३.२;
१.१०.३.३; १.११.३.२
बेडेकर दि. के. १.३.३.२०
बेहेरे पु. रा. १.६.३.१
भागवत माधुरी १.३.३.२
भास्करवार माधुरी १.३०.३.१
मनोहर माधव १.७.३.७; १.८.३.२;
१.९.३.१; १.१०.३.२;
१.११.३.१
मराठे मालती १.८.३.५
महाजन शरद्चंद्र १.३.३.२३
महाडिक वैजयंती १.५२.३.१
मंगरूळकर सदाशिव १.६.३.६
माडखोलकर उमा १.८.३.३
मोडखोलकर ग. त्र्यं. १.८.३.९;
१.८.३.११
मिरजकर निशिकांत १.६.३.९
मेश्राम केशव १.६.३.५
रेगे पंढरीनाथ १.७.३.२
लेले अरविंद १.७.३.६
वगळ सुधा १.८.३.१०
वैद्य मा. गो. १.१५.३.१
वैद्य राम १.५२.३.८
वैद्य रामकृष्ण १.५२.३.३
शास्त्री अवधूत १.६.३.३
शेष १.२.३.३; १.३.३.१२;
१.३.३.१३
शेळके शांता १.१५.३.४;
१.२२.३.३.
संहिता १.२.३.६; १.७.३.१
सावंत शिवाजी १.५२.३.१
सुभेदार सुनील १.३.३.७; १.५.३.२;
१.५.३.४
क्षीरसागर श्री. के. १.३.३.११

२.१.२.८
निर्देशसूची : ८
नियतकालिके

८.१
दैनिके

केसरी ३.३; १.२.३.४

गोमंतक १.५२.३.१०

तरुण भारत (नागपूर) १.३.३.७; १.५.३.२; १.५.३.३; १.५.३.४; १.८.३.९; १.१५.३.१; १.३०.३.१

तरुण भारत (पुणे) १.३.३.१; १.३.३.१४; १.३.३.२४; १.५.३.६; १.६.३.६; १.७.३.६

नवशक्ती १.५.३.५; १.६.३.१; १.७.३.७; १.८.३.२; १.९.३.१; १.१०.३.२; १.११.३.१; १.१२.३.२; १.१८.३.२; १.१९.३.२; १.२२.२.८; १.५२/१; ३.५५; ३.५६; ३.५७; ३.६०; ३.६१; ३.६२; ३.६३; ३.६४; ३.६५; ३.६६; ३.६७; ३.७०; ३.७१; ३.७२; ३.७३; ३.८२; ३.८३; ३.८६

नवाकाळ १.५.३.१

मराठा १.३.३.२२; १.५.३.७; १.६.३.२.; १.७.३.१; १.८.३.४; १.१०.३.१; १.१०.३.४; १.५२.३.४

मराठवाडा १.२.३.६; १.१५.३.३

महाराष्ट्र टाइम्स १.३.३.२; १.६.३.३; १.७.३.२; १.९.३.३; १.१२.३.३; १.१४.३.१; १.१८.३.१; १.१९.३.१; १.२१.३.२; १.२३.३.१; १.२४.३.१; १.५०.३.२; १.५२.३.११; ३.१६२; ३.१८०; ३.१८६

लोकसत्ता १.३.३.१६; १.६.३.८; १.४५.२.८

सकाळ (मुंबई-पुणे) १.६.३.७

८.२
साप्ताहिके

गगनभेदी १.४३.३.१
मौज ३.७
वैनतेय ३.१०
सोबत १.३.३.२१; १.८.३.१; १.२२.३.१

८.३
पाक्षिके

माणूस १.६.३.९
लोकप्रभा १.२५.३.१; १.५१.३.२

८.४
मासिके, दिवाळी अंक, वार्षिके

अनुराग १.१७.२.२; १.१७.२.६
अनुराधा १.७.३.३; १.१२/१; १.१४.२.१०; १.४९.२.८; १.४९.२.९; ३.१७२; ३.१७३
अभिरुची (त्रैमासिक) १.८.३.५
अलका १.१७.२.८
अमृत १.६.३.१०
अस्मितादर्श १.८.३.६; १.८.३.८; १.१५.३.२
आक्रोश (दिवाळी) १.४९.२.१२
आदित्य (दिवाळी) १.५३.२.३
आलमगीर १.२.३.७; १.३.३.५; १.१४.२.१; १.१४.२.४; १.१४.२.५; १.१४.२.८; १.१४.२.११; १.१४.२.१३; १.२२.२.२
आलोचना १.३.३.३; १.६.३.४; १.७.३.४
आशा (दिवाळी) ३.१५
आशिष (दिवाळी) १.१७.२.७
इंडियन रायटिंग टुडे (वार्षिक) १.३.३.२०
उत्तम (दिवाळी) १.१४.२.१५; १.१५/१; १.४५.२.१
कथाश्री (दिवाळी) १.४५.२.२; १.४९.२.१३
कदंब (दिवाळी) १.५३.२.४
कवडसे (दिवाळी) १.३९.२.२
कळसूलकर हायस्कूल मासिक ३.१
कादंबरी १.४३.२.४
केसरी (दिवाळी) १.३.३.१५, १.३९.२.९.

कोकणमित्र ३.७५; ३.७७
गंमतजंमत (दिवाळी) ३.१६३; १.१६४
गोरक्षण ३.२; ३.८; ३.९; ३.११
गौरव (दिवाळी) १.१७.२.५;
१.१७.२.९; १.४५.२.१२;
३.१५६; ३.१५९; ३.१६१
जयशक्ती १.४९.२.११; ३.१७९
झारापकर ३.१६; ३.२३; ३.२४;
३.२५; ३.२६; ३.२७; ३.२८;
३.२९; ३.३०; ३.३१; ३.३२;
३.३३; ३.३४; ३.३५; ३.३६;
३.३७; ३.३८; ३.३९; ३.४०;
३.४१; ३.४२; ३.४३; ३.४४;
३.४५; ३.४६; ३.४७; ३.४८;
३.४९; ३.५१; ३.५३
टॉनिक (दिवाळी) १.१८१
तरुण भारत (नागपूर (दिवाळी)
१.४५.२.३; १.४५.२.५;
१.५०.२.७; १.५०.२.८
दीपावली १.२/१; १.३/१;
१.३.३.८; १.३.३.१७;
१.७.३.५; १.१४.२.६;
१.१४.२.७; १.१४.२.१२;
१.१४.२.१४; १.१५.२.२;
१.१५.२.३; १.१५.२.५;
१.१५.२.१०; १.१५.२.११;
१.१४.२.१३; १.३१.२.९;
१.३६.२.१०; १.३९.२.१०;
१.३९.२.५; १.५०.२.२.;
१.५०.२.४; १.५०.२.६;
१.५०.२.१०; ३.५८; ३.६८;
३.६९; ३.७४; ३.७६; ३.७८;
३.७९; ३.८०; ३.८१; ३.८४;
३.८५; ३.८७; ३.८८; ३.८९;
३.१४५; ३.१६७
देशदूत (दिवाळी) १.५३.२.२
नयन ३.१२; ३.१३; ३.१४; ३.१७;
३.१८; ३.१९; ३.२०; ३.२१;
३.२२
नवनीत १.२२.३.२
नवयुग (दिवाळी) १.४५.२.११
निषाद (दिवाळी) १.२२.२.६
नंदा १.२.३.२; १.३.३.६; १.७/१;
१.८/१; १.२.३.५; १.९/१;
१.१५.२.९; १.१५.२.१२;
१.१७.२.३; १.१८/१;
१.२१.३.१; १.२२.२.३;
१.३१.२.९; १.३९.२.८; ३.१११
पराग १.३१.२.९
पंचधारा (त्रैमासिक) ३.१८५
पैंजण १.२२.२.४; १.३१.२.४;
१.३६.२.६; १.३६.२.७;
१.४३.२.१; १.४३.२.२;
१.४९.२.७; १.५०.२.७;
१.५०.२.३; १.५३.२.७;
१.५३.२.८; ३.१७६
प्रियंवदा (दिवाळी) १.१५८
बडगुजर (दिवाळी) १.४९.२.१४;
३.१७७
बागेश्री (दिवाळी) १.१४.२.३
बिल्वदल (दिवाळी) १.२९.२.२
बुवा १.४३.२.३; १.४९.२.१०;
१.५०.२.१; १.५०.२.५; ३.१७४
भुइकोट (दिवाळी) १.३६.२.७

मनोरा १.२२.२.१; १.३१.२.१०; १.३२/१
महाराष्ट्र साहित्य पत्रिका (त्रैमासिक) १.८.३.१०; ३.१५४
मेनका ३.३९.२.७; १.४५.२.९; १.४९.२.६; १.५३.२.८; ३.१७०
मौज (दिवाळी) १.३१.२.१
युगवाणी १.४५.२.१; १.५१.३.१
रत्नप्रभा (दिवाळी) १.१७.२.४
राजस १.३१.२.२; १.३१.२.५; १.३६.२.३; १.३९.२.१; १.३९.२.४; १.३९.२.५; १.५०.२.९
राष्ट्रमत (दिवाळी) १.१५.२.४; १.३६.२.१
रुद्रवाणी (दिवाळी) १.२२.२.७; १.२२.२.१३; ३.१३८; ३.१५५; ३.१५७; ३.१६०
ललित १.५.३.८; १.६.३.५; १.८.३.११; १.९.३.२; १.१० ३.३. १.११.३.२; १.२२.२.१०; १.२२.२.११; १.२२.२.१२; १.२२.२.१४; १.३१.२.३; १.३१.२.८; ३.९०; ३.९३; ३.११६
लक्षदा (दिवाळी) ३.१७८
लोकमत (दिवाळी) १.५३.२.११
वसंत १.३.३.११
वीणा १.३.३.१२; १.३.३.१३; १.८.३.३; १.१४.२.२; ३.११० (क्रमशः)
वीरवाणी (दिवाळी) १.३६.२.९; १.४५.२.४; १.४५.२.६
विवेक (दिवाळी) १.३.३.४
शब्दगंध (दिवाळी) १.५३.२.६
शरदश्री (दिवाळी) १.४९.२.३.; ३.१७५
शेरलॉक ३.९१; ३.९२; ३.९३; ३.९४; ३.९५; ३.९६; ३.९७; ३.९८; ३.९९; ३.१००; ३.१०१; ३.१०२; ३.१०३; ३.१०४; ३.१०५; ३.१०६; ३.१०७; ३.१०८; ३.११२; ३.११३; ३.११४; ३.११५; ३.११७; ३.११८; ३.११९; ३.१२०; ३.१२१; ३.१२२; ३.१२४; ३.१२५; ३.१२६; ३.१२७; ३.१२८; ३.१२९; ३.१३०; ३.१३१; ३.१३२; ३.१३३; ३.१३४; ३.१३५; ३.१३६; ३.१३७; ३.१३९; ३.१४०; ३.१४१; ३.१४२; ३.१४३; ३.१४४; ३.१४८; ३.१४९; ३.१५०; ३.१५१; ३.१५२
श्री (दिवाळी) १.१५/१; १.१०९; ३.१२३
श्रीदीपलक्ष्मी (दिवाळी) १.५३.२.५
सकाळ (दिवाळी) ३.१७१
समाज प्रबोधन पत्रिका (द्वैमासिक) १.८.३.७
सत्यकथा १.८.३.१२; १.८.३.१४; १.१७.२.१; १.२२.२.९
सह्याद्री (दिवाळी) १.३.३.१८; ३.१६५

सागर (दिवाळी) ३.३६.२.५
साधना (दिवाळी) १.३.३.९;
१.३.३.१०
साहित्यसूची ३.१८३
सुगंध १.१७.२.१०; १.४८.२.१.;
१.४९.२.४; १.५३.२.१; ३.१६८
सुमनोद्यान ३.४
सेंच्युरी १.२.३.१
स्वरमाला (दिवाळी) ३.१६९
हेमांगी (दिवाळी) १.३९.२.११;
१.५०.२.११; १.५०.२; ३.१८४
क्षितिज (दिवाळी) ३.४७; ३.५०;
३.५२; ३.५४
ज्ञानमंदिर ३.५; ३.६

२.१.२.९
निर्देशासूची : ९

इतर

टीप : प्रस्तुत निर्देशासूचीत मुख्य सूचीमध्ये आलेल्या इतर लेखकांच्या ग्रंथांचा, लेखांचा आणि इतर व्यक्तींचा निर्देश आहे. त्यात ग्रंथ दुहेरी अवतरण चिन्हात, लेख एकेरी अवतरणचिन्हात व व्यक्तिनामे अवतरणचिन्हाशिवाय आहेत.

अवसरे वसंत १.३१.२.१०
''अमरूशतकम्'' १.१५.२.८; १.१५.२.९; ३.७९, ३.८०; ३.८१
ईश्वरदत्त १.४३.२.३
''उत्तररामचरितम'' १.३९.२.७
''उभयाभिसारिका'' १.४३.२.१
एक नाट्यरसिक ३.६३
'एकोणीसशे अडुसष्टमधील मराठी कविता' १.६.३.५
'एकोणीसशे एक्काहत्तर सालातील कादंबरी' १.९.३.२; १.१०.३.३; १.११.३.२
'एकोणीसशे चौऱ्याहत्तर सालातले ललितलेखन' १.१५.३.४
'एकोणीसशे पंचाहत्तर सालातील ललितगद्य' १.२२.३.३
ऑर्सलर १.१७.२.३
''कथासरित्सागरम्'' १.४५.२.४; १.४५.२.७
कालिदास १.२०.२; १.२४.२.१; १.२४.२.२ १.२६.२; १.२७.२; १.२८.२; १.२९.२.५; १.३८.२.३
कुमारदास १.२४.२.८
''कुमारसंभवम्'' १.२०.२; १.२४.२.२; १.२४.२.३
खांडेकर वि. स. १.१८.३.२
''गाथासप्तशती'' १.१५.२.१
''गीत-गोविंदम्'' १.१५.२.१२; १.१५.३.१; १.३९.२.८
गोडबोले म. शं. १.३१.२.२
जयदेव १.१५.२.१२
''जानकीहरण'' १.२४.२.८
ज्युलियन माधव १.४२.२.७
जोशी महादेवशास्त्री १.४८.२.६
ढेरे रा. चिं. १.४८.२.६
ताम्हणेकर म. दु. ३.६२
तुकाराम १.४८.२.६
तुळशीदास १.४५.२.९

''दशकुमारचरितम्'' १.१५.२.५
दंडी १.१५.२.५
दामोदरगुप्त १.१५.२.१०
धनपलवार माणिक ३.१६२
पटवर्धन वसुंधरा ३.६३
''पद्मप्राभृतिकम्'' १.४३.२.२
''पंचतंत्रम्'' १.१४.२.९;
१.१४.२.१०; १.४६/१ १.४७/१
पंडित नरेन्द्र १.३७/२
''प्रतिमा'' १.३४.२; १.३९.२.६
''पादताडितकम्'' १.४३.२.४
''पानाआडचे फूल'' १.२२.२.२
फाटक न. र. ३.५९
भट्टनारायण १.४४.२;
भर्तृहरी १.१५.२.७
भवभूती १.३०.२; १.३६.२.५;
१.३९.२.७
''भागवत'' १.१५.२.१३
भागवत दुर्गाबाई १.२१.२.१
भास १.२१.२; १.३४.२;
१.३९.२.६
''मालती-माधवम्'' १.३०.२;
१.३६.२.५
''मालविकाग्निमित्रम्'' १.२७.२;
१.२९.२.६
''मुद्राराक्षसम'' १.३३.२;
१.३६.२.९
मुनी वररुची १.४३.२.१
''मृच्छकटिकम्'' १.२३.२;
१.२९.२.१०; १.३६.२.८
''मेघदूतम्'' १.१५.२.३;
१.१५.३.१
मोरोपंत १.१५.२.१३
''रघुवंशम्'' १.२९.२.५
''राजगोपालविलास'' ३.१६२
''रुक्मिणीस्वयंवर'' १.३७.२
वाकसकर वि. स. ३.८३
वामन पंडित १.१५.२.१३
वाल्मिकी १.४५.२.६
''विक्रमांकदेवचरितम्'' १.२९.२.९
''विक्रमोर्वशीयम्'' १.२६.२
विशाखदत्त १.३३.२
''वेणीसंहारम'' १.४४.२
व्यंकटाचलम् गुडिपाटी १.४२.२.१
''शाकुंतलम् (अभिज्ञान)'' १.२८.२;
१.३६.२.४
शामीलक १.४३.२.४
शांताबाई (कशाळकर) १.४२.२.७
श्रीधर पंडित १.१५.२.१३
''शृंगारशतकम्'' १.१५.२.७
''शृंगारहट'' १.४३.२
शेले १.४८.२.७
शैला (कु.) ३.६८
'सत्तरच्या दिवाळी अंकातील कादंबऱ्या'
१.१०.३.१
''समयमातृका'' १.१५.२.११
''स्वप्नवासवदत्तम्'' १.२१.२
साधले नलिनी १.३३.१; १.४८.२.५;
५.१.४
सावंत खासेराव १.३१.२.४
सावे आशालता १.२२.२.२;
१.३१.२.६
सोमण कृ. वि. ३.६१
हर्डीकर आप्पासाहेब १.४८.२.४

''हितोपदेश'' १.३६.२.१०;
१.४०.२
''हिरकणी'' – ३.६३

क्षेमेंद्र १.१५.२.११
ज्ञानेश्वर १.४८.२.६

आनंद साधले : साहित्यसूची

३.०.०

खंड तिसरा

३.१.०

परिशिष्टे

३.१.१

परिशिष्ट : १

आनंद साधले : जीवनपट

३.१.२

परिशिष्ट : २

आनंद साधले : एक वेगळा माणूस

डॉ. न. गो. राजूरकर

३.१.१
परिशिष्ट : १
आनंद साधले : जीवनपट

जन्म	पाच जुलै एकोणवीसशे वीस (५.७.१९२०)
जन्मगाव	साळगाव, तालुका : कुडाळ, जिल्हा : सिंधुदुर्ग
शालान्त परीक्षा	सावंतवाडी १९३९ साली
	बी.ए. (संस्कृत, मराठी) रुईया आणि खालसा कॉलेज – १९४९ साली
व्यवसाय	सरकारी नोकरी, सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस १९४० ते १९७५
लेखनाची सुरुवात	१९३५ साली. हिंदी अनुवादित कथा 'मौज' मध्ये प्रकाशित
पहिली कादंबरी	१९३९ साली – 'लढाई संपल्यावर' हे कादंबरीचे नाव. प्रकाशन १९४५ साली. प्रकाशक – महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगाव, मुंबई
पहिले महत्त्वाचे लेख	'परि हरि हा ब्रह्मचारी' १९५७-५८ एम.ए.च्या टर्म्स भरताना.
पहिला महत्त्वाचा ग्रंथ	'हा जय नावाचा इतिहास आहे' 'दीपावलीत' प्रथम प्रकाशित
पहिला विवाह	१९४३ साली. पूर्वाश्रमीच्या कु. रत्नप्रभा जोशी ह्यांच्याशी
मुलं	३ मुली, १ मुलगा
सेपरेशन	प्रथम विवाह दुभंग – १९६३ साली
विवाह विच्छेद	१९७६
द्वितीय विवाह	१९७६ साली. पूर्वाश्रमीच्या डॉ. नलिनी पराडकर यांच्याशी

मुंबई निवास १९३९ ते १९७६

हैदराबाद निवास १९७६ ते आजतागायत

पारितोषिके

१. महाराष्ट्र राज्य शासन पारितोषिक १९६६
'हा जय नावाचा इतिहास आहे' या ग्रंथासाठी

२. महाराष्ट्र राज्य शासन पारितोषिक १९७२
'मातीची चूल' या आत्मचरित्रासाठी

३. महाराष्ट्र राज्य शासन पारितोषिक १९७६
'परि हरि हा ब्रह्मचारी' या लेखसंग्रहासाठी

यानंतर पुस्तके पारितोषिकासाठी पाठवणे आपणहून बंद केले.

सध्याचा वेळ – वाचन, ठराविक लिखाण यात.

३.१.२

परिशिष्ट : २

आनंद साधले : एक वेगळा माणूस

न. गो. राजूरकर

आनंद साधल्यांची व माझी पहिली भेट १९७८ मध्ये हैदराबादेतील एका लग्नाच्या स्वागत समारंभात झाली. साधले हैदराबादेत स्थायिक झाल्याचे माझ्या ऐकण्यात होते, पण तोपर्यंत भेटीचा योग आला नव्हता. 'मातीची चूल' हे त्यांचे आत्मचरित्र मला आवडले होते व म्हणूनच मी त्यांना भेटण्यास उत्सुक होतो. स्वागत समारंभाला खूपच गर्दी होती. हॉल आमंत्रितांनी भरून गेला होता. हॉलमध्ये मी पाऊल टाकताच माझे एक प्राध्यापक मित्र मला म्हणाले, 'चला, मी तुमची आनंद साधल्यांशी ओळख करून देतो.' मी त्यांना विचारले, 'कुठे आहेत आनंद साधले ?' उजव्या दिशेला हात करून ते म्हणाले, 'चष्मा लावलेले व पांढऱ्या बुशशर्टमध्ये जे गृहस्थ पलीकडे उभे आहेत, तेच आनंद साधले.' मी जेथे उभा होतो तेथून चारपाच हातांवर साधले उभे होते. सावळा रंग, साधारण स्थूल व हसऱ्या चेहऱ्याच्या साधल्यांकडे पाहून मी मनाशी म्हणालो, 'अच्छा, हेच ते साधले काय !' अर्ध्या-एक मिनिटानंतर माझ्या मित्रांनी साधल्यांशी माझी ओळख करून दिली. साधल्यांना त्यांनी माझ्याबद्दल बरेच काही सांगितले. खरे पाहता अशा ओळखींना फारसा अर्थ नसतो. लग्नसमारंभातील गोंगाटात ओळख करून देत असताना जे काही सांगितले जाते ते दुसऱ्या व्यक्तीस नीट ऐकूही येत नाही. त्यातून ती व्यक्ती नामवंत असेल तर एकानंतर एक अशी कित्येकांची ओळख त्या व्यक्तीशी करून देण्यात येते. निदान माझ्याबाबत तरी असे होते. गर्दी-गोंधळात एखाद्याशी माझी ओळख करून देण्यात आली तर ती व्यक्ती माझ्या फारशी लक्षात राहात नाही. त्यामुळेच की काय त्या गोंधळात साधल्यांशी होत असलेली ओळख मला फारसे समाधान देत नव्हती. त्यातून माझ्याबद्दल जे काही सांगितले जात होते, ते साधले लक्षपूर्वक ऐकत आहेत असे काही त्यांच्या चेहऱ्यावरून वाटत नव्हते. (साधल्यांनी ते सगळे खूपच लक्षपूर्वक ऐकले होते याची जाणीव त्या ओळखीचे रूपांतर पुढे मैत्रीत झाल्यावर मला झाली.) साधल्यांना जवळून पाहिल्यानंतर माझ्या मनात विचार आला, 'अरेच्या ! आपल्याला वाटत होते त्यापेक्षा साधले पुष्कळच वेगळे दिसतात तर !' साधले हा माणूस गंभीर व उग्र चेहऱ्याचा असेल व त्याला पाहिल्यानंतर मनात भीती निर्माण होत असेल असे त्यांचे आत्मचरित्र वाचल्यावर व त्यातील त्यांचा फोटो पाहून मला नेहमी वाटत असे. पण माझ्यासमोर उभे असलेले साधले अत्यंत सौम्य व हसऱ्या चेहऱ्याचे होते.

थोड्याच वेळात मी तेथून हॉलच्या आतल्या भागात गेलो. जेवण्याची व्यवस्था तेथे करण्यात आली होती. जेवण उत्कृष्ट होते. मित्रमंडळींना भेटण्यात व त्यांच्याबरोबर हास्यविनोद करण्यात एक वेगळा आनंद होता. अर्ध्याएक तासाने मी घरी जाण्यास निघालो. साधले हॉलच्या दाराजवळच उभे असलेले मला दिसले. 'घरी निघाला काय ?' काहीतरी बोलायचे म्हणून मी विचारले. साधल्यांनी काय उत्तर दिले ते मला आज आठवत नाही. पण त्यानंतर ते जे काही म्हणाले त्याने मी थोडासा बुचकळ्यात पडलो. 'ओळखी झाल्या म्हणजे येणे-जाणे वाढते, व त्यात वेळेचा अपव्यय होतो,' अशा अर्थाचे काहीतरी साधले म्हणाले. आपण त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करू नये असेच त्यांना सुचवायचे आहे असे निदान त्या वेळी तरी मला वाटले. (वस्तुत: ते माझ्याशी मैत्री जोडण्याबाबत उत्सुक होते व त्या संध्याकाळी त्यांनी केलेले विधान हे एक सर्वसामान्य विधानाच्या स्वरूपाचे होते हे त्यांची माझी ओळख वाढल्यानंतर माझ्या लक्षात आले.) एकूण पहिल्या भेटीत तरी साधल्यांनी माझी थोडी निराशाच केली.

महिना-पंधरा दिवसांनंतरची ही गोष्ट आहे. सकाळी आठच्या सुमारास मी काचीगुडा स्टेशनवर गेलो असताना, वेटिंग रूममधील वर्तुळाकार टेबलासमोरील खुर्चीवर हातात छत्री घेऊन बसलेले साधले मला दिसले. ओळख वाढवण्याबाबत साधले फारसे उत्सुक नाहीत असा त्यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच माझा ग्रह झाला असल्यामुळे मी तसाच पुढे गेलो व ज्या प्लॅटफॉर्मवर गाडी येणार होती त्यावरील एका बाकावर जाऊन बसलो. थोड्या वेळाने हळूहळू साधले माझ्याच दिशेने येताना मला दिसले. जवळ येताच 'कोण राजूरकर का' असे म्हणत साधले बाकावर माझ्याशेजारी येऊन बसले. (साधले राजूरकरमधील 'जू'चा उच्चार 'मेरा जूता है जापानी'मधील 'जू'सारखा करतात.) त्या सकाळी आमच्या खूप मनमोकळ्या गप्पा झाल्या. नरहर कुरुंदकर त्या गाडीने नांदेडहून येणार असल्याचे साधल्यांनी सांगितले. माझे वडील त्याच गाडीने नांदेडहून येणार असल्याचे मी त्यांना सांगितले. बोलण्याच्या ओघात हैदराबादेतील कोणत्या भागात मी राहतो ह्याची माहिती मी त्यांना दिली. गाडी उशिरा येणार असल्यामुळे आम्ही निरनिराळ्या विषयांवर बोलत होतो. थोरामोठ्यांच्या ज्या आठवणी सांगितल्या जातात त्यांचे सर्वसाधारण स्वरूप काय असते व काय असावे ह्या विषयावर आम्ही बोलत असताना गाडी आली. कुरुंदकर त्या गाडीने आले, माझे वडील काही आले नाहीत. कुरुंदकरांशी दोन-चार मिनिटे बोलून मी घरी आलो.

पुढे दोन-तीन आठवड्यांनंतर, दुपारच्या वेळेस, कॉलेजहून घरी आल्यानंतर मी झोपलो असताना दारावरची घंटी वाजली. मी जागा झालो. माझी पत्नी कुणाशी तरी बोलत होती. जे गृहस्थ आले होते त्यांचा आवाज फारसा ओळखीचा वाटेना. कोण आले असावे ह्याचा विचार करीत मी बाहेरच्या खोलीत आलो. साधले आले होते. मला आनंद झाला व थोडे आश्चर्यही वाटले. स्टेशनवर बोलण्याच्या ओघात मी सांगितलेला पत्ता बरोबर लक्षात ठेवून साधले आमच्या

घरी आले होते. आमच्या गप्पा सुरू झाल्या. बोलता बोलता साधले म्हणाले : 'त्या दिवशी स्टेशनवर तुम्ही मोहम्मद अली जीनांची आठवण सांगत असताना गाडी आली व त्यामुळे ती आठवण अर्धवटच राहिली.' मला आश्चर्य वाटले. जे काही सांगितले जाते ते हा माणूस अत्यंत लक्षपूर्वक ऐकतो ह्याची जाणीव झाली.

आपल्या मित्रांशी साधले खूपच मोकळेपणाने बोलतात. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर खूप विस्ताराने व व्यवस्थित देतात. पण ज्यांना आपण 'Compulsive talker' म्हणतो त्यातले साधले मुळीच नाहीत. साधल्यांना बोलण्यात जितका रस आहे तितकाच दुसऱ्या व्यक्तीचे ऐकून घेण्यातही आहे. कित्येकदा ते इतरांचे बोलणे मध्ये एक शब्दही न बोलता तासन् तास ऐकून घेतात. बऱ्याच वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. एके दिवशी सकाळी नरहर कुरुंदकरांबरोबर साधले आमच्या घरी आले होते. मी आणि कुरुंदकर नेहरूंच्या राजकीय विचारांवर दोन-तीन तास सतत बोलत होतो. साधले मध्ये एकही शब्द न बोलता फक्त ऐकण्याचे काम करत होते. त्यानंतर माझ्या आणि कुरुंदकरांच्या उर्दू काव्यावर गप्पा सुरू झाल्या. मी आणि कुरुंदकर अधूनमधून उर्दू शायरीतील सौंदर्यस्थळे साधल्यांना समजावून सांगत होतो. साधले लक्षपूर्वक ऐकत होते. दुसरा कुणी त्यांच्या जागी असता तर त्याच्या 'ego' ने त्याला गप्प बसू दिले नसते. 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखविण्याकरिता तो काहीतरी बोलत सुटला असता. पण साधले तसे नाहीत. ते फार 'mature' आहेत. संस्कृत काव्य हा साधल्यांचा बालेकिल्ला आहे. आम्ही उर्दू काव्यावर बोलत असताना कोणत्या तरी सोयीच्या क्षणी साधल्यांना संभाषणाची गाडी संस्कृत काव्याच्या रुळावर सहज नेता आली असती. पण मानसशास्त्रात ज्याला 'Secure ego' म्हणतात त्या प्रकारचा साधल्यांचा 'ego' आहे. मुद्दाम ज्ञान पाजळण्याची त्यांना जरूरही नाही व हौसही नाही.

साधले इंग्रजी छान बोलतात. संभाषणाच्या ओघात त्यांच्या तोंडून कित्येक इंग्रजी वाक्ये बाहेर पडतात. आजकाल विद्यापीठात शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्याही इंग्रजीचा दर्जा काय असतो ह्याची मला चांगलीच कल्पना असल्याने, साधल्यांच्या इंग्रजीचे मला आश्चर्यमिश्रित कौतुक वाटते. इंग्रजीवरून एक गोष्ट आठवली. एका विद्यापीठाने माझी तीन व्याख्याने आयोजित केली होती. पहिल्या व्याख्यानाला फक्त प्राध्यापक मंडळी हजर होती. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्राचे विभागप्रमुख होते. विभागप्रमुख महाराष्ट्रीय होते. भाषणाला विद्यार्थी का नाहीत असे मी त्यांना विचारल्यानंतर ते हळूच माझ्या कानात म्हणाले, 'इंग्रजी भाषण प्राध्यापकांना समजले तरी नशीब समजा.' ही पार्श्वभूमी लक्षात घेता साधल्यांच्या इंग्रजीचे कौतुक वाटते.

अमेरिकेतील एका संस्थेतर्फे, साधल्यांना, त्या संस्थेच्या कार्याचा आढावा घेणारी पत्रके येत असतात. साधले त्या संस्थेच्या कार्याने प्रभावित झाले. त्यांनी त्या संस्थेला काही पैसे पाठविण्याचे ठरविले. माझी मुलगी सौ. जयश्री (जी बॉस्टनला असते) तेव्हा हैदराबादेत होती. साधल्यांनी तिच्याबरोबर पैसे पाठविण्याचे ठरविले. त्या संस्थेच्या अध्यक्षांना लिहिलेले पत्र

त्यांनी मला वाचायला दिले. भाषेच्या व त्या पत्रातून व्यक्त केलेल्या विचारांच्या दृष्टीने ते पत्र खरोखरच फार सुंदर होते.

माझी मुलगी जयश्री हिचे लग्न होण्यापूर्वीची ही गोष्ट आहे. साधल्यांच्याकडे गायन-वादनाचा कार्यक्रम होता. साथीला तंबोरा घेऊन जयश्री बसली होती. कार्यक्रमानंतर त्यात भाग घेणाऱ्या प्रत्येकाला भेटवस्तू देण्यात आल्या. जयश्रीला सुंदर कंगवे देण्यात आले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सकाळी दारावरील घंटी वाजली. इतक्या सकाळी कोण आले असावे याचा विचार करीतच मी बाहेरच्या खोलीत आलो. पाहतो तो दारात साधले उभे ! मी दार उघडले. साधले खुर्चीवर येऊन बसले. इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्यावर साधले म्हणाले, ''काल रात्रीपासून मी बेचैन आहे. तुमची मुलगी काल तीन तास तंबोरा घेऊन अवघडून बसली होती. तिला आम्ही काल जे दिले त्याने माझे मुळीच समाधान झालेले नाही. भेट म्हणून माझे एक पुस्तक तिला देण्यासाठी मी आलेलो आहे.'' साधल्यांची ही Sensitivity मनाला हेलावून सोडणारी होती.

जयश्रीच्या लग्नानंतरची गोष्ट. ती मंगळागौर पुजणार होती. सौ. नलिनीताई (सौ. साधले) व रेखाला (नलिनीताईंची भाची. साधले तिला आपलीच मुलगी मानतात.) पूजेला निमंत्रित करण्याकरिता मी त्यांच्या घरी गेलो. दोघीही घरी नव्हत्या. साधले मात्र घरीच होते. त्या वेळी नलिनीताईंच्या मातोश्री तेथेच होत्या. त्या जरा जास्तीच आजारी असल्याचे साधल्यांच्या बोलण्यावरून मला कळले. (घरी वडीलधारे माणूस गंभीर आजारी असल्याने,) जमल्यास त्या दोघींनी पूजेस यावे असे सांगून मी घरी आलो. पूजेच्या दिवशी भल्या सकाळी दारावरची घंटी वाजली. पाहतो तो दारात फुलांनी भरलेल्या दोन मोठ्या पिशव्या घेऊन साधले उभे ! त्यांच्या बागेतील अतिशय सुंदर व रंगीबेरंगी अशी ती फुले होती. मी कुठेतरी आत गलबललो. साधल्यांना म्हणालो, ''अहो कशाला ही तसदी घेतलीत ?'' साधले म्हणाले, ''तसदी कसली ? तुमच्या घरी आज मंगळागौरीची पूजा आहे. तुम्हाला फुलांसाठी वणवण फिरावे लागणार. माझ्या बागेतील फुलांनी अनेक मंगळागौरी साजऱ्या होतात. तुमचा हक्क सर्वांआधी. म्हणून बागेतील फुले घेऊन आलो; इतकेच.'' मी साधल्यांना फुलांबद्दल एका शब्दानेही सांगितले नव्हते. माझ्या घरी पूजा आहे, हे लक्षात ठेवून साधले भल्या पहाटे उठतात काय ! बागेतील निरनिराळ्या प्रकारची फुले निवडून तोडतात काय ! व रिक्षा करून ती मला घरी आणून देतात काय ! हे सारेच भारावून टाकणारे होते. हा माणूस इतरांपेक्षा वेगळा आहे याची कुठेतरी जाणीव करून देणारे होते. त्या दिवशी गौर मुख्यत: साधल्यांच्या बागेतील फुलांनीच सजली होती.

घरी गेलो. खूप गप्पा झाल्या. कुरुंदकर म्हणाले, ''मीही उद्या लग्नाला येणार आहे. उद्या सुटीचा दिवस आहे. लग्नानंतर आपण कॉलेजमधील माझ्या खोलीत (कुरुंदकर तेव्हा नांदेडच्या पीपल्स कॉलेजात प्राचार्य होते.) निवांत गप्पागोष्टी करू. ठरल्याप्रमाणे मी व कुरुंदकर लग्नानंतर कॉलेजमधील त्यांच्या खोलीत गेलो. कुरुंदकरांनी कॉलेज कॅन्टीनमधल्या चहा करणाऱ्या मुलाला बोलाविले व ते त्याला म्हणाले, ''तीन कप उत्तम चहा बनवून आण. हे साहेब हैदराबादेहून आले आहेत. तुझ्या चहाची कीर्ती हैदराबादपर्यंत गेली पाहिजे.'' (माणशी दीड कप चहा हा कुरुंदकरांचा हिशोब.) काही वेळाने चहा आला. तो खरोखरच फार चांगला होता. आमच्या गप्पा दोन-तीन तास खूपच रंगल्या. अतिशय शांत वातावरणात गप्पांना एक वेगळाच रंग भरतो असा माझा अनुभव आहे. बोलता बोलता आनंद साधल्यांचा विषय निघाला. बराच वेळ कुरुंदकर साधल्यांविषयी बोलत होते. त्यांचे एक वाक्य माझ्या मनावर कोरले गेले. कुरुंदकर म्हणाले, ''जिवाला जीव देणारा हा माणूस आहे.'' कुरुंदकरांना एवढा मोठा compliment कोणाला देताना मी क्वचितच ऐकले होते. त्यामुळे त्या वाक्याचा माझ्यावर अधिकच परिणाम झाला. नंतरच्या काळात साधल्यांविषयी कुरुंदकरांचे reading किती बरोबर होते, याची मला वारंवार प्रचिती आली.

साधल्यांनी एखाद्याला मित्र मानले की त्याच्यासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी असते. मित्र अडचणीत सापडला आहे, अथवा त्याला आपल्या मदतीची जरूर आहे हे लक्षात येताच, साधले आपल्या हजार अडचणी बाजूला सारून त्याच्या मदतीला धावतात. अशा वेळी स्वत:चा पैसा, स्वत:ची प्रकृती, स्वत:चा अमूल्य वेळ, यांपैकी कशाचा म्हणजे कशाचाही विचार ते करीत नाहीत. त्यांनी आपल्या मित्रांकरिता केव्हा केव्हा व काय काय केले आहे याची मला कल्पना आहे. पण इतरांशी संबंध असल्यामुळे त्याबद्दल इथे विस्ताराने लिहिणे साधल्यांना आवडणार नाही. मला स्वत:ला कोणत्याही प्रकारची मदत आजतागायत तरी साधल्यांकडून घ्यावी लागलेली नाही. पण हा 'जिवाला जीव देणारा' आपला मित्र, आपल्या घरापासून अवघ्या अर्ध्या मैलाच्या अंतरावर राहतो, ही गोष्ट मला नेहमीच दिलासा देते.

एकदा साधल्यांच्या एका मित्राचे एक वाक्य साधल्यांच्या मनाला खूपच लागले. ते अस्वस्थ मनाने माझ्याकडे आले व बराच वेळ त्याबाबत बोलत राहिले. मला त्यांची ती over-reaction वाटली. साधल्यांनी ती गोष्ट इतकी मनाला लावून घ्यायला नको होती, असे वाटले. पण विचारांती दोन गोष्टी माझ्या लक्षात आल्या. पहिली ही की साधल्यांचे मन हे एका निरागस लहान मुलाच्या मनासारखे आहे. त्यांना एखादी गोष्ट खटकली वा मनाला लागली, तर कोणताही आडपडदा न ठेवता, जे काही मनात असेल ते ते धडाधडा बोलून टाकतात व नंतर ते आपले दु:ख लहान मुलाप्रमाणेच विसरूनही जातात. जेव्हा मित्र त्यांना शब्दाने वा कृतीने दुखावतो, तेव्हा मैत्रीची नाजुकता अर्थातच दुखावलेली असते; पण साधले त्या व्यक्तीबद्दल कधीही आकस मनात ठेवत नाहीत. दुसरी गोष्ट ही की साधल्यांच्या मनाचा पिंड इतरांपेक्षा

साफच निराळा आहे. सर्वसाधारणपणे माणूस तारुण्यातच भावनाप्रधान व आदर्शवादी असतो. त्या वेळी मित्रकर्तव्याबाबत त्याच्या कल्पना फार उच्च असतात. आपण ज्याला मित्र मानतो, त्याने मैत्रीला न शोभेल असे कृत्य केले, तर अशा वेळी त्याला जबरदस्त धक्का बसतो. पण वाढत्या अनुभवाबरोबर हे बदलते. हळूहळू भावनांच्या पात्याची धार बोथट होत जाते. आदर्शवादाला तडे जातात. या जगात असेच होणार, या कटू सत्याची दु:खद जाणीव होते. आपण out of the way जाऊन कुणाला मदत करावयाची नाही; इतरांपासूनही फारशा कशाची अपेक्षा धरावयाची नाही; किंबहुना ज्यांना आपण विश्वसनीय व जवळचे मानतो, तेही आपल्या विरुद्ध जातील ही शक्यता गृहीत धरावयाची, हा व्यवहार आपण शिकतो. तसे बदल आपल्या विचारसरणीत होत जातात. पण साधले हा व्यवहार शिकू इच्छीत नाहीत. जे फारसे स्पृहणीय नाही अशा रूपात त्यांना अनंतवार सामोरे आले असताही, आज सत्तरीच्या उंबरठ्यावर असलेले साधले आजही भावनाप्रधान व आदर्शवादी आहेत. आजही मित्राकरता कोणत्याही संकटाला तोंड देण्याची, कोणताही त्याग करण्याची त्यांची तयारी आहे. म्हणूनच मित्राकडून अपेक्षाभंग होतो, तेव्हा ते अत्यंत व्यथित होतात. परंतु अशी व्यथा कितीही वेळा भेटली तरी तिच्या भयाने ते आपले आदर्शवादी तारुण्य सोडावयास तयार नाहीत. काल कुणी भावनाशून्य व्यवहाराने वागला, म्हणून आज दुसऱ्याशी वागताना ते माणुसकी विसरणार नाहीत.

रागालोभाचे ओझे खांद्यावर घेऊन फिरणे साधल्यांना मानवत नाही. ज्यांना कामाचे डोंगर उपसायचे असतात, त्यांना ही चैन परवडतही नाही. त्यांचा मित्रच असणाऱ्या एका प्रकाशकांनी साधल्यांची दोन चांगली पुस्तके प्रकाशित केली होती. परंतु ती उत्तम खपली तरी साधल्यांना एक कवडीही मानधनापोटी दिली नव्हती. मुंबई सोडून हैदराबादेस स्थायिक होण्याचा निर्णय जेव्हा साधल्यांनी घेतला तेव्हा त्या प्रकाशकाला भेटीला बोलावून साधले म्हणाले, ''तुमच्याकडे माझे काही हजार येणे आहे. तुम्हीही ते मानता. तुम्ही पैसे दिले नाहीत याची खंत मी बाळगावयाची, ते पैसे तुम्ही केव्हा द्याल किंवा द्याल की नाही याची काळजी व हिशोब मी करत बसावयाचे. तुम्हीही तुम्ही माझे देणे आहे हे ओझे सतत मनावर बाळगावयाचे. यातून आपले मैत्रीचे नाते तेवढे गढूळ होईल. यानंतर भेटी होणार नाहीत. तेव्हा तुम्ही अत्यंत मोकळ्या मनाने तुम्ही माझे पैसे देऊ शकत नाही असे मला स्पष्ट सांगा. त्या क्षणी मला सारे पैसे मिळाले असे मी सांगतो. आपण पैशांचा व्यवहार संपवून मोकळ्या मैत्रीने निरोप घेऊ.'' तेव्हा उत्तरादाखल ते प्रकाशक महाशय म्हणाले, ''माझी आर्थिक स्थिती बरी नाही. इच्छा असूनही मी तुमचे पैसे देऊ शकत नाही.'' साधले म्हणाले, ''ठीकं आहे. माझे सर्व पैसे मिळाले.'' साधले शांत होते, पण प्रकाशक अजून अशांत होते. ते म्हणाले, ''जाताना मला मदत म्हणून तुमचे आणखी एक पुस्तक मला द्या.'' कसलेही आश्चर्य वाटू न देता साधल्यांनी बांधाबांधीत जुळवून ठेवलेले व वरच हाताशी असलेले नव्या पुस्तकाचे स्क्रिप्ट त्यांना दिले व ते म्हणाले, ''याही पुस्तकाचे सर्व पैसे मला मिळाले. तुम्ही काही देणे नाही.'' हा जो साधले

नावाचा माणूस आहे तो वेगळा नाही काय? या वेगळेपणाला कुणी शहाणपणा म्हणेल, कुणी वेडेपणा. साधल्यांच्या लेखी तो फक्त साधलेपणा आहे.

साधले खऱ्या अर्थाने scolastic वृत्तीचे आहेत. दुसरा माणूस कोणत्या प्रकारचे कपडे घालतो; कशा प्रकारच्या घरात राहतो; हिंडण्याफिरण्यासाठी कोणते वाहन वापरतो, यापेक्षा तो काय वाचतो, काय लिहितो, बाहेर कोठे गेला तर काय बघतो याचे महत्त्व त्यांना जास्त वाटते. '८८ च्या जून-जुलैमधे मी अमेरिकेला गेलो होतो. ज्या विद्वत्सभेसाठी मला आमंत्रित केले होते ती पश्चिम अमेरिकेत कॅलिफोर्नियात होती, त्यामुळे मला त्या भागात जाण्याची संधी मिळाली. मुलगी, जावई व इतर नातेवाईक अमेरिकेच्या पूर्व भागात राहात असल्याने मला व माझ्या पत्नीला बराचसा पूर्वभाग पाहता आला. मी भारतात परतल्यावर साधले मला भेटायला आले. मी अमेरिकेत काय काय पाहिले हे जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांच्या आवडीनिवडी माहीत असल्यामुळे, अमेरिकेतील malls केवढे मोठे व भव्य असतात, तेथे सोयी कोणत्या व कशा आहेत, सुबत्ता किती आहे हा व या प्रकारचा तपशील मी त्यांना सांगितला नाही. साहित्याशी व इतिहासाशी निगडित असलेल्या व मी पाहिलेल्या ठिकाणांची माहिती मी त्यांना दिली. रॉबर्ट फ्रॉस्ट या कवीचे न्यू हँपशायर या अतिसुंदर भागातील घर आणि भोवतीचा दाट जंगलाचा निसर्गमोही परिसर. यामुळे 'The woods are lovely, dark and deep' या अतिसुंदर कवितेच्या ओळी त्याला सुचल्या नसत्या तरच नवल; मार्क ट्वेनचे बॉस्टन येथील निवासस्थान, अमेरिकेची घटना जेथे तयार झाली, तो फिलाडेल्फियाचा 'इंडिपेंडन्स हॉल', वॉशिंग्टन येथील 'व्हाइट हाऊस' 'एअर ॲंड स्पेस म्युझियम', सेनेटचे जगप्रसिद्ध ग्रंथालय, जेफरसन् मेमोरिअल, लिंकन मेमोरिअल, व इतर अशाच महत्त्वाच्या वास्तूंची व ठिकाणांची माहिती ऐकून साधले हरकून गेले. ते म्हणाले, ''मला ज्या गोष्टींत रस आहे त्यांची माहिती तुम्ही मला दिली. तेथील रस्ते किती गुळगुळीत असतात, इमारती किती भव्य व उंच असतात यात मला रस नाही.'' मला स्वत:ला 'लिंकन मेमोरिअल' फार आवडले होते. ती माहिती मी साधल्यांना सांगितली तेव्हा ती त्यांनी अतिशय उत्सुकतेने ऐकली. लिंकन हे त्यांचे एक श्रद्धास्थान आहे. आपल्या देशाला एक लिंकन हवा आणि to the finish अशी civil war लढून त्याने इथले सर्व प्रश्न सोडवायला हवेत असे साधल्यांना वाटते.

साधले वृत्तीने अत्यंत साधे आहेत. त्यांची राहणीही साधी आहे. हाफ बुशशर्ट व लुंगी या वेषात भाज्या, फळे घेताना अथवा सायकलरिक्षाने फिरताना मी नेहमी त्यांना पाहतो. माझी व त्यांची जेव्हा ओळख झाली तेव्हा मी ट्रूप बाजार (Troop Bazar) या भागात राहात होतो. हा भाग साधल्यांच्या घरापासून दोन-अडीच मैल लांब आहे. गेली दहा वर्षे मी साधल्यांच्याच विभागात म्हणजे हिमायतनगरमधे राहात आहे. तेव्हा त्यांना बघण्या-भेटण्याचे प्रसंग साहजिकच जास्त येतात. एकदा तर मी त्यांना आपल्या नेहमीच्या वेषात रेशनच्या दुकानात क्यू लावून उभे असलेले पाहिले आहे. हैदराबादमधे जेव्हा एखाद्या कार्यक्रमाला साधले जातात,

तेव्हा ते हळूच हॉलच्या कोणत्या तरी कोपऱ्यात जाऊन बसतात. पहिल्या रांगेकडे त्यांचे पाय वळतच नाहीत. पु. ल. देशपांड्यांच्या एका कार्यक्रमात मी त्यांना शेवटच्या रांगेत बसलेले पाहिले आहे. दुर्दैवाने कधीकधी साधले कुठे बसले आहेत, याकडे कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांचे लक्ष जात नाही. मोठा माणूस कुठेही बसला तरी मोठाच दिसतो. त्याला पहिल्या रांगेची आवश्यकता नसते.

एकदोन मित्रांच्या सान्निध्यात साधले खूप बोलतात. पण चारचौघांच्या बैठकीत ते फारसे बोलत नाहीत. आठ-दहा जण जेव्हा एकत्र येतात, तेव्हा संभाषणाचा texture फार निराळा असतो. तेथे श्रवणाची पातळी सर्वात जास्त थिल्लर श्रोत्याच्या पातळीएवढी खाली असते. मला स्वत:ला अशा बैठकीत बोलणे फार अवघड जाते. साधल्यांच्या स्वभावालाही अशा पातळीशी समरस होऊन अघळपघळ गप्पा मारणे रुचत नसावे व मानवतही नसावे. त्यांचे व्याख्यान ऐकण्याचा योग मला अद्याप आलेला नाही. पण लिहिण्याची जशी साधल्यांना हौस आहे तशी व्याख्याने देण्याची नसावी, अशी माझी समजूत आहे.

'तुम्ही जे लिहिता त्यावर लोकांनी टीका केली तर तुम्हाला ते आवडत नाही काय ?' असे मी एकदा साधल्यांना विचारले. माझ्या एका दुसऱ्या मित्राचे काही कारणास्तव तसे मत झाले होते. साधले म्हणाले, ''कुणीतरी तुमचा गैरसमज करून दिला आहे असे तुमच्या प्रश्नावरून वाटते. वाङ्मयीन पातळीवर ज्यांचे माझ्याशी अतितीव्र, कटू ठरावे असे मतभेद आहेत अशा अनेक थोर विद्वानांशीसुद्धा माझे व्यक्तिगत संबंध जिव्हाळ्याचे व मैत्रीचे आहेत.'' त्यानंतर त्यांनी श्री. अनंत आठवले यांसारख्या साधल्यांच्या अत्यंत कठोर टीकाकाराशीही त्यांचे परस्पर प्रेमादराचे संबंध आहेत हे उदाहरणांनीच स्पष्ट केले. ते या टीकाकारांचा सखोल अभ्यास आणि थोर विद्वत्ता मानतात. विद्वत्तेला स्नेहादराचा सन्मान देणे, हा त्यांचा धर्म आहे. हे टीकाकार त्यांच्या टीकेने सन्मान करतात असे साधले मानतात. अशी अनेक उदाहरणे देत शेवटी साधले म्हणाले, ''कोणत्याही अभ्यासाशिवाय केवळ पूर्वग्रहांच्या आधारे कोणी टीकेचा आव आणून उडती बडबड केली तर ती मी ऐकण्याच्याही लायकीची मानीत नाही. टीकेला टीका बनण्यासाठी काही अभ्यास-विचाराची बैठक हवी. हैदराबादेत तरी माझ्यावर कोणीही ताकदीने टीका केलेली आठवत नाही. नागपूरचे पंडित अप्रबुद्ध पाळेकर यांनी माझ्यावर अतिज्वलंत टीका केली. तिच्या विद्वत्तेचा झळाळ असा तेजोमय आहे की त्यांचे चरण धरायलाही मला आनंदच वाटेल.'' या विद्वानांचे साधले या व्यक्तीशी वाकडे नाही. पण ज्या ग्रंथांना ते ईश्वरी वाणी असे धर्मग्रंथ मानतात अशा ग्रंथांवर आणि Classics वर भाष्य करताना, निरनिराळ्या प्रसंगांचा व ओळींचा अर्थ लावताना, आजच्या सामाजिक समस्यांचा संदर्भ साधले लक्षात घेतात, हा त्या श्रद्धावान पंडितांना दैवी वाणीवर अत्याचार वाटतो. पण आपल्या श्रद्धांच्या संरक्षणासाठी ते ठाम पौरुषाने उभे राहतात आणि पारंपरिक विद्वत्तेचा तेजोगर्भ आत्मा प्रकट करतात यासंबंधी साधल्यांना गौरव, आदर वाटतो. कुणाही विद्वान टीकाकाराशी आपले कटुतेचे नाते नाही, हे त्यांनी पटवून

दिले. या सर्वाचा बुद्धीला पटेल असा अर्थ लावण्याचा त्यांचा प्रयत्न कसा असतो याचे त्यांनी सोदाहरण विवेचन केले. त्या दिवशीचे त्यांचे ते तर्कशुद्ध आणि मार्मिक बोलणे मला फारच आवडले.

साधल्यांचे आत्मचरित्र त्यांची ओळख होण्याच्या बऱ्याच आधी मी वाचले होते, याचा उल्लेख लेखाच्या सुरुवातीलाच आला आहे. साधल्यांचे पहिल्या विवाहातील जीवन आनंदी असावे असाच ग्रह आत्मचरित्र वाचून इतरांप्रमाणेच माझाही झाला होता. त्यामुळे त्यांनी दुसरे लग्न केले तेव्हा इतरांप्रमाणेच मलाही आश्चर्य वाटले. नलिनीताईंचा व माझा तेव्हा परिचय नव्हता. पण त्या सुस्वभावी असून स्कॉलर आहेत हे ऐकून होतो. आश्चर्य नलिनीताईंशी लग्न त्यांनी का व कसे केले याबाबत नसून, पहिला विवाह अनपेक्षित रीतीने अयशस्वी का ठरला याबाबत होते. इतरांच्या खाजगी जीवनाबद्दल गैरवाजवी कुतूहल असणाऱ्यांपैकी मी नसल्यामुळे, त्यांचा परिचय झाल्यानंतर, चुकूनही कधी मी त्यांना त्यांच्या खाजगी जीवनाबद्दल प्रश्न विचारले नाहीत. साधल्यांचा स्वभाव व त्यांची व्यासंगी वृत्ती, यांमुळे मला त्यांच्याबद्दल आकर्षण वाटले होते. इतर गोष्टींशी मला कर्तव्य नव्हते. त्यांची ओळख झाल्यानंतर साधारण एक वर्षाने मी त्यांच्या हिमायतनगर भागात राहायला आलो. परत एकदा त्यांचे आत्मचरित्र वाचण्याची इच्छा झाली. घर जवळच असल्याने त्यांच्याकडे जाणे कठीण नव्हते. मी त्यांच्याकडून त्यांचे आत्मचरित्र आणले व परत वाचले. साधारणत: एक आठवड्याने पुस्तक परत करण्यासाठी म्हणून मी त्यांच्याकडे गेलो. साधल्यांनी एकदम मला प्रश्न केला. ''माझ्या पहिल्या विवाहाबद्दल तुम्हाला विचारायचे असेल ?'' वास्तविक पाहता मला याबद्दल काहीही विचारायचे नव्हते. ज्या व्यक्तीची व आपली ओळख झाली आहे ती व्यक्ती त्याच्या आत्मचरित्रातून कशी प्रकट होते हे, परत एकदा ते आत्मचरित्र वाचून मला पाहावयाचे होते. साधल्यांच्या त्या अनपेक्षित प्रश्नाने मी जरासा गोंधळलो. ते साधले यांच्या लक्षात येऊन, आपल्या वैवाहिक जीवनात कशामुळे Crisis निर्माण झाला, त्याचा एका वाक्यातच खुलासा करून साधल्यांनी माझा गोंधळ संपविला. तो खुलासा ऐकून मी दचकलो. कोणत्याही प्रकारचा तपशील जाणून घेण्याचे धैर्य मला झाले नाही. मी घाईत असल्यामुळे दोन-चार मिनिटांतच साधल्यांच्या घराबाहेर पडलो. यानंतर जवळजवळ नऊ वर्षांनी म्हणजे गेल्या वर्षी कधीतरी ते माझ्याकडे आले असताना तो विषय निघाला. आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्यानंतरच्या काळात त्यांच्या जीवनात जे काही घडले, त्याचा समावेश करून आत्मचरित्राची नवी आवृत्ती काढण्याच्या विचारात ते होते. त्याचप्रमाणे मागील घटनांबाबत जे काही लिहावयाचे त्यांनी सकारण टाळले होते, त्याबद्दलही, ती कारणे आता उरली नसल्याने, ते लिहिणार होते. नव्या आवृत्तीबद्दल किंवा कदाचित आत्मचरित्राच्या दुसऱ्या खंडाबद्दल बोलत असताना साधल्यांनी आपल्या जीवनातील त्या crisis बद्दलचा पूर्ण तपशील मला सांगितला. त्या प्रसंगी ते स्वत: कसे वागले याची सर्व माहिती त्यांनी मला दिली. ते सगळे ऐकून माझे डोके बधीर झाले. काही

न बोलताच सुन्न मनाने मी बसून राहिलो. त्यांची काहीही चूक नसताना केवळ अपकारकर्त्यांचेही जीवन उध्वस्त होऊ नये म्हणून इतकी वर्षे या माणसाने सामाजिक अवहेलनेचे घाव सोसले होते. साधले जायला निघाले. त्यांना निरोप देण्यासाठी म्हणून मी उभा राहिलो व फक्त एवढेच म्हणालो, ''Today you have gone up in my esteem.''

असाच एके दिवशी त्या बाजूला काही कामासाठी गेलो असताना मी साधल्यांकडे गेलो. दारावरच्या घंटीवर बोट ठेवले व ती वाजवणार तोच आतल्या खोलीतून गाण्याचा आवाज ऐकू आला. आवाज पुरुषाचा होता. कुणीतरी अत्यंत तन्मयतेने अभंग गात होते. मी एकदम स्वत:शीच म्हणालो, ''अरे! हा तर साधल्यांचा आवाज!'' एवढे तार्किक साधले आणि अभंगात तन्मय, हे मला खरेच वाटेना. मी थोडा वेळ थांबलो. अभंग, कबिराची भजने, चालूच होती. मी घंटी वाजविली. साधले बाहेर आले. तेच गात होते. आपल्या आजारी सासूबाईंना बरे वाटावे म्हणून ते अभंग, दोहे गात बसले होते. त्या अंथरुणाला अत्यवस्थेत खिळून होत्या. त्यांना ऐकू येते याची खात्री नव्हती. पण समजा येत असेलच तर या अखेरच्या दिवसांत त्यांची श्रद्धा असलेल्या देवाचे नाव त्यांच्या कानी पडावे, त्यांचे मन जागे असेल तर आनंदी राहावे; त्यांची प्रकृती सुधारावी, व आपण त्यासाठी होईल ते करावे, अशी साधल्यांची धारणा होती. 'हीच माझी आईही या अवस्थेत असू शकती, मग मी हेच केले नसते का?' अशी त्यांची विचारसरणी होती. आजारापोटी पत्नीचे व मुलीचे कॉलेज त्यांनी बुडू दिले नाही. सासूला आई मानून तेवढा वेळ तिची सेवा केली. इतर नातेवाईक नव्हते अशातला भाग नव्हता. पण त्यांच्या अडचणींमुळे सासूबाई काही महिने साधल्यांकडे होत्या. जोपर्यंत त्या आपल्या घरी आहेत तोपर्यंत त्यांच्या शुश्रूषेत काहीही कमतरता राहू द्यावयाची नाही असा साधल्यांचा निर्धार होता. त्या दोन-तीन महिन्यांत, बाहेर जाणे, लिखाण करणे, कोणत्याही कार्यक्रमात भाग घेणे साधल्यांनी जवळजवळ बंद केले होते. त्या काळी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळा व देदीप्यमान पैलू माझ्या नजरेत आला.

८७ मधील नोव्हेंबरच्या तिसऱ्या किंवा चवथ्या आठवड्यातील ही गोष्ट आहे. माझे मित्र डॉ. एम्. एस्. देशपांडे यांच्या घरी डिनर होते. पु. ल. देशपांडे, पंडित जसराज व अशी इतर मंडळी येणार होती. रात्री साडेआठच्या सुमारास मी तिथे गेलो. पु. ल. व इतरांशी गप्पा झाल्या. जेवणाची व्यवस्था बंगल्यासमोरील पटांगणात टेबल मांडून करण्यात आली होती. माझे स्नेही प्राध्यापक दादेगावकर जेवणाच्या वेळी माझ्या शेजारीच उभे होते. आपल्या नेहमीच्या शांत आवाजात त्यांनी विचारले, ''अशात साधल्यांना भेटला होता काय?'' मला त्यांनी तो प्रश्न सहज विचारला असावा असे वाटले. बऱ्याच दिवसांत साधल्यांची माझी भेट झाली नसल्याचे मी दादेगावकरांना सांगितले. ''एकदा त्यांना भेटून घ्या.'' दादेगावकर काहीशा गंभीर स्वरात म्हणाले. मी चरकलो. दादेगावकरांना विचारले, ''त्यांची तब्येत तर ठीक आहे ना?'' दादेगावकर म्हणाले, ''तशी तब्येत ठीक आहे. पण बाबूभाई छायाशास्त्रींनी त्यांच्या मृत्यूची

जी तारीख दिली आहे ती एक डिसेंबर ८७ ही आहे. साधल्यांनी ती तारीख....'' दादेगावकरांनी वाक्य अर्धवटच सोडले. साधल्यांच्या स्वभावाची मला पुरेशी कल्पना असल्याने दादेगावकरांना काय म्हणायचे होते हे माझ्या पूर्णपणे लक्षात आले. खुद्द साधल्यांशीच या विषयावर अनेकदा बोलणे झाले होते. साधले यांची कसल्याही ज्योतिषावर मुळीच श्रद्धा नाही; देवावर नाही व कर्मकांडात्मक धर्मावरही नाही. तरीही ज्यामागे कोणतीच तार्किक शास्त्रीयता नाही अशा ज्योतिषग्रंथातील त्यांची मृत्युतारीख त्यांनी पक्की स्मरणात ठेवली होती. चर्चा करताना ते पूर्वी मला म्हणाले होते, ''माझे सावरकरांसारखे आहे. सगळ्यात वाईट तेच घडण्याची शक्यता समोर ठेवून मी वागतो. म्हणजे जर ते घडले तर आपण सिद्ध असतो. जर घडले नाही तर आनंदच आहे!'' एक डिसेंबर जवळ येत आहे हे लक्षात घेऊन साधले कसे वागत असतील याची मला आता दादेगावकरांनी न सांगताही कल्पना आली. तसे काही झाले, तर त्यापूर्वी आपली सगळी अपुरी कामे पुरी झालेली असावी; सर्व देणी-घेणी पुरी झालेली असावी; चित्त मृत्यूला सामोरे जावयास व त्याच्या स्वागतास मुक्त असावे, असे साधल्यांनी ठरविले असणार. रेखाच्या शिक्षणाची त्यांनी आधीच उत्कृष्ट व्यवस्था संयोजिली होती. तिला संगीताचे अंग आहे हे लक्षात येताच तिला उत्तम संगीतशिक्षणही मिळेल अशी योजना केली होती. स्वत: तासचे तास रोज शिकवून संस्कृतची गोडी तिच्यात निर्मिली होती. त्यांचे जीवनच व्यापून सुगंधमय करणाऱ्या नलिनीताईंशी त्यांची पक्की समजूत होती. आपला पती मरणाची तयारी करीत आहे, याचा नेमका अर्थ त्यांना समजत होता. ती dead-line डोळ्यापुढे ठेवून, आणखी कोणाबाबत कोणती कर्तव्ये पुरी करावयाची आहेत, त्याच्या ध्यासात साधले असणार. उद्या येणाऱ्या मरणाच्या धास्तीने ते निष्क्रिय कपाळ धरून बसले नसणार, हे सारे माझ्यासमोर आले. मलाच ते एकदा म्हणाले होते, ''I may live for 10 or 15 years more. But I may even die tomorrow. I must always keep myself in readiness'' पुढे ते असेही म्हणाले होते, ''माझ्या पश्चात कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये ह्याची व्यवस्था मी करणार आहे.'' असा माणूस गेले काही दिवस कसा वागत असेल हे समजून घेण्यासाठी ज्योतिष्याची आवश्यकता नव्हती.

तरीही काहीशा अस्वस्थ मन:स्थितीतच मी घरी आलो. साधल्यांच्या आत्मचरित्रातील बाबूभाईंच्या ज्योतिषातील तो उतारा मी माझ्या डायरीत टिपून ठेवला होता. कारण बाबूभाईंवर नसला तरी ज्योतिष या शास्त्रावर माझा विश्वास आहे. मी हौस म्हणून त्या शास्त्राचा थोडा अभ्यासही केला आहे. मी कुंडली पाहतो. साधले यांची कुंडलीही मजपाशी आहे. बाबूभाईंचे भविष्य, त्यांची इतर भविष्ये खोटी झाली, तसेच खोटे होणार, असे माझ्या ज्योतिषशास्त्राच्या तुटपुंज्या ज्ञानावर मला वाटले होते. मी ते साधल्यांना सांगितलेले होते. वर मृत्यूविषयीचे त्यांचे तत्त्वज्ञान लिहिले, ते ते त्याच वेळी बोलले होते.

आता मी घरी आलो आणि बाबूभाईंचा तो उतारा पाहण्यासाठी डायरी काढली. तो उतारा

वाचला. त्यातील साधल्यांच्या मृत्यूसंबंधी वाक्य पुढीलप्रमाणे होते. ''तू सदुसष्ठाव्या वर्षी १९८७ साली मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला हृदयक्रिया बंद पडून मरशील.'' आत्मचरित्रात लगेच या मरणमुहूर्ताची टिंगल करीत साधल्यांनी लिहिले आहे, ''ज्यांना जिज्ञासा असेल त्यांनी माझ्या मरणकाळी माझ्या घरी यावे. मी जिवंत असलो तर कपभर चहा देईन. मेलो असेन तर मला वाहून नेण्यासाठी चार डोकी जमविण्याचा त्रास वाचेल.'' दुरून ही टिंगल ठीक आहे. हा प्रसंग येणार नाही असे माझे reading असले तरी साधल्यांकडे एक-दोन दिवसांत जाण्याचे मी ठरविले. पण एका महत्त्वाच्या कामासाठी बाहेरगावी जाण्याच्या गडबडीत ते राहून गेले. अतिशय घाईगर्दीच्या कार्यक्रमानंतर एक डिसेंबरच्या रात्री मी हैदराबादला परत आलो. साधल्यांची आठवण सदैव होतीच. रात्रीचे साडेनऊ वाजले होते. मी काहीशा घाबरलेल्या आवाजात पत्नीला विचारले, ''काय ग, इकडे सगळे ठीक आहे ना?'' सगळे ठीक आहे असे ती म्हणाली व माझा जीव भांड्यात पडला. पण माझा स्वर घाबरलेला का होता हे काही तिच्या लक्षात आले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळीच मी साधल्यांकडे जायचे ठरविले. दुसरा दिवस उजाडला. भल्या सकाळी दारावरची घंटी वाजली. पाहतो तो दारात साधले उभे! मला अत्यानंद झाला. ज्योतिषशास्त्रावरील माझ्या विश्वासामुळे व जवळचा एक मित्र म्हणून, मी काळजीत असेन हे त्यांनी ओळखले होते. ते पहाटे चारला उठतात म्हणून त्यांची सकाळ माझ्या सकाळच्या आधीच झाली होती, व ते आले होते. राजूरकरमधील 'जू'चा उच्चार 'मेरा जूता है जापानी' मधील 'जू'सारखा करीत साधले दारातूनच ओरडून म्हणाले, ''अहो राजूरकर, काळजी करू नका. मी जिवंत आहे.''

REFBK-0026174

आनंद साधले : साहित्यसूची : डॉ. उमा दादेगावकर

श्री. आनंद साधले हे मराठीचे एक ज्येष्ठ लेखक आहेत. त्यांचा 'हा जय नावाचा इतिहास आहे' हा महाभारतावरील विचारप्रबंध आणि 'मातीची चूल' हे आत्मचरित्र आपल्या निर्भीड आणि प्रांजळ विवेचनामुळे वादळी ठरले. त्यांच्या 'आनंदध्वजाच्या कथा' मधील धीट आणि निर्मळ शृंगार मराठीत शृंगाररसाला प्रतिष्ठा देणारा ठरला तर त्यांनी केलेले संस्कृत अभिजात साहित्याचे अनुवाद रसिक वाचकांवर 'अमृतमेघ' होऊन बरसले. 'महाराष्ट्र रामायण' या महाकाव्याने त्यांना महाकवीची प्रतिष्ठा दिली.

ग्रंथलेखनाचे अर्धशतक केव्हाच पार केलेल्या अशा या बहुप्रसव आणि वादळी वाङ्मयीन व्यक्तित्व असलेल्या लेखकाच्या साहित्याची ही वर्णनात्मक बृहद्सूची आहे. ती सिद्ध करताना डॉ. उमा दादेगावकर यांनी साधले यांच्या प्रत्येक ग्रंथाचा (प्रसंगी त्यातील प्रत्येक कथेचा/लेखाचाही) संक्षेपाने परिचय करून तर दिला आहेच; पण त्याचसोबत त्या त्या ग्रंथावर आलेल्या समीक्षणांचेही सार दिले आहे. एकाच ग्रंथाकडे मराठी समीक्षकांनी किती भिन्न भिन्न दृष्टींनी पाहिले आहे ते या सूचीद्वारे प्रथमच अभ्यासकांपुढे येत आहे, हे या सूचीचे वेगळे वैशिष्ट्य म्हणता येईल. त्यामुळे लेखक साधले कसे घडत गेले याबरोबरच त्या त्या काळातील ग्रंथसमीक्षेचे स्वरूप काय होते तेही समजून घेण्यास मदत होणार आहे.

सूची : स्वरूप, शास्त्र व इतिहास : डॉ. सु. रा. चुनेकर

सूचिशास्त्रावरील अधिकारी व व्यासंगी विद्वान डॉ. सु. रा. चुनेकर यांनी या सूचीला लिहिलेली 'सूची : स्वरूप, शास्त्र व इतिहास' या विषयावरील प्रस्तावना त्यांच्या आजवरच्या या क्षेत्रातील अभ्यासाचे सार ठरावी. सूचींचे विविध प्रकार, त्या सिद्ध करण्यासाठी संशोधकांनी पाळावयाची पथ्ये व विविध सूचींचा ऐतिहासिक आढावा यामुळे ही प्रस्तावना सूचिशास्त्रावरील एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरली आहे. या प्रस्तावनेचा उल्लेख केल्याशिवाय यापुढील सूचिविषयक कोणतेही संशोधन परिपूर्ण ठरू शकणार नाही इतके तिचे महत्त्व आहे.

सूचिकार, वाङ्मयेतिहासकार, समीक्षक, संशोधक, मराठी वाङ्मयाचे विद्यार्थी आणि सर्वसाधारण वाचक अशा सर्वांसाठीच ही सूची उपयुक्त ठरणारी आहे.